म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ७८४७

REFBK-0016308

# संतांच्या आत्मकथा

प्राचीन मराठींतील आत्मकथनात्मक
वाङ्मयाचें दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ४४००२ वि: काव्य
दा.क. १८३०८
REFBK-0016308

संपादक

**रामचंद्र चिंतामण ढेरे**

मूल्य ५ रुपये

पुष्पक प्रकाशन, पुणें

□ प्रकाशक :
ह. ल. निपुणगे
पुष्पक प्रकाशन,
४१३ ब, शनिवार पेठ, पुणें २

□ © रामचंद्र चिंतामण ढेरे

□ प्रथमावृत्ति :
वटपौर्णिमा, शके १८८९
२१ जून १९६७

□ चित्रकार :
सागर आर्ट स्टुडिओ, पुणें

□ मुद्रक :
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस,
४३०।३१, शनिवार पेठ, पुणें २

माझे

अनिमित्तबन्धु

श्री. अनन्तराव लिमये

यांस सस्नेह समर्पण

# निवेदन

'संतांच्या आत्मकथा' मराठी वाचकांच्या हातीं देतांना मला अतीव आनंद होत आहे. बहिणाबाई, कचेश्वर आणि निरंजन रघुनाथ या तीनच मराठी संतांनीं आत्मकथा लिहून ठेवल्या आहेत. संतांच्या या आत्मकथा म्हणजे संत-साहित्याच्या रसिकांसाठीं एक अपूर्व ठेवा आहे. सुमारें पंधरा वर्षांपूर्वी या आत्मकथा मीं प्रथम वाचल्या. तेव्हांपासून त्यांनीं माझ्या मनावर जी मोहिनी घातली आहे, तिला अजूनहि उतार नाहीं.

संतांच्या आत्मकथांचें हें संपादन करण्याच्या निमित्तानें, मीं प्रारंभीं प्राचीन मराठींतील आत्मकथनात्मक वाङ्मयाचा जो विस्तृत परामर्श घेतला आहे, तो प्राचीन मराठीच्या अभ्यासक्षेत्रांत प्राथम्य पावेल असा आहे. आत्मकथा अथवा आत्मचरित्र हा एक वाङ्मयप्रकार म्हणून पद्धतशीरपणें विकसित होऊं लागला, तो एकोणिसाव्या शतकांत आंग्ल वाङ्मयाचा संपर्क घडल्यानंतर. त्यामुळें मराठी आत्मचरित्रात्मक वाङ्मयाचा परामर्श घेतांना अभ्यासकांकडून प्राचीन मराठींतील आत्मकथनाची बहुंशीं उपेक्षाच झालेली आहे. या पार्श्वभूमीवर माझा प्रयत्न प्राचीन मराठीच्या अभ्यासकांना स्वागतार्ह वाटेल, असा मला विश्वास वाटतो.

माझ्या या अल्पशा प्रयत्नानें प्राचीन मराठी वाङ्मयाचें एक महत्त्वपूर्ण, परंतु आजवर कांहींसें अलक्षित राहिलेलें अंग प्राचीन मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांच्या दृष्टीसमोर सातत्यानें रहावें, एवढेंच माझें मर्यादित उद्दिष्ट आहे.

हें संपादन इतक्या नेटक्या स्वरूपांत मराठी वाचकांना सादर करण्याच्या कामीं मला ज्यांचें सहकार्य लाभलें, त्या सर्व स्नेह्यांचा मी ऋणी आहें.

'लोककल्याण,'
७७ शनिवार पेठ, पुणें २

रामचंद्र चिंतामण ढेरे

## अनुक्रमणिका

**प्रस्तावना** ९–६४

प्राचीन मराठींतील आत्मकथन : पूज्यता डोळां न देखावी ९, विनय आणि दीनता १०, गुरुकृपेच्या निमित्तानें आत्मगौरव ११, वाङ्मयी श्रीमूर्ति १२, आत्मकथनात्मक वाङ्मयाचें वर्गीकरण १३, संतांचें स्फुट आत्मकथन १४, एकांक आत्मचरित्र कीं चरित्र ? १८, नामदेवाचें आत्म-चरित्र शंकास्पद २०, 'संप्रदायपरिमळ' –आत्मचरित्र कीं चरित्र ? २४, आनंदमूर्तींचें लघु आत्मचरित्र २७, विठाबाईचें आत्मचरित्र २८, वहेरूचा शोकाविष्कार ३१, चार यात्रावर्णनें ३३, पत्रांतील आत्मकथन ३८, तीन गद्य आत्मचरित्रें ४०–४५.

तीन संतांच्या आत्मकथा : बहिणाबाईची आत्मकथा ४६, कचेश्वरांची 'आदि' ५२, निरंजन रघुनाथांची 'स्वात्मप्रचीति' ५६, आत्मकथा–आत्मप्रचीतिकथा ६२, संतांच्या आत्मकथा आणि संतचरित्रकथा ६३–६४.

**संहिता** ६५–१४२

बहिणाबाई ६५, कचेश्वर ९३, निरंजन रघुनाथ ९७–१४२.

**शब्दार्थ आणि टीपा** १४३–१५९

**परिशिष्टें** १६०–१७१

१ : बहिणाबाईच्या आत्मचरित्राची संहिता १६०, २ : बहिणाबाईचें 'वज्रसूचिकोपनिषद्भाष्य' १६२–१७१.

**प्रस्तावनेची सूची** १७२–१७४

**संदर्भ-साहित्य** १७५–१७६

* * *

# संतांच्या आत्मकथा

पुढील कथेचें अनुसंधान । विचित्र आहे रसाळ गहन ।
करूनि सर्वांगाचे कान । श्रोते जनीं परिसावें ॥

— ' स्वात्मप्रचीति ', १.१०२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९६३०८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

# प्रस्तावना

क्रमांक ........ दि. ........
संकलित ........ नोंद दि. ........

## प्राचीन मराठींतील आत्मकथन

### पूज्यता डोळां न देखावी

'संतांच्या आत्मकथा' हा अपूर्वाईचा विषय आहे. कारण संत स्वतःविषयीं अभावानेंच बोलतात. आपलें पूर्वजीवन, आपल्या ठायीं झालेला मुमुक्षुतेचा उदय, आपण केलेली खडतर साधना, त्या साधनेंत आलेलीं विघ्नें आणि विघ्नांवर मात करतांना तनामनाला झालेले क्लेश, साधनेला परमसिद्धीचें श्रेय प्राप्त करून देणारा गुरु, गुरु आणि आपण यांच्या संबंधांतील नानाविध अनुभव या सर्व गोष्टींचा तपशील संत क्वचितच नोंदवून ठेवतात. संतांच्या ठायीं अमानित्व आणि अदंभित्व पुरेपूर बाणलेलें असतें. स्वतःविषयीं कांहीं बोलायचें झालें, तर ते अत्यंत संकोचून जातात. कुलवधू आपले अवयव ज्या दक्षतेनें झाकते, त्याच दक्षतेनें संत आपलें दान-पुण्य झाकून टाकतात. 'पूज्यता डोळां न देखावी। स्वकीर्ती कानीं नायकावी।' हा त्यांच्या वागण्याचा दंडक. एवढेंच

नव्हे, तर 'हा अमुका' अशी जाणीवहि लोकांना होऊं नये, याची ते सदैव काळजी घेतात. 'माझें असतेपण लोपो। नांवरूप हारपो।' अशी ज्यांची आकांक्षा असते, ते संत आपल्या जीवनाचा तपशील पुरवतील, अशी अपेक्षा करण्यांत अर्थ उरत नाहीं. ज्ञानदेवांनीं अमानित्वावर व्याख्यान करतांना संतांचा हा वृत्तिविशेष विस्तारानें स्पष्ट केला आहे. ते म्हणतात—

> **वाचस्पतीचेनि पाडें। सर्वज्ञता तरी जोडे।**
> **परि वेडिवेमाजीं दडे। महिमेभेणें॥**
> **चातुर्य लपवी। महत्त्व हारवी।**
> **पिसेपण मिरवी। आवडोनि॥**

—ज्ञानेश्वरी १३.१९०–१९१

साक्षात् वाचस्पतीशीं बरोबरी करणारी सर्वज्ञता आपल्या ठायीं असतांनाहि, केवळ आपलें महिमान वाढेल, या भयानें संत वेडिवेमाजीं लपतात, असें ज्ञानेश्वरांनीं स्पष्टच सांगून ठेवलें आहे. याच अमानित्वाच्या वृत्तींतून ज्ञानदेवांनींहि आपलें सर्व चातुर्य आणि महत्त्व लपविण्याचा प्रयत्न केला. अमृतातेंहि पैजा जिंकूं पाहणारा हा ज्ञानियांचा राजा 'वांचौनि पढें ना वाची। ना सेवाही जाणें स्वामीची। ऐसिया मज ग्रंथाची। योग्यता कें असे॥' (ज्ञा. १८.१७४३) असा विनय जेव्हां दाखवितो, तेव्हां संतांच्या ठायीं बाणलेल्या अमानित्वाची स्पष्ट जाणीव होते.

संतांचें हें अमानित्व – स्वतःच्या महत्त्वाची जाणीव विरवून टाकण्याची ही निरहंकारवृत्ति त्यांच्या परमार्थाला नितांत उपकारक असली, तरी संतप्रेमी जनांना मात्र, संतांच्या अमानित्वामुळें त्यांचें चरित्र जाणण्याची अनावर ओढ अतृप्तच राखावी लागते.

## विनय आणि दीनता

संत तुम्हां-आम्हांशीं बोलतांना स्वतःला लपवीत असले, तरी देवाशीं बोलतांना मात्र ते पुष्कळच मोकळे बनलेले दिसतात. त्या सर्वज्ञ आणि सर्वव्यापक अशा प्रभूपासून काय आणि कसें लपविणार? जो सर्वांचा अंतर्यामी आहे, त्याला न दिसणारें आणि न समजणारें कांहींच असूं शकणार नाहीं, अशी संतांची दृढ

श्रद्धा असल्यामुळें आपलें सर्व भलेंबुरें संचित देवाजवळ उघडें करून सांगावें आणि ' मी आहें हा असा आहें,' या भूमिकेंतून त्याच्याकडे उद्धाराची याचना करावी, असें त्यांना सदैव वाटत राहतें. या वाटण्याला एक वेगळीच मर्यादा आहे. ती मर्यादा अशी कीं, देवाजवळ बोलतांना संत आत्यंतिक दीनता प्रकट करतात. आपण सर्व प्रकारें पतित आहोंत, आपलें जीवन म्हणजे अनेकविध अवगुणांचें गांठोडें आहे, अशीच त्यांची भूमिका असते. स्वतःच्या ठिकाणीं त्यांना गुणांचा, सामर्थ्याचा आढळच होत नाहीं. ' मी तों दीनाहूनि दीन, ' असा त्यांचा स्वतःविषयींचा अभिप्राय असतो. आत्मकथनाला प्रेरक ठरणारी जी अस्मिता वा अहंता, तीच समूळ खणून टाकण्यासाठीं धडपडणारे संत स्वतः-विषयीं बोलणार तरी कसे ? आत्मकथन हा त्यांना आत्मगौरवाचाच प्रकार वाटतो आणि ' जो आपुली आपण स्तुती करी ', त्याचा तर संतांनीं 'मूर्खां'च्या यादींत समावेश केली आहे ( दासबोध, २.१.१२ ).

## गुरुकृपेच्या निमित्तानें आत्मगौरव

आपला गुणसमुच्चय आणि आपलें सामर्थ्य संतांनीं सर्वस्वानें लपविलें आहे, असा मात्र याचा अर्थ नाहीं. संतहि अनेकदां आत्मविश्वासानें बोलतात – अगदीं पराकोटीच्या अहंकाराला जेवढी धार असते, तेवढीच धार कित्येक वेळां संतांच्या आत्मकथनाला येते. परंतु असें सर्व आत्मकथन प्रायः गुरुकृपेचा वा प्रभुकृपेचा गौरव गाण्याच्या निमित्तानें होत असतें. प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्या विश्वामित्रा-लाहि खिजविण्याइतकें सामर्थ्य आपण निर्माण केलेल्या शब्दसृष्टींत आहे, असें ज्ञानेश्वरांना म्हणायचें असेल, तर ते आपल्या शब्दसामर्थ्याचें सर्व श्रेय आपल्या गुरुदेवांना देऊन म्हणतील –

> जी मजलागी ग्रंथाची स्वामी । दुजी सृष्टि केली तुम्हीं ।
> ते पाहोनि हांसों आम्ही । विश्वामित्रातें ॥
>
> —ज्ञानेश्वरी, १८·१७६५

श्रीगुरूंच्या कृपेनें आपण कृतकृत्य झालों, आपल्या सकळ कामनांचा उपशम झाला, अशी संतृप्ति व्यक्त करतांना ज्ञानदेवांनीं गुरुकृपेला पात्र होणाऱ्या आपल्या साधनेचा अभावितपणें कसा उल्लेख केला आहे तो पहा—

माझिया सत्यवादाचें तप । वाचा केलें बहुत कल्प ।
तया फळाचें हें महाद्वीप । पातली प्रभु ॥
पुण्यें पोशिलीं असाधारणें । तियें तुझे गुण वानणें ।
देऊनि मज उत्तीर्णें । जालीं आजी ॥

—ज्ञानेश्वरी, १८·३२–३३

" हे प्रभो, माझ्या वाचेनें पुष्कळ कल्पपर्यंत सत्यव्रत पाळलें, त्या तपाचें फळ मला हें मिळालें आहे कीं, या गीताव्याख्यानरूपी बेटाला माझी वाचा सुखरूप येऊन पोचली आहे. मीं लोकोत्तर पुण्यें आचरलीं, म्हणून तुझें गुण-वर्णन करणें हा प्रसाद मला देऊन माझीं तीं पुण्यकर्में माझ्या ऋणांतून मुक्त झालीं आहेत ! " —या उद्गारांत ज्ञानदेवांनीं आपण प्रदीर्घ काळपर्यंत आचरिलेल्या सत्यव्रताचा आणि असाधारण पुण्यकर्मांचा उल्लेख अप्रत्यक्षपणें केला आहे.

## वाङ्मयी श्रीमूर्ति

खरें म्हणजे अशा अप्रत्यक्ष आत्मकथनपर उल्लेखांतून होणारें संतदर्शन फारच पुसट आणि अंधुक असतें. या असल्या अप्रत्यक्ष उल्लेखांतून संतांच्या मूर्ति आपल्यापुढें उभ्या राहूं शकत नाहींत. परंतु त्या त्या संताची समग्र वाणी जर आपण धांडोळली, तर त्या वाणींतून त्याचें आंतरजीवन मात्र अनेकांगांनीं आपल्यापुढें प्रस्फुटित होतें. ' अंतरींचें धांवे स्वभावें बाहेरी ', या उत्कटतेनें आणि प्रांजलपणानें जें जें लिहिलें गेलें आहे, तें सर्व संतवाङ्मय संतांच्या अंत-रंगावर स्पष्ट प्रकाशझोत टाकण्यास समर्थ असतें. ' गीता जाणा हे वाङ्मयी । श्रीमूर्ति प्रभूची ॥ ' असें जें ज्ञानदेवांनीं गीतेविषयीं म्हटलें आहे, तें ज्ञानेश्वरी-लाहि लागू पडतें. ज्ञानेश्वरी ही ज्ञानदेवांची ' वाङ्मयी श्रीमूर्ति ' आहे– ज्ञानेश्वरींत ज्ञानदेवांच्या विराट् व्यक्तिमत्त्वाचें रहस्य शब्दांच्या लाखो कळ्यांतून उमलून आलें आहे, हें आपणांस तत्काळ जाणवतें. दासबोध वाचतांना समर्थांच्या उत्कट भव्य व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आपल्या मनावर चटकन् उमटतो आणि मग ' आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध । ' हा समर्थांचा त्यासंबंधींचा ' सांगावा ' आपल्याला तंतोतंत प्रत्ययास येतो. ' अणुरणीया थोकडा ' असलेला तुका

'आकाशाएवढा कसा झाला, याची कल्पना तुकोबांच्या अभंगवाणींतून कांहीं एक प्रमाणांत तरी येऊं शकते. हें असें घडणें स्वाभाविकच आहे. कारण, केवळ संतवाङ्मयच नव्हे, तर कोणतेंहि श्रेष्ठ वाङ्मय हें, तें निर्माण करणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचें अपरिहार्य व्यक्तीकरण असतें.

परंतु एवढ्यानेंहि आपलें समाधान होऊं शकत नाहीं. आपल्याला संतांच्या जीवनाचा कांहीं भौतिक तपशील हवा असतो. जीवनाच्या विविध संदर्भांत संत कसा वागला, कसा बोलला, तें जाणून घेण्याची आपल्याला ओढ असते. संतांचें आत्मिक सामर्थ्य ज्या भौतिक घटनांतून व्यक्त झालें, त्या घटनांची माहिती आपल्याला हवी असते. ती मिळाली नाहीं, तर आपण अस्वस्थ होतों. संतांनीं जर आत्मचरित्रें लिहिलीं, तर आपल्या या अस्वस्थतेला जागा उरणार नाहीं आणि संतांविषयींचें आपलें कुतूहल अधिकृत रीत्या तृप्त होऊं शकेल.

आत्मचरित्रलेखन हें संतांच्या वृत्तीला विरोधी असल्यामुळें जगांतील संत-वाङ्मयांत आत्मचरित्रें अगदींच विरळा आढळतात. पाश्चिमात्य जगांतहि सेंट ऑगस्टिनचीं 'कन्फेशन्स' अथवा सेंट पॉलचीं ख्रिस्ताविषयींचीं पत्रें हीं अपवादात्मकच होत. आपल्या सुदैवानें मराठींत बहिणाबाई, कचेश्वर व निरंजन रघुनाथ या तीन संतांनीं आत्मचरित्रें लिहिलीं आहेत. या आत्मचरित्रांच्या लेखनामागील प्रेरणा कोणत्या आणि त्या आत्मचरित्रांचें स्वरूप कसें आहे, याचा आपण पुढें विस्तारानें विचार करूं. त्यापूर्वीं प्राचीन मराठींतील सर्वच आत्मकथनपर वाङ्मयाचा आढावा घेणें आवश्यक आहे.

## आत्मकथनात्मक वाङ्मयाचें वर्गीकरण

प्राचीन मराठींतील आत्मकथनात्मक वाङ्मयाचे प्राधान्यानें दोन वर्ग पडतात : संतांचें आत्मकथन आणि राजकारणी व्यक्तींचें आत्मकथन. या प्रत्येकाचे पुनः दोन दोन उपवर्ग पडतात : स्फुट प्रासंगिक आत्मकथन आणि आत्मकथनात्मक स्वतंत्र कृति. माध्यमाच्या दृष्टीनें विचार करायचा झाला, तर संतांचें आत्मकथन प्रायः पद्यांत झालेलें असून, राजकारणी व्यक्तींनीं गद्याचा वापर केला आहे. संतांचें स्फुट प्रासंगिक आत्मकथन अभंगांतून, पदांतून वा भक्तिवेदान्तपर ग्रंथांच्या उपक्रमोपसंहारांत आढळतें, तर राजकारणी व्यक्तींचें

स्फुट आत्मकथन त्यांच्या पत्रव्यवहारांत दिसून येतें. याला कांहीं अपवादहि सांगतां येतील. समर्थांप्रमाणेंच बहुतेक संतांनीं पत्रव्यवहारासाठींहि बऱ्याच वेळां पद्याचा वापर केला असला, तरी त्यांचा गद्य पत्रव्यवहारहि आहेच. 'मज रघुनाथजीवेगळें कोण्ही नाहीं!' यासारखा हृद्य आत्माविष्कार समर्थांच्या एखाद्या गद्य पत्रांतहि आढळतो.

प्राचीन मराठींतील आत्मकथनात्मक वाङ्मयाचें हें स्थूल वर्गीकरण आलेखाच्या रूपानें असें मांडतां येईल—

**प्राचीन मराठींतील आत्मकथन**

↓

- संतांचें आत्मकथन [ पद्य ]
  - स्फुट आत्मकथन [ पदें, अभंग, इ. ]
  - आमत्चरित्रें
- राजकारणी व्यक्तींचें आत्मकथन [ गद्य ]
  - स्फुट आत्मकथन [ पत्रें ]
  - आत्मचरित्रें

## संतांचें स्फुट आत्मकथन

संतांच्या स्फुट आत्मकथनाचा उल्लेख मीं मागें प्रारंभींच्या दोन-तीन छेदकांत केलाच आहे. ज्ञानेश्वरांनीं आपल्या अभंगांतून आत्मकथन फारसें केलेलें नसलें, तरी तुकारामांच्या अनेक अभंगांत तें आढळतें. दुष्काळानें झालेली दुर्दशा, भंडाऱ्या-भामनाथावर केलेली साधना आणि बाबाजी चैतन्यांनीं केलेला स्वप्नोपदेश या महत्त्वाच्या घटना तुकोबांनीं स्वतःच अभंगबद्ध करून ठेवल्या आहेत. एकनाथांनींहि कांहीं आत्मकथनपर अभंग रचले आहेत. मूळ नक्षत्रावर आपला जन्म झाल्याची नोंद त्यांनीं एका अभंगांत गूढ शब्दांत केली आहे, तर दुसऱ्या एका अभंगांत काशी येथील विश्वेश्वरमंदिरांत कीर्तन करीत असतां झालेल

दत्तसाक्षात्कार वर्णिला आहे. नाथांचे अनुगामी असलेल्या रमावल्लभदासांनीं एका अभंगांत[1] अभिनव रीतीनें आपलें पूर्ववृत्त सूचित केलें आहे—

मूळीं लागतां सहज । मायबाप नाहींत मज ॥
झालों पोसणें संतांचें । मन कोवळें तयांचें ॥
गोत्र अगस्ति होतें साचें । आतां गोत्र व्यापकाचें ॥
ऋग्वेदी होतों पहिले । आतां भागवती वहिले ॥
नामघोषाचा आचार । भगवद्गीतेचा विचार ॥
पूर्वीं संध्या ते त्रिकाळ । प्रेमसंध्या सर्व काळ ॥
पूर्वील गुरु तो त्रिविद्येचा । आतां गुरु तो हरिविद्येचा ॥
पूर्वीं होतों मतभेदी । आतां मत जी अभेदी ॥
पूर्वीं बोलिलों लौकिका । आतां बोलें अलौकिका ॥
पूर्वीं मान म्यांच घ्यावा । आतां मान सर्वां द्यावा ॥
पूर्वीं रुचे चतुरपण । आतां भोळीव आपण ॥
पूर्वीं मुक्तीलागीं बाहे । आतां भक्तीलागीं वाहे ॥
पूर्वीं तारक होता हरी । आतां तारक मजला करी ॥
पूर्वीं होतों परतंत्र । आतां सर्वांशीं स्वतंत्र ॥
पूर्वीं रुचे रूपनाम । आतां नाहीं त्याचें काम ॥
नामरूप जाउनि भास । अवघा रमावल्लभदास ॥

या स्वरूपाचें स्फुट आत्मकथन बहुतेक संतांनीं आपल्या स्फुट रचनेंत कमी-अधिक प्रमाणांत केलेलें आहे आणि त्या आत्मकथनाचें महत्त्व त्या त्या संतांचें चरित्र जाणून घेण्याच्या दृष्टीनें अग्रक्रमाचें ठरलें आहे.

उपरिनिर्दिष्ट स्फुट आत्मकथनाशिवाय आणखी एका प्रकारचें आत्मकथन प्राचीन मराठी वाङ्मयांत आढळतें. तें म्हणजे भक्तिवेदान्तपर वा अन्य विषयां-वरील ग्रंथांच्या उपक्रमोसंहारांत–विशेषतः उपसंहारांत येणारें आत्मकथन. बहुतेक प्राचीन ग्रंथकार कमीअधिक प्रमाणांत आपली माहिती ग्रंथाच्या अखेरीस नोंदवितात. बऱ्याच वेळां केवळ ग्रंथरचनेच्या स्थळकाळाचा तपशील वा गुरूचा

---

१. ‘श्रीरमावल्लभदासांची गाथा’ : संपा. शु. गो. सभयकर. १९२८. पृ. ४४–४५.

( कधीं कधीं गुरुपरंपरेचा ) उल्लेख ग्रंथांतीं येतो. कांहीं ग्रंथकार तर आपल्या नाममुद्रेशिवाय आपल्याविषयीं कांहींहि पत्ता लागू देत नाहींत. उदाहरणार्थ, शहा मुतबजी ब्रह्मणी अथवा मृत्युंजयस्वामी या ग्रंथकारानें विपुल रचना केलेली असूनहि स्वतःविषयीं यत्किंचितहि माहिती नोंदविली नाहीं. उलट, आपला नामनिर्देश करते वेळींहि ' ब्रह्मणी मुंतोजी मृत्युंजया । या वायांचि उपाधिया ॥ ' अशी नाराजीच व्यक्त केली आहे.[२] कांहीं थोडे ग्रंथकार मात्र आपल्या ग्रंथाच्या अखेरीस आपली बरीच माहिती देतात— एक प्रकारें स्थूल आत्मचरित्रच देतात. पैठणचे प्रख्यात संत शिवदिन केसरी यांनीं आपल्या ' ज्ञानप्रदीपा ' च्या अखेरीस जवळ जवळ तीनशेंवर ओव्यांत आपल्या परंपरेचा विस्तृत इतिहास दिला आहे, तर शिवकल्याणांनीं ' नित्यानंदैक्यदीपिके ' च्या अखेरीस आपल्या परंपरेचें आणि कुळाचें वृत्त नोंदविलें आहे. बालबोधकार त्र्यंबकानें तर ' बालबोधा 'च्या उपसंहारांत स्वतःच्या माहितीला दीडशें ओव्या खर्ची टाकल्या आहेत. त्र्यंबकाचें हें आत्मकथन अशा प्रकारच्या आत्मकथनाचें प्रातिनिधिक स्वरूप मानून पहायला हवें. पांगारकरांनीं केलेला या आत्मकथनाचा संक्षेप वाचकांच्या सोयीसाठीं इथें उद्धृत करीत आहें—

" कवि म्हणतो कीं, ' आमुचा पिता कृष्णदेवाचा सुतु । नामें भैरव विख्यातु । भला ब्राह्मण साक्षातु । यजुर्वेदी ॥ शाखा माध्यंजनी पवित्र । शुद्ध सांतत्य गोत्र । वंशवृद्धीस्तव पुत्र । इच्छिले तेणें ॥ ' त्र्यंबकरायाचा पिता भैरव नामक माध्यंदिन शाखेचा यजुर्वेदी कर्मनिष्ठ ब्राह्मण होता. त्यानें तुळजापुरस जाऊन भवानीदेवीपाशीं वंशवृद्धीसाठीं अनुष्ठान केलें. भवानीदेवीनें प्रसन्न होऊन नवव्या रात्रीं त्याच्या हातीं तीन फळें दिलीं व मधलें फळ हातीं देतांना सांगितलें कीं, ह्या फळाच्या भक्षणानें ' पुत्र जालेया केवळ । करीं देखसी त्रिशूळ । तें ज्ञानगर्भ महाफळ । माझें वरद ॥ ' भैरव आपल्या गांवीं आला. त्याला तीन पुत्र झाले. नृसिंह, त्र्यंबक व कौंडन्य. त्र्यंबकाचा जन्म होतांच भैरवानें दिवा घेऊन पाहिलें. तों त्याच्या हातावर खरोखरीच रेखात्रयांकित त्रिशूळ होता. त्र्यंबक मोठा झाला तेव्हां, हा कोण्हाचा अवतार कोण जाणे, असें मनांत घेऊन, पिता ' मज न बोले

२. ' स्वरूपसमाधान ', ३. ९१.

दुरोत्तर। ना न संगे धुळाक्षर। मग विद्या कैची ? ॥' व्रतबंध झाला. विवाहाचे भरीं न पडे पिता!' त्र्यंबकाच्या आईचें नाव अंबावती असून ती भारद्वाज गोत्रांत जन्मलेली होती. भैरवानें अंबावतीस जवळ घेऊन त्र्यंबकाच्या हातावरचा त्रिशूळ दाखवून तिला सांगितलें कीं, हा कोणी महायोगी जन्मास आला आहे. महायोगी म्हणजे काय, याचा उगम तीस न पडल्यामुळें आईबाप दोघे भ्याले. हें सांगतांना कवि म्हणतो, 'जीवां ईश्वरा संयोगु। द्वैतभेदाचा त्यागु। यासी बोलिजे राजयोगु। हा स्मरु त्यां नाहीं ॥' मग मीच कांहीं स्वमतीनें शिकलों. कालगतीनें पिता निजधामास गेला – 'पाठीं आम्हीच आपुला। गृहस्थधर्मु विस्तारला!' वडील बंधु नृसिंह याचा कांहीं उपदेश घेतला, कमळाकर नामक पुरुषानेंहि कांहीं प्रबोध दिला. अनेक सज्जन पाहिले. पण माझा कोठें पुरा विश्वास बसेना. मग चंडीची उपासना सुरू केली. खाणें-पिणें, निद्रा-जागर इकडे लक्ष ठेविलें नाहीं. सोळावे रात्रीं 'पांचा वरुषांची कुमरी' प्रकट होऊन, तिनें सप्तशृंगीवर जाण्यास सांगितलें. सप्तशृंगीवर 'महामायेचा रहिवासु। ह्मणौनि नांदे श्रीसिद्धेशु।' तेथें जाऊन ध्यान धरून बसल्यावर तिसऱ्याच रात्रीं अंबा प्रसन्न झाली. अंबेपाशीं त्र्यंबकानें ब्रह्मज्ञान मागितलें. 'कृपावछल भवानी। करें स्पर्शलें वदनीं।' आणखी एक चमत्कार झाला. 'जो ब्रह्ममूर्ती आकारु। तोही प्रसन्न झाला सिद्धेश्वरु। मस्तकीं ठेविला करु। द्विजवेषें ॥' त्यानें पांच वचनें सांगितलीं, त्यांचाच विस्तार मीं 'बालबोध' ग्रंथांत केला आहे. त्रिलोचन शंकरानें मला ब्रह्मज्ञान दिलें. 'पाठी प्रकाशु करूनि। कांहीं येक दाविलें लोचनीं। जें भरलें दिसे आज्ञुनी। दृष्टीं सृष्टीं ॥ मनसहित इंद्रियें सकळें। जालिं सुखपात्रें निर्मळें। याचा वेचु कोण्हे काळें। नाहीं तया ॥ प्रसन्न करितां भवानी। अवचित जोडले शूळपाणी। फिटली सर्व सिराणी। अप्रयासें ॥' भवानीला प्रसन्न करूं गेलों, तों 'श्रीशंकरेंसहित भवानी। पुढारली आम्हां ॥' त्यांच्या प्रसादामुळें 'उन्मळले लोचन!' आंतला ज्ञानाचा डोळा उघडला व ब्रह्मानंदु प्रकटला. 'महासुखाचा संचारु। निरसला स्वप्नसंसारु'–भानावर आलों तरी समाधिसुख दाटून राहतें. इकडील म्हणजे संसारांतला स्वाद घेत असतांनाहि सर्वेंद्रियांत ब्रह्मानंद भरून वोसंडतो. 'फूल फळपणं सरे। आमोद सन्मंधी उरे। तेवीं आजन्मपर्यंत बा रे। सुखचि सर्व!' हेंच भूमंडळीं पसरण्या-साठीं ग्रंथ लिहिण्याची जगदंबेनें आज्ञा केली. श्रोत्यांस कवीनें 'माझिये

स्तुतिचेनि पाडें । न पडावें भिडे । शुद्धाशुद्ध तेवढें । निवडावें जी ॥' अशी मोकळया मनानें प्रार्थना केली आहे."[३]

त्र्यंबकानें आपल्या आत्मकथनाच्या शेवटीं 'मोकळ्या मनानें केलेल्या' प्रार्थनेवरूनच आत्मकथनाच्या बाबतींतील त्याचा संकोच स्पष्ट होत आहे. आपण ही आत्मस्तुतीच करीत आहोंत आणि या आत्मस्तुतीच्या पार्श्वभूमीवर श्रोत्यांचा ग्राह्याग्राह्यविवेक शबलित होईल, असें सार्थ भयहि त्याला वाटलें आहे. संतांनीं आत्मचरित्रें कां लिहिलीं नाहींत, याचें एक प्रकारें स्पष्टीकरणच त्र्यंबकाच्या या अखेरच्या प्रार्थनेवरून मिळून जातें.

आतां, बहिणाबाई, कचेश्वर व निरंजन रघुनाथ या तिघांच्या आत्मचरित्रां-शिवाय ज्या आत्मचरित्रात्मक कृति आहेत आणि ज्या कृति आत्मचरित्रात्मक असल्याचा अपसमज आहे, त्या सर्वांचा परामर्श घेऊं.

## एकांक : आत्मचरित्र कीं चरित्र ?

मराठींतलें पहिलें आत्मचरित्र कोणतें, याविषयीं निश्चयानें कांहींहि सांगतां यायचें नाहीं. डॉ. वि. भि. कोलते यांचें मत[४] प्रमाण मानायचें म्हटलें, तर महानुभावीय वाङ्मयांतील 'लीळाचरित्रा'चा एकांक भाग हें मराठींतलें पहिलें आत्मचरित्र ठरेल. डॉ. कोलते यांनीं चक्रपाणिचरित्रादि ग्रंथांचें कर्तृत्व चक्रधरां-कडे देऊन, प्रस्तुत संदर्भांत असें म्हटलें आहे कीं, "...'लीळाचरित्रां'तील एकांक भागाचेंहि कर्तृत्व चक्रधरांचें ठरतें. चक्रधरांच्या आयुष्यांतील एकांक भाग म्हणजे गुजराथेंतील भरवसचा वृत्तान्त व तेथून अळजपूरच्या मार्गानें रिद्धपूरला आल्यापासून तों प्रतिष्ठान येथें बाइसाची भेट होईपर्यंतचा काल. या कालांत आपल्या आयुष्यासंबंधींच्या लीळा खुद्द चक्रधरांनींच भक्तांना सांगितल्या होत्या. त्याच नागदेवांनीं म्हाइंभटाला सांगितल्या व त्यानें त्या लिहिल्या. अर्थात् याहि लीळांचें कर्तृत्व चक्रधरांचेंच ठरतें."

---

३. 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड दुसरा : ल. रा. पांगारकर. १९३५. पृ. ५०५–५०७.

४. 'श्रीचक्रधरचरित्र' : डॉ. वि. भि. कोलते. १९५२ पृ. ११२.

चक्रधरांनीं आपला पट्टशिष्य नागदेवाचार्य याला एकदां हिवरळीहून ऋद्धि-पूरला पाठविलें होतें, त्या वेळीं त्यांनीं त्याला अग्निविधानींचा आचार सांगतांना असें उपदेशिलें होतें कीं, "एथीची चरीत्रे आठवीजेति : आईकीजेति : उच्चारीजेति : तेही एक स्मरणचि की गा :"[५] (माझीं चरित्रें आठवावींत, ऐकावींत व उच्चारावींत. तेंहि एक स्मरणच आहे बरें!) पुढें चक्रधरांच्या महाप्रयाणानंतर नागदेवाचार्यादि शिष्य ऋद्धिपूर येथें गोविंदप्रभूंच्या सन्निध राहूं लागल्यावर, नागदेवाचार्य चक्रधरांच्या आपण स्वतः पाहिलेल्या लीळा, बाइसाच्या माहितींतील लीळा आणि चक्रधरांची व बाइसाची भेट होण्यापूर्वींच्या लीळा—ज्या स्वतः चक्रधरांनीं 'प्रसंगें भक्तांप्रती सांघीतलीया' होत्या त्या लीळा आठवीत असे. या सर्व लीळा म्हाइंभटानें नागदेवमुखांतून ऐकून शब्दबद्ध केल्या. यांपैकीं बाइसांच्या भेटीपूर्वींच्या, एकाकी भ्रमणाच्या कालांतील लीळा स्वतः चक्रधरांनीं 'प्रसंगें भक्तांप्रती सांघीतलीया' होत्या; त्या नागदेवाचार्यानें ऐकल्या होत्या; त्या त्यानें भक्तिभावानें स्मरणसंपुटांत साठवल्या होत्या आणि त्याच शेवटीं म्हाइंभटानें शब्दबद्ध केल्या. एकांकाच्या रचनेची ही प्रक्रिया ध्यानीं घेतां त्याला 'आत्मचरित्र' मानणें—त्याचें कर्तृत्व चक्रधरांकडे देणें उचित ठरणार नाहीं. चरित्राची सामग्री ज्यानें पुरविली, तोच त्याचा कर्ता होय, असें कसें म्हणतां येईल? जो ती सामग्री शब्दबद्ध करतो, त्यालाच कर्ता मानणें योग्य ठरेल. म्हाइंभट हा केवळ 'डिक्टेशन' घेणारा नव्हता, हें डॉ. कोलते यांनाहि मान्य आहे. स्वामींच्या परिवाराची माहिती देण्याच्या प्रसंगीं त्यांनीं म्हाइंभटाच्या 'लीळाचरित्र'-रचनेचा गौरव करतांना म्हटलें आहे कीं, "स्वामींची ही 'वाङ्मयमूर्ति' निर्माण करून म्हाइंभटानें महानुभाव पंथांत आणि मराठी साहित्यांत आपली कीर्ति अजरामर करून ठेवली आहे, यांत शंका नाहीं."[६] डॉ. कोलते यांनींच ही जी निःशंक ग्वाही दिली आहे, ती ध्यानीं घेतां 'लीळाचरित्रा'चा एकांक हें आत्मचरित्र नसून म्हाइंभट-कृत चरित्राचा भाग आहे, यांत आपणांसहि संशय उरणार नाहीं. एकांकांतील लीळांत लीळा-

---

५. 'श्रीचक्रधरचरित्र', पृ. २०८.

६. 'श्रीचक्रधरचरित्र', पृ. ९८.

नायक चक्रधरांची भूमिका प्रथमपुरुषी नसून, तृतीयपुरुषी आहे, ही वस्तुस्थितिहि प्रस्तुत संदर्भात भ्रमनिरास करणारी आहे.

## नामदेवाचें आत्मचरित्र : शंकास्पद

यानंतर कालानुक्रमानें विचार कर्तव्य ठरतो, तो नामदेवाच्या नांवावरील आत्मचरित्राचा. नामदेवगाथ्यांत या आत्मचरित्राचा समावेश झालेला आहे. १६५ अभंगांच्या या आत्मचरित्रांत नामदेवाच्या जीवनांतील मुमुक्षुतेपासून परमबोधापर्यंत ज्या ज्या महत्त्वाच्या घडामोडी झाल्या, त्यांचा भावमय आलेख आहे. अगदीं पहिल्या अभंगांतच शिवण्याच्या व्यवसायावर श्लेष साधून व्यक्त झालेलें नामदेवाचें शिवात्म अंतरंग रसिकांचें चित्त वेधून घेतें—

शिंपियाचे कुळीं जन्म मज झाला ।
परि हेतु गुंतला सदाशिवीं ॥
रात्रीमाजी शिवीं दिवसामाजी शिवीं ।
आराणुक जीवीं नाहीं माझ्या ॥
सुई आणि सातुळी कात्री गज दोरा ।
मांडला पसारा सदाशिवीं ॥
नामा म्हणे शिवीं विठोबाची आंगी ।
त्याचेनि मी जगीं धन्य झालों ॥...ना. गा. ५

एक सामान्य शिंप्याचें पोर घरांतील विठ्ठलभक्तीच्या वातावरणांत भक्तिसन्मुख बनतें आणि ती भक्ति त्याच्या ठायीं इतक्या आवेगानें रुजते–अंकुरते कीं, पुढें घरांतील लौकिक ओढींचा प्रतिबंध दूर सारून ती फुलीं-फळीं बहरून जाते. भक्तिछंदामुळें घरादाराची उपेक्षा करणाऱ्या नामदेवाला त्याची आई गोणाई अत्यंत कठोर शब्दांत छेडते आहे, त्या प्रसंगींचा हा एक अभंग पहा—

गोणाई म्हणे, नाम्या सोडी देवपिसें ।
बुडविसी कैसें घर बळें ॥
तुजसारिसीं लेकुरें वर्ततातीं कैसीं ।
तूं मज झालासी कुळक्षय ॥

धनधान्य पुत्र कलत्रें नांदती ।
तुज अभाग्या तो चित्तीं पांडुरंग ॥
शिवण्याटिपण्या घातलेंसें पाणी ।
न पहासी परतोनी घराकडे ॥
कैसी तुझी भक्ति लौकिकावेगळी ।
संसाराची होळी केली नाम्या ॥...ना. गा. २९

नामदेवाच्या विठ्ठलवेडाविषयीं गोणाईप्रमाणेंच त्याची पत्नी राजाई हिनेंहि तीव्र शब्दांत निषेध नोंदविला आहे. घरांतील कर्ता पुरुष सर्व लौकिक व्यवहार सोडून भजनसंकीर्तनांत सदैव रमामाण झाला आहे, ही वस्तुस्थिति लौकिक पातळीवरच्या कुटुंबीयांना किती जाचक होत असेल, त्याची जाणीव या चरित्रग्रंथांत अत्यंत सहानुभवाच्या दृष्टीनें व्यक्त केलेली दिसते. ज्या देवाच्या नादीं लागून नामदेव घरदार विसरला, त्या देवाचीच हजेरी घेण्याचा प्रयत्न गोणाई व राजाई करतात, तेव्हां या चरित्राचा कर्ता त्या दोन व्यथित स्त्रियांच्या हृदयवेदनांशीं किती समरस झाला आहे, त्याची स्पष्ट कल्पना येते. राजाईच्या व्यथेची धार किती तीव्र आहे पहा—

आई जें शिकवी तीतें तुम्ही नाइका ।
नाहीं भयशंका लौकिकाची ॥
लावोनी लंगोटी झालेती गोसावी ।
आमुची टेवाटेवी कोण करी ॥
ऐसी तुमची स्थिति विलग देखोनी ।
पडिलें चिंतवनीं काय करूं ॥
धडचि कांटिये घातलें हें कैसें ।
बळेंचि आपणां पिसें लावियेलें ॥
सुखाचा संसार करोनि बारा वाटे ।
नांव केलें मोटें जगामाजी ॥...ना. गा. ८४

अलौकिकाची ओढ आणि लौकिकाचीं बंधनें यांचा हा संघर्ष जसा या चरित्राच्या कर्त्यानें बहारीनें रंगविला आहे, तसाच नामदेव-ज्ञानदेवांच्या

भेटीचा प्रसंग आणि त्यानंतरचा गुरुबोधाचा प्रसंगहि त्यानें हृदयस्पर्शी शब्दांत व्यक्त केला आहे. 'अखंड जयाला देवाचा शेजार' अशा नामदेवाच्या भक्ति-गर्वावर मुक्ताईनें बोट ठेवलें; गोरा कुंभारानें त्याला कच्चें मडकें ठरवून संतमंडळांत फजीत केलें; त्यानंतर नामदेव रागावून देवाकडे गेला; देवानें संतविमुखतेबद्दल त्याला दोष देऊन सद्गुरुला शरण जायला सांगितलें आणि—

श्रवणीं सांगितली मात ।
मस्तकीं ठेवियला हात ॥
पदपिंडविवर्जित केला नामा ॥
खेचरु विसा प्रेमाचा पिसा ।
तेणें नामा कैसा उपदेशिला ॥
तया सांगितलें एकांतींचें गुज ।
आतां पाल्हाळीं तुज काय चाड ॥
मग खेचरु म्हणे मज ज्ञान हेंचि गुरु ।
तेणें केला अगोचरु म्हणे नामा ॥...ना. गा. १४४

नामदेवगाथ्यांतील हें नामदेवचरित्र मोठें रसभरित आहे, हें खरें; परंतु तें नामदेवाचें आत्मचरित्र मात्र नव्हे. अनेक विद्वानांनीं तें आत्मचरित्रच मानलें आहे. "नामदेव हे मराठी भाषेंतील आद्य आत्मचरित्रकार होत."[७] असें डॉ. शं. गो. तुळपुळे यांचें म्हणणें आहे. या आत्मचरित्राविषयींचा त्यांचा अभिप्राय असा कीं, "त्यांनीं (नामदेवांनीं) लिहिलेलें आत्मचरित्र संपूर्ण नसलें, तरी त्यांच्या जीवनांतील कांहीं अत्यंत महत्त्वाच्या अशा प्रसंगांवर प्रकाश पाडण्यास तें समर्थ आहे. या आत्मचरित्रापर अभंगांचें कर्तृत्व नामदेवांकडे जातें किंवा त्यांच्या कोणा शिष्याकडे जातें, यासंबंधीं मतैक्य नाहीं. कोणी हें सर्वच आत्म-पर प्रकरण नामदेवांचें न मानतां त्यांच्या कोणा अज्ञात भक्ताचें मानतात. परंतु हें आत्मचरित्र नामदेवांचें नव्हे असें मानण्यास कोणतेंहि प्रमाण नाहीं. इतर प्रकरणांप्रमाणें यांतहि भेसळ आहे, हें खरें; पण तेवढ्यामुळें हें प्रकरण नामदेवकृत नाहीं, असें मानणें योग्य नव्हे."

---

७. 'पांच संतकवि': डॉ. शं. गो. तुळपुळे. द्वितीयावृत्ति, १९६२. पृ. १४२.

एखाद्या ग्रंथाविषयींच्या आपल्या विवक्षित 'वाटण्या'ला बाधक असे उल्लेख त्या ग्रंथांत असतील, तर ते प्रक्षेप आहेत, असें सोयीस्कर रीत्या समजण्याची प्रवृत्ति संशोधक-अभ्यासकांत प्रायः सार्वत्रिक आढळते. त्याचमुळें 'यांतहि भेसळ आहे, हें खरें,' असें मान्य करूनहि 'हें आत्मचरित्र नामदेवांचें नव्हे, असें मानण्यास कोणतेंहि प्रमाण नाहीं.' असें निश्चयात्मक विधान डॉ. तुळपुळे यांनीं केलें आहे. डॉ. तुळपुळे यांना मान्य असलेल्या 'भेसळी'चें स्वरूप पाहिल्यावर या आत्मचरित्राची विश्वसनीयता कितपत टिकते, तें समजून येईल.

(१) "नामदेवांच्या जन्मापूर्वीं कांहीं वर्षें त्यांचे आईबाप पंढरपूर येथें येऊन विठ्ठलभक्ति करीत राहिले होते...नामदेवांचा जन्म पंढरपुरास झाला." परंतु या आत्मचरित्रांत नामदेव हा परठिकाणाहून पंढरपुरास येत असे, असे उल्लेख वारंवार आलेले आहेत. पहा–'नामा चालविला पंढरिये नेला।' क्र. ६६; 'नामा पंढरीसी आला।' क्र. ७५; 'राजाई पंढरपुरा चालयेली।' क्र. ९०; इत्यादि.

(२) "नामदेव तरुणपणीं दरोडेखोर असून पुढें अनुताप होऊन भक्ति-मार्गास लागले असा एक प्रवाद असून त्याचें मूळ महीपतीनें लिहिलेल्या त्यांच्या चरित्रविषयक वृत्तान्तांत दिसतें...वास्तविक वरील प्रवादांत तथ्य अगदीं नाहीं. ज्या ५६–चरणी अभंगाचा आधार या मतास घेतला जातो, तो अभंग नामदेवांचा नाहीं." परंतु हा ५६-चरणी अभंग वगळूनहि काम भागत नाहीं. कारण चरित्र-निवेदनाच्या ऐन ओघांत नामदेवाची पत्नी रुक्मिणीला विनवणी करीत असतांना तिच्या मुखीं आपल्या पतीच्या चरित्राविषयींची जी तक्रार व्यक्त झालेली आहे, त्या तक्रारींत वरील प्रवादाला पुष्टि आहे—

> आमुच्या वडिला शस्त्र सुई आणि कातरी।
> हा बाण आणि सुरी वागवीतसे॥
> एकातें भोंकिलें, रुदना करी त्याची नारी।
> वाहियेलीं सुरीं नागनाथीं॥...ना. गा. ८८

ज्याच्या दरोडेखोरीविषयींच्या प्रवादांत तथ्य नाहीं, तो स्वतःच आपलें चरित्र सांगत असेल, तर आपल्या दरोडेखोरीचा उल्लेख कसा करील? हा उल्लेख प्रक्षेप मानण्याच्या सोयीचा नाहीं.

( ३ ) नामदेवाच्या दरोडेखोरीचा उल्लेख करणारा ५६ – चरणी अभंग फारशी शब्दप्रयोगानें युक्त असल्यामुळें प्रक्षिप्त मानला गेला आहे. परंतु या आत्मचरित्रांत दुकान (क्र. ७८), मालिक, जामीन (क्र. ८३), हिलाल (क्र. १०४), इत्यादि अनेक फारशी शब्द अन्यत्र आलेले आहेत. ते सर्व अभंग प्रक्षिप्त मानायचे, तर चरित्रनिवेदनाचा ओघच खंडित होईल.

( ४ ) ज्ञानदेवादि संतमंडळींशीं नामदेवाची भेट झाली, त्या वेळीं नामदेवानें ' भक्तिहूनि श्रेष्ठ आणिक नाहीं ', हा सिद्धांत मुक्ताबाईला ऐकवतांना कबीर व रोहिदास चांभार या उत्तरकालीन संतांची धन्यता गायिली आहे आणि त्यांच्याबरोबर आपलेंहि नांव गोवलें आहे (क्र. १०२). याचा अर्थ सरळ असा आहे कीं, हें चरित्र लिहिणारा कवि कबीर-रोहिदासानंतरच्या काळांतच झालेला आहे.

( ५ ) यांशिवाय या चरित्रांत पुनरुक्ति आहे, संदिग्धताहि आहे.

— या सर्व बाबींचा विचार करतां नामदेवगाथ्यांत नामदेवाचें आत्मचरित्र म्हणून समाविष्ट झालेलें हें प्रकरण आत्मचरित्र नसून, नामदेवानंतर अनेक शतकांनीं आत्मचरित्रपद्धतीनें लिहिलें गेलेलें एक नामदेवचरित्र आहे.

## ' संप्रदायपरिमळ ' : आत्मचरित्र कीं चरित्र ?

हरिभक्तिपरायण पांगारकांनीं ' निरंजन माधवांच्या कवितासंग्रहा 'च्या पहिल्या भागांत सन १९१९ मध्यें प्रकाशित केलेला ' संप्रदायपरिमळ ' हा ग्रंथ आत्म-चरित्रपर समजला जातो. पांगारकरांनीं हा ग्रंथ निरंजन माधवांचा म्हणूनच त्यांच्या ' कवितासंग्रहां 'त समाविष्ट केला असून, सारस्वतकार भावे, कविचरित्रकार आजगांवकर, प्रा. चिं. नी. जोशी व कवि नाथ निफाडकर यांनींहि तो निरंजन माधवांचाच मानला आहे. परंतु इ. स. १९२८ मध्यें ' महाराष्ट्र साहित्य पत्रिकें 'त म. म. दत्तो वामन पोतदारांनीं, या ग्रंथाचा कर्ता निरंजन माधव नव्हे या गोष्टीकडे अभ्यासकांचें लक्ष वेधलें. पोतदारांचा पक्ष प्रा. पां. जि. सबनीस व प्रा. पंगू यांनीं हिरीरीनें उचलून धरला. खरें म्हणजे केवळ अनवधानानें व ग्रंथाच्या मांडणीनें उत्पन्न केलेल्या भ्रमामुळें हा ग्रंथ निरंजन माधवांचा आहे, असें कांहीं काळ मानलें जावें, यांत आश्चर्य नाहीं. परंतु ग्रंथाच्या सूक्ष्म परीक्षणां-

तून त्याच्या खऱ्या कर्त्याकडे एकदा बोट दाखविलें गेल्यानंतर वाद चालू रहायला अवकाश नव्हता. तरीहि अनेकांनीं या ग्रंथाचें कर्तृत्व निरंजन माधवांकडे देण्यासाठीं वृथा पांडित्यप्रदर्शन करीत रहावें, ही आश्चर्याची बाब आहे. या ग्रंथाचा कर्ता निरंजन माधवांचा कोणी एक शिष्य असून, त्यानें स्वतःला 'निरंजनदास' म्हणविलें आहे. त्यानें या ग्रंथांत आपल्या गुरूचें वंशकथन आणि संप्रदायकथन केलें आहे. निरंजन माधव व त्याची पत्नी गंगावती यांच्या संवादांतून निरंजनदासानें सर्व कथन केलें आहे. ही संवादपद्धति आपल्याकडे अत्यंत पुरातन आहे. मराठी संतांना प्रिय असलेली 'गुरुगीता' शिवपार्वतीसंवादात्मक आहे. संवादांतील पात्रांच्या कल्पित भूमिकांशीं समरस होऊन त्या त्या भूमिकांना साजेशा भाषेंत ग्रंथाचा प्रवाह वाहता ठेवणें, हें त्या पद्धतीचें प्राणतत्त्व आहे. निरंजनदासानें हें प्राणतत्त्व नेमकें पकडलें आहे. त्यानें निरंजन माधव व त्याची पत्नी गंगावती यांना श्रोत्यांपुढें उभें केलें आहे आणि आपण स्वतः एखाद्या दृश्य संगीतिकेंतील निवेदकाप्रमाणें अलिप्ततेची भूमिका घेतली आहे. संवादपद्धतीनें रचलेला हा चरित्रग्रंथ आहे— आत्मचरित्र नव्हे. या ग्रंथाची भाषा प्रौढगंभीर आणि तरीहि मधुर आहे. अनेक ठिकाणीं ग्रंथकारानें भावनांचे कल्लोळ उठविले आहेत; नाट्यात्मक वातावरण उभें केलें आहे आणि सर्व प्रसंगांचा प्रत्यय श्रोत्यांना वर्तमानाइतका जिवंत करून घडविला आहे. या ग्रंथाचे ५ उद्गार (अध्याय) असून ओवीसंख्या ९९२ आहे. ग्रंथाचा रचनाकाल भाद्रपद शु. ४ शके १६८५ असा आहे. ग्रंथकर्त्यानें प्रत्येक 'उद्गारा'च्या उपसंहारांत अगदीं निःसंदिग्धपणानें आपल्या नांवाची मुद्रा उठविली आहे—

ऐसें गंगावतीप्रती । योगी निरंजन स्वकथा कथी ।
**दास** विनवी संतांप्रती । महिमा पुढती परिसावी ॥ १·१५१

ऐसी निजसुंदरीप्रती । निरंजन योगी कथा कथी ।
**दास** विनवी संतांप्रती । श्रवणीं प्रीती असावी ॥ २·१९७

ऐसें निरंजन निजसतीतें । कथन करी प्रेमें बहुतें ।
**दास** विनवी सज्जनांतें । पुढें कथा परिसावी ॥ ३·२६१

**दास** म्हणे संतीं । ऐकावी कथा पावन अती ।
पुसे भावें गंगावती । निरंजना संप्रदाय । ४·१

इति श्री **निरंजनदास** विरचित । संप्रदायपरिमळ महाग्रंथ ।
येथें षट्पद साधुसंत । रमतां तृप्ति घडेल ॥ ४·१६१
**निरंजनदास** विनवी संतां । हे गुरुसंतति संतानलता ।
हे मुक्तिफळदात्री सर्वथा । ब्रह्मावबोध रसगोड ॥ ५·१८८
अनंतकोटि जीवमणी । व्यापोनी वसे सूत्रस्थानीं ।
तो सद्गुरु गणपती कोटि नमनीं । **निरंजनदासें** प्रार्थिला ॥२१५
**निरंजनदास** रचित । संप्रदायपरिमळ महाग्रंथ ।
आजि पूर्ण होतां यथास्थित । सद्गुरुचरणीं अर्पिला ॥ ५·२१८

हीं वर उल्लेखिलेलीं स्थानें कर्त्याचा स्पष्ट निर्णय करणारीं आहेत. येथें सर्वत्र ग्रंथकर्त्यानें स्वतःचा उल्लेख 'दास' वा 'निरंजनदास' असा केलेला असून, तो निरंजनांहून वेगळा असल्याचेंहि वरील सर्व उल्लेखांतून दिसत आहे. निरंजन व त्यांची पत्नी गंगावती यांचा संवाद कथन करणारा हा निरंजनदास वेगळा आहे, याबद्दल शंकेला अवकाशच उरूं नये इतक्या निःसंदिग्ध स्वरूपाचे हे उल्लेख आहेत. निरंजनदासानें संवादपद्धति अवलंबिली असल्यानें जिथें निरंजनाचें त्यांच्या पत्नीशीं बोलणें सुरू आहे, तो भाग सोडून अन्यत्र सर्वत्र त्यानें निरंजनांचा उल्लेख तृतीयपुरुषीच केला आहे. प्रत्यक्ष संवाद सुरू होण्यापूर्वींचा ग्रंथाच्या उपक्रमाचा जो भाग आहे, त्यांत—

एवं विनवितां सद्गुरुचरणीं । मान्य करोनि माझी दीनवाणी ॥
म्हणती, अवश्य शिष्यमणी । कीर्तिपरिमळ प्रकटवीं ॥ १·१५

असा प्रथमपुरुषी उल्लेख आहे, तो ग्रंथकाराचा स्वतःविषयींचा असल्यामुळें स्वाभाविकच आहे. पहिल्या 'उद्गारां'तील या १५ व्या ओवीनंतर लगेच २३ व्या ओवींत संवादाचा प्रस्ताव करतांना—

निरंजनयोगी समाधिविरामीं । स्वानुभवसुखानंदपरमीं ।
रमोनि असतां चिद्घनधामीं । गंगा नमीं पादपद्मां ॥

अशा प्रकारें निरंजनांचा उल्लेख तृतीयपुरुषीच केलेला आहे.

एवंच, प्रत्यक्ष ग्रंथांत कर्त्याविषयीं वाद घालण्याला जागाच नसल्यामुळें, 'संप्रदायपरिमळा' ला आत्मचरित्र मानण्याचें कारणच उरत नाहीं. जर यदा-

कदाचित् स्वतः निरंजन माधवांनींच प्रकट होऊन सांगितलें कीं, " हा ग्रंथ मींच रचला असून वाचकांना चक्रविण्यासाठीं मीं कौशल्यानें त्याचें कर्तृत्व माझ्या शिष्याला बहाल केलें आहे ! " तरच हें निरंजन माधवांचें आत्मचरित्र ठरेल. प्राचीन संतांच्या अशा ' साक्षात्कारा 'ची ग्वाही देण्याचे प्रकार संशोधनक्षेत्रांत घडले आहेत, म्हणूनच मी येथें असा उल्लेख करीत आहें.

## आनन्दमूर्तींचें लघु आत्मचरित्र

समर्थ पंचायतनांतील एक थोर साधु आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर यांनीं एका ४७–चरणी अभंगांत आपलें ओझरतें चरित्र निवेदिलें आहे.[८] या आत्मकथनांत त्यांनीं प्रामुख्यानें गुरुकृपेनें प्राप्त झालेल्या आनंदसोहळ्याचेंच वर्णन केलें आहे—

**सद्गुरु श्रीराम जे दिनीं भेटला । श्रम पैं तुटला संसारींचा ॥ १ ॥**
**संसारींचा श्रम अनादि पै होता । चरणदर्शन होतां भस्म केला ॥ २ ॥**

हें त्यांच्या आत्मकथनाचें प्रमुख सूत्र आहे. आपण ' अनधिकारी ' आणि ' विषयीं लंपट ' असतांनाहि आपणांस सद्गुरूनें ' कृपामात्रें चोखट ' केलें, याविषयीं आनंदमूर्तींनीं सविनय कृतज्ञता व्यक्त केली आहे. सांगलीजवळच्या ढालगांवीं अप्पाजीपंत देशपांड्यांच्या बागेंत वेलगंगेच्या कांठावरील निंबोणीच्या झाडाखालीं सद्गुरु रघुनाथस्वामींनीं आपणांवर अनुग्रह कसा केला, याची हकीकत आनंदमूर्तींनीं पुढीलप्रमाणें सांगितली आहे—

**प्रथम दर्शन धन्यग्रामीं झालें । देखतांचि गेलें संशयजाल ॥११॥**
**सखा आपा नामा याचे बागेमध्यें । मन तें निमग्न पादपद्मीं ॥१२॥**
**देहाचा अभिमान शरीरीं पै होता । जाणिवेचा ताठा लोकमान्य ॥१३॥**
**भिक्षुक पै देह चावट शोधक । विद्यावयें उन्मत्त सप्तदशीं ॥१४॥**
**सप्तदश वर्षीं अंगिकार केला । आनंद तारिला पादपद्मीं ॥१५॥**
**पादरजस्नानें पावन पै केलें । यत्नें सह्य केले अपराध ॥१६॥**
**सद्गुरु श्रीराम प्रसन्न होउनी । निरंजन निंबोणी गंगास्नान ॥१७॥**

---

८. ' श्रीआनंदचरितामृत ' : संपा. शं. पां. ओक. १९३५. पृ. १५४–१५६.

तेथें पै नेवोनी उत्साहभुवनीं । स्वामी संतोषोनी दया केली ॥१८॥
पद्महस्त माथा स्वामींनीं ठेविला । तेचि समयीं केला गुणातीत ॥१९॥

श्रीगुरूंनीं आपल्या परमार्थाचाच नव्हे, तर प्रपंचाचाहि रथ आपल्या सामर्थ्यानें चालवून आपणांस 'आनंदरूप' केलें, असे धन्यतेचे उद्‌गार अखेरीस आनंदमूर्तींनीं काढले आहेत.

आनंदमूर्तींच्या या लघु आत्मचरित्रांत गुरुकृपेच्या क्षणाखेरीज अन्य घटनांचा कसलाहि तपशील नाहीं. परंतु संतजीवनाच्या दृष्टीनें गुरुकृपेच्या क्षणाचें अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळें आनंदमूर्तींनीं तो क्षण स्वतःच शब्दबद्ध करून ठेवला आहे, ही विशेष आनंदाची गोष्ट आहे, त्यांच्या या अभंगाची धाटणी कचेश्वरांच्या आदींतील अभंगासारखीच धावती आहे.

## विठाबाईचें आत्मचरित्र

उत्तर पेशवाईतील प्रख्यात साधु चिदंबर दीक्षित गुर्लहोसूरकर यांची शिष्या विठाबाई हिनें आपलें आत्मचरित्र अभंगांत मांडलें आहे.[१] ही मूळची पंढरपूरची रामप्पा नायक व संतूबाई यांची कन्या. विठ्ठलाच्या कृपाप्रसादानें तिचा जन्म झाला आणि मातापित्यांची विठ्ठलभक्ति बालपणींच तिच्या हृदयांत रुजली. आषाढ वद्य १४, मंगळवार, शके १७१४ हा तिचा जन्मदिन. लग्न करण्याची इच्छा नसतांनाहि मातापित्यांनीं वयाच्या चौदाव्या वर्षी तिचें लग्न केलें. तिचें सासरहि पंढरपूर हेंच होतें. त्या काळीं सासूरवास हा मुळांतच जाचक आणि त्यांत विठाबाईची मनोवृत्ति प्रपंचपराङ्मुख, त्यामुळें तिला सासरीं 'बहुत दुःख' भोगावें लागणें अपरिहार्यच होतें. ती म्हणते—

भ्रतार हो मजसी वोढतो येकांतीं ।
भोगावें मजसी म्हणूनियां ॥
ओढोनियां बहुत मारितो मजसी ।
मध्यरात्रीं जाणा समयासी ॥

---

१. 'जुनें वाङ्मय-नवें संशोधन': डॉ. पंडित आवळीकर. १९६४. पृ. २१८-२२३.

या अव्याहत जाचणीमुळें विठाबाई घराबाहेर पडली आणि जवळ पांडुरंगाची मूर्ति घेऊन ती रानावनांत भटकूं लागली. या भ्रमणांत तिनें आर्त स्वरांत पांडुरंगाची करुणा भाकली—

करुणा येऊं दे आई तुझें मी लेकरूं ।
परदेशी मज करूनी टाकलेंसी ॥

आजवर आपण पांडुरंगाचें 'किंचितहि स्मरण' न केल्यामुळें आपलें 'आयुष्य वायां गेलें,' असा अनुतापहि तिनें व्यक्त केला. तिची आर्तता कळसाला पोचली आहे आणि जर आपण भेटलों नाहीं, तर तिची 'शेवटची वेळ' येईल, असें जाणवतांच विश्वव्यापिनी 'विठाबाई धांवोनीया आली' आणि मग या विठाबाईची सर्व 'व्यथा निवाली'!

विठाबाईच्या आर्त मनःस्थितींत तिला विठ्ठलाचा असा दृष्टान्त झाला कीं—

"म्हणोनियां मीच अवतरलों समज ।
चिदंबर नाम धरूनियां ॥
कुंदगोळीं असतों ब्राह्मणवेषानें ।
जावें ह्या वाटेनें," म्हणती मजसी ॥
"राजाराम भक्त माझा येईल येथें ।
तुकाराम जाण प्रत्यक्ष तो ॥
चिदंबर-नाम गात फिरतों जाण ।
अवतार पूर्ण नामदेव ॥
येईल हो आतां कुंदगोळीं जाणसी ।
हेचि वाट त्यासी खूण जाण ॥
त्याच्याबरोबर जावें तुवां तेथें ।"
सांगोनी अदृश्य होती देव ॥

रात्रींच्या वेळीं हा असा दृष्टान्त झाला आणि सकाळीं वाटेवरच राजारामाची दिंडी भेटली. टाळमृदंगांच्या नादांत भजनरंगानें रंगलेल्या राजारामाचे चरण दिसतांच तिचें देहभान हरपलें. ती राजारामाच्या दिंडींत सामील झाली. सतत

दोन महिनेपर्यंत दिंडीबरोबर प्रवास केल्यावर तिला कुंदगोळ येथें चिदंबर-स्वामींचें दर्शन घडलें. तो दिवस होता कार्तिक शुद्ध एकादशी-गुरुवार! स्वामींच्या रूपानें साक्षात् परब्रह्म भेटल्यामुळें ‘ देहांतुनी निघालें मीच जाणा ! ’ असा आगळा अनुभव विठाबाईला आला. तिच्या हातांतल्या मशालीच्या ज्वाळांनीं तिचे हात भाजून निघाले, तरी तिला त्याचें भान राहिलें नाहीं.

—आणि ती भानावर आली तों आणखी एक असाधारण अनुभव ! तिला आपले अनेक पूर्वजन्म स्मरूं लागले. राजाराम नामदेव होता, तेव्हां आपण जनाबाई होतों आणि चिदंबरस्वामी पांडुरंग होते, असें तिला जाणवलें. चिदंबरांचा व राजारामाचा जन्मोजन्मींचा बंध तिच्या प्रत्ययास आल्यामुळें त्यांच्याविषयींची तिची प्रीति गाढ बनली.

पंढरीनाथा, चिदंबररूप दाविलें आतां !

या शब्दांत तिनें ही दिव्य प्रीति व्यक्त केली आहे.

चिदंबर हें विठाबाईचें उपास्य दैवत आणि राजाराम हा तिचा गुरु. त्यांच्या सान्निध्यांत सदैव राहून परमसुख अनुभवावें, एवढीच तिची इच्छा. परंतु हें तिच्या नातेवाइकांना कसें रुचणार ? त्यांना तिचा पत्ता कळल्यावर ते सर्व ( पति व माता-पिता ) तिला नेण्यासाठीं कुंदगोळास आले. तिला पाहतांच तिचा पति खवळला आणि तिच्या अंगावर धांवून गेला. परंतु विठाबाई विचलित झाली नाहीं. ‘ देह नव्हे मी— माझा देह जाण, ’ याची त्याला जाणीव देऊन, तिनें त्याला सुनावलें कीं—

तुझी सत्ता आहे देहावरी समज ।
माझेवरी तुझी किंचित् नाहीं ॥

एवढेंच सांगून ती थांबली नाहीं, तर आपला परम आश्रय असलेल्या चिदंबरांच्या चरणीं तिनें बेभानपणें दंडवत् घातलें. तल्लीनतेमुळें निश्चेतन भासणारी तिची ती अवस्था पाहून, तिच्या नातेवाइकांना वाटलें कीं, विठाबाई मेली ! आणि आतां आपल्यावर आणखी कांहीं लचांड येईल, म्हणून ते सर्व पंढरपुरास पळून गेले ! विठाबाई आतां ‘ मुक्त ’ झाली.

विठाबाई देहभानावर येतांच राजारामानें 'त्रय गेले तुझे देहाचे हो जाण !' असे हर्षोद्‌गार काढले आणि स्वामींनीं तिच्या मस्तकावर वरदहस्त ठेवला. त्या क्षणीं तिनें आपल्या आराध्य दैवताजवळ एवढेंच विनयानें मागितलें कीं—

मन जातें जेथें, दुःख दाखवी तेथें ।
नामावांचुनी वाचा बंद करी ॥

पुढचें सर्व जीवन तिनें स्वामींची सेवा करण्यांत व्यतीत केलें. आत्मकथनाबरोबरच चिदंबरस्वामी आणि राजाराम यांच्याविषयींहि तिनें अनेक अभंग रचले आहेत. तिची सर्व रचना अनघड असली, तरी त्या रचनेंत सच्चेपणा पुरेपूर भरलेला असल्यामुळें अनघड स्वरूपांतहि तिचे अभंग वाचकांच्या हृदयाला चटका लावून जातात. तिनें केलेला हा एक धांवा पहा, म्हणजे तिच्या सहजोत्कट वाणीचें अंतरंग कळून येईल—

तुजवीण चैन नाहीं चिदंबरा ।
यावें बा सत्वरा चिदंबरा ॥
विठाबाईचा अंत किती पाहसी देवा ।
लवकरी हो धांवा स्वामीराया ॥
कां नये करुणा स्वामी ब्रह्म पूर्णा ।
कृपेचा तूं राणा म्हणवीसी ॥
धांवा करितों स्वामी रात्रंदीस तुझा ।
कां नये रे माझे करुणा तुला ॥
विठाबाईचा अंत जवळी आला स्वामी ।
कुठें गेला तुम्ही चिदंबरा ॥

उत्कट अनुभवांनीं भारलेलें आणि सहज सरळ शैलीनें प्रत्ययकारी बनलेलें विठाबाईचें हें आत्मचरित्र ' संतांच्या आत्मकथां ' त महत्त्वाचें ठरावें, असेंच आहे.

## बहेरूचा शोकाविष्कार

संत सामान्यतः वैयक्तिक सुखदुःखांच्या अतीत गेलेले असतात. तुकोबांची प्रथम पत्नी निवर्तली, तेव्हां त्यांनीं ' बरें झालें बाईल मेली ! ' असे सुटकेचे

उद्गार काढल्याचें आपल्याला माहीतच आहे. संत देवाशीं भांडतात, त्याला शिव्या घालतात, धमकीहि देतात; परंतु तें सर्व चालतें केवळ साक्षात्काराच्या उत्कटतेनें. आपल्या हातानें घराला आग लावून, ‘देवाच्या सख्यत्वासाठीं जिवलगांच्या तुटी’ पडल्यानें आनंद मानण्याची वृत्ति संतांच्या ठायीं सार्वत्रिक आढळते. याउलट ‘संसारदु:खाचेनि गुणें । देवासि गाळी देणें ।’ याला संतांनीं मूर्खत्व मानलें आहे (दासबोध, २.१.५५). या पार्श्वभूमीवर बहेरू नामक कोणा भक्ताचें आत्माविष्करण पाहण्यासारखें आहे.[१०] आपण देवाच्या भक्तींत रंगलेलों असतांना देवानें आपला एकुलता एक पुत्र मृत्यूच्या स्वाधीन करावा, या घटनेचा बहेरूच्या मनावर विलक्षण परिणाम झाला आणि त्यानें पांडुरंगाला अत्यंत कठोर शब्दांत छेडलें—

कोण दोष घडला माथा । सांग सांग पंढरीनाथा ।।
तुझ्या सेवेसी तत्पर । बरा फेडिला उपकार ।।

प्रभुसेवेंत रत असलेल्यालाहि पुत्रवियोगाची व्यथा सहन करावी लागावी, याचें बहेरूला कोडें पडलें आहे. ज्यानें तारावें, तोच बुडवायला प्रवृत्त झाल्यावर कुणाकडे आशेनें पहावें? म्हणूनच बहेरूनें उद्ध्वस्त बनून देवाला सरळ सरळ शिव्या दिल्या आहेत—

नष्टा नारायणा । दुष्ट कर्म केलें ।
सिंधूंत बुडविलें । जहाज माझें ।।
वैर साधूनियां । पुत्र माझा नेला ।
ध्वज हा मोडिला । परलोकींचा ।।
दु:ख तें भोगावें । किती हे दिवस ।।
कधीं हें आयुष्य । सरेल माझें ।।
अहा रे अदृष्टा । कैसी घेसी धांव ।
घातकी हा देव । कळों आला ।।

---

१०. ‘रामदासी संशोधन’, प्रथम खंड : शं. श्री. देव श. १८५५. पृ. ७० (बाडांक १४).

मागें पुढें तुवां । न केला विचार ।
कैसी आणिली धाड । आम्हांवरी ॥
बहेरू म्हणे देव । चांडाळ घातकी ।
काये आलें हातीं । सांग तुझ्या ॥

'राईचा अन्याय' करणाऱ्या दीनदुबळ्यांना सुळीं द्यायचें आणि उन्मत्तांना सुखानें मिरवूं द्यायचें, असा देवाघरचा न्याय आहे, असाहि विचार बहेरूच्या मनांत येऊन गेला आणि त्यानें देवाला 'परम निर्दयी' असें संबोधून विचारलें आहे कीं —

तुझा म्यां अन्याय । काय केला चोरा ।
सांग सांग पोरा । गवळियाच्या ॥

बहेरूनें हा इतका उद्वेग प्रकट केला, हें स्वाभाविकच आहे. कारण ज्या वेळीं त्याच्या पुत्राचें निधन झालें, त्या वेळीं बहेरू हा वृद्ध झाला होता. 'शक्ति हे राहिली । न दिसे डोळां । कैसें हें कपाळां । दुःख आलें ॥' अशी आपली अवस्था त्यानें स्पष्ट केली आहे. अशा अवस्थेंत एकुलता एक आधारहि नष्ट झाल्यावर त्या बिचाऱ्यानें काय करावें? 'रहावें कोण्हे स्थळीं? जावें कोण्हे देशीं?' या अगतिक अवस्थेमुळेंच बहेरूची शांति भंग पावली आणि त्यानें संतापानें देवालाच शाप दिला कीं —

बहेरू म्हणे तुझें । हो रे निःसंतान ।
कैसें आम्हां रान- । भरी केलें ॥

## चार यात्रावर्णनें

प्रवासवृत्त अथवा यात्रावर्णन याचाहि आत्मचरित्रपर वाङ्मयांतच समावेश होतो. परंतु प्राचीन मराठींत यात्रावर्णनाच्या स्वरूपांतहि आत्मचरित्रपर लेखन फारसें झालें नाहीं. नामदेवाच्या नांवावर जसें आत्मचरित्र आहे, तशीच एक 'तीर्थावळी' हि आहे. त्यानें ज्ञानेश्वरादि संतांसह उत्तर भारतांतील तीर्थांची यात्रा केली होती. या यात्रेच्या प्रसंगीं ज्ञानदेव व नामदेव यांचा जो ज्ञान-भक्तिसंवाद घडून आला, त्याचें ग्रथन प्रस्तुत 'तीर्थावळीं'त आहे. परंतु

नामदेवाच्या नांवावरील आत्मचरित्रासारखीच या 'तीर्थावळी'चीहि अवस्था आहे. नामदेवाच्या गाथ्यांत नामदेवाचीं म्हणून 'आदि', 'तीर्थावळी' व 'समाधि' अशीं तीन प्रकरणें ज्ञानेश्वरचरित्राशीं संबद्ध आहेत. या तीनहि चरित्रांचें नामदेवकर्तृत्व कसें शंकास्पद आहे, याची साधारण चर्चा मीं अन्यत्र विस्तारानें केलेली आहे.[११]

यानंतर क्रम लागतो तो दीन दत्तपदांकित मुकुंदाच्या यात्रावर्णनाचा.[१२] हा मुकुंद वाजसनेयी शाखेचा यजुर्वेदी ब्राह्मण. 'नमीयाड देशांत खांडोवनासी' याचा जन्म झाला. सातव्या वर्षीं त्याचा विवाह झाला. विवाहानंतर त्याचा पिता मृत्यु पावल्यावर हा बागलाणांतील जैतापूर गांवीं आजोबांजवळ येऊन राहिला. पित्याच्या मृत्यूनंतर त्याची विपन्नावस्था झाली. 'एकाकी पडलों प्रपंचविषयीं, देखोनि भांबावलों,' अशी आपली मनःस्थिति त्यानें नोंदवून ठेवली आहे. या मनःस्थितींत आजोबांच्या उपदेशानें त्याचें मन परमार्थसन्मुख बनलें आणि जैतापूरच्या परिसरांतील देवतांचें दर्शन घेऊन तो मुल्हेर येथें आला. या वेळीं तो अठरा-एकोणीस वर्षांचा होता. मुल्हेर येथें आश्विन व. ६, शके १६०८ या दिवशीं दोन प्रहरीं त्याला सद्गुरु दत्तराजांनीं अर्धसुप्त व अर्धजागृत स्थितींत दर्शन दिलें. यानंतर पंधरा वर्षांनीं पौष शु. १०, शके १६२३ (शनिवार) या दिवशीं सद्गुरूचें प्रत्यक्ष दर्शन घडून प्रसादाचा लाभ झाला. गुरुप्रसाद-प्राप्तीनंतर सकल उपाधींचा त्याग करण्याच्या हेतूनें मुकुंदानें यात्रेचें प्रस्थान ठेवलें. गिरणा, गोदावरी व कृष्णा या नद्यांकाठचीं तीर्थें पाहिल्यावर मुकुंद परत तापीकाठीं गेला आणि तेथून, बंधमुक्त होऊन दिल्लीस निघालेल्या मोअज्जमची सेवा पत्करून त्याच्याबरोबर उत्तरेस निघाला. या उत्तरयात्रेंतील नानाविध भलेबुरे अनुभव त्यानें आपल्या यात्रावर्णनांत ग्रथित करून ठेवले आहेत. तीर्थांची शोभा, त्यांचें पावित्र्य, त्यांच्या माहात्म्यकथा, देशोदेशींची लोकस्थिति, वाटेंत भेटणारे नाना तऱ्हांचे सांगाती, द्रव्यासाठीं करावी लागलेली लाचारी या सर्वांचें वर्णन त्यानें केलें आहे. या वर्णनांत त्यानें मराठीबरोबरच हिंदी, गुजराती,

---

११. 'विविधा': रामचंद्र चिंतामण ढेरे. १९६७. पृ. १०१–१०९.

१२ भारत इतिहास संशोधक मंडळ–वार्षिक इतिवृत्त, शके १८३४ । २, पृ. १८२–१९५.

वगैरे अन्य भाषांचाहि वापर केला आहे. नमुना म्हणून मुकुंदानें केलेलें मुलतानवर्णन पहा—

मूलस्थान प्रसिद्ध नाम नगरी जैसी अयोध्या पुरी ।
जेथें जन्म धरी नृसिंह बरवा प्रल्हाद राखे हरी ॥
तर्णीकुंडहि रामतीर्थ लहरी हे चंद्रभागातिरीं ।
केलें संगममज्जनें निज करीं संतोषलें अंतरीं ॥

नृसिंहावताराच्या जन्मभूमीचा महिमा अशा प्रकारें गायिल्यावर त्यानें मुलतानच्या लोकजीवनाविषयींचा अभिप्राय लिहून ठेवला आहे, तो असा—

ठाइं ठाइं धर्मशालया सकूप शोभती ।
लोक भावभक्तियुक्त संपदाच भोगिती ॥
अपूर्व पौरसौख्य सर्व पाहिलें, परी असे ।
स्त्रिया अलज्ज– दूषणासि बोलिजे असे ॥

समर्थसमकालीन मुकुंदाचें हें यात्रावर्णन काव्यदृष्ट्या अतिसामान्य आहे. त्यांतून कवीच्या सामान्य व्यक्तिमत्त्वाची स्पष्ट कल्पना येते. या काळांत (श. १६३९ मध्यें) समर्थांचे प्रशिष्य गिरिधरस्वामी बीडकर यांनीं काशीयात्रा केली आणि त्या यात्रेचें वर्णन 'काशीयात्राकथन' नामक एका छोट्या (१०६ कडव्यांच्या) प्रकरणांत करून ठेवलें.[१३] या प्रकरणांत यात्रेंतील अनुभव नाहींत वा तीर्थस्थळांचीं वर्णनेंहि नाहींत. गिरिधरांनीं त्या त्या तीर्थांविषयींचा स्थूल भक्तिभाव व्यक्त केला आहे, इतकेंच. प्रत्यक्ष काशीस पोचल्यावर गिरिधरांच्या मनांत जो भाव उमलला, तो त्यांनीं पुढीलप्रमाणें व्यक्त केला आहे—

यात्रा आली काशीपुरीसी श्रीमंत ।
भागीरथी प्रांत पश्चमेसी ॥८१॥
पश्चमेसी काशी क्रमिलि चातुर्मासी ।
महिमा कोणासी वर्णवेल ॥८२॥

---

१३. 'श्रीगिरिधरकृत काशीखंड व काशीयात्राकथन' : संपा. ग. श्रं. देव. १९४७. पृ. १५९-१६२.

वर्णवेना भक्तिपुरीचा स्वानंद ।
जेथें परमानंद शिव स्वयें ॥८३॥
शिव स्वयें काशीखंडीं श्रवणीं बैसे ।
वाणी वदवीतसे काशीखंडीं ॥८४॥
काशीखंड श्रवण काशीसी संपूर्ण ।
गुरुकृपें पूर्ण यात्रा जाली ॥८५॥
यात्रा जाली गुरुकृपें निवेदिली ।
सज्जनीं ऐकिली स्वानंदेंसी ॥८६॥

गिरिधरांच्या या स्थूल भावदप्रकनाच्या पार्श्वभूमीवर कविवर मोरोपंतांचा 'गंगास्तव' जाणवून जातो.[१४] पंतांनीं शके १७१० मध्यें अमरसिंह जाधवाबरोबर काशीयात्रा केली. पंतांचें हृदय अत्यंत सत्त्वसंपन्न. आपल्या परंपरेंतील सर्व धार्मिक सत्त्वांशांचा दृढ संस्कार त्यांच्या मनावर झाला होता. परंपरेनें पोसलेली गंगेविषयींची ओढ त्यांच्या हृदयीं अनावर झाली होती. काशीयात्रेस निघण्यापूर्वी त्यांनीं एका यात्रिकाबरोबर 'गंगाप्रार्थना' व 'गंगाविज्ञप्ति' गंगेकडे पाठविली होती. 'गंगाप्रार्थनार्थ या आर्या पाठविल्या काशीप्रति' असा स्पष्ट उल्लेख त्यांनीं 'गंगाप्रार्थने'त केला आहे. काशींत पोचल्यावर पंतांनीं 'गंगावकिली' रचून, आपल्याबरोबरच आपल्या अनेक सख्यास्नेह्यांचा उद्धार करण्यासाठीं गंगेला विनविलें आहे. 'विष्णुपदवकिली' त्यांनीं गयेंत रचली. हीं दोन्ही प्रकरणें पंतांच्या चरित्राला अंशतः साह्यभूत होणारीं आहेत. या यात्राकाळांतच त्यांनीं गंगादि पवित्र विषयांच्या स्तवनासाठीं शेकडो आर्या रचल्या. परंतु हरिभक्तिपरायण पांगारकरांनीं म्हटल्याप्रमाणें "या सर्व प्रकरणांत केवळ स्वोद्धारासाठीं रचलेल्या 'गंगास्तवा'ची योग्यता अधिक आहे. हा स्तव सरळ सोप्या भाषेंत रचलेला असून, पंतांच्या हृदयवृत्तींच्या लाटांबरोबर बाहेर आलेला असल्यामुळें यांत माधुर्यप्रसादादि गुण उत्कृष्टत्वानें साधले आहेत. पंतांच्या हृदयाकाशांतील निर्मलत्व-पावनत्वादि गुणांचें प्रतिबिंब यांत फारच स्वच्छ पडलें आहे. हा 'गंगास्तव' पंतांच्या उत्तम काव्यांत मोडण्यासारखा आहे.

---

१४. 'मोरोपंतांचे समग्र ग्रंथ', खंड दहावा ( स्फुट काव्यें, भाग पहिला ) : संपा. अ. का. प्रियोळकर. १९६१. पृ. २८५–२९३.

पंत काशीस गंगेच्या घाटावर एकटे बसून हा गंगास्तव करीत आहेत, असें समजून आपण त्यांच्या पावन मूर्तींच्या मागें क्षणभर उभे राहून ऐकूं. म्हणजे आपलेंहि चित्त प्रसन्न व निर्मळ होईल. " [१५]—

तुवां मत्पत्राला जननि ! दिधला मान, कळलें
तुझें कारुण्यार्द्रे ! मन मजकडे स्पष्ट वळलें ।
सुखें येणें झालें, सकळहि पथीं विघ्न टळलें
प्रसू प्रक्षाळिल त्वरित न कशी बाळ मळलें ? ॥ १ ॥
वदे ज्ञाता, 'मुक्त त्वरित तुज गंगा करिल गा !'
मला नाहीं संतांहुनि इतर या भूवरि लगा ।
तुला आलों आहे जननि ! कर जोडूनि शरण
स्वतीरीं त्वां द्यावें द्रवुनि मज काशींत मरण ॥ २ ॥
गळावा त्वत्तीरीं भगवति ! न हा देह सदनीं
पडो गंगे ! तूझें मरणसमयीं तोय वदनीं ।
विवेकीं यावें जें धवलपण हेरंबरदनीं
भत्रीं हो त्वन्नेत्र, प्रभुनयन ते जेविं मदनीं ॥ ३ ॥
तुझ्या तीरीं नीरीं हृदय रमतें, दुःख शमतें,
यशोगानें पानें कुमत गळतें, विघ्न टळतें ।
कली भंगे गंगे ! षडरि झुरती, दोष तुरती,
दिली रामें नामें तशिच जगतीला निजगती ॥ ४ ॥

गंगेच्या घाटावर बसून तिच्या जळलहरींचा ध्वनि ऐकत ऐकत पंतांनीं भावसंकुल स्थितींत केलेलें हें गंगासंकीर्तन पंतांच्या आंतरजीवनाचें सत्त्व प्रत्ययास आणणारें आहे.

अशीं आणखीहि कांहीं यात्रावर्णनें शोधून सांपडतीलहि. परंतु त्यांना आत्मचरित्रपरता फारशी नसल्यामुळें त्यांचा विचार अनावश्यक ठरतो. तंजावरच्या द्वितीय शरफोजीनें (इ. स. १७९८–१८३२) रचलेल्या 'त्रिस्थळी

---

१५. 'मोरोपंत : चरित्र आणि काव्यविवेचन' : ल. रा. पांगारकर. द्वितीयावृत्ति, १९४३. पृ. १४२.

यात्रेच्या लावण्या '[१६] (त्याच्या कोणा आश्रितानें रचलेल्या असण्याचा संभव असूनहि) त्यानें स्वतःच रचलेल्या आहेत, असें मानलें, तरी त्यांत त्या त्या तीर्थांच्या महिम्याशिवाय कांहींहि नाहीं. यात्रिकाच्या अंतर्बाह्य जीवनाचा अंशहि त्यांत व्यक्त झालेला नाहीं. अशीं यात्रावर्णनें आत्मपरतेच्या अभावीं आत्म-चरित्रपर लेखनांत समाविष्ट करण्याचें कारण नाहीं.

## पत्रांतील आत्मकथन

पत्र-वाङ्मय हें आत्मचरित्रात्मक वाङ्मयाचें एक महत्त्वाचें अंग आहे. पत्रांतून पत्रलेखकाच्या आंतरजीवनाचीं अनेकविध रंगरूपें प्रकटतात, त्याच्या हृदयांतील नाना भावविचार कांहींशा अनौपचारिक सहजतेनें व्यक्त होतात. सुदैवानें प्राचीन मराठींतील पत्रवाङ्मयाचें प्रचंड भांडार संशोधकांच्या अनेक तपांच्या परिश्रमांतून उपलब्ध झालें आहे. हीं पत्रें प्राधान्यानें राजकीय इतिहासाचीं साधनें म्हणून शोधलीं गेलीं आहेत; त्यांचे लेखक बहुंशानें राजकीय उलाढालींत भाग घेणारे कर्ते पुरुष आहेत; त्यांनीं लिहिलेलीं बहुतेक पत्रें राजकीय उलाढालींच्या संबंधींच आहेत. त्यामुळें दृश्यतः त्यांचें स्वरूप औपचारिक असल्याचें जाणवतें आणि आत्मकथनाच्या दृष्टीनें त्यांचें मोल उणावतें कीं काय, अशी शंका वाटूं लागते. परंतु या प्रचंड पत्रभांडारांतील अनेक पत्रें अशीं आहेत कीं, ज्यांचें लेखनप्रयोजन औपचारिक व्यवहाराचें असूनहि त्यांनीं औपचारिकतेवर मात करून पत्रलेखकांच्या व्यक्तिमत्त्वाचें हृदयंगम दर्शन घडविलें आहे—त्या पत्रांना पत्रलेखकांच्या आंतरजीवनाचा सुगंधस्पर्श झाला आहे, याचा प्रत्यय आपल्याला येऊं शकतो. डॉ. शं. गो. तुळपुळे यांनीं यथार्थतया म्हटलें आहे कीं, " बहुतेक सर्व पत्रकारांनीं आपापलें मनोगत अशा रीतीनें प्रकट केलें आहे कीं, त्यांतून त्या त्या लेखकाचें अंतश्चरित्र स्पष्टपणें उमटावें. हीं पत्रें म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासांतील थोरांचीं छोटीं आत्मचरित्रेंच होत. "[१७] उदाहरणार्थ, आपण शिवप्रभूंचीं कांहीं पत्रें पाहूं.

---

१६. 'त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या': संपा. ए. कृष्णस्वामी महाडिक. १९५१ (तंजोर सरस्वती महाल सेरीज्, क्र. ३७).

१७. 'प्राचीन मराठी गद्य': संपा. डॉ. शं. गो. तुळपुळे. द्वितीयावृत्ति, १९६१. प्रस्तावना, पृ. १२–१३.

आपल्या सैनिकी हालचालींचा प्रजेला उपद्रव होऊं नये आणि तिला 'मोंगल मुलकांत आले, त्याहूनही तुम्ही!' असें कधींहि वाटूं नये, यासाठीं शिवप्रभूंनीं छावणींतील अधिकाऱ्यांना लिहिलेलें एक पत्र [१८] आहे. त्या पत्रांत शिवप्रभूंचा प्रजेविषयींचा कळवळा, तिच्या ठायीं स्वराज्यनिष्ठा जागृत करण्याचा त्यांचा प्रयत्न, सेनाधिकाऱ्यांना त्यांनीं लावून दिलेली शिस्त, सेनेच्या नैतिक बळावर असलेला त्यांचा कटाक्ष या सर्व गोष्टी प्रतिबिंबित झाल्या आहेत आणि 'रयतेस काडीचा अजार द्यावया गरज नाहीं!' हें सैन्याला जरबेनें बजावणाऱ्या त्या महापुरुषाची दिव्योदात्त मूर्ति त्यांत, अस्पष्टपणें का होईना, व्यक्त झाली आहे.

शिवप्रभूंनीं आपले बंधु व्यंकोजीराजे यांना लिहिलेल्या तीन पत्रांत त्यांचें हृदय अनेकांगांनीं व्यक्त झालें आहे आणि त्यांच्या चरित्रांतील अनेक घटनांचें प्रस्फुटन घडलें आहे. अशा एका प्रदीर्घ पत्रांत[१९] त्यांनीं आपलें आत्मचरित्रच सांगितलें आहे, तर दुसऱ्या एका पत्रांत व्यंकोजीराजांना त्यांनीं नव्या पुरुषार्थासाठीं प्रोत्साहित केलें आहे. ते लिहितात—

"तरी या गोष्टी आम्हांस बहुत अपूर्व वाटल्या कीं, कैलासवासी स्वामींनीं कसे कसे प्रसंग पडले ते निर्वाह करून, यवनांच्या सेवा करून, आपल्या पुरुषार्थें बाजी संवारुन, उत्कर्ष करुन घेतला. शेवट बरा निर्वाह केला. तें सर्व तुम्ही जाणतां. त्यांच्या साह्यतेस त्यांच्या बुद्धियुक्ति सर्वही तुम्हांस उपतिष्ठोन त्यांपासून शहाणे झाले आहां. त्याउपरी आम्हीही जे जे प्रसंग पडले ते निर्वाह करून कोणे तऱ्हेनें राज्य मिळविलें हें जाणतां व देखत आहां. असें असोन तुम्हांला ऐसा कोणता प्रसंग पडला जे, इतक्याचमध्यें आपल्या संसाराची कृतकृत्यता मानून, नसतें वैराग्य मनावरी आणून, कार्यप्रयोजनाचा उद्योग सोडोन, लोकांहातीं रिकामपणीं द्रव्य खाऊन नाश करवणें, व आपल्या शरीराची उपेक्षा करणें, हें कोण शहाणपण व कोणती नीति? आम्ही तुम्हांस वडील असतां चिंता कोणे गोष्टींची आहे? याउपरी सहसा वैराग्य न धरितां, मनांतून विषण्णता

---

१८. 'महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास' : संपा. द. वि. आपटे व रा. वि. ओतुरकर. द्वितीयावृत्ति, १९६३. पृ. ३२–३३.

१९. 'ऐतिहासिक साधनें' : संपा. शां. वि. आवळसकर. १९६३. पृ. १९–२५.

काढून कालक्रमणा करीत जाणें. सणवार व उत्साह पूर्ववत् करीत जाऊन तुम्ही आपलें शरीरसंरक्षण बरें करीत जाणें. जमेती सेवक लोकांना रिकामे न ठेवून कार्यप्रयोजनाचा उद्योग करून त्यांपासून पुरुषार्थ व कीर्ति अर्जणें. तुम्ही त्या प्रांतें पुरुषार्थ करून संतोषरूप असलिया आम्हांस समाधान व श्लाघ्य आहे कीं, कनिष्ठ बंधु असे पुरुषार्थी आहेती." [२०]

या पत्रांत शिवाजीमहाराजांची विजिगीषु वृत्ति आणि जीवनाविषयींची रसरशीत प्रवृत्तिपर दृष्टि व्यक्त झाली आहे. त्यांचीं अशीं अनेक पत्रें आहेत कीं, ज्यांतून व्यक्त झालेलें त्यांचें चरित्र त्यांच्या अनेक प्राचीन-अर्वाचीन चरित्र-ग्रंथांहून अधिक बोलकें आहे.

प्राचीन आत्मकथनात्मक वाङ्मयांतील हें पत्रांचें दालन अत्यंत समृद्ध आहे. त्यांत अनेक मराठा वीरांचें व मुत्सद्द्यांचें मन उघडें झालें आहे–त्यांच्या बुद्धीची तरलता, तेजस्विता व गतिमानता परिस्फुटित झाली आहे आणि तत्कालीन संघर्षमय इतिहासाच्या घडणींतील त्यांचें स्थान त्यांच्याच मुखानें अप्रत्यक्षतया सांगितलें गेलें आहे. त्यांचें सौंदर्य मुळांतूनच न्याहाळायला हवें.

इथेंच एक गोष्ट स्पष्ट करायला हवी. गद्य पत्रें हीं बहुशः राजकारणी व्यक्तींचीं आहेत. साधुसंतांनीं गद्यांत पत्रव्यवहार केलाच नाहीं, असा याचा अर्थ नव्हे; परंतु संतांचें मन पद्याला अधिक अनुकूल होतें; त्यांनीं पत्रेंहि बऱ्याच वेळां पद्यांतच लिहिलीं : तरीहि 'मज रघुनाथजीवेगलें कोण्ही नाहीं !' असा अनन्यभाव व्यक्त करणारें समर्थांच्या पत्रासारखें एखादें गद्य पत्र[२१] आपलें लक्ष वेधून घेतें.

## तीन गद्य आत्मचरित्रें

संतांनीं ज्याप्रमाणें अप्रत्यक्ष आत्मकथन केलें, परंतु आत्मचरित्रें लिहिलीं नाहींत, त्याचप्रमाणें संतेतर व्यक्तींनींहि आत्मचरित्रें न लिहितां अप्रत्यक्ष

---

२०. 'प्राचीन मराठी गद्य' : संपा. डॉ. शं. गो. तुळपुळे. १९६१. पृ. १२४–१२५.
२१. 'श्रीसंप्रदायाचीं कागदपत्रें', खंड पहिला : संपा. शं. श्री. देव. श. १८३७. पृ. १–४.

आत्मकथनच केलें आहे. आंग्ल साहित्याचा संपर्क येऊन आत्मचरित्रलेखनाची नवी धारा निर्माण होण्यापूर्वी सर्वसाधारणपणें समाजांतील सर्वच स्तरांतील व्यक्ति आत्मचरित्रविमुख होत्या, असें म्हणायला हरकत नाहीं. संतांचीं जशीं इन–मीन–तीन आत्मचरित्रें आपल्यापुढें आहेत, त्याचप्रमाणें योगायोगानें राजकारणी व्यक्तींचींहि तीनच आत्मचरित्रें आढळलीं आहेत: पहिलें नाना फडणिसांचें, दुसरें गंगाधरशास्त्री पटवर्धनांचें आणि तिसरें बापू कान्हो यांचें.

यांपैकीं नाना फडणिसांचें आत्मचरित्र[२२] अत्यंत महत्त्वाचें आहे. त्यांत नानांनीं केवळ आत्मगौरव केला आहे, असें नव्हे; तर त्यांनीं आपल्या दोषांनाहि शब्द-बद्ध करून ठेवलें आहे. नानांच्या जन्मापासून थोरल्या माधवरावांच्या मंचका-रोहणापर्यंतचा चरित्रभाग या आत्मचरित्रांत आला आहे. " हें पुण्यश्लोकाचें स्वानुभव निजहस्तें लिखित प्रकरण " अनेक दृष्टींनीं अपूर्व असें आहे. नानांचें हें प्रांजळ आत्माविष्करण पहा—

" बालपण हें षड्भाववत विकार असा देही जो मी त्याला लहानपणी अज्ञानें-करून आवृत. परंतु पूर्वसंस्कारेंकरून देवाची पूजा करावी, हा छंद फार. याजकरितां मातोश्रींनीं मारही दिला. परंतु संस्कार दृढ. विद्याभ्यासाकरितां मातापितर जे यांची शिक्षा, तेणेंकरून लहानपणीं अज्ञानाकरितां चित्तास फार वाईट वाटून त्यांचेंही अनिष्ट चिंतीत असें. दहावे वर्षी विवाह झाला. विघ्नें पडलीं असतां निर्विघ्न केलें. पुढें अकरा-बारा वर्षांनंतर कामाविर्भाव शरीरीं होऊं लागला. तेणेंकरून असत्समागम किंचित् झाला. तेणेंकरून पापप्रवृत्ति होऊं लागली. रेतस्खलनही व्यर्थ करूं लागलों. मध्यें घोड्यावरून पडलों. अति अवस्था कठीण. दोन दिवस शरीरभान नाहीं. याप्रमाणें झालें असतां गोविंद जो त्याचे कृपेनें बरें केलें. पुढें पंधरावे वर्षी पित्याचा काळ झाला. त्याचें और्ध्वदेहिक ईश्वरें करविलें. त्यात पापदृष्टि एकसमयीं जहाली. हा अपराध झाला. व्यर्थ रेतस्खलनेंकरून पाप व शरीरनाश समजू लागलों. तेव्हा सोडून देऊन निश्चय

२२. ' काव्येतिहाससंग्रहांतलि ऐतिहासिक पत्रें, यादी वगैरे ' : संपा. का. ना. साने. श. १८११. पृ. १७३–१८०.

केला. परंतु कामाविर्भाव विशेष, येणेंकरून पापबुद्धि होत असे. पुढें परंपरा, सेवाधर्म चालावा, या योगें व श्रीमंतांची कृपा पुत्रवत्, असें जाणून कर्नाटक प्रांतीं श्रीरंगपट्टणपर्यंत गेलों. परंतु प्रत्यहीं स्वप्नावस्था होऊं लागली. पुढें घरी आल्यावर रमणीयोग मात्र अज्ञानच तेणेंकरून झाला. परंतु पापबुद्धि निःशेष सुटेना. तेव्हां चित्तात विचार केला कीं, पितामह याची बुद्धि धर्मशील असतां व सत्यवचनी एकनिष्ठ देवब्राह्मणांचे ठायीं परमभक्ति, सात्विक आणि निषिद्ध करणेंच नाहीं; असें असतां माझे चित्त पापाकडे थोडेसें कां जातें? याचा विचार करितां, मातामहपक्ष अति व्यभिचारी, तो संस्कार आहे. बुद्धीचा निश्चय करावा तत्रापि स्थिरता राहूं नये. तेव्हां संस्कार नव्वत्तर-''

या उताऱ्यांत नानांच्या प्रांजळपणाचे स्फटिकवत् दर्शन घडतें. त्यांची पापभीरुता, ईश्वरावरील श्रद्धा, आपल्या ठायीं असलेल्या अतिरिक्त विकाराची जाणीव व त्याविषयीं वाटणारी आत्यंतिक खंत त्यांनीं इतक्या मोकळेपणानें व्यक्त केली आहे कीं, त्यांच्याविषयीं वाचकाला घृणा न वाटतां आदरच वाटावा. प्रांजळपणा हा अल्पचरित्राचा सर्वाधिक महत्त्वाचा विशेष मानला जातो; परंतु अगदीं गाजलेल्या आधुनिक आत्मचरित्रांतहि जो इतक्या स्पष्टपणानें क्वचितच व्यक्त झाला आहे, त्याचा आढळ नानांच्या आत्मचरित्रांत व्हावा, हें विशेष.

पानपताच्या मोहिमेच्या निमित्तानें उत्तरेंत गेले असतां नानांनीं जीं जीं तीर्थक्षेत्रें पाहिलीं, त्यांचें वर्णन करतांना त्या त्या ठिकाणीं त्यांच्या मनांत जे भावतरंग उसळले, ज्या भावविचारांच्या प्रतिक्रिया घडल्या, त्याहि त्यांनीं अत्यंत वेधक शब्दांत मांडल्या आहेत. पानपतावरील पराभवानंतर मराठा सैन्यांतील अवशिष्ट मंडळींची जी पळापळ झाली आणि त्यांच्यावर जो दारुण प्रसंग गुदरला, त्याचें वर्णन नानांनीं स्वानुभवानें केलें असल्यामुळें त्याला विलक्षण प्रत्ययकारिता लाभली आहे—

"...सर्व टाकून शुद्ध लंगोटी लावून बसलों. रात्र जाहल्यावर चाललों. तों एका कोसांत तीन-चार वेळ शरीरास हात लावून टोपीवाल्यांनीं झाडा घेतला. दर खेपेस समागमेंचे दहावीस तोडून टाकीत. त्यांत मी राहिलों. हे सत्ता ईश्वराची...असें जातां दहाबारा कोश पश्चिमेकडे गेलों तों तेच शत्रु येऊन रामजीपंत, बापूजीपंत वगैरे यांस जखमी भारी केलें. पडले. मी एकटा राहिलों.

तों गवतांत गेलों. ईश्वरें तृणेंकरून माझें रक्षण केलें. त्यांस मोहनी घातली. सर्वांस मारिलें असतां मी जवळ असतां न मारिलें...पुढें ते गेल्यावर जाऊं लागलों. तो पुढें दोन कोशांवर दुसरे मागती दृष्टीस पडले. तेव्हां मागती तृणांत जाऊन बसलों. तों जवळ येऊन काढूं लागले. ते समयीं ईश्वर त्यांतीलच एका वृद्धाचे मनांत संचार करिता जाहला, कीं कशास मारितां? मग गेले. तदनंतर माझी शक्ति पाणिपतावर बहुत क्षीण, आत्मविकारादिक विकारयुक्त. अन्न चालेना. असा मी, त्याजवर दयासमुद्र सांबसदाशिवजी, याणें कृपा करून शरीर अशक्त, ऊन पाहिलेंच नाहीं व पादचारी अभ्यास नसतां सोळासतरा कोश अन्न-उदका-व्यतिरिक्त आलों. क्षुधा तिसरे प्रहरीं लागली. तेव्हां बोरीचा पाला सांपडला तो खाऊन पाहिला. तो तोंडांत जाईना. तसाच सायंकाळीं ग्रामाबाहेर आलों. तों एका बैराग्यानें पीठ आणून दिलें. त्याची भाकर खादली. ती अमृतप्रमाण लागली. नंतर निद्रा केली."

पुढें 'भले बुद्धिचे सागर नाना' अशी ज्यांची ख्याति झाली, त्या या बिनीच्या मुत्सद्द्यानें वर्णिलेला हा प्रसंग पाहून डोळ्यांत टिपें येतात आणि पानपतावरील संहाराच्या कल्पनेनें अंग शहारतें. नानांची आत्माभिव्यक्ति अत्यंत प्रांजळ, सरळ आणि अनौपचारिक आहे, हें वाचकांना तत्काळ जाणवून जातें.

दुसरें गंगाधरशास्त्री पटवर्धनांचें आत्मचरित्र[२३] म्हणजे एक प्रकारें त्यांची कैफियतच आहे. या कैफियतीची पार्श्वभूमि स्पष्ट करतांना त्यांनीं प्रारंभींच लिहिलें आहे कीं, "मेजर वॉकर रसिडेंट, गुजराथ, याणी आज्ञा केली की, 'तुम्ही पुणेयास असताना बदचाल चालला म्हणोन अजम गवरनर साहेब बहादूर यास माहीत जाहाले आहे. सबब तेथे जे वृत्त जाहाले असेल, त्याची कच्ची माहितगारी व्हावी. सबब जसा जसा वेव्हार जाहला असेल तो सत्य लिहून द्यावा.' त्याजवरून स्मरणात जो सत्य व्यवहार आहे, तो लिहून देतो."

श्री. पां. न. पटवर्धन यांनीं संशोधिलेल्या या आत्मचरित्राविषयीं संपादकीय टिपणांत म. म. दत्तो वामन पोतदारांनीं म्हटलें आहे कीं, "हें गंगाधरशास्त्री

---

२३. 'भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक', ३-१, पृ. १७–४१.

यांचें आत्मचरित्र मोठें परीक्षणीय आहे. बाजीरावी घडामोडींतील गंगाधरशास्त्री हें एक प्रमुख पात्र आहे; व त्यानें लिहिलेला इतिहास, हा त्याच्या स्वभावाचा व सूक्ष्म माहितीचा एक चित्रपटच तयार झाला, असें समजतां येईल. दुर्दैवानें हें चरित्र अपूर्ण आहे. ”

प्रारंभींच्या भूमिकेंत गंगाधरशास्त्र्यांनीं स्पष्ट केल्याप्रमाणें ही एक प्रकारें कायदेशीर कैफियत वा जबानी असल्यामुळें, तींत गंगाधरशास्त्र्यांनीं आपल्या वयाच्या आठव्या वर्षापासूनची हकीकत सांगितलेली असूनहि, तिला आत्मचरित्राची रंगत येऊं शकली नाहीं.

तिसरें आत्मचरित्र बापू कान्हो यांचें.[२४] “ हे साताऱ्च्या सुप्रसिद्ध फडणिसांचे मूळ पुरुष होत. हे साताऱ्यांतील एक प्रतिष्ठित जुने सरदार असून, यांनीं नामधारी दुसरे छत्रपति शाहू महाराज यांचे बंधु चतुरसिंग राजे यांच्याबरोबर एकनिष्ठेनें राहून अनेक राजकीय कारस्थानें केलीं आणि अनेक बिकट प्रसंगांचे अनुभव घेतले. चतुरसिंग राजे यांनीं साताऱ्च्या छत्रपतीस पेशव्यांच्या बंदिवासांतून सोडविण्यासाठीं पुष्कळ खटपट केली; एवढेंच नव्हे तर ते त्यासाठीं शिंदे, होळकर आणि नागपूरकर भोसले यांच्याकडेहि गेले होते. बापू कान्हो हे त्यांच्याबरोबर होते. शेवटीं त्यांच्या प्रयत्नांस यश न येतां, त्यांस त्रिंबकजी डेंगळे यानें इ. स. १८१२ मध्यें मालेगांव मुक्कामीं दगा करून कैद केलें. अर्थात् चतुरसिंग राजे यांच्याबरोबर बापू कान्हो यांसहि पेशव्यांच्या बंदिवासांत राहणें भाग पडलें. दुसरे बाजीराव पेशवे यांनीं बापू कान्हो यांस जीवधन किल्ल्यावर ठेवलें. हे पेशवाई बुडाल्यानंतर बंदिवासांतून मुक्त झाले व यांस इ. स. १८१९ च्या जानेवारीमध्यें इंग्रज सरकारच्या शिफारशीनें साताऱचे महाराज श्रीछत्रपति प्रतापसिंह यांनीं फडणिसीचीं वस्त्रें दिलीं. ग्रांट डफसाहेब साताऱ्यास रेसिडेंट असतांना बापू कान्हो हे छत्रपतींच्या दरबारांतील प्रमुख व वजनदार मुत्सद्द्यांपैकीं होते. त्यांच्यावर ग्रांट डफसाहेबांची मेहेरबानी असून, त्यांच्याच सांगण्यावरून त्यांनीं आपलें आत्मवृत्त लिहून तयार केलें व ग्रांट डफसाहेब यांस

२४. ‘ इतिहाससंग्रहां ’तील ऐतिहासिक स्फुट लेख, भाग तिसरा : द. ब. पारसनीस. पृ. ७७-८६.

पेशवाईच्या अखेरच्या उलाढालींची पुष्कळ माहिती देऊन त्यांच्या इतिहासास मदत केली. हें आत्मवृत्त पेशवाईची अखेर पाहिलेल्या एका जुन्या मराठी मुत्सद्द्यानें लिहिलेलें आहे, हें एक त्याच्या कौतुकाचें कारण आहे." बापू कान्होचें हें आत्मवृत्त हकीकतवजाच आहे. घडलेल्या घटनांचें संक्षेपानें सरळ साधें निवेदन करणें एवढेंच त्यांचें उद्दिष्ट आहे. निजाम–पेशवे–संघर्षाचें पुढील वर्णन पहा—

"नबाब निजाम अल्लीखान बहादूर यांजकडील साठ लक्षांची जहागीर व दौलताबाद किल्ला पेशवे मागूं लागले. यास्तव नबाबाकडून मीर आलम व रेणूराव बोलण्याच्या वकिलीस आले. त्यांच्या भेटी जाल्या. नंतर बोलण्याचा तह न पटे. तेव्हां सवाई माधवराव पेशवे यांचे डेरे गारपिरावर सन तिसैन खमसेनच्या आश्विन मासीं होऊन नाना फडणीस सुद्धां मोहिमेस निघाले. तमाम फौजा व सरदार लोक होते ते चालले. तेथून मुंढव्याचे मुक्कामीं संक्रांतीचा समारंभ पौष मासीं होऊन, नंतर तेथून कूच दर कूच सीनानदीचे कांठीं मुक्काम झाला. नवाबाची बातमी ठेवून, सडया फौजा दौलतराव शिंदे व रघोजी भोसले सेनासाहेब सुभा व बापू होळकर व परशुरामभाऊ पटवर्धन मंडळींसुद्धां व कांहीं हुजुरात व पागे यांच्या खानग्या पुढें आघाडीस जाल्या. त्यांचे व नवाब यांचे फौजेचा मुकाबला जाला. शिंदे अलिजाबहादूर यांणी तोफांचा मारा बहुत केला व सेनासाहेब सुभा नागपूरवाले यांणीं बाणांचा मारा जवामर्दीनें केला. तेव्हां नवाब यांची फौज शिकस्त खाऊन माघारी फिरली."

— असा हा प्राचीन मराठींतील आत्मकथनात्मक वाङ्मयाचा स्थूल आलेख आहे. आत्मकथनाच्या या सर्व प्रयोगांत एक वाङ्मयकृति निर्माण करण्याची दृष्टि सहसा आढळत नाहीं. आत्मप्रकटीकरणाच्या सहजात वृत्तींतून अथवा एखाद्या व्यावहारिक निमित्तानेंच हें आत्मकथन घडलें आहे आणि 'स्वतः-विषयीं कांहीं बोलणें–लिहिणें हें अप्रशस्त आहे,' या दृढ संस्कारानें त्या आत्मकथनाला मर्यादा घातली आहे. त्यामुळें हा सहजतया होणारा आत्माविष्कारहि 'मुक्त' नाहीं. त्याला एक प्रकारचें अवघडलेपण आहे, संक्षिप्तता आहे आणि त्याचमुळें संदिग्धताहि आहे.

★ ★ ★

# तीन संतांच्या आत्मकथा

## बहिणाबाईची आत्मकथा

प्राचीन मराठींतील आत्मकथनपर वाङ्मयांत बहिणाबाईच्या आत्मकथेला अपूर्वाई लाभली आहे.[२५] शैशवांतच एका प्रौढ कर्मठ बिजवराशीं विवाहबद्ध झालेली गरीब ब्राह्मणाची पोर वयाच्या सातव्या-आठव्या वर्षी आईबाप व पति यांच्यासह परागंदा होते, आठ-दहा वर्षें अस्थिरपणें वणवणते आणि या अस्थिर विपन्न अवस्थेंतहि अंतरींचा ज्ञानदिवा मालवूं न देतां वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी तुकारामासारख्या महामानवाच्या कृपेला पात्र होऊन आपलें जीवन सुफळ-संपूर्ण बनविते— ही घटनाच परमार्थजगतांत अपूर्वाईची आहे. अन् त्याहून अपूर्वाई म्हणजे ' देवगांव माझें माहेर साजणी ! ' अशी, अंतरंग-सखीशीं हितगूज करावें इतक्या मोकळ्या मनानें, आपली अद्भुत जीवनकहाणी तिनें सांगितली आहे. तिची ही कहाणी ऐकणारी ' साजणी ' कोण भाग्यवती होती, कुणास ठाऊक ! परंतु त्या ' साजणी 'नें संतसाहित्यरसिकांवर अनंत उपकार करून ठेवले आहेत, एवढें मात्र खरें.

बहिणाबाईचा जन्म शके १५५१ मध्यें झाला आणि शके १५७० मध्यें तिला तुकोबांचा साक्षात् बोध प्राप्त झाला. गुरुबोधानंतर ती पुढें ५२ वर्षें जगली. परंतु तिनें आपली कथा केवळ पहिल्या अठरा-एकोणीस वर्षांचीच—जन्मापासून गुरुबोधापर्यंतचीच—सांगितली आहे. बहिणाबाईनें हें निवेदन अत्यंत सहज, सरळ आणि प्रांजळ भाषेंत केलेलें असून, त्याला तिच्या अनुभवांचा रसशीतपणा व ओलावा लाभला आहे. या अठरा वर्षांतील खरें म्हणजे वयाच्यीं ३ ते १८ अशा पंधराच वर्षांतील अनेक सुखदुःखांचे, हर्षामर्षांचे, आशानिराशांचे अन् जीवघेण्या संघर्षाचे प्रसंग तिनें अशा वेधक सरलतेनें सांगितले आहेत कीं, ऐकणाऱ्याला त्यांविषयीं आत्मीय संवेदना जाणवावी. तिनें कुठेंहि आपल्या निवेदनाला हेतुतः अलंकृत करण्याचा प्रयत्न केला नाहीं. सत्यनिष्ठा आणि आत्म-

---

२५. ' श्रीसंत बहिणाबाई यांची अभंगांची गाथा ' : चित्रशाळा प्रकाशन, पुणें. द्वितीयावृत्ति, १९५६. अभंग २–७९. पृ. १–२७.

परीक्षणाची वृत्ति इतकी पराकोटीची कीं, तिच्या विरोधकांनाहि ती आवडावी. ज्यांच्याकडून तिचा छळ झाला किंवा ज्यांचा तिला विरोध सहन करावा लागला, त्यांची बाजू तिनें सहानुभवानें समजावून घेतली आहे, त्यांच्या मानसिक घडणीचें रहस्य तिनें जाणलें आहे आणि अत्यंत ताटस्थ्यानें त्यांचीहि बाजू मांडली आहे. समरसता आणि तटस्थता यांच्या प्रयागतीर्थांत न्हालेली ही कथा त्याचमुळें कमालीची प्रांजळ बनली आहे.

तिचें कठोर आत्मपरीक्षण आत्मनिंदेच्या अतिरेकी वृत्तीनें डागळलेलें नाहीं, हेंहि मुद्दाम ध्यानीं घ्यायला हवें. कारण संतांची वृत्ति स्वतःला हीन-दीन समजण्याची असते—निदान साधनेच्या काळांत तरी संत कमालीची आत्मनिंदा करतात; सर्व दोषांचें खापर आपल्याकडे घेतात. परंतु बहिणाबाईला आपल्या परमार्थनिष्ठेची, तितिक्षेची अन् साधनापथावरील निर्भय वाटचालीची यथार्थ जाणीव आहे. तिनें ती मोकळेपणानें व्यक्तहि केली आहे— स्वमुखानें नव्हे, परंतु आपल्याविषयीं आस्था बाळगणाऱ्या संतसज्जनांच्या मुखानें.

बहिणाबाईच्या आत्मकथेंतील कांहीं प्रसंगांचा आपण ओझरता रसास्वाद घेऊं, म्हणजे आपल्याला तिच्या आंतरिक सामर्थ्याची आणि त्या सामर्थ्याचा स्पर्श लाभलेल्या तिच्या आत्मकथेची स्पष्ट कल्पना येईल.

प्रारंभींच ( अभंग क्र. ९ ) आपल्या पतीचा परिचय घडवितांना बहिणाबाई म्हणते—

द्वितीयसंबंधी वरुषा तिसाचा ।
नोवरा भाग्याचा ज्ञानवंत ॥

या तिच्या शब्दांत कसलाहि उपरोध नाहीं; परंतु तिनें अगदीं सरळ व निर्मळ मनानें केलेल्या या निवेदनालाहि एक धार आहे – व्यथेची धार आहे. केवळ तीन वर्षांची पोर आणि तीस वर्षांचा बिजवर पति. मातापित्यांना कन्यादानाचें पुण्य संपादण्याची ओढ असल्यामुळें त्यांना ही विषमता जाणवणें अशक्य होतें. पुण्याच्या यज्ञधूमानें त्यांची दृष्टि झाकोळली होती. या अगतिकतेच्या पार्श्वभूमीवर बहिणा सरळपणें पत्करते कीं, ' नोवरा भाग्याचा ज्ञानवंत ! '

लग्नानंतर त्यारच वर्षांनीं म्हणजे वयाच्या अवघ्या सातव्या-आठव्या वर्षीं बहिणाबाईच्या पित्यावर गंडांतर आलें आणि त्यांतून सुटण्यासाठीं जांवयाच्या सूचनेनें त्यांनीं परागंदा होण्याचा उपाय पत्करला. सासर-माहेर पाठीशीं घेऊन ही आठ वर्षांची पोर घराबाहेर पडली—रात्रींच्या अंधारांत! कुठें जायचें तें ठरलेलें नाहीं, काय करायचें तें ठरलेलें नाहीं, भिक्षेवांचून अन्य निर्वाहसाधन नाहीं. तिची सोबत करायला एकच विश्वासाची सखी होती—ती म्हणजे तिची सहजात भक्तिभावना. या भक्तिभावनेच्या बळावरच तिची पुढील खडतर वाटचाल सुसह्य झाली.

प्रवरासंगमींचा प्रसंग. त्या पवित्र तीर्थक्षेत्राच्या वातावरणांत तिचें मन रमलें—विसांवलें. 'तेथूनिया जीव निघों नेणें!' पण ती स्वतंत्र कुठें होती? तिचें 'करंटें अदृष्ट' तिला हवें तिकडे खेचीत होतें—तिच्या इच्छेविरुद्ध! मन मागें रेंगाळे आणि तें करंटें अदृष्ट पाय पुढें ओढी आणि मग बहिणाचें मन आक्रोशून इतकेंच म्हणे—

निघतां तेथून थोर वाटे दुःख।
करंटें अदृष्ट काय कीजे?॥

अदृष्टाचा हवाला आणि 'काय कीजे?' हा प्रश्न—यांतून त्या पोरीची सर्व अगतिकता घनीभूत होऊन राहिली आहे. परंतु या अगतिकतेनें जडावलेल्या जीवनाला अखंड गतिमान् राखण्याची तिची आंतरिक धडपडहि चालू असलेली दिसते.

प्रवरासंगम, शिखरशिंगणापूर, नीरानरसिंगपूर, पंढरपूर, पुनः शिखरशिंगणापूर, रहिमतपूर अशी भटकंती करीत करीत आणि जमेल तिथें दिवस काढीत ही मंडळी चार वर्षांनंतर कोल्हापूरला येऊन स्थिरावली. पंढरीला गेली तेव्हां, 'पांडुरंगमूर्ती देखोनी पवित्र। संतोषले नेत्र इंद्रियेंसी॥' परंतु ती नेत्रांची संतुष्टि अखंड टिकायला 'प्राक्तनाची दशा' आडवी येत होती. भिक्षेवर वाट क्रमून आणि नानापरींचे कष्ट सोसून कोल्हापुरांत आल्यावर हिरंभट नामक सत्प्रवृत्त ब्राह्मणाच्या घरीं या कुटुंबाला आश्रय लाभला. तिथें राहत असतांनाच तिला जयरामस्वामींच्या सत्संगतीचा लाभ झाला. तुकोबांची चरित्रकीर्ति आणि

अभंगावाणीहि त्यांच्याचकडून तिला ऐकायला मिळाली. अभंग क्र. १४ मध्यें विस्तारानें वर्णिलेली ती गाय-वासराची अद्‌भुत घटनाहि याच स्थानीं घडली. गायीच्या वासराविषयीं तिच्या मनांत रुजलेला आगळा भावबंध तिनें हळुवारपणें वर्णिला आहे. तिला लागलेला वासराचा लळा पाहून तिच्या पतीची जी प्रति-क्रिया घडली, ती व्यक्त करतांना बहिणाबाईच्या शब्दांत एक विलक्षण आशय-घनता आली आहे. ती म्हणते—

भ्रतार रागीट नावडेचि तया ।
परी त्यासी माया उपजली ॥
म्हणे, "असो, तुज नाहीं मूलबाळ ।
हाचि तुझा खेळ जाण मनीं ॥
तुजहि आवडी कथापुराणाची ।
संगति फुकाची तुज जाली" ॥

या प्रतिक्रियेंत राग आहे, कींव आहे आणि उपरोधहि आहे. प्रेम मात्र नाहीं. बहिणाबाईची भूमिका त्याविषयीं कांहींशी ताटस्थ्याची आहे. प्रेम असो-नसो, कोणत्या का निमित्तानें होईना, आपल्या साधनेच्या मार्गातील विरोध सौम्य झाला म्हणजे झालें.

वासराच्या प्रसंगाच्या निमित्तानें आणि एकंदरींत कोल्हापूरच्या निवासकाळांत बहिणाबाईचा जयरामस्वामींशीं जो संबंध आला, तो एक प्रकारें गुरुशिष्यसंबंधा-सारखाच आहे. जयरामस्वामींचें बहिणाबाईनें रेखाटलेलें व्यक्तिमत्त्व एखाद्या सहृदय पित्यासारखें वाटतें. बहिणाबाईचें लोकविलक्षण जीवन पाहून 'जन हांसती सकळ' असा नित्य अनुभव तिला घ्यावा लागे, परंतु जयरामस्वामी मात्र 'प्रेमळ' असल्यामुळें ते आत्मीयतेनें तिची वाटचाल न्याहाळीत होते, तिला उत्तेजन देत होते, तिच्या जखमांवर हळुवारपणें फुंकर घालीत होते, तिला दिलासा देत होते आणि तिच्यांतील आत्मविश्वास जागवीत होते. तिची पारमार्थिक प्रगति पाहून त्यांचा 'कंठ आनंदानें दाटत होता'. आपल्यावर 'माउलीच्या मायेची पांखर' घालणाऱ्या या सत्पुरुषाविषयीं कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं बहिणाबाईजवळ शब्द उरले नाहींत. नवऱ्याच्या विरोधामुळें त्यांचा प्रकट सत्कार करणें अशक्य असल्यामुळें बहिणाबाईनें—

मनेंचि आरती, केला नमस्कार।
पूजिला साचार मनामाजीं ॥

बहिणाची ही मानसपूजा केवळ औपचारिक नाहीं; तिच्यांत बहिणाच्या निःशब्द भावनांचा सुगंध दाटून राहिला आहे, हें वाचकांना तत्काळ जाणवतें.

जयरामस्वामींच्या मुखानें तुकोबांचें चरित्र आणि त्यांची अभंगवाणी ऐकून बहिणाबाईला तुकोबांचा छंद जडला. त्यांच्या 'अद्वैतपदां'च्या चिंतनानें तिचें 'चित्त झुरूं लागलें'.

ऐसीं ज्यांचीं पदें तो मज भेटता।
जीवास या होता तोष बहु ॥

अशी त्यांच्याविषयींची ओढ मनांत दाटूं लागली. परंतु त्यांची भेट होणें सोपें नव्हतें. अनेक विरोधांचीं कुंपणें ओलांडून जातांना तिला रक्तबंबाळ व्हावें लागणार होतें. तोंवर——

तुकोबांचें ध्यान करोनी अंतरीं।
राहे त्याभीतरीं देहामाजीं ॥

अंतरीं ध्यान उभें करायचें आणि त्या ध्यानाच्या अंतरीं आपण रहायचें—— हें सुख कोणीच हिरावून घेऊं शकत नव्हतें. परंतु या सुखाची जातच अशी होती कीं, त्यामुळें चित्ताची कासावीशी आणखीच वाढावी. बहिणाबाईला तुकोबांच्या 'आवडी' मुळें जी 'तडफडी' सहावी लागली, ती केवळ 'अंतरींचा साक्षी असेल जो प्राणी' तोच 'अनुभवें मनीं' जाणूं शकेल.

बहिणाबाईचें तें आवडतें वासरूं गेल्यावर तिचा आंतरिक संघर्ष आणखीच वाढला आणि आपणांस गुरुप्राप्ति झाली, तर आपण जगूंच शकणार नाहीं, अशा निकराला तिची वेदना पोंचली. अखेरीस या वेदनेच्या गाभ्यांतूनच महासुख उमलून आलें. सात दिवसांच्या अनुष्ठानानंतर कार्तिक वद्य पंचमी, रविवार शके १५६९ या दिवशीं चिंतनाच्या तंद्रींत असतांना तिच्या हृदयांत एक वेगळेंच जग फुलून आलें. रोमरोमांतून तरुवेली फुलांफळांनीं डवरल्या. इंद्रायणीच्या अमृतस्पर्शानें धुंदावलेला वारा तिच्या श्वसनांतून भिरभरूं लागला

आणि हृदयाच्या राउळांतून टाळमृदंगांच्या साथीवर नामघोष घुमूं लागला. तिनें पाहिलें–साक्षात् तुकोबा आपल्या अंतरांत उभे आहेत आणि आपल्याला अभयाचें वरदान देत आहेत—

> अमृत पाजिलें चवी अनारिसी।
> साक्ष ज्याची त्यासी मनामाजीं॥
> बहिणी म्हणे ऐसी कृपा सद्गुरूची।
> तुकारामें साची पूर्ण केली॥

या आगळ्या अनुभूतीमुळें तिचें ‘ मन आनंदलें ’ आणि ‘ चिद्रूपीं कोंदलें ’! तुकारामांची दिव्यता तिला जाणवली. ‘ विठ्ठलासी तया नाहीं भेदभाव ’ हें तिच्या प्रत्ययास आल्यामुळें ती गर्जून उठली–

> पांडुरंग तुका पांडुरंग तुका।
> वेगळीक देखा होय केवीं ?॥

पुढें पतीचें हृदयपरिवर्तन होऊन देहूस गेल्यावर तिला तुकोबांचें साक्षात् दर्शन घडलें; त्यांनीं तिला परमबोधाची अधिकारिणी बनविलें आणि तिचें जीवन कृतार्थ केलें. या साक्षात् दर्शनाचें चित्रहि तिनें हृदयंगम शब्दांत रेखांकित केलें आहे.

या आत्मकथेंत उमटलेलें बहिणाबाईचें व्यक्तिमत्त्व ठसठशीत आहे. तिची सहजात अनन्य परमार्थनिष्ठा, त्या निष्ठेपायीं उद्भवणारीं संकटें सहन करण्याची तिची क्षमता, तिची विवेकनिष्ठ जीवनदृष्टि, विवेकनिष्ठेंतून प्रत्ययास आलेल्या सत्याशीं इमान राखण्याची तिची तयारी, जीवनाचा समतोल राखण्याची तिची कुशलता—या सर्वच गोष्टी विलोभनीय आहेत. परमार्थाला पतीचा कडवा विरोध असतांनाहि तिनें त्याचा राग केला नाहीं, मग मीरेप्रमाणें त्याचा त्याग करणें दूरच राहिलें. पति आपणांस सोडून जात आहे, हें दिसतांच ती व्यथित झाली, आपल्यांतील शक्तींचें अपुरेपण तिला जाणवलें. मग तिनें आपलें सर्वस्व पणास लावलें आणि सेवाबळावर त्याचें हृदयपरिवर्तन घडवून आणलें. तिच्याच शब्दांत सांगायचें तर, तिनें प्रपंच आणि परमार्थ समानतेनें चालवून तळहातावर गगन झेलण्याचा चमत्कार दाखवून दिला!

## कचेश्वरांची ' आदि '

कचेश्वर हे बहिणाबाईप्रमाणेंच तुकाराममहाराजांचे शिष्य होत. परंतु त्यांना तुकोबांचा बोध अप्रत्यक्ष रीत्या प्राप्त झाला होता. त्यांचा जन्म इ. स. १६४० नंतर झालेला असल्यामुळें तुकोबांच्या निर्याणाच्या वेळीं ते अगदीं लहान होते. चाकणच्या सुप्रसिद्ध ब्रह्मे घराण्यांत त्यांचा जन्म झाला. या घराण्यांत शहाजी-राजांच्या काळापासून भोसल्यांकडील ब्रह्मत्वाचा अधिकार होता. शंकरभट–मेंगनाथभट–सिद्धेश्वरभट–कचेश्वरभट अशी त्यांची वंशपरंपरा आहे. सिद्धेश्वर-भटांना शिवाजीराजांनीं १०० रुपयांचें वर्षासन लावून दिल्याचा कागद उपलब्ध आहे. अशा या ख्यातनाम वैदिक घराण्यांत जन्मलेल्या कचेश्वरांना मात्र लहान वयापासूनच भगवद्भक्तीचें वेड होतें. हें वेड त्यांनीं प्रतिकूल वातावरणांतहि कसें टिकविलें-वाढविलें आणि त्यांना भक्तीच्या क्षेत्रांत परमयश कसें प्राप्त झालें, याची धावती कहाणी त्यांनीं आपल्या ' आदी 'मध्यें वा ' आदिकथानुसंधाना 'मध्यें ग्रथित केली आहे.[२६] ' आदि ' म्हणजे पूर्ववृत्त. म्हणजे कचेश्वरांचें हें 'आदि'-नामक आत्मचरित्र त्यांच्या जीवनाचा प्रारंभकाळ व्यापणारें आहे. ' आदी '-मध्यें ग्रथित झालेल्या कालखंडानंतरचें कचेश्वरांचें जीवन पुष्कळच घडामोडींनीं भरलेलें आहे. शाहूराजे दिल्लीहून सुटून महाराष्ट्रांत आल्यावर त्यांना खेड येथें कचेश्वरांचा आशीर्वाद प्राप्त झाला. पुढें ते सातारा येथें स्थिर झाल्यावर कचेश्वर ब्रह्मे हे ' राजगुरु ' बनले. शाहूराजाची स्त्री विरूबाई ही तर कचेश्वरांची अनुग्रहीतच बनलेली होती. या संबंधामुळें कचेश्वरांच्या घराण्याला अनेक इनामें वगैरे मिळालीं. ते फाल्गुन वद्य २, शके १६५३ या दिवशीं उंब्रज येथें कृष्णातीरीं समाधिस्थ झाले. त्यांचा एक शिष्य रामचंद्र खटाटोपे यानें त्यांची समाधि माहुली येथें उभारली. कचेश्वरांनीं ' सुदामचरित्र ' व ' गजेंद्रमोक्ष ' हीं दोन छोटीं श्लोकबद्ध प्रकरणें, कांहीं पदपदांतरें आणि तुकोबांवरील दोन सुंदर आरत्या एवढी रचना केली आहे.

---

२६ ' श्रीसरस्वतीमंदिर ', ८·११–१२, पृ. १९ २३ ( अपूर्ण ), भारत इतिहास संशोधक मंडळ वार्षिक इतिवृत्त, शके १८३५, पृ. २४१–२४६ ( संपूर्ण ).

कचेश्वरांच्या जीवनांत घडलेल्या एका अद्भुत चमत्कारासंबंधीं दोन ऐतिहासिक महत्त्वाचे कागद उपलब्ध आहेत.[२७] चाकण येथें चक्रेश्वराच्या देवालयाजवळ असलेल्या ओढ्याच्या पलीकडे जें मारुतीचें मंदिर आहे, त्याच्यासमोर असलेल्या आनंदगिरीच्या मठांत कचेश्वर राहत होते. त्या काळांत शके १६०७ मध्यें अवर्षण पडलें आणि लोक हवालदिल झाले. चाकणच्या किल्लेदारानें गांवांतील ब्राह्मणांना सांगितलें कीं, अनुष्ठान करून पाऊस पडण्याची व्यवस्था करा. ब्राह्मणांनीं अनुष्ठान केलें, परंतु पाऊस पडला नाहीं. त्यानंतर ब्राह्मणांनीं व्यंगोक्ति केली कीं, 'आमचे मुख्य महंत (कचेश्वरभट) आमच्यांत आल्याशिवाय पाऊस पडणें अशक्य आहे.' कचेश्वरांना आणण्यांत आलें. त्यांनीं आनंदगिरीच्या मठांतच हरिकीर्तन सुरू केलें आणि योग असा कीं, त्यांच्या प्रार्थनेला दैवी प्रतिसाद मिळून धो धो पाऊस पडला. यासंबंधीं चौसष्ट गांवच्या मोकदमांच्या सह्या असलेला कागद उजेडांत आला आहे.

कचेश्वरांनीं वर्णिलेली स्वतःची 'आदि' भावती असली, तरी प्रत्ययकारी आहे. घरांतील भक्तिविरुद्ध कर्मठ वातावरण आणि स्वतःची लहानपणांतील हूड वृत्ति यांचें सूचन पहिल्या ६ कडव्यांत घडवून, पुढचा जीवनांतील संक्रमणाचा टप्पा ७ ते २२ अशा १६ कडव्यांत वर्णिला आहे. 'प्रपंचाच्या योगें' चाकण सोडून 'जीर्णपुर' म्हणजे जुन्नर येथें कृष्णंभट सहस्रभोजने यांच्या घरीं राहत असतांना शाक्तांच्या जाळ्यांत सापडण्याचा मोह कसा उत्पन्न झाला आणि त्या मोहांतून कृष्णंभटांनींच कसें तारलें, याचें वृत्त वेधक व वेचक शब्दांत त्यांनीं दिलें आहे. हे कृष्णंभट सहस्रभोजनेच कचेश्वरांच्या हृदयांत भक्तीचा अंकुर रुजविण्यास कारणीभूत ठरले. शाक्त दीक्षा घेण्याच्या विचारांत निद्रिस्थ झाल्यावर कृष्णंभटांनीं आपल्याला स्वप्नांत कसें 'जागविलें', याचें वर्णन कचेश्वरांनीं हृदयंगम रीतीनें केलें आहे—

ऐसें विचारितां कांहीं निद्रा आली ।
देहबुद्धि गेली विचाराची ॥ १५ ॥

---

२७. भारत इतिहास संशोधक मंडळ वार्षिक इतिवृत्त, शके १८३५, पृ. २४७-२५५.

सहस्रभोजनी कृष्णभट आले ।
स्वप्नीं म्यां देखिले तये वेळीं ॥ १६ ॥
अद्भुत तें रूप साजिरें सुंदर ।
मंद हास्य कीर देखियलें ॥ १७ ॥
हात जोडूनियां मातें विनविलें ।
म्हणे नव्हे भले मंत्रशास्त्र ॥ १८ ॥
हांसोनिया म्हणे यांत न पडावें ।
सांगतों तें भावें धरा मनीं ॥ १९ ॥
कर्णीपाशीं माझ्या श्रीमुख आणिलें ।
बीज सांगितलें एकांतीचें ॥ २० ॥
नका करूं याचा म्हणती अव्हेर ।
निज प्रणवाक्षर हेंचि जपे ॥ २१ ॥
ऐसा उपदेश पडतांचि कानीं ।
होतें जें जें मनीं तें तें गेलें ॥ २२ ॥

या प्रसंगाच्या वर्णनांतून सात्त्विक व्यक्तीच्या संगतीचा मनावर होणारा प्रभाव आणि त्या प्रभावाच्या बळानें घडणारें अनिष्टनिवारण याची उत्तम कल्पना येते. यानंतर कचेश्वरांनीं वडिलांच्या भयानें विजापूरला केलेलें गमन, त्यांना जडलेला गीतेचा अनावर छंद, त्यांना झालेली विषबाधा, महामारीच्या साथीच्या प्रसंगानें चाकण सोडून शिरोलीस जाणें, तेथें कथा श्रवण करतांना स्वतः कीर्तन करण्याची लाभलेली प्रेरणा, त्या संदर्भात खेड येथें झालेली तुकारामपुत्र नारायणबावांची भेट, इत्यादि घटना ४५ व्या कडव्यापर्यंत सांगितल्या आहेत.

कीर्तनासाठीं नारायणबावांजवळ कचेश्वरांनीं तुकोबांचीं पांच पदें लिहून मागितलीं. त्यांनीं उत्तर दिलें कीं, 'देहू येथें आबाजीच्या घरीं तुकोबांच्या वह्या आहेत, त्या पहाव्या.' या उत्तरानंतर कचेश्वर नारायणबावांची आज्ञा घेऊन देहूला आले आणि तेथें पूर्वपुण्याईनें त्यांच्या जीवनाचें सोनें झालें. देहू येथें घडलेला तो अद्भुत दिव्यानुभवाचा प्रसंग कचेश्वरांनीं बहारीनें वर्णिला आहे. तो त्यांच्याच शब्दांत पहा—

देखोनियां देव आनंदलें मन ।
ऐकिलें कीर्तन संतामुखें ॥ ५० ॥
कथा जाल्यावरी देखिलें कौतुक ।
मोठें अलोलिक सांगवेना ॥ ५१ ॥
प्रत्यक्ष तुकोबा करीतसे कथा ।
आनंदें सर्वथा डोलतसे ॥ ५२ ॥
कर्दळी हेलावे जैसी चंडवातें ।
तैसें तुकोबातें देखियलें ॥ ५३ ॥

कचेश्वरांनीं हें जें 'अलोलिक कौतुक' अनुभवलें, तो त्यांच्या तुकाराम-भक्तीचा स्वाभाविक परिणाम होता. या वेळीं तुकोबांना जाऊन पंचवीस वर्षें उलटलीं होतीं. परंतु त्यांच्या अंतरांत तुकोबांच्या जीवनाचें, त्यांच्या वाणीचें इतकें उत्कट चिंतन चालू होतें कीं, त्याला साक्षात्काराचें फळ लाभणें स्वाभाविकच होतें. कचेश्वरांना घडलेलें हें तुकारामदर्शन विलोभनीय आहे. आंत दाटलेल्या आनंदाच्या ऊर्मीनीं डोलणारी तुकोबांची काया 'कर्दळी हेलावे जैसी चंडवातें', तशी भासली, हें कचेश्वरांचें वर्णन त्या महामानवाच्या कीर्तनरंगाची नेमकी कल्पना घडवूं शकते. कचेश्वरांना भासमान झालेला तुकोबांचा कीर्तनावेग इतका प्रबळ होता कीं, कचेश्वरांनीं धीर करून त्यांना एक प्रहरभर खांद्यावर घेऊन आवरण्याचा प्रयत्न केला, तरीहि तो आवरला नाहीं. या एका प्रहराच्या सेवेनें संतुष्ट झालेल्या तुकोबांनीं कचेश्वरांवर कृपावृष्टि केली—

जाणितला भाव अंतरीं व्यापकें ।
कथा कवतुकें पूर्ण केली ॥ ५७ ॥
ठेवियला माझ्या माथ्यावरी हात ।
स्वयें जाला गुरु स्वप्नामाजीं ॥ ५८ ॥
तेथूनियां स्फूर्ति तुकोबानें दिल्ही ।
येरे दिसीं केली कथा दीनें ॥ ५९ ॥
व्यथा जे जे होती ते ते सर्व गेली ।
प्रचित घडली माझी मज ॥ ६० ॥

गुरुकृपेनें हें ' परम प्रचीती 'चें लेणें प्राप्त झाल्यानंतर कचेश्वरांनीं लौकिकाची लाज सोडली; प्रभुसंकीर्तनासाठीं ' बाजारीं नाचायला ' प्रारंभ केला; वर्णाभिमान सोडून यातिबाह्य हरिभक्तांना आलिंगनें दिलीं; पित्यानें घरांतून बाहेर काढलें आणि ज्ञातिबांधवांनीं वाळींत टाकलें तरी त्यांनीं त्याची तमा बाळगली नाहीं. या अनन्यतेमुळें ' जो जो हेत माझ्या मनामाजीं देतो । तो तो पुरवितो स्वामी माझा ॥ ' असा आगळा अनुभव त्यांना प्रत्यहीं घडूं लागला. अशा प्रकारें देवानेंच त्यांचा योगक्षेम वहायला प्रारंभ केल्यामुळें सर्व विरोध विरून गेले आणि कचेश्वरांचें हृदय कृतज्ञतेनें उद्‌गारलें—

किती उपकार आठऊं स्वामीचे ।
सर्व खेळ याचे अगणित ॥ ९९ ॥

प्रभूच्या अगम्य लीलेच्या जयजयकारानें संपलेलें हें लघु आत्मचरित्र चरित्र-नायकाच्या महनीयतेचा स्पर्श लाभलेलें आहे.

## निरंजन रघुनाथांची ' स्वात्मप्रचीति '

संतसाहित्यरसिकांची संतचरित्राविषयींची जिज्ञासा विशेषतया तृप्त केली आहे ती निरंजन रघुनाथांच्या आत्मचरित्रानें.[२८] कार्तिक शुद्ध ८, शके १७०४ ते भाद्रपद शुद्ध ११ शके १७७७ (इ. स. १७८२ ते १८५५) हा त्यांचा जीवनकाल. त्यांनीं पेशवाईची इतिश्री पाहिली आणि आंग्लाईची अथश्रीहि अनुभवली. ते मूळचे बालेघाटीं वांजरेच्या कांठीं असलेल्या कळंब गांवचे अवधूत श्रीधर ओत्री नामक कौशिकगोत्री आश्वलायनशाखीय देशस्थ ब्राह्मण. निरंजन हें त्यांचें सांप्रदायिक नांव. निर्वाहासाठीं पुण्यास एकटेच आले. नष्टे उपनामक सावकाराकडे नोकरीस राहिले. बेलबागेंत ठाकुरदासांच्या कीर्तनांनीं त्यांची सुप्त अवधूतवृत्ति चाळवली आणि एके दिवशीं त्यांनीं नोकरी सोडली, पुणेंहि सोडलें अन् दत्तदर्शनाचा ध्यास घेऊन भ्रमंती सुरू केली. पुण्याजवळच देहूला त्यांनीं, ' एक वर्ष सात दिवसांत दत्तदर्शन झालें नाहीं, तर जिवंत

२८. श्रीनिरंजन रघुनाथांचे ग्रंथ : संपा. य. व्यं. कोल्हटकर. १९३५. पृ. २२९–३१७.

रहायचें नाहीं ', अशी कठोर प्रतिज्ञा केली. या तीव्र मुमुक्षुतेच्या उदयापासून ( भाद्रपद वद्य ४, शके १७३३ ) नाशिक येथें रघुनाथभटजींकडून गुरुबोधाची प्राप्ति होईपर्यंत ( कार्तिक वद्य ३०, शके १७३३ ) दोन महिने अकरा दिवसांत त्यांनीं जें जें अनुभलें, तें सर्व ' स्वात्मप्रचीति ' नामक ग्रंथांत ( अध्याय ५, ओव्या ५६५ ) शब्दबद्ध करून ठेवलें आणि पुढें प्रतिज्ञापूर्तीसाठीं नाशिक सोडून गिरनारवर दत्तसाक्षात्कार घडेपर्यंत ( भाद्रपद वद्य ११ शके १७३४ ) जें जें अनुभवलें तें सर्व ' साक्षात्कार ' नामक ग्रंथांत ( अध्याय ७, ओव्या ७०६ ) ग्रथित केलें आहे. ' स्वात्मप्रचीती 'ची रचना नाशिक येथें पौष शुद्ध १०, शके १७३३ या दिवशीं सांगता पावली, तर ' साक्षात्कारा 'ची रचना नाशिक येथेंच कार्तिक शुद्ध १०, शके १७३४ या दिवशीं समाप्त झाली.

निरंजन रघुनाथांनीं रचलेल्या आत्मचरित्रात्मक दोन ग्रंथांपैकीं ' स्वात्मप्रचीति ' हा ग्रंथ ' संतांच्या आत्मकथा ' मध्यें मीं समाविष्ट केला आहे. या ग्रंथांत त्यांनीं एका विशिष्ट प्रसंगाचें निमित्त करून विहंगमावलोकनपद्धतीनें ( Flash Back ) आपलें पूर्वजीवनहि परिचित करून दिलें आहे. तसेंच, देहूला त्यांनीं जी कठोर प्रतिज्ञा केली, तिची पूर्ति जरी ' साक्षात्कार ' प्रकरणाच्या अंतीं वर्णिलेली असली, तरी त्यांच्या ध्यानीं-मनीं नसतांना प्रतिज्ञापूर्तीपूर्वींच त्यांची तीव्र मुमुक्षुता नाशिक येथें परमपदप्राप्तीचा सोहळा अनुभवूं शकली. रघुनाथ-भटजींचा लाभ त्यांना अगदीं अकल्पितपणें घडला आणि त्यांनीं बोध करतांच त्यांचा परमार्थ ' सुफळ संपूर्ण ' झाला. म्हणजे परमार्थदृष्ट्या ' स्वात्मप्रचीति ' हा लघुग्रंथ निरंजन रघुनाथांचा मुमुक्षुतेपासून परमसिद्धीपर्यंतचा प्रवास रेखाटणारा आहे; म्हणूनच तो ग्रंथ मीं येथें वाचकांपुढें ठेवला आहे.

गिरनारवर दत्तसाक्षात्कार घडल्यावर निरंजन मुंबईमार्गें नाशिकास येऊन गुरूला भेटले. तेथें 'साक्षात्कारा'ची रचना करून कांहीं काळानें ते स्वतःच्या गांवीं गेले. तिथें कांहीं दिवस राहून कुटुंबासह जुन्नरास येऊन राहिले. तिथें त्यांचा ग्रंथसंग्रह जळाला. तो परत मिळावा, म्हणून त्यांनीं सप्तशृंगीवर पांच दिवस देवीजवळ धरणें धरलें. पांच दिवसांनीं त्यांना पूर्ववत् आपला ग्रंथसंभार परत मिळाला, असें म्हणतात. त्यानंतर ते श्रीमंत भाऊमहाराज पंडित या आपल्या

गुरुबंधूंपाशीं कोल्हापूर प्रांतीं वळवडें येथें जाऊन राहिले. तिथें त्यांची कीर्ति मिरजेचे अधिपति श्रीमंत गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन यांच्या कानांवर गेली. त्यांनीं निरंजनांना गौरवानें मिरजेस आणलें, त्यांचा अनुग्रह घेतला आणि त्यांना मिरज येथेंच स्थिर केलें ( सुमारें शके १७६७ ).

निरंजनांची ग्रंथरचना प्रचंड आहे. आत्मचरित्राशिवाय ‘ अनुभवामृतपद-बोधिनी ’, ‘ आत्मबोधप्रकाशिनी ’, ‘ श्रीरघुनाथचरित्र ’, ‘ केनोपनिषत्-टीका ’, पदपदांतरें इत्यादि त्यांचे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत नांदूनहि निरंजनांचें मन मात्र जुन्या वातावरणांतच घडलेलें होतें. नारायणमहाराज जालवणकर, बलभीमबुवा साडेकर, शांताश्रमस्वामी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, इ. सत्पुरुष त्यांच्याच परंपरेंतले.

‘ स्वात्मप्रचीती ’ मध्यें निरंजनांच्या विविध अनुभवांचें वेधक चित्रण आहे. पुणें, चिंचवड, देहू, घोडें, ब्राह्मणवाडा, जुन्नर, कोतूळ, अकोलें, देपूर, सिन्नर या क्रमानें ते नाशकास पोचले. देहू ते नाशिक हा प्रवास त्यांनीं एक महिना दहा दिवसांत केला. या प्रवासांत त्यांना सज्जन भेटले, दुर्जनहि भेटले; सहाय्यक भेटले, पीडकहि भेटले; कुणीं गौरविलें, तर कुणीं कुचेष्टा केली; परमार्थाच्या वाटेवर प्रामाणिक वाटचाल करणारे दिसले, तसेंच साधुवेश पांघरणारे दांभिकहि दिसले. निरंजनांची दृष्टि परमार्थोन्मुख असल्यामुळें त्यांच्या अनुभवाच्या कक्षा जरी परमार्थसंबद्ध जगापुरत्या सीमित होत्या, तरीहि त्यांची संवेदनशीलता तरल असल्यामुळें त्यांनीं सर्व अनुभव भेदकतेनें टिपले आहेत आणि मार्मिक शब्दांत अभिव्यक्त केले आहेत. त्यांच्या मांडणींत इतका दिलखुलासपणा दिसतो कीं, त्यांतून त्यांची सर्वच सुखद-दुःखद अनुभव तन्मयतेनें अनुभवण्याची वृत्ति जाणवून जाते.

निरंजनांच्या आत्मचरित्राचा पहिला विशेष हा कीं, त्यांना आपण एक ग्रंथ रचतों आहोंत, याची स्पष्ट जाणीव आहे आणि त्यांनीं आपलें आत्मकथन जाणीवपूर्वक ‘ रंगविलें ’ आहे. अर्थात् त्यांच्या आत्मकथनाला चढलेले रंग कुठेंहि त्या आत्मकथनाचें सत्य स्वरूप आवृत करीत नाहींत, सत्याचा यत्किंचि-तहि अपलाप करीत नाहींत, तर तें सत्य खुलवीत आहेत. ही रंगांची खुलावट

निरंजनांच्या रसिक आणि विदग्ध व्यक्तिमत्त्वाची अपरिहार्य परिणति आहे. बहिणाबाई आणि कचेश्वर यांच्या आत्मचरित्रांना एक प्रकारची आर्ष सहजता आहे. ती मात्र निरंजनांच्या आत्मकथनांत तितक्या प्रकर्षानें जाणवत नाहीं. तरीहि निरंजनांनीं आपलें कथन शक्य तितकें साध्या पद्धतीनेंच केलें आहे— त्याला कृत्रिम अलंकरणाच्या भारांत गुदमरून टाकलें नाहीं. सर्वसाधारणा-बरोबरच प्रौढ रसिकतेला आकर्षून घेण्याचें सामर्थ्य त्यांच्या या कुशल अभिव्यक्तींत आहे.

निरंजनांच्या आत्मचरित्राचा सहज जाणवणारा दुसरा विशेष म्हणजे त्यांतील अनुभवांची नाट्यात्मकता. वेळबागेंत ठाकूरदासांचें कीर्तन ऐकतांना उद्भवलेल्या विरक्तीच्या पहिल्या उन्मेषापासूनच या नाट्यात्मकतेला प्रारंभ झाला आहे आणि अकोलें येथें एका परित्यक्तेनें आपला पति म्हणून निरंजनांकडे बोट दाखविल्यामुळें निर्माण झालेल्या कठीण प्रसंगांत या नाट्यात्मकतेचा कळस झाला आहे.

‘ स्वात्मप्रचीती ’च्या दुसऱ्या-तिसऱ्या अध्यायांत निरंजनांनीं तो, अनुभवतांना दुःखद वाटलेला, परंतु रंगवतांना विनोदी बनलेला प्रसंग शब्दबद्ध करून ठेवला आहे. अकोलें येथें चंडीराममहाराजांकडे राहिल्यावर त्यांना कांहीं सत्संगाचें सुख अनुभवायला मिळालें. तेथील मुक्कामांतच त्यांना कार्तिक शुद्ध ९, शके १७३३ या दिवशीं श्रीदत्तात्रेयाचें सगुण-सालंकृत रूप ध्यानांत अनुभवायला मिळालें. अकरा दिवसपर्यंत त्यांनीं चंडीरामांच्या भागवत-प्रवचनांचाहि लाभ घेतला. परंतु एके दिवशीं पुराणश्रवणाला बसले असतांनाच त्यांच्यावर तो दारुण प्रसंग गुदरला—

तेथें एक ब्राह्मणाची कुमरी। वय तारुण्य अति सुंदरी।
तयेचा भ्रतार देशावरी। टाकुनी बहुदिन पैं गेला॥

ती ब्राह्मणी आपुले माहेरीं। राहिली बहुत काळवरी।
चिंता करितसे अंतरीं। भ्रताराच्या वियोगें॥

तयेनें मजलागीं पाहोन। मातेसी जाऊनि सांगे खूण।
म्हणे दृष्टीं पाहिला ब्राह्मण। आपुले भ्रतारासारिखा॥

म्हातारी तैशीच उठूनी । आली पुराणश्रवणालागूनी ।
दृष्टीं मातें अवलोकुनी । गेली सदनीं आपुल्या ॥
आप्तवर्गासी मेळवून । तयांसी बोलती झाली वचन ।
' माता जामात गेला उठून । तो म्यां दृष्टीं देखिला ' ॥
ते सर्व मजला पाहूं येती । आश्चर्य करिती अपुले चित्तीं ।
जवळ येऊनि पुसती । कवण ग्राम तुमचें ॥
तुम्हीं तों आच्छादिलें स्वरूप । परी आम्हीं ओळखिलें तुमचें रूप ।
सोडोनियां सर्व संताप । सत्य आम्हांसी वदावें ॥ ( २.८३-९० )

हें बालंट अकल्पितपणें अंगावर आल्यानंतर ' तो मी नव्हेच ! ' हें पटवून देतां देतां निरंजनांच्या नाकीं नऊ आले--

एथींची नीत ऐशी काई । सर्व करिती एकचि आवई ।
लटकेंच म्हणूनी जावाई । गळां पडती माझिया ॥ ( ३.२८ )

' एका स्त्रियेचे भयेंकरून ' सर्वस्वाचा त्याग केला असतांना सद्गुरूनें हें नवेंच लचांड आपल्या माथीं कां मारलें, याचें त्यांना कोडें पडलें. याच प्रसंगीं त्यांनीं आपल्या पूर्वजीवनाची कहाणी सांगितली आहे.

हा सर्वच प्रसंग निरंजनांनीं बहारीनें रंगविला आहे. या प्रसंगीं प्रकर्षानें प्रकटलेली त्यांची विनोदशीलता प्रस्तुत आत्मचरित्रांत अनेक ठिकाणीं दिसून येते. उदाहरणार्थ, चंडीरामांची भेट झाल्यावर त्यांनीं निरंजनांचें स्वागत करून त्यांना विचारलें कीं, " आपण आपलीं वस्त्रें कुठें ठेवलीं आहेत ? तीं अगोदर जाऊन आणा, नाहीं तर कोणी घेऊन जाईन ! " ' मी तों इतुकाचि दिगंबर ' अशा शब्दांनीं त्यांनीं स्वतःकडे संकेत केला आणि हंसून उत्तर दिलें—

सहस्त्रथिगळी कंथा परिकर । शिवालयीं ठेविली ॥
तयाचें ऐका हो वर्णन । विंचा सर्पांचें जें स्थान ।
लोक पळती तयासी भिऊन । ऐसी कंथा योग्य जे ॥
ती ठेविली शिवाचे शेजारी । तीतें पाहुनी अभिलाष करी ।
ऐसा कवण हो दरिद्री । तुमचे गांवीं जन्मला ? ॥ ( २.२२-२४ )

या उत्तरानें चंडिराममहाराजांप्रमाणेंच तुम्ही-आम्ही वाचकहि ' हास्यवदन ' केल्यावांचून राहत नाहींत.

विनोदशीलतेप्रमाणेंच सूक्ष्म संवेदनशीलतेमुळें निरंजन व्यक्तींचीं व प्रसंगांचीं वेधक चित्रें चितारूं शकतात, हेंहि वाचकांना जाणवून जातें. आपल्या परमार्थ-प्रवासांत त्यांना भेटलेल्या अनेक व्यक्ति त्यांनीं मोजक्या शब्दांत आपल्यापुढें उभ्या केल्या आहेत. विशिष्ट व्यक्तींप्रमाणेंच सर्वसाधारण समाजाच्या प्रतिक्रियाहि त्यांनीं सहजतया शब्दांत पकडल्या आहेत.

सूक्ष्म संवेदनशीलता, विदग्ध रसिकता, अनुभवांची विविधता, विनोदशीलता, इत्यादि वैशिष्ट्यांमुळें निरंजनांची ही कहाणी जशी रंजक आणि वेधक बनली आहे, तशीच त्यांची सहजसुंदर शैलीहि त्या कहाणीचें मूळचें सौंदर्य वाढविणारी आहे. ' काढिली लज्जेचि गवसणी ', ' अंतरीं प्रेमाश्रूंचिया लहरी। जळ तुंबळ दाटलें ॥ ', ' पोटीं पश्चात्तापाचा व्याळ। तेणें पळाली क्षुधा सकळ। ', ' सर्वेंचि दिठीं देखिली गंगा। जे त्रितापशमनी भवभंगा। ', ' मन-इंद्रियांचा करोनि लोथा। वचन माझें परियेसी ॥ ' यांसारखी सुंदर अभिव्यक्ति जागोजाग आढळते.

इतकी सुंदर आत्मकथा लिहूनहि निरंजन रघुनाथ आपल्या या कृतीला विनयानें ' अरण्यांतील वाकडें फूल ' म्हणतात. त्यांच्या ' अरण्यांतील वाकड्या फुलानें ' ब्रह्मांडव्यापी आत्मलिंग संतुष्ट होतें, तर तुम्ही-आम्ही रसिक कां संतुष्ट होणार नाहीं ? कारण त्यांच्या या बनफुलाला आत्मप्रचीतीचा आमोद आहे—

पहिली पहावी शास्त्रप्रचीति। दुसरी घ्यावी गुरुप्रचीति।
तिसरी ते आत्मप्रचीति। उपरी ग्रंथीं लिहिलीसे ॥

जरी ऐसा पश्चात्ताप घडेल। तरीच डोळा उघडेल।
नाहीं तरी सप्रेम बोल। येणार नाहीं अंतरीं ॥

म्हणाल लटकें हें वचन। तरी पुसा गुरुसी जाऊन।
तेव्हां मिळेल माझी खूण। ज्याप्रमाणें वदलों हें ॥

(५.१२२-१२४)

## आत्मकथा : आत्मप्रचीतिकथा

आत्मानुभवाची प्राप्ति करून घेणें हेंच संतजीवनाचें परमोद्दिष्ट असल्यामुळें त्यांची आत्मकथा ही एक प्रकारें आत्मप्रचीतिकथाच असते. या आत्मप्रचीतीसाठीं संतांना जी साधना करावी लागते, त्या साधनेच्या अनुषंगानें लौकिक जीवनाचें चित्रण येतें, इतकेंच. परंतु त्यांनीं न्याहाळलेलें लौकिक जीवनहि त्यांच्या पारमार्थिक दृष्टीनेंच रंगलेलें असतें. संतांच्या आत्मकथांची हीच विशेषता आहे आणि हीच मर्यादाहि आहे.

प्रा. रा. कृ. लागू यांनीं उत्कृष्ट आत्मचरित्राच्या कसोट्या सांगतांना असें म्हटलें आहे कीं, " आत्मवृत्तांत वाचकाला जो जिवंतपणाचा अनुभव येतो, तो लेखकाच्या व्यक्तिगत गुणांमुळेंच. आत्मचरित्रकारानें, परिमित का होईना, पण निर्मळ सत्य आपल्यापुढें मांडलें आहे, स्वतांच्या आणि इतरांच्या गुणावगुणांचें आविष्करण करतांना त्यानें लपवालपवी किंवा अतिशयोक्ति केली नाहीं, त्याचप्रमाणें कुठेंहि वायफळ आत्मस्तुतीला किंवा आत्मसमर्थनाला वाव दिला नाहीं, तसेंच लेखकाच्या मनोविश्लेषणांतील कौशल्याचा, चिकित्सक बुद्धीचा आणि न्यायनिष्ठुरतेचा आपल्याला जागोजाग प्रत्यय येतो आणि त्यानें आपल्या चरित्राची रचना आटपशीर, व्यवस्थित आणि टापटिपीनें केली आहे, अशी जेव्हां वाचकाची खात्री होते, तेव्हां आत्मवृत्त लिहिणारानें आपली कामगिरी उत्कृष्ट रीतीनें बजावली, असें त्याला म्हणतां येतें." [२९]

या कसोट्यांवर बहिणाबाई, कचेश्वर आणि निरंजन रघुनाथ या तीन संतांच्या आत्मकथा आपण पारखून पाहूं लागलों, तर या तिघांच्याहि आत्मकथा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या स्पर्शानें रसरशीत बनल्या आहेत, असें आपल्या अनुभवास येतें. कचेश्वरांची आत्मकथा त्रोटक असूनहि तींत निश्चितच जिवंतपणा आहे. निर्मळ सत्याचें निवेदन, अकृत्रिम प्रांजळपणा, कठोर आत्मपरीक्षण, न्यायनिष्ठुरता आणि आटपशीरपणा हेहि अपेक्षित गुणविशेष या आत्मकथांत आहेत. आंग्ल साहित्याच्या संपर्कानंतर आत्मकथा हा एक वाङ्मयप्रकार म्हणून

---

२९. ' रावबहादूर दादोबा पांडुरंग ' : अ. का. प्रियोळकर. १९४७. प्रास्ताविक निबंध, पृ. २२.

प्रगत झाल्यावर त्याचे जे साहित्यिक निकष बनले, ते संतांच्या आत्मकथांना लावून त्यांचें मूल्यमापन करणें रास्त नव्हे, याचें भान ठेवूनहि आपणांस असें म्हणतां येईल कीं, आत्मचरित्रांच्या नव्या वाचकांनाहि या संतांच्या आत्मकथा आवडतील अशा आहेत.

'संतांच्या आत्मकथां'चें विशेष मोल आहे, तें साधकांना आणि परमार्थाचें व्याकरण ( Grammar of Mysticism ) सिद्ध करूं पाहणाऱ्या संतसाहित्यरसिकांना. ज्यांना परमार्थपथावर वाटचाल करायची आहे, त्यांच्या-साठीं हे वाटाड्ये आहेत आणि ज्यांना परमार्थाचें शास्त्र बांधायचें आहे, त्यांच्यासाठीं ही प्रयोगसामग्री आहे. या उभयविध वाचकांना तरी 'संतांच्या आत्मकथां' चें संपादन संतोषदायी ठरेल, असा विश्वास वाटतो.

## संतांच्या आत्मकथा आणि संतचरित्रकथा

संतांच्या आत्मकथा या इतरांनीं लिहिलेल्या संतांच्या चरित्रकथांशीं तुळून पाहण्यासारख्या आहेत. संतांनीं लिहिलेलीं आपलीं चरित्रें आणि संतचरित्र-कारांनीं लिहिलेलीं संतांचीं चरित्रें यांत महदंतर आहे. संतचरित्रकारांना संतांचें आंतरजीवन पुरतेपणीं समजलेलेंच नसतें; त्यामुळें त्यांनीं संतचरित्रकथांना बहुंशीं भाकडकथांचें स्वरूप दिलें आहे. त्यांवर त्यांनीं अद्‌भुताचे रंग इतक्या गडदपणानें फासले आहेत कीं, त्यांमुळें मूळ विषयाची उज्ज्वलता लोपून जावी. संतांच्या आत्मकथांत सहजता आणि सरलता आहे, तर संतचरित्रकथांत असंभवनीयता आणि अद्‌भुतता आहे; संतांच्या आत्मकथांत अनुभूत सत्याची स्पष्टता आणि त्या सत्याचा अंगीकार पेलूं शकणारी निर्भय विवेकनिष्ठा आहे, तर संतचरित्रकथांत अनेकदा परमार्थाविषयींच्या अपसमजावर आधारलेला भाबडेपणा आणि गतानुगतिकता आहे.

संतांच्या आत्मकथा आणि संतचरित्रकथा यांमध्यें हा असा भेद जाणवणें स्वाभाविकच आहे. कारण संत हे स्वानुभवाचे सम्राट असतात, तर संत-चरित्रकार त्या स्वानुभवाच्या बाह्य दीप्तीनें दिपलेले दुर्बळ दृष्टीचे पामर असतात; संत हे आत्मप्रतीतीला सर्वश्रेष्ठ मानून त्या प्रतीतीनें उजळलेल्या वाटेवर निर्भयपणें वाटचाल करतात, तर संतचरित्रकारांना शास्त्रप्रतीतीहि धडपणें पेलणें कठीण जातें;

संत हे असत्यावर आणि अशिवावर कठोर आघात करतात, तर संतचरित्रकार हे दुबळेपणानें असत्य आणि अशिव यांवर सत्य-शिवाचा आभास लादतात. संतांच्या आत्मकथांमध्यें लौकिक हें अलौकिकांत परिणत होतें, तर संतांच्या चरित्रकथांत अलौकिक हें लौकिकाच्या पातळीवर उतरतें.

दोहींतील हें अंतर यथार्थपणें जाणून घ्यायचें असेल, तर आपल्याला 'संतांच्या चरित्रकथां'चा स्वतंत्रपणें परिचय करुन घ्यायला हवा.

★ ★ ★

४४००२
९८४८

# बाहिणाबाई

## १

देवगांव माझें माहेर साजणी । वेरूळ तेथोनी पूर्व भागीं ॥ १ ॥
देवांचा समूह सर्व जया ठायीं । मिळालासे पाहीं देवगांवीं ॥ २ ॥
हिमाचलाहुनी चालला अगस्ती । चतुर्मास वस्ती केली जेथें ॥ ३ ॥
तेथोनी पश्चिमे शिवनदी वाहात । तीर्थ हें अद्भुत तीर्थांमाजीं ॥ ४ ॥
लक्ष तीर्थ जेथें मज्जनीं सर्वदा । लाक्षायणी सदा वास तेथें ॥ ५ ॥
स्थळ तें पवित्र देखोनी अगस्ती । अनुष्ठाना येती सूर्योदयीं ॥ ६ ॥
वर दिधलासे ऋषी अगस्तीनें । लक्ष तीर्थें जाण लाक्षाग्रामा ॥ ७ ॥
स्नान दान करी जप अनुष्ठान । सिद्धि तेथें जाण होय नरा ॥ ८ ॥
अगस्ती राहोनी देवगांवीं जाण । शिवनदीस्नान करी सदा ॥ ९ ॥
बहिणी म्हणे ऐसें स्थळ देवग्राम । तेथें माझा जन्म झाला असे ॥१०॥

## २

आऊजी कुळकर्णी लेखक ते स्थळीं । तयाचिये कुळीं जन्म माझा ॥ १ ॥
जननी जानकी पिता आऊदेव । देवगांव नांव स्थळ त्यांचें ॥ २ ॥
तयाचिये कुळीं नाहीं जी संतान । करीत जीं संतांना कांहीं बाहीं ॥ ३ ॥
लक्ष तीर्थीं नित्य करूनिया स्नान । शिव-अनुष्ठान आरंभिलें ॥ ४ ॥
किती येक दिवशीं झालें स्वप्न तया । माझिया पितया आऊजीसी ॥ ५ ॥
होईल संतान कन्या दोन पुत्र । ब्राह्मणें पवित्र सांगितलें ॥ ६ ॥
बहिणी म्हणे एका वरुषीं मी उत्पन्न । नवमास पूर्ण कन्या झालें ॥ ७ ॥

## ३

करिती उत्साह बारशा ब्राह्मण । करूनी ब्राह्मण घरां गेलें ॥ १ ॥
पिता आऊदेव गेला अरण्यांत । तंव अकस्मात लाभ झाला ॥ २ ॥
मोहर बांधिली पितांबरी गांठीं । सांपडली वाटीं वेरुळाच्या ॥ ३ ॥

घरां येउनिया आनंदें बोलती । कन्या आम्हांप्रती लाभाईत ॥ ४ ॥
विश्वेश्वर ब्राह्मण ज्योतिषी नेटका । तयानें पत्रिका संपादिली ॥ ५ ॥
होईल कल्याण इचेनि तुमचें । ऐसें पत्रिकेचें फळ वाची ॥ ६ ॥
बोलती देवलसी भाग्याची होईल । आयुष्याचें बळ फार आहे ॥ ७ ॥
बहिणी म्हणे ऐसें द्विजें सांगितलें । तयासी दिधलें वस्त्र गायी ॥ ८ ॥

४

कन्यादान घडो हा अर्थ पाहोन । करावया लग्न द्विज आले ॥ १ ॥
तंव अकस्मात प्राक्तनासारिखा । शिऊराचा सखा एक आला ॥ २ ॥
पूर्वील सोयरा लग्नाचा इच्छिक । विवेक पाठक रत्न नामी ॥ ३ ॥
लाउनी मागणें केलें वाक्प्रदान । नेमुनीया लग्न संपादिलें ॥ ४ ॥
तंव बंधु झाला माझे पाठीवरी । अनुष्ठाना करी पूर्वीचिया ॥ ५ ॥
म्हणती हे सभाग्य बंधु पाठीवरी । झाला हे निर्धारी गुण इचे ॥ ६ ॥
बहिणी म्हणे ऐसीं झालीं वर्षें तीन । त्यापुढें जें होणें तेंही बोले ॥ ७ ॥

५

मौनस गोत्र माझ्या पित्याचें वरिष्ठ । भ्रतारही श्रेष्ठ गौतम तो ॥ १ ॥
शिवपुर नाम तेथील ज्योतिषी । मायबापें त्यासी समर्पिलें ॥ २ ॥
द्वितीयसंबंधी वरुषा तिसाचा । नोवरा भाग्याचा ज्ञानवंत ॥ ३ ॥
बहिणी म्हणे त्यासी कन्यादान केलें । आंदण दिधलें सर्व कांहीं ॥ ४ ॥

६

लग्न संपादोनी जालीं वरुषें चारी । गोत्रजाचा वैरी पिता जाला ॥ १ ॥
वृत्तीच्या संबंधें कलह मांडला । माझा बोलाविला भ्रतार हा ॥ २ ॥
गोत्रजाची फेडा बाकीसाकी ऋण । मागती लेहून शेतमळा ॥ ३ ॥
आतां येथोनिया जावें परदेशीं । तरीच आम्हांसी सुख प्राप्त ॥ ४ ॥
तूं सखा सोईरा मित्र तूंचि जामात । आमुचा हा अंत पाहूं नको ॥ ५ ॥
घातलेंसे बंदीं सोडवील कोण । सखा तूं होऊन सोडवावें ॥ ६ ॥
मग त्या भ्रतारें काढिलें बाहेरी । निशिचिया भरीं मध्यरात्रीं ॥ ७ ॥

पिता माता बंधु मजही समवेत । गेले रातोरात गंगातीरा ॥ ८ ॥
प्रवरासंगमीं केलें गंगास्नान । घेतलें दर्शन सिद्धनाथा ॥ ९ ॥
बहिणी म्हणे पुढें चालिलों तेथोनी । पाय वोसंतुनी महादेवा ॥१०॥

७

गंगा देखोनिया सिद्धेश्वर देव । तेथोनिया जीव निघों नेणें ॥ १ ॥
आवडीचा हेत पूर्वील संस्कार । श्रवणीं आदर कीर्तनाचा ॥ २ ॥
पुराणश्रवण पूजा देवस्थान । ब्राह्मणपूजन प्रीति यांची ॥ ३ ॥
संन्यासी सज्जन संत महानुभाव । यांचे पायीं जीव लागलासे ॥ ४ ॥
निघतां तेथून थोर वाटे दुःख । करंटें अदृष्ट काय कीजे ॥ ५ ॥
बहिणी म्हणे पुढें महादेवा जावें । भ्रतार गौरवें नेत आम्हां ॥ ६ ॥

८

मागोनी भिक्षेसी क्रमितसों वाट । सोसुनीया कष्ट नानापरी ॥ १ ॥
माय बाप बंधु भ्रतारेंसी जाण । महादेववन पहावया ॥ २ ॥
नरसिंहदर्शन घेउनी संपूर्ण । पांडुरंगस्थान देखियेलें ॥ ३ ॥
भीमा चंद्रभागा पुंडलीक भक्त । वेणुनादीं मुक्त प्राणिमात्र ॥ ४ ॥
पद्मालयीं स्नान देवाचें दर्शन । नामसंकीर्तन आयकियेलें ॥ ५ ॥
राही रखुमाबाई सत्यभामा सर्व । देखियेलें पूर्वद्वारयुक्त ॥ ६ ॥
महाद्वारांतुनी करितां प्रवेश । वाटलें मनास महासौख्य ॥ ७ ॥
पांडुरंगमूर्ती देखोनी पवित्र । संतोषले नेत्र इंद्रियेंसी ॥ ८ ॥
केली प्रदक्षिणा महाहर्षयुक्त । चित्त हें विरक्त करोनिया ॥ ९ ॥
वाटे मनामाजीं रहावें येथेंचि । परी प्राक्तनाची दशा नाहीं ॥१०॥
जीव जावो परी पंढरीचें स्थळ । न संडावें जळ ऐसें वाटे ॥११॥
बहिणी म्हणे पंचरात्री पंढरीस । केला आम्हीं वास पुण्ययोगें ॥१२॥

९

चैत्र पौर्णिमेस गेलों महादेवा । देवयात्रा सर्वा पाहविलें ॥ १ ॥
जालें समाधान देखोनी शंकर । मागें अभयकर भक्तियोगें ॥ २ ॥

पंचरात्री तेथें क्रमोनिया जाण । सिंगणापुरस्थान तेथें आलों ॥ ३ ॥
कोरान्नीचे कण सहज मेळवूं । तेणें सुखी जीवू होय माझा ॥ ४ ॥
अमृताचे परी वाटे गोड अन्न । पाप जळे जाण भक्षिलिया ॥ ५ ॥
बहिणी म्हणे माझें वय वर्षें नव । जालें अंतर्भाव सांगितला ॥ ६ ॥

१०

अतार विचारी सर्वांस विचार । रहावया थार येथें नाहीं ॥ १ ॥
ब्राह्मणाचे गांवीं जाउनी रहावें । ऐसें मनोभावें वाटतसे ॥ २ ॥
रहिमतपुरीं आहे ब्राह्मणसमुदाव । तेथें वस्ती ठाव सर्व करूं ॥ ३ ॥
बहिणी म्हणे पूर्वप्राक्तनाचे योग । न सोडी स्थळ त्याग केलीयाही ॥ ४ ॥

११

रहिमतपुरीं सर्व जाउनी राहिलों । अवघींच लागलों भिक्षा करूं ॥ १ ॥
अतार तो थोर स्नानसंध्या करी । देव तयावरी कृपावंत ॥ २ ॥
तेथील उपाध्य ग्रामीचा ग्रामस्थ । जावया उदित वाराणसी ॥ ३ ॥
ग्रामीचा व्यवहार चालावयालागीं । अतार विभागी केला तेणें ॥ ४ ॥
देखोनी नेटका ज्ञानी विद्यावंत । सर्वही गृहस्थ तया पुसे ॥ ५ ॥
आपण काशीस जाऊनी तुम्हांसी । उपाध्या ज्योतिषी रत्नाकर ॥ ६ ॥
तेहीं केलें मान्य मग राहों तेथें । निर्वाह जाला येथें वरुषाचा ॥ ७ ॥
यावरी तो जाणा आलीया ग्रामासी । रक्षिलें आम्हांसि वर्ष एक ॥ ८ ॥
ऐसीं वर्षें अकरा जालीं मजलागीं । वाटे संतसंगीं असावेंसें ॥ ९ ॥
कथा आयकावी पुराणश्रवणीं । ब्राह्मण-पूजनीं चित्त रिझे ॥ १० ॥
तेथोनी प्राक्तनें वोढोनिया जाण । स्थळ तें त्यागून चालविलें ॥ ११ ॥
उदास अंतर नावडेचि कांहीं । प्राक्तनासी नाहीं उपाय तो ॥ १२ ॥
बहिणी म्हणे पुढें कोल्हापुर क्षेत्र । जें अति पवित्र तेथें गेलों ॥ १३ ॥

१२

हिरंभट एक ब्राह्मण वेदान्ती । दोहीं शास्त्रीं गति यजुर्वेदी ॥ १ ॥
थोर भाग्यवंत पवित्र अग्निहोत्र । विद्यार्थी सर्वत्र पठण करिती ॥ २ ॥

तयाचिये गृहीं पाहोनिया स्थळ । राहोनी निश्चळ श्रवण होय ॥ ३ ॥
' जयराम गोसावी ' त्यांची हरिकथा । नित्य भागवता श्रवण करूं ॥ ४ ॥
बहिणी म्हणे तेथें करोनिया वास । सदा निजध्यास आत्मचर्चा ॥ ५ ॥

## १३

कोणे एके वेळीं अठराव्या वरुषांत । सोमवारीं वृत्त थोर झालें ॥ १ ॥
हिरंभट यासी गोदान दिधलें । द्विमुखी पाहिलें यजमानें ॥ २ ॥
काळी ते कपिला काळें तिचें वत्स । प्रदक्षणे पुच्छ निवेदिली ॥ ३ ॥
सुवर्णाचीं शिंगें रुपियाचे खूर । वरी पीतांबर पांघुरीला ॥ ४ ॥
सर्व उपचारें गोदान दिधलें । पहावया आले सर्व जण ॥ ५ ॥
उपजोनी वत्स गाय नेली घरां । वत्स पीत क्षीरा दोहाचिया ॥ ६ ॥
जाले दिवस दहा अकराव्या दिनीं । हिरंभटा स्वप्नीं द्विज बोले ॥ ७ ॥
ब्राह्मण हा तुझे आहे ओसरीस । कपिला तयास निवेदिजे ॥ ८ ॥
स्वप्नापरी साच केलें हिरंभटें । भ्रतारासी निष्ठें गाय दिल्ही ॥ ९ ॥
आनंदलें मन सर्वांचेंही जाण । गायी शुश्रूषण घडे आम्हां ॥१०॥
नित्य मायबाप जाती तृणालागीं । पाळिती प्रयोगीं जाण तोषें ॥११॥
गायीचें तें वत्स तेंही पै कपिला । माझे ठायीं तिला हेत बहु ॥१२॥
मीच सोडी तरी वत्स रिघे दोहा । करितां दोहावा सवे माझी ॥१३॥
पाणी मीच पाजीं तृण घालीं मीच । मजविण काच मनीं वाहे ॥१४॥
मी जाय पाणीया ओरडे तें वत्स । गाय वाय पुच्छ सवें चाले ॥१५॥
करुनीया लोक नवलचि राहाती । उगेच पहाती वत्स गायी ॥१६॥
मोकळेंचि वत्स असोनिया जाण । न वचे आपण गायीपाशीं ॥१७॥
तृण घाली तरी भक्षिती आपण । पाजिल्या जीवन तेव्हां पिती ॥१८॥
रात्रीचे अवसरीं वत्स निजे सेजे । पुराणीं तें फुंजे श्रवणकाळीं ॥१९॥
कथेपाशीं जाय सवें तेंही येत । उभयेचि निवांत कथा परिसे ॥२०॥
गाय गोठा घरीं आपण कथेसी । जातां मी स्नानासी सवें चाले ॥२१॥
करिती अपूर्व हे तुझे संबंधी । लोक नाना शब्दीं बोलताती ॥२२॥
कोणी म्हणे वत्स आहे योगभ्रष्ट । कोणी म्हणे नष्ट सवे इची ॥२३॥
कोणी म्हणती जन रिणाइत इचे । रीण फिटे तिचें तैंच सुटे ॥२४॥

ऐसे नानापरी वत्स तें न सोडी। मजही आवडी तयापाशीं ॥२५॥
न देखतां वत्स हेचि तळमळी। जलाविण मासोळी तैसें वाटे ॥२६॥
दळितां कांडितां वाहतांही पाणी। वत्साविण जनीं नावडे हो ॥२७॥
भ्रतार रागीट नावडेचि तया। परी त्यासी माया उपजली ॥२८॥
म्हणे असो तुज नाहीं मूलबाळ। हाचि तुझा खेळ जाण मनीं ॥२९॥
तुजही आवडी कथा-पुराणाची। संगती फुकाची तुज जाली ॥३०॥
तंव तये वेळीं जयराम गोसावी। तेथें तों स्वभावीं सहज आले ॥३१॥
कथा घरोघरीं ब्राह्मणाची पूजा। संतर्पणे द्विजां आरंभिलीं ॥३२॥
रात्रीं कथा होती दिवसांही करिती। मायबापें प्रीतीं पाहाती ते ॥३३॥
तेथें तयांसंगें मीही जाय कथे। वत्सही तें तेथें सवें चाले ॥३४॥
जेथें बैसे माय तेथें मी आपण। वत्सही धांवोन सवें उभें ॥३५॥
हागेना मुतेना उभेंचि श्रवण। करीत कीर्तन नामघोष ॥३६॥
आरती जालीया नमस्कार होती। आपणही क्षितीं ठेवी डोकें ॥३७॥
देखोनिया जन हांसती सकळ। परि तें प्रेमळ आल्हादचि ॥३८॥
म्हणती योगभ्रष्ट पूर्वील हरिभक्त। गोवेषें विरक्त पहा कैसें ॥३९॥
तंव येके दिवशीं मोरोपंतें कथा। करावया भक्ता पाचारिलें ॥४०॥
दिवस एकादशी प्रहरां दो कथा। मांडिली तत्त्वतां महानंदें ॥४१॥
जयराम गोसावी शिष्यसमूहेंसी। बैसले सभेसी आसनीं ते ॥४२॥
टाळ मृदंगेंसी होतसे गायन। मिळालेसे जन सर्व तेथें ॥४३॥
तेथें आपणही माय बाप बंधु। कथा परमानंदु पहातसे ॥४४॥
समागमें वत्स मजपाशीं बैसलें। लोकीं त्यासी नेलें दारवंटा ॥४५॥
म्हणती स्थळ नाहीं वैसावया जनां। पशु हें श्रवणा काय योग्य ॥४६॥
मी रडों लागलें वत्सालागीं तेथ। तंव जालें श्रुत गोसाविया ॥४७॥
ओरडतां वत्स मज ये रडतां। सांगती अवस्था स्वामीपाशीं ॥४८॥
म्हणती एक मुली हिरंभटाघरीं। आली ते श्रीहरिकीर्तनासी ॥४९॥
तिजसवें एक वत्स असे त्यासी। सांगातें दिनदिशीं हिंडवीते ॥५०॥
तें वत्स बाहेरी घातिलें अडचणीं। त्यालागीं रुसुनी रडतसे ॥५१॥
वत्स तें ओरडे बाहेरी तिष्ठतें। रडत हे येथें गलबला ॥५२॥
साक्ष अंतरींचा तो स्वामी जयराम। वत्स-अंतर्याम ओळखिलें ॥५३॥

म्हणे आणा त्यासी वत्साचे अंतरीं । काय नाहीं हरी आत्मवेत्ता ॥५४॥
कथेलागीं जीव होतो कासावीस । पशु कीं तयास म्हणों नये ॥५५॥
आणविलें वत्स बैसवी आसनीं । पाहोनी नयनीं तोष वाटे ॥५६॥
मजही कृपावंत कृपेचिये शब्दें । बोलावी प्रारब्धें पूर्वपुण्यें ॥५७॥
कुर्वाळोनी दोघां पाहे पूर्ण दृष्टीं । न मानेचि गोष्टी जनांलागीं ॥५८॥
कथा होत असे गजरें महाथोर । चित्त हें निर्भर वैष्णवांचें ॥५९॥
जयराम गोसावी यांचें मनोगत । पुण्यशील सत्य उभय वर्गे ॥६०॥
कथेमाजीं वत्स उभेंचि तिष्ठत । रूपीं सर्व चित्त आणुनीया ॥६१॥
मुली हे लहान वय इचें थोडें । श्रवण हें आवडे नवल मोठें ॥६२॥
म्हणे इचें कोणी आहे ये कथेसी । मायबाप तिसी सांगितलें ॥६३॥
भ्रतार इयेचा आहे बहु योग्य । परि हिचें वैराग्य थोर दिसे ॥६४॥
मायबापासवें येतसे पुराणीं । वत्सही घेऊनी समागमें ॥६५॥
मग म्यां आपुलें आपण पाहिलें । चरणीं घातलें लोटांगण ॥६६॥
वत्सही तैसेंचि पायांवरी पडे । अपूर्वता घडे सर्व जनीं ॥६७॥
वाम सव्य दोनी होते दोघे जणे । वत्सा मज तेणें उठविलें ॥६८॥
कथा संपलीया लोक गेले सर्व । परि हें अपूर्व म्हणती जन ॥६९॥
हिरंभट आणि आणिकही जन । म्हणती हें चिन्ह कोणा कळे ॥७०॥
बहिणी म्हणे ऐसें कोल्हापुरीं होय । पुढीलही सोय तुम्हां सांगों ॥७१॥

## १४

पिता-माता-बंधु-समवेत बिऱ्हाडीं । पावले ते घडीं वत्स-युक्त ॥ १ ॥
दोन घडी रात्र होती ते समयीं । वत्स तयीं गायीं पाजियेलें ॥ २ ॥
हिरंभटीं स्नान केलें अग्नीसवें । कार्तिकाचे दिवे आकाशांत ॥ ३ ॥
सडे संमार्जन केलें स्नान तेथें । गायी वत्स हातें कुर्वाळिलें ॥ ४ ॥
भ्रताराचें स्नान केलें आपुलीया । दक्षिणेची गया कोल्हापूर ॥ ५ ॥
तंव कोणी एक मिराबाई होती । तिनें कथास्थिती सांगितली ॥ ६ ॥
भ्रताराचे कानीं कथेंतील सर्व । सांगाया अपूर्व म्हणोनिया ॥ ७ ॥
वत्साचा वृत्तान्त माझेंही रुदन । भ्रताराचे कान तृप्त केले ॥ ८ ॥
जयराम गोसावी विदेही अवस्था । तेणें हात माथां ठेवियेला ॥ ९ ॥

थोर याचें भाग्य तो यासी बोलिला। आशीर्वाद दिला योग्य तेणें ॥१०॥
जातीचा भिक्षुक अंतरीं बहु राग। धावला सवेग गेहाप्रती ॥११॥
धरूनीया वेणी मारिलें यथेष्ट। हिरंभटा कष्ट फार झाले ॥१२॥
नावरे मारितां गायही ओरडे। वत्स तेंही रडें कासाविसी ॥१३॥
अठरावें वरुष मज होतें तेव्हां। काय पतिसेवा अंतरलें ॥१४॥
मायबाप बंधु बोलती न कांहीं। भ्रतारें क्रोधही आवरिला ॥१५॥
शांत झालीयानें पुसत तयास। स्त्रियेवरी त्रास कासयाचा ॥१६॥
येरू म्हणे रात्रीं कथेंत प्रतिष्ठा। काय याची निष्ठा देखियेली ॥१७॥
कैंचें तें पुराण कैंची हरिकथा। मारीन अन्यथा नव्हे येथ ॥१८॥
इतुकें बोलोनिया भ्रतार पुनरपी। क्रोध तो नाटोपी अग्नि-ऐसा ॥१९॥
बहिणी म्हणे तेव्हां देह संकल्पिलें। प्राक्तनाचें केलें कोण वारी ॥२०॥

## १५

आलें मना तंव मारिलें बळकट। बांधोनिया मोट टाकियेली ॥ १ ॥
हिरंभट म्हणे व्हा तुम्ही बाहेरी। हा दिसे हत्यारी चांडाळ कीं ॥ २ ॥
मग मातापिता हिरंभटालागीं। प्रार्थुनीया वेगीं स्थिर केलें ॥ ३ ॥
म्हणती कृपा करा आजि दिसभरी। प्रातःकाळीं दुरी ठाव पाहों ॥ ४ ॥
तयावरी वत्स गाय दोघे जण। न खाती तृण जळासही ॥ ५ ॥
देखोनी वत्सांसी गायींचा वृत्तान्त। मोट तो सोडीत तये वेळीं ॥ ६ ॥
आणिलें जवळी गाय वत्सापाशीं। हुंबरली जैसी पुत्र माता ॥ ७ ॥
आपण देखिलें वत्स आणि गाय। म्हणे प्राण जाय तरी बरा ॥ ८ ॥
बहिणी म्हणे तया तृण-पाणी पाजी। न घेती ते माझी थोर माया ॥ ९ ॥

## १६

न खाती तृण न घेती जीवन। आपणही अन्न टाकियेलें ॥ १ ॥
उठती सर्वथा स्वस्थळापासून। येती सर्व जण पाहावया ॥ २ ॥
जयराम स्वामींस सांगितलें जनीं। पहाया निर्वाणीं तेही आले ॥ ३ ॥
भ्रतारें तयांसी केला नमस्कार। आपुलें अंतर एकनिष्ठ ॥ ४ ॥
घातिलें आसन जयराम स्वामींस। हिरंभटीं त्यांस पूजियेलें ॥ ५ ॥

मिळोनिया लोक पाहाती लोचनीं । स्वामीही ते क्षणीं आनंदले ॥ ६ ॥
म्हणती ब्राह्मण तूं इचा भ्रतार । सांगतों निर्धार ऐक आतां ॥ ७ ॥
योगभ्रष्ट इचीं साधनें बळकट । तूं इसी कष्ट करूं नको ॥ ८ ॥
स्वधर्मेंचि तुझी करील ही सेवा । उद्धरील जीवा आपुलीया ॥ ९ ॥
तुझे पदरीं कांहीं पूर्वील सुकृत । तेणें ही सांगाती प्राप्त जाली ॥१०॥
गायी आणि वत्स हें इचें सांगाती । अनुष्ठानीं होती ऐक्यभाव ॥११॥
हेंच इचें गुरु हें इचें साधन । तोडील बंधन आपुलें हें ॥१२॥
इचे समागमें करिती जे वास । तेही भक्तिरस घेती सुखें ॥१३॥
आयकसी तरी बरें होय तुझें । येथें काय माझें बळ आहे ॥१४॥
बहिणी म्हणे ऐसें बोलोनी जयराम । पाहे मनोरम सर्व चिन्हें ॥१५॥

## १७

स्वस्थाना आपण चालिले जयराम । शिष्यांचा संभ्रम फार होता ॥ १ ॥
म्हणती जयराम अनुष्ठानी तिघे । पूर्वींच्या प्रसंगें एकनिष्ठ ॥ २ ॥
अंतराय कांहीं अनुष्ठानीं राहिल्या । गायी या जन्मल्या पुण्यवेगें ॥ ३ ॥
हे मुली संपूर्ण आहे अनुष्ठान । चित्तशुद्धि जाण ईस आहे ॥ ४ ॥
ऐसें परस्परें बोलतीं उत्तरें । कानीं मीं सादरें ऐकियेलीं ॥ ५ ॥
बहिणी म्हणे गेले स्वामी स्वस्थानासी। मागील वृत्तासी जाण सांगों ॥ ६ ॥

## १८

द्वादशी क्रमोनी त्रयोदशी आंत । वत्सासी देहान्तसमय आला ॥ १ ॥
तेथ हिरंभट बोलियला श्लोक । सहज स्वाभाविक 'मूकं करोति' ॥ २ ॥
पूर्वार्ध श्लोकाचा सरतांचि जाण । बोलिलें आपण वत्स तेव्हां ॥ ३ ॥
'यत्कृपा तमहं वंदे' बोले शब्द । श्लोकउत्तरार्ध वत्स बोले ॥ ४ ॥
आयकिला सर्व लोकीं तो श्लोकार्ध । करिती संवाद परस्परें ॥ ५ ॥
तंव त्या वत्सें टाकियेला प्राण । आलें मी धांवोन तयापाशीं ॥ ६ ॥
प्राणासवें प्राण जाऊं पाहे माझा । प्राक्तनासी दुजा यत्न नाहीं ॥ ७ ॥
गाय हंबरडे दोहींवरी मान । टाकी परी जाण शब्द कैंचा ॥ ८ ॥
बहिणी म्हणे देह प्राक्तनें राखिलें । पुढें काय झालें कोण जाणे ॥ ९ ॥

## १९

जयराम स्वामींस कळला वृत्तान्त । वत्सासी त्या अंतकाळ जाला ॥ १ ॥
श्लोकार्ध म्हणोनी प्राण वत्स त्यजी । योग लाजला जी तयापुढें ॥ २ ॥
मग सर्व श्रेष्ठ संत साधुजन । करीत कीर्तन वत्स नेलें ॥ ३ ॥
दिंडी पताकानें मिरविलें वत्स । गाय सर्वे तुच्छ मानीं देह ॥ ४ ॥
हुंबरे म्हणोनी चाले मागें मागें । गाय अंतरंगें महा दुःखी ॥ ५ ॥
पुरुनीया वत्स आले सर्व जन । करुनीया स्नान गृहां गेले ॥ ६ ॥
गाय वत्सापाशीं जाऊनी हुंबरे । मागुती ते फिरे गृहासी ये ॥ ७ ॥
मज विलोकितां मी तों अचेतन । माझ्या देहीं प्राण आढळेना ॥ ८ ॥
ऐसे दिन चारी लोटलियावरी । प्रतिपदेमाझारीं मध्यरातीं ॥ ९ ॥
बोलिला ब्राह्मण येऊनी सन्मुख । सावध विवेक धरीं बाई ॥१०॥
सावध सावध सावध तूं मनीं । श्रवणीं ऐकोनी देह कांपे ॥११॥
तंव गाय नाहीं वत्स ना ते लोक । माय ते सन्मुख बैसलीसे ॥१२॥
बंधु पिता आणि भ्रतार बैसला । सोज्ज्वळ लागला दीप असे ॥१३॥
तेथोनीया मन करोनी सावध । स्मरणीं स्वतःसिद्ध चित्त केलें ॥१४॥
बहिणी म्हणे देह सर्वही विकळ । परि तें निश्चळ चित्त माझें ॥१५॥

## २०

उघडोनी नेत्र पाहे जंव पुढें । तंव दृष्टी पडे पांडुरंग ॥ १ ॥
देखिली पंढरी ध्याना तेचि येत । जयराम दिसत दृष्टीपुढें ॥ २ ॥
ब्राह्मण स्वप्नांत देखिला तो जाण । त्याची आठवण मनीं वाहे ॥ ३ ॥
न दिसे आणिक नेत्रांपुढें जाण । नामाचें स्मरण मनीं राहे ॥ ४ ॥
पूर्वील हरिकथा आयकिल्या होत्या । त्या मनीं मागुत्या आठवती ॥ ५ ॥
तुकोबाचीं पदें अद्वैत प्रसिद्ध । त्यांचा अनुवाद चित्त झुरवी ॥ ६ ॥
ऐसीं ज्याचीं पदें तो मज भेटतां । जीवास या होतां तोष बहु ॥ ७ ॥
तुकोबाचा छंद लागला मनासी । ऐकतां पदांसी कथेमाजीं ॥ ८ ॥
तुकोबाची भेटी होईल तो क्षण । वैकुंठासमान होय मज ॥ ९ ॥
तुकोबाची ऐकेन कानीं हरिकथा । होय तैसें चित्ता समाधान ॥१०॥

तुकोबाचें ध्यान करोनी अंतरीं । राहे त्याभीतरीं देहामाजीं ॥११॥
बहिणी म्हणे तुका सद्‌गुरु सहोदर । भेटतां अपार सुख होय ॥१२॥

## २१

मच्छ जैसा जळावांचोनी तडफडी । तैसीच आवडी तुकोबाची ॥ १ ॥
अंतरींचा साक्षी असेल जो प्राणी । अनुभवें मनीं जाणेल तो ॥ २ ॥
तृषितासी जैसें आवडे जीवन । तैसा पिंड प्राणावीण तया ॥ ३ ॥
बहिणी म्हणे हेत तुकोबांचे पायीं । ऐकोनिया देहीं पदें त्यांचीं ॥ ४ ॥

## २२

संचितासी दग्ध करी ऐसा कोण । सद्‌गुरूवांचोन जाण मना ॥ १ ॥
यालागीं सद्‌गुरु असावा उत्तम । जेणें निमे श्रम संसाराचा ॥ २ ॥
त्रिविध तापांसी कोण करी शांत । सद्‌गुरु एकान्त न जोडतां ॥ ३ ॥
जन्ममरणाची कथा कैं निवारे । सद्‌गुरु निर्धारें न भेटतां ॥ ४ ॥
वासना निःशेष निवारेल तेव्हां । भेटेल तुकोबा सद्‌गुरु तो ॥ ५ ॥
बहिणी म्हणे माझा जाऊं पाहे जीव । कां हो न ये कींव तुकोबासी ॥ ६ ॥

## २३

न बोलवे शब्द अंतरींचा धावा । नायके तुकोबा काय कीजे ॥ १ ॥
अदृष्ट करंटें साह्य न हो देव । अंतरींची हांव काय करूं ॥ २ ॥
तेरा दिवस ज्यानें वह्या उदकांत । घालोनिया सत्य वांचविल्या ॥ ३ ॥
महाराष्ट्री शब्दांत वेदान्ताचा अर्थ । बोलिला लोकांत सर्वद्रष्टा ॥ ४ ॥
अंतरसाक्ष आहे निरोपणीं हेत । जडे परी चित्त वोळखेना ॥ ५ ॥
बहिणी म्हणे मीच असेन अपराधी । अपराध त्रिशुद्धी काय त्यांचा ॥ ६ ॥

## २४

बहुत अंतरीं शोक आरंभिला । कां मज विठ्ठला मोकलिलें ॥ १ ॥
त्रिविध तापानें तापलें मी बहु । जाईना कां जीऊ प्राण माझा ॥ २ ॥
तंव अकस्मात सातविया दिनीं । नामसंकीर्तनीं घोषयुक्त ॥ ३ ॥

तुकारामरूपें येवोनी प्रत्यक्ष । म्हणे पूर्वपक्ष सांभाळीजे ॥ ४ ॥
नको करूं चिंता असें तुजपाशीं । घेईं अमृतासी हातींचिया ॥ ५ ॥
गाय केलें वत्स मुखीं निघे धार । अमृत हें सार सेवीं हेंचि ॥ ६ ॥
ठेवोनीया कर मस्तकीं बोलिला । मंत्र सांगितला कर्णरंध्रीं ॥ ७ ॥
म्यांही पायांवरी ठेविलें मस्तक । दिधलें पुस्तक मंत्र गीता ॥ ८ ॥
कार्तिकांत वद्य पंचमी रविवार । स्वप्नींचा विचार गुरुकृपा ॥ ९ ॥
आनंदलें मन चिद्रूपीं कोंदलें । उठोनी बैसलें चमत्कारें ॥१०॥
मंत्र आठविती तुकोबास्वरूपा । स्वप्नामाजीं कृपा पूर्ण केली ॥११॥
अमृत पाजिलें चवी अनारिसी । साक्ष ज्याची त्यासी मनामाजीं ॥१२॥
बहिणी म्हणे ऐसी कृपा सद्‌गुरूची । तुकारामें साची पूर्ण केली ॥१३॥

## २५

जालें समाधान ब्राह्मणाच्या शब्दें । स्वप्नामाजीं पदें आठविती ॥ १ ॥
परी अंतरींच तुकोबाचें ध्यान । दर्शनावांचोन करीतसें ॥ २ ॥
जयाचिया पदें होतसे विश्रांती । तेचि देहाकृति विठ्ठलाची ॥ ३ ॥
विठ्ठलासी तया नाहीं भेदभाव । ऐसें माझें मन साक्ष आहे ॥ ४ ॥
पांडुरंग तुका पांडुरंग तुका । वेगळीक देखा होय केवीं ॥ ५ ॥
कलियुगीं बौद्धरूप धरी हरी । तुकोबा शरीरीं प्रवेशला ॥ ६ ॥
तुकोबाची बुद्धि पांडुरंगरूप । मन तें स्वरूप तुकोबाचें ॥ ७ ॥
तुकोबाचें सर्व इंद्रिय-चालक । पांडुरंग देख सत्य आहे ॥ ८ ॥
तुकोबाचे नेत्र तेही पांडुरंग । श्रोत्र ते अभंगरूप त्याचे ॥ ९ ॥
तुकोबाचे हात लिहिताती जें जें । तेंचि तें सहजें पांडुरंग ॥१०॥
सर्वही व्यापार तुकोबाचे हरी । आपणचि करी अद्वयत्वें ॥११॥
बहिणी म्हणे रूपें व्यापक तुकाबा । ध्यान माझ्या जीवा हेंचि पाहे ॥१२॥

## २६

भ्रतारें टाकिलें मोट बांधोनिया । न सोसी ते तया क्लेशावस्था ॥ १ ॥
चतुर्थ दिवशीं जीव टाकियेला । विठ्ठलें दाविला चमत्कारु ॥ २ ॥
ब्राह्मणाच्या रूपें येवोनी सांगत । सावधान चित्त करीं पुढें ॥ ३ ॥

अंतरीं सावध होउनी राहिलें। चित्त म्यां गोविलें तुकोबासी ॥ ४ ॥
वत्स गेलीयासी दिवस सातवा। येवोनी तुकोबा स्वप्नामाजी ॥ ५ ॥
केलें समाधान पाजिलें अमृत। वत्सासी करीत गाय-भेटी ॥ ६ ॥
अमृता पाजोनी सांगितला मंत्र। जो कां हा सर्वत्र लोक जपती ॥ ७ ॥
मस्तकीं हस्तक ठेवोनिया कृपा। केली त्या स्वरूपा तोचि जाणे ॥ ८ ॥
कृपेचा महिमा आहे तो अपार। वत्स बोले सार श्लोक-अर्ध ॥ ९ ॥
आठवे दिवशीं सावध इंद्रियें। अमृतें घालिये तुकोबाच्या ॥१०॥
तेधवां ती गाय देखिली सन्मुख। निमालीसे देख वत्स कळे ॥११॥
म्हणे या वत्सानें पाजिलें अमृतु। तयासी तो मृत्यु कदां नोहे ॥१२॥
अमर तें वत्स आहे मजपासीं। चित्त अमृतासी घेत गोडी ॥१३॥
बहिणी म्हणे इतुकें वर्तलियावरी। पुढेंही विस्तारीं सांगिजेल ॥१४॥

## २७

जयराम समर्थ ज्ञानाचा सागर। साक्ष तें अंतर त्याचें तया ॥ १ ॥
बोलाविलें तेणें हिरंभटाप्रती। माझी तया स्थिती पुसीयिली ॥ २ ॥
सांगितला तेणें वृत्तान्त सर्वही। वर्तला जो कांहीं गृहीं त्याचें ॥ ३ ॥
स्वप्नगत गुरु तुकोबाचे रूपें। स्वप्नींचिये कृपें बोध केला ॥ ४ ॥
सावध होउनी ते मुली बैसली। गायीस गौरविली कुर्वाळुनी ॥ ५ ॥
दुग्ध दोहोनिया घेतलें तियेनें। पाणी आणि तृणें भक्षीतसे ॥ ६ ॥
परी तें मुलीचें रूप पालटलें। पूर्ण तें दाटलें हृदय तिचें ॥ ७ ॥
तुकोबाचा अंतरीं छंद लागला। मायबापें तिला सांगताती ॥ ८ ॥
भ्रतार हा तिचा वेडावला राहे। उगाचि तो पाहे तियेकडे ॥ ९ ॥
छांदिष्ट होउनी बैसली घरांत। तुकोबासी चित्त लावुनीया ॥१०॥
ऐसा हा वृत्तान्त हिरंभट सांगे। जयराम निजांगें संतोषला ॥११॥
बहिणी म्हणे ऐसा निर्धार ऐकोनी। जयराम स्वामींनीं कृपा केली ॥१२॥

## २८

कृपा उपजली जयराम स्वामींसी। आले पाहायासी भाव माझा ॥ १ ॥
देखोनी तयांसी आनंद वाटला। कंठ कोंदाटला आनंदानें ॥ २ ॥

मनेंचि आरती केला नमस्कार। पूजिला साचार मनामाजीं ॥ ३ ॥
बहिणी म्हणे त्याचे मनांतील हेत। ओळखे निश्चित पांडुरंगा ॥ ४ ॥

## २९

मजवरी दृष्टी कृपेची ओतिली। प्रेमाची गुंतली माय जैसी ॥ १ ॥
अंतरींची पूजा घेऊनी जयराम। गेला तो सप्रेम स्वस्थानासी ॥ २ ॥
उगाचि बैसला आसनीं नेमस्त। करोनिया स्वस्थ चित्तवृत्ति ॥ ३ ॥
तंव कांहीं एक अपूर्व वर्तलें। तुकारामें दिलें दर्शनासी ॥ ४ ॥
केला नमस्कार भेटुनी आनंदें। अत्यंत आल्हादें स्वामी सखा ॥ ५ ॥
मजही दर्शन दिधलें अलुमाळ। घातला कवळ मुखामाजीं ॥ ६ ॥
मज म्हणे आलों जयराम-भेटीसी। तुजही मानसीं ओळखिलें ॥ ७ ॥
तुम्ही आतां येथें नको राहों कदा। आत्मज्ञानबोधा न संडीं वो ॥ ८ ॥
बहिणी म्हणे हें तो दर्शन दुसरें। मनाच्या व्यापारें तुकोबाचें ॥ ९ ॥

## ३०

नवल जनांसी वाटलें म्हणोनी। येती ते धांवोनी पहावया ॥ १ ॥
भ्रतार हा माझा देखोनी तयांसी। माझिया देहासी पीडा करी ॥ २ ॥
न देखवे तया द्वेषी जनांप्रती। क्षणक्षणा चित्तीं द्वेष वाढे ॥ ३ ॥
म्हणे ही बाईल मरे तरी बरें। ईस कां पामरें भेटताती ॥ ४ ॥
काय आतां घुमारें येईल अंगासी। देव इचे पोषी पोट कैसें ॥ ५ ॥
बहिणी म्हणे ऐसी भ्रतारासी चिंता। जाणोनी अनंता कळों आलें ॥ ६ ॥

## ३१

भ्रतार म्हणतसे आम्ही कीं ब्राह्मण। वेदाचें पठण सदा करूं ॥ १ ॥
कैंचा शूद्र तुका स्वप्नींचे दर्शनीं। बिघडली पत्नी काय करूं ॥ २ ॥
कैंचा जयराम कैंचा पांडुरंग। माझा झाला भंग आश्रमाचा ॥ ३ ॥
आम्ही काय जाणो नाम हरिकथा। भक्ति हे तत्त्वतां नसे स्वप्नीं ॥ ४ ॥
कैंचे संत साधु कैंची भावभक्ती। भिक्षुकांचे पंक्तीं वसो सदा ॥ ५ ॥
बहिणी म्हणे ऐसें चित्तांत भ्रतारें। चिंतोनी निर्धारें विचारिलें ॥ ६ ॥

## ३२

विचारिलें मनीं भ्रतारें आपण। आतां हें त्यागोन वना जावें ॥ १ ॥
इशी नमस्कार करितील जन। आम्ही इशी तृण वाटों परी ॥ २ ॥
स्त्रियेशीं बोलती अनुवाद कथेचा। आम्ही इशी नीचापरी वाटो ॥ ३ ॥
पुसतचि येती इशी पहा जन। आम्ही कीं ब्राह्मण मूर्ख जालों ॥ ४ ॥
इचें नांव घेती गोसाविण ऐसें। आम्हां कोण पुसे इजपुढें ॥ ५ ॥
बहिणी म्हणे ऐसें भ्रतार मानसीं। चिंतुनी चित्तासी बोध करी ॥ ६ ॥

## ३३

म्हणे आतां मना स्त्रियेची हे दशा। आतां तू सहसा राहों नको ॥ १ ॥
चाल वेगीं जाऊं तीर्थासी वैराग्य। आमचें हें भाग्य ओढवलें ॥ २ ॥
सासूसासऱ्यांशीं केला नमस्कार। आहे स्त्री गरोदर मास तीन ॥ ३ ॥
आम्ही जातों तीर्थयात्रा करावया। देवलसी स्त्रिया यत्न कीजे ॥ ४ ॥
न पाहे मी मुख सर्वथा इयेचें। हीनत्व आमुचें कोण फेडी ॥ ५ ॥
भंडिमा सोसून कोण राहे येथें। ऐसिया स्त्रियेतें कोण पाळी ॥ ६ ॥
बहिणी म्हणे ऐसें बोलिला भ्रतार। मज पडे विचार मनामाजीं ॥ ७ ॥

## ३४

वैदिक व्यवहार स्वामी उदरार्थ। करितसे तेथ देव कैंचा ॥ १ ॥
वेदपाठकांही नावडेचि भक्ति। पराधीन युक्ति न चले माझी ॥ २ ॥
वय तो लहान लौकिक तो वेडा। वेदाचिया भिडा उभी राहे ॥ ३ ॥
बहिणी म्हणे माझें चित्त कासावीस। संसाराचा त्रास बहु झाला ॥ ४ ॥

## ३५

स्त्रियेचें शरीर पराधीन देह। न चाले उपाव विरक्तीचा ॥ १ ॥
पडिलें अंतर विवेकाचे बळें। काय निर्मियेलें राघोबानें ॥ २ ॥
तापलें शरीर त्रिविध तापानें। वाटतसे मनें प्राण द्यावा ॥ ३ ॥
न घडे हरीची भक्ति अणुमात्र। शत्रु इष्टमित्र संसाराचे ॥ ४ ॥

शरीराचे भोग वाटताती वैरी। माझी कोण करी चिंता आतां ॥ ५ ॥
बहिणी म्हणे जैसा वोकियला वोक। तैसे हें मायिक वाटे मना ॥ ६ ॥

### ३६

हरण सांपडें जैसें वाघुरेंत। अंध अरण्यांत पडे जैसा ॥ १ ॥
तैसें मज झालें पुसूं कोणा हित। होय माझें चित्त कासावीस ॥ २ ॥
जलाविण मत्स्य गाईविण वत्स। मृगीविण पाडस जयापरी ॥ ३ ॥
बहिणी म्हणे देवा ऐसीया संकटीं। करीं कृपादृष्टी दीनावरी ॥ ४ ॥

### ३७

विरक्तीचें मूळ प्रपंचाचा त्याग। पहातांचि एक गृह शैल ॥ १ ॥
संकट मांडिलें धांव तूं झडकरी। विवेक-उत्तरीं बोधीं चित्त ॥ २ ॥
भ्रतार त्यागितां वेदासी विरुद्ध। परमार्थ तो शुद्ध सापडेना ॥ ३ ॥
द्वाराशीं भुजंग प्रहजळे अंगीं। जीव त्या प्रसंगीं केवीं राहे ॥ ४ ॥
वेदाचें वचन त्यागूं नये धर्म। माझें तंव प्रेम हरिभक्ती ॥ ५ ॥
बहिणी म्हणे ऐसीं संकटें दाटती। क्लेश ते वाढती काय सांगूं ॥ ६ ॥

### ३८

वेद हांका देती पुराणें गर्जती। स्त्रियेच्या संगतीं हित नोहे ॥ १ ॥
मी तों सहज स्त्रियेचाचि देह। परमार्थाची सोय आतां कैंची ॥ २ ॥
मूर्खत्व ममता मोहन मायिक। संगचि घातक स्त्रियेचा तो ॥ ३ ॥
बहिणी म्हणे ऐसा स्त्रीदेह घातकी। परमार्थ या लोकीं केवीं साधे ॥ ४ ॥

### ३९

काय पाप केलें पूर्वील ये जन्मीं। आतां पुरुषोत्तमीं अंतरलें ॥ १ ॥
लाधलें नरदेह स्त्रियेचेनि रूपें। असंख्यात पापें फळा आलीं ॥ २ ॥
अधिकार नाहीं वेदार्थश्रवणीं। गायत्री ब्राह्मणीं गुप्त केली ॥ ३ ॥
करूं नये मुखें प्रणवाचा उच्चार। बीजाचा संचार ऐकों नये ॥ ४ ॥
बोलों नये बोल पराचिया संगें। भ्रतार तो अंगें जमदग्नी ॥ ५ ॥
बहिणी म्हणे होतो जीव कासावीस। नये देवाजीस करुणा माझी ॥ ६ ॥

## ४०

नामाचा विटाळ आमुचिये घरीं । गीताशास्त्र वैरी कुळीं आम्हां ॥ १ ॥
देव तीर्थ यात्रा नावडती हरी । ऐसियांचे घरीं संग दिला ॥ २ ॥
संतसमागम राघवाची भक्ती । नावडती श्रुतिशास्त्रकथा ॥ ३ ॥
बहिणी म्हणे माझ्या पापाचा संग्रहो । तुटोनिया राहो चित्त स्थिर ॥ ४ ॥

## ४१

अनुतापें तापलें बहुत मानसीं । न ये देवाजीसी करुणा कैसी ॥ १ ॥
वाटे देह आतां घालूं अग्नीआंत । किंवा हा करवत घालूं माथा ॥ २ ॥
वाटे जीव द्यावा नदीचे प्रवाहीं । किंवा दिशा दाही उल्लंघाव्या ॥ ३ ॥
वाटे अरण्यांत घेऊनी धरणें । बैसावें पारणें करूं नये ॥ ४ ॥
बहिणी म्हणे माझा जीव हा तळमळी । कां रे वनमाळी मोकलीसी ॥ ५ ॥

## ४२

गांजविसी देह भ्रताराचे हातें । माझिया तों चित्तें नेम केला ॥ १ ॥
न सोडी भजन प्राणही गेलिया । आतां देवराया दीनबंधु ॥ २ ॥
पहातोसी काय आतां माझा अंत । होतसे देहान्त पतीहातें ॥ ३ ॥
करूं काय मज मांडलें सांकडें । नाहीं देहाकडे हात माझा ॥ ४ ॥
पडो देह परी राहतसे हेत । पहावा अनंत ज्ञानदृष्टीं ॥ ५ ॥
करावी हे भक्ति स्वधर्म-आचारें । तुज ज्ञानद्वारें ओळखावें ॥ ६ ॥
राहील हें काय शरीर पीडेनें । कां रे हें वचन नायकसी ॥ ७ ॥
हेत राहे तया जन्म घडे पुनः । वेदाच्या वचना आयकिलें ॥ ८ ॥
आतां या संकटीं तुझे शिरीं हत्या । राखावें अपत्या आपुलिया ॥ ९ ॥
बहिणी म्हणे हरी बहिरा आंधळा । कां रे विश्वपाळा झालासी तूं ॥१०॥

## ४३

सखा सहोदर तूंचि एक हरी । दीनांचा कैवारी पांडुरंग ॥ १ ॥
तुझी भक्ती घडे पतिव्रताधर्में । ऐसें मेघश्यामा विचारावें ॥ २ ॥

वेदासी विरुद्ध नव्हे तो परमार्थ । म्हणोनि हा अर्थ विचारावा ॥ ३ ॥
बहिणी म्हणे दोन्ही घडतील हरी । हेत हा झडकरी विचारावा ॥ ४ ॥

### ४४

मातापिता बंधु प्रपंचाचे सखे । होती महा दुःखें माझ्या संगें ॥ १ ॥
देवासी सांगता जाणसी अंतर । सांगावया थार नाहीं मज ॥ २ ॥
सांगती न कोणी स्वहितविचार । नाहीं तो शेजार सज्जनाचा ॥ ३ ॥
एकली एकट पडियलें वनीं । क्षुधा तृषा मनीं आठवेना ॥ ४ ॥
बोलावें न ऐसें वाटे कोणासवें । विचार केशवें करावा हा ॥ ५ ॥
बहिणी म्हणे नाम तुझें जाणें एक । कोणासी आणिक सांगूं ॥ ६ ॥

### ४५

सोसियले क्लेश जीवें बहु फार । जाली हे अपार दीन सख्या ॥ १ ॥
चित्तीं समाधान केलें असें एक । प्रारब्धें हें दुःख आलें भागा ॥ २ ॥
भोगणें न चुके ब्रह्मादिकां दुःख । इतर हे रंक कोण तेथें ॥ ३ ॥
बहिणी म्हणे माझ्या देहाचें प्रारब्ध । ऐसिया गोविंद काय करी ॥ ४ ॥

### ४६

देहाचिया माथां सुखदुःख आलें । पाहिजे भोगिलें आवश्यक ॥ १ ॥
परिहार माझ्या होतसे पापाचा । लाभ हाचि साचा मानियला ॥ २ ॥
अंतरींचा हेत नामसंकीर्तनीं । शरीर पीडनीं पीडियलें ॥ ३ ॥
बहिणी म्हणे माझ्या संचितीं जें आहे । तंव पीडा पाहे कवण वारी ॥ ४ ॥

### ४७

प्रारब्धाची गती न संडी सर्वथा । व्यर्थ आतां चिंता कोण वाहे ॥ १ ॥
निश्चय निर्धारीं धरियला मनीं । आतां चक्रपाणी पांडुरंग ॥ २ ॥
शरीराचे क्लेश निवारे न कोणा । अगा नारायणा कळों आलें ॥ ३ ॥
बहिणी म्हणे आतां केशवा शरण । नको माझें मन पाहूं हरी ॥ ४ ॥

## ४८

काय म्यां अदृष्टा करावें आपण। आलें जें टाकून सोसी जेथें ॥ १ ॥
नाहीं येत वारें अंगासी माझिया। घुमारीन काया नव्हे माझी ॥ २ ॥
स्वधर्म आपुला रक्षूनिया मनें। शास्त्राच्या श्रवणें देव साधु ॥ ३ ॥
भ्रताराची सेवा तोचि आम्हां देव। भ्रतार स्वयमेव परब्रह्म ॥ ४ ॥
तीर्थ भ्रताराचें सर्व तीर्थ जाण। तया तीर्थावीण निरर्थक ॥ ५ ॥
भ्रतारवचनासी उल्लंघीन जरी। पापें माझ्या शिरीं पृथिवीचीं ॥ ६ ॥
धर्म अर्थ काम मोक्षासी अधिकारी। भ्रतार साचारी वेद बोले ॥ ७ ॥
हा माझा निश्चय मनांतील हेत। भ्रतारेंसी चित्त लाविलेंसे ॥ ८ ॥
भ्रतारसेवेनें सांग हा परमार्थ। भ्रतारेंच स्वार्थ सर्व आहे ॥ ९ ॥
भ्रतारावांचोनी अन्य देव जरी। येईल अंतरीं ब्रह्महत्या ॥१०॥
सद्‌गुरु भ्रतार साधन भ्रतार। सत्य हा निर्धार अंतरींचा ॥११॥
बहिणी म्हणे देवा भ्रताराचे मनीं। तुवां प्रवेशोनी स्थिर केलें ॥१२॥

## ४९

भ्रतार गेलिया वैराग्य घेऊनी। पांडुरंगा जनीं जिणें काय ॥ १ ॥
प्राणाविण देह काय पावे शोभा। रात्री विण प्रभा चंद्राचिये ॥ २ ॥
भ्रतार तो जीव देह मी आपण। भ्रतार कल्याण सर्व माझें ॥ ३ ॥
भ्रतार जीवन मी मीन तयांत। कैसेनि वांचत जीव माझा ॥ ४ ॥
भ्रतार तो रवी मी प्रभा तयासी। वियोग हा त्यासी केवीं घडे ॥ ५ ॥
बहिणी म्हणे माझ्या जीवाचा निर्धार। बोलें पैं विचार हरि जाणे ॥ ६ ॥

## ५०

भ्रतारें वैराग्य घेतलियावरी। जीव हा निर्धारीं देईन मी ॥ १ ॥
वत्सासाठीं देह अचेतन पडे। हें तंव रोकडें परब्रह्म ॥ २ ॥
भ्रताराचें तीर्थ न सांपडे जरी। अन्न खाय तरी मांस आम्हां ॥ ३ ॥
भ्रताराचें शेष न सांपडे तरी। पापें माझ्या शिरीं त्रैलोक्याचीं ॥ ४ ॥
चित्त हें भ्रताराविण जरी जाये। तरी वास होय नरकीं आम्हां ॥ ५ ॥

भ्रतारदर्शनाविण जाय दीस । तरी तोचि रास पातकांची ॥ ६ ॥
बहिणी म्हणे मज आज्ञाचि प्रमाण । ब्रह्म सनातन स्वामी माझा ॥ ७ ॥

## ५१

पाषाण विठ्ठल स्वप्नांतील तुका । प्रत्यक्ष कां सुखा अंतरावें ॥ १ ॥
घेईन उदंड सेवासुख देहीं । साक्ष या विदेही आहे मज ॥ २ ॥
भ्रताराची सेवा पतिव्रता करी । तरी ती उद्धरी उभय कुळें ॥ ३ ॥
बहिणी म्हणे माझ्या जीवाची विश्रांती । भ्रतारें समाप्ती जन्ममृत्यु ॥ ४ ॥

## ५२

भ्रतारें निश्चय केला मनामाजीं । जावें उद्यां आजी टाकोनिया ॥ १ ॥
तंव त्यासी व्यथा जाली शरीरास । झाला सात दिवस ज्वाळ देहीं ॥ २ ॥
ओळखीचे जन नायके उत्तर । आपण अहोरात्र तयापासीं ॥ ३ ॥
दिधल्या औषध नेदी तया मान । जीव व्यथा पूर्ण फार सोसी ॥ ४ ॥
एक मासवरी अन्नविवर्जित । व्यथा हे अद्भुत सोसीतसे ॥ ५ ॥
नाना देव कुळें देवतांची भाष । ठेविल्या विशेष बहु कांहीं ॥ ६ ॥
परी तया व्यथेलागीं न ये गुण । म्हणे तो मरण आलें मज ॥ ७ ॥
काय पांडुरंगा तुकोबासी निंदी । व्यथा तेचि संधी आली मज ॥ ८ ॥
जरी तुकाराम निंदिला त्या गुणें । असेल दुखणें व्यथा मज ॥ ९ ॥
तरी चमत्कार दाखवावा सद्या । जीवीं विश्ववंद्या तुकारामा ॥१०॥
बहिणी म्हणे झाला अनुताप भ्रतारा । पांडुरंग पुरा अंतरसाक्ष ॥११॥

## ५३

वृद्धसा ब्राह्मण येऊनी बोलत । म्हणे कां रे मृत्य इच्छितोसी ॥ १ ॥
वैराग्य कां तुज आलें असे मना । स्त्रीचा त्याग कोणा गुणें केला ॥ २ ॥
आधीं इचा विचारी अपराध अंतरीं । मग कोपा करी प्रवर्तावें ॥ ३ ॥
वाचण्याची इच्छा असलिया मानसीं । तरी तूं इयेसी अंगिकारीं ॥ ४ ॥
स्वधर्मविरहित वर्तेल ही जरी । तरी तिचा करीं त्याग वेड्या ॥ ५ ॥
ही आहे विरक्त निश्चित हरिभक्त । तुवां पाहीं सत्य तैसें व्हावें ॥ ६ ॥

होईल कल्याण बोलत ब्राह्मण । भ्रतारें चरण वंदियेले ॥ ७ ॥
सांगितलें सर्व कारण आपण । देईं जीवदान आजी मज ॥ ८ ॥
ये व्यथेपासोनी वांचवीं स्वामिया । जीव तुझ्या पायां वाहीन मी ॥ ९ ॥
स्त्रियेसी सर्वथा न बोले आपण । हरीसी शरण जीवेंभावें ॥१०॥
केला नमस्कार प्रत्यक्ष उठोन । होईल कल्याण म्हणे द्विज ॥११॥
आइकतें मीही दोघांचें बोलणें । घालीं लोटांगणें भ्रताशासी ॥१२॥
झाला तो अदृश्य ब्राह्मण तात्काळ । आरोग्य कुशल देह झाला ॥१३॥
बहिणी म्हणे देव कृपा करी तरी । सर्व सिद्धी द्वारीं तिष्ठतील ॥१४॥

५४

आरोग्य तात्काळ व्यथेचा हा ऱ्हास । झाला दिसंदीस भ्रताराचा ॥ १ ॥
मग करी कृपा बोले समाधानें । द्वेषाचें हें ठाणें दूर केलें ॥ २ ॥
म्हणे आतां सर्व जावें येथुनीया । आपुलिया ठाया स्वस्थानासी ॥ ३ ॥
देवें आपणांसी ब्राह्मणाच्या वेषें । सांगितला शेष प्राक्तनाचा ॥ ४ ॥
तेचि आतां करूं हरीची वो भक्ती । मिरासीची खंती वाटियेली ॥ ५ ॥
माझीं माय-बापें तयांसी सांगत । तुम्ही जा निवांत देवगांवा ॥ ६ ॥
आपण अरण्यांत दोघें करूं वास । देवाच्या बोलास धरोनिया ॥ ७ ॥
हो आतां कल्याण किंवा अकल्याण । आम्ही तों संपूर्ण भक्ती करूं ॥ ८ ॥
तुकोबाचे गांवां जाऊनिया राहों । मनींचा दृढावो धरोनिया ॥ ९ ॥
ऐसी पालटली भ्रताराची बुद्धी । स्वामी कृपानिधी अंतरसाक्ष ॥१०॥
काय एक देव करील तें नव्हे । प्रत्यक्ष अनुभवें सर्व जनां ॥११॥
बहिणी म्हणे अवघीं घेउनी चालिलों । तुकोबाच्या आलों दर्शनासी ॥१२॥

५५

वत्साचीही माय कपिला सांगातें । धांवे एकचित्तें आम्हांपुढें ॥ १ ॥
मायबाप बंधु भ्रतारासहित । इंद्रायणी जेथ तेथें आलों ॥ २ ॥
करोनिया स्नान पांडुरंगीं-भेटी । आनंदली सृष्टी अंतरंगें ॥ ३ ॥
तुकोबा आरती करीत होते तेथे । नमस्कारें स्वस्थ चित्त केलें ॥ ४ ॥

स्वप्नीं जो देखिला तेंच ध्यान तेथें । देखिलें नेमस्त पूर्ण दृष्टीं ॥ ५ ॥
बहिणी म्हणे तेथ भ्रतारें साष्टांग । केला अंतरंगभावयुक्त ॥ ६ ॥

## ५६

माध्याह्न झालिया पाहिजे तें अन्न । भ्रतार जाऊन ग्रामीं हिंडे ॥ १ ॥
तंव तेथ एक ब्राह्मण कोंडाजी । म्हणे तुम्ही या जी भोजनासी ॥ २ ॥
भ्रतार बोलिला आहों पांच जण । इतुकियां अन्न कोण घाली ॥ ३ ॥
येरू म्हणे तुम्ही अवघींच भोजना । यावें नारायणा काय चिंता ॥ ४ ॥
जावें स्थळ तुम्हीं पाहोनी राहिजे । माध्याह्नीं येईजे गृहाप्रती ॥ ५ ॥
बहिणी म्हणे आला भ्रतार अन्नासी । मेळविलें त्यासी सांगितलें ॥ ६ ॥

## ५७

मंबाजी गोसावी त्या स्थळीं नांदते । गृह प्रशस्त तें देखियेलें ॥ १ ॥
जाऊनी तयासी मागितलें स्थळ । तो अति चंचळ क्रोध तया ॥ २ ॥
मारावया उठे घातलें बाहेरी । आनंदें वोवरीं प्रार्थियेलें ॥ ३ ॥
तेथें राहोनिया भोजनासी गेलों । बहुत पावलों समाधान ॥ ४ ॥
वृत्तान्त पुसिला कोठोनी आलांत । चालतसा पंथ कवण कार्या ॥ ५ ॥
कांहींबाहीं तया सांगितलें पूर्व । म्हणे रहा सर्व पर्वणीसी ॥ ६ ॥
सोमवारीं आहे अमावास्या पुढें । रहा भक्तिकोडें सुख घ्यावें ॥ ७ ॥
नित्य हरिकथा होतसे देऊळीं । तुकोबा माऊली वैष्णवांची ॥ ८ ॥
रहा येथें तुम्हां भक्षावया धान्य । देऊं हेंही पुण्य आम्हां घडे ॥ ९ ॥
बहिणी म्हणे मग राहिलों देहूस । धरूनी हव्यास तुकोबाचा ॥ १० ॥

## ५८

देऊळांत कथा सर्व काळ होत । श्रवण करीत दिनरात्रीं ॥ १ ॥
तुकोबाची कथा वेदांतील अर्थ । पावे माझें चित्त समाधान ॥ २ ॥
तुकोबाचें ध्यान पूर्वीं कोल्हापुरीं । जें स्वप्नामाझारीं देखियलें ॥ ३ ॥
तेंचि ध्यान डोळां प्रत्यक्ष देखोनी । आनंद लोचनीं हेलावत ॥ ४ ॥

रात्रंदिन निद्रा न ये तिळभरी । तुकोबा अंतरीं प्रवेशला ॥ ५ ॥
बहिणी म्हणे येती सुखाचे डोलावे । जाणती अनुभवें जाणते जे ॥ ६ ॥

## ५९

मंबाजी गोसावी भ्रतारासी म्हणे । तुम्ही शिष्य होणें क्रियायुक्त ॥ १ ॥
माझा हेत आहे तुम्हीही हरिभक्त । दिसतां विरक्त उभय वर्गें ॥ २ ॥
ऐकोनी ते गोष्टी दोनचार वेळां । मग त्या प्रांजळा सांगितलें ॥ ३ ॥
आम्ही अनुग्रही आहों जी पूर्वींच । न वाटे त्या साच गोष्टी कांहीं ॥ ४ ॥
भ्रतारें त्याप्रती सांगितलें सर्व । कोल्हापुरीं पूर्व वर्तलें जें ॥ ५ ॥
ऐकोनिया द्वेष संचरला मनीं । म्हणे काय स्वप्नीं समाधान ॥ ६ ॥
नाहीं गुरुसेवा घडली जोंवरी । हस्तक हा शिरीं सद्गुरूचा ॥ ७ ॥
तोंवरी तो गुरु कासयाचा खरा । शूद्राच्या अंतरा ज्ञान कैंचें ॥ ८ ॥
स्वप्नींचा अनुग्रह गुरु केला शूद्र । तोही बळिभद्र ज्ञानहीन ॥ ९ ॥
तुम्हांसी वाळीन ब्राह्मणाचे पंक्तीं । तुम्ही गुरुभक्ती नका सांगूं ॥१०॥
बहिणी म्हणे ऐसें मंबाजी बोलिला । द्वेषही मांडिला तेच क्षणीं ॥११॥

## ६०

एके दिवशीं वाटे देखिलें आपण । मंबाजीसी पूर्ण हेतुयुक्त ॥ १ ॥
नमस्कार करावया गेले जवें । येरू हा न शिवे दुरी पळे ॥ २ ॥
म्हणे तुम्ही काय कोण याती नेणें । मी तो शूद्र म्हणे तुम्हांलागीं ॥ ३ ॥
सोनार कीं तुम्ही गोळक यातीचीं । तुम्हां ब्राह्मणाची क्रिया नाहीं ॥ ४ ॥
तुम्ही कोठें जाल भोजनासी जरी । दिवाणांत तरी घालीन मी ॥ ५ ॥
बहिणी म्हणे ऐसें ऐकोनी आपण । भ्रतारासी पूर्ण सांगितलें ॥ ६ ॥

## ६१

महादाजी कुळकर्णी कोंडाजीपंतासी । सांगितली ऐसी गोष्ट तया ॥ १ ॥
मग तेहीं नेलें आपुल्या गृहासी । म्हणे कीं तयासी काम काय ॥ २ ॥
परंतु तो द्वेष चालवी अत्यंत । मारूं पाहे घात चिंतोनिया ॥ ३ ॥
म्हणे हे ब्राह्मण तरी गुरु शूद्र । हेंचि तया छिद्र सांपडलें ॥ ४ ॥

द्वेषही वाढला अत्यंत अद्भुत । सर्वही लोकांत कळों आलें ॥ ५ ॥
बहिणी म्हणे देव छळी नानापरी । निश्चय निर्धारीं पाहातसे ॥ ६ ॥

## ६२

आपाजी गोसावी पुण्यांत रहात । जो अति विख्यात राजयोगी ॥ १ ॥
तयाप्रती पत्र मंबाजी पाठवी । तुकोबा गोसावी शूद्र वाणी ॥ २ ॥
कथा करितसे देऊळीं सर्वदा । द्विज त्याच्या पदां लागताती ॥ ३ ॥
रामेश्वरभट्ट अतियोगी थोर । तेही नमस्कार त्यासी करिती ॥ ४ ॥
आम्हांसी अन्याय हाचि थोर वाटे । होत असे खोटें वेद-बाह्य ॥ ५ ॥
तुम्ही थोर आहां दंड करावया । बांधोनिया तया न्यावें तेथें ॥ ६ ॥
आणिकही एक स्त्री-पुरुष आहेती । तेही म्हणविती शिष्य त्याचे ॥ ७ ॥
म्हणविती ब्राह्मण आहेती सोनार । कुळकर्णीहीं फार मान्य केले ॥ ८ ॥
स्वधर्माचा लोप होतसे देखोन । धाडिलें लिहोन म्हणोनिया ॥ ९ ॥
याचा कीं अपमान न करितां जाण । राज्यही बुडोन जाय तरी ॥१०॥
डोंबाळें मांडून स्वधर्म लोपला । पाहिजे रक्षिला स्वामिराजें ॥११॥
बहिणी म्हणे ऐसें पत्र पाठविलें । चोरोनी लिहिलें घरामाजीं ॥१२॥

## ६३

आपाजी गोसावी वाचोनिया पत्र । क्रोधें फार नेत्र भोवंडीत ॥ १ ॥
शूद्र होवोनिया नमस्कार घेत । पाप हें अद्भुत होत असे ॥ २ ॥
सोनाराची जाती म्हणविती ब्राह्मण । तयाचें दर्शन घेऊं नये ॥ ३ ॥
शूद्राचा अनुग्रह घेताती ब्राह्मण । भ्रष्टाकार पूर्ण होत असे ॥ ४ ॥
त्यासी शिक्षा द्यावी दोष नाहीं यासी । ऐसा निश्चयेंसी नेम केला ॥ ५ ॥
बहिणी म्हणे याचें प्रत्युत्तर लिहिलें । होय यथाकाळें कार्यसिद्धी ॥ ६ ॥

## ६४

मंबाजी गोसावी द्वेष करी जीवें । म्हणे तुम्हीं जावें येथोनिया ॥ १ ॥
तेणें फार चिंता वाटतसे मनीं । विघ्न कां भजनीं ओढवलें ॥ २ ॥
कोणाचें न घेतां न बोलतां कांहीं । नसोनी अन्यायी द्वेष कां हा ॥ ३ ॥

देवासी आठवी चिंतोनी मानसीं । साक्ष तूंचि यासी पांडुरंगा ॥ ४ ॥
माझे अंतरींचें जाणतोसी तूंचि । चित्तीं या द्वेषासी थार नाहीं ॥ ५ ॥
विघ्न हें आणिलें त्यासी तूं निवारी । तुकारामा शिरीं आहेस तूं ॥ ६ ॥
भक्ती करी त्यासी पीडिसी अंतरीं । निष्ठा नानापरी लक्षिसी तूं ॥ ७ ॥
बहिणी म्हणे देवा संचितासारखें । नाना सुखदुःखें प्राप्त होतीं ॥ ८ ॥

## ६५

कोल्हापुरीं गाय होती जे सांगातें । कांहीं ते दुग्धातें देत होती ॥ १ ॥
गाय ते बांधोनी घातली घरांत । सोटेही मारीत तयेलागीं ॥ २ ॥
पाहों गाय तंव न दिसे पाहतां । तुकोबासी व्यथा तेचि झाली ॥ ३ ॥
पहातोसी काय होत असे कष्टी । तीन रात्रीं खुंटी बांधलीसे ॥ ४ ॥
नाहीं तृण पाणी आरडतसे फार । धांवण्यासी थार नाहीं दिसे ॥ ५ ॥
तुकोबा जागृत झाले तंव पाठ । सुजेली ती नीट होयेचि ना ॥ ६ ॥
सोटे अंगावरी दिसती तुकोबा । आठवी विठोबा नानापरी ॥ ७ ॥
देखोनी तयासी कष्ट होती जनां । सांगितलें स्वप्नांतील सर्व ॥ ८ ॥
तुकोबा अंतरीं आठवुनी देवा । धांव रे माधवा सोड म्हणे ॥ ९ ॥
कोणें गाय कोठें बांधिली कळेना । धांव नारायणा गाय रक्षीं ॥१०॥
तंव अकस्मात तयाचिये गृहीं । अग्नि लागे तोही महाथोर ॥११॥
धांवोनिया लोक विझविती अग्नी । गाय ते निमग्नीं बैसलीसे ॥१२॥
जे गाय पहाती आजी तीन दिवस । चांडाळें तियेस बांधिलेंसे ॥१३॥
गाय सोडोनिया आणिली बाहेरी । तंव पाठीवरी मारिलेंसे ॥१४॥
भ्रतार आपुला बोलावोनी पाहे । गाय सांभाळीं हें ब्राह्मणा तूं ॥१५॥
तुकोबा धांवोनी करी प्रदक्षिणा । नमस्कारी गुण धन्य तुझे ॥१६॥
दाखविलें स्वप्न मज माये तुवां । न कळेचि धांवा केला माझा ॥१७॥
तुझा माझा एक आत्मा सर्वगत । ते साक्ष निश्चित आली मज ॥१८॥
ऐसा तुकोबानें केला फार धांवा । तंव माझ्या जीवा दुःख झालें ॥१९॥
मजही तैसेचि क्लेश झाले फार । साक्ष हें अंतर विठ्ठलाचें ॥२०॥

तुकोबाची पाठी पहाताती जन । गायीसी देखोन थोर कष्टी ॥२१॥
बहिणी म्हणे ऐसें वर्तलें हें जाण । गायीचें निर्वाण हरी जाणे ॥२२॥

## ६६

रामेश्वरभट्टें ऐकिला वृत्तान्त । धांवोनी त्वरित तेथ आला ॥ १ ॥
तुकोबाचें तेहीं घेतलें दर्शन । गाय तेही पूर्ण पाहियेली ॥ २ ॥
दोहींचे पाठीचा दिसे एक भाव । रुदनीं ते सर्व प्रवर्तले ॥ ३ ॥
तुकोबाचा पार वर्णिलसा कोण । कलियुगीं जाण प्रल्हाद हा ॥ ४ ॥
सर्वांतरसाक्षी करोनिया स्तुती । स्वसुखें रमती आपुलिया ॥ ५ ॥
बहिणी म्हणे लोक बोलती सकळ । तुकोबा केवळ पांडुरंग ॥ ६ ॥

## ६७

महादाजी कुळकर्णी तयाचीये घरीं । असोनी निर्धारीं काळ क्रमूं ॥ १ ॥
येताती हेलावे दुःखाचे अनेक । लक्ष्मीनायक जाणतसे ॥ २ ॥
घालोनी संकटीं देवावरी भार । असो निर्विकार एकनिष्ठ ॥ ३ ॥
तंव तये काळीं झालिये प्रसूत । कन्या झाली तेथ आपणासी ॥ ४ ॥
काशीबाई तिचें ठेवियेलें नांव । दाखविला भाव पूर्ण कांहीं ॥ ॥ ५ ॥
बहिणी म्हणे वत्स मेलें कोल्हापुरीं । तेंचि आलें उदरीं ऐसें वाटे ॥ ६ ॥

## ६८

तुटकें संचित जालें शुद्ध चित्त । अंतरींचा हेत ओळखिला ॥ १ ॥
कृपा केली देवें इंद्रायणीतीर । देहुग्रामीं थोर भक्तिपंथ ॥ २ ॥
तेथें पांडुरंग देवाचें देऊळ । रहावया स्थळ प्राप्त झालें ॥ ३ ॥
तुकाराम संत संताचें कीर्तन । तिन्ही काळ तीन दृष्टीपुढें ॥ ४ ॥
नमस्कार तया न घडे पतिभयें । परि चित्त राहे सदा पायीं ॥ ५ ॥
बहिणी म्हणे ऐसे मास झाले सात । अवघेंचि संचित सरों आलें ॥ ६ ॥

## ६९

आनंदवोवरी होती तये ठायीं । वाटे तेथें कांहीं बसावेंसें ॥ १ ॥
करूनिया ध्यान लावावें लोचन । करावें स्मरण विठोबाचें ॥ २ ॥
तुकाराम तंव देखतां देखत । आले अकस्मात गुरुरूपें ॥ ३ ॥
बहिणी म्हणे तेथ पुसोनी मातेसी । क्रमियल्या निशी तीन तेथें ॥ ४ ॥

## ७०

नेणें जप तप नेणें अनुष्ठान । घालावें आसन कळेना तें ॥ १ ॥
ध्यानाचें लक्षण इंद्रियांचा रोध । नाहीं याचा बोध ऐकियला ॥ २ ॥
पाषाणप्रतिमा विठोबाचें ध्यान । हृदयीं चिंतन नाममुद्रा ॥ ३ ॥
तुकारामकथा करावी ती द्वारीं । ऐसा हा अंतरीं हेत होता ॥ ४ ॥

## ७१

टाळ चिपोळ्यांचा ध्वनी आयकतां । आनंद हा चित्ता सामावेना ॥ १ ॥
लावियले नेत्र निद्रेंत जागृती । तुकाराममूर्ति देखियली ॥ २ ॥
ठेवियला हस्त मस्तकीं बोलून । दिधलें वरदान कवित्वाचें ॥ ३ ॥
बहिणी म्हणे नेणें स्वप्न कीं जागृती । इंद्रियांच्या वृत्ती वोसरल्या ॥ ४ ॥

## ७२

आनंदें सद्गद जाहलीं इंद्रियें । तुकाराम-पाय आठवले ॥ १ ॥
होऊनी सावध उघडिले नेत्र । आठवला मंत्र षडक्षरी ॥ २ ॥
ठसावला ध्यानीं मनाचिये ठायीं । आणिक तें कांहीं आठवेना ॥ ३ ॥
बहिणी म्हणे हात घातला मस्तकीं । देह तो या लोकीं आढळेना ॥ ४ ॥

## ७३

तें सुख सांगतां वाचे पडे मौन । जाणता ते धन्य गुरुभक्त ॥ १ ॥
झालासे आनंद इंद्रियांचे द्वारीं । बैसलें शेजारीं चैतन्याचे ॥ २ ॥
घट हा बुडावा जैसा डोहाआंत । न फुटतां ओतप्रोत पाणी ॥ ३ ॥
बहिणी म्हणे तैसें झालें माझे मना । तुकाराम खुणा ओळखी त्या ॥ ४ ॥

## ७४

वाटे उठों नये जीव जाय तरी । सुख तें अंतरीं हेलावलें ॥ १ ॥
आनंदें निर्भर होउनिया मन । करूं आलें स्नान इंद्रायणी ॥ २ ॥
घेतलें दर्शन पांडुरंगमूर्ति । तंव झाली स्फूर्ति वदावया ॥ ३ ॥
तुकोबासी तेथें करुनी नमस्कार । आलें मी सत्वर बिऱ्हाडासी ॥ ४ ॥
बहिणी म्हणे जैसा लोटला समुद्र । हृदयाकाशीं चंद्र बोले वाचा ॥ ५ ॥

* * *

# कचेश्वर

परिसावें आतां जालें वर्तमान । वेदावीण आन कांहीं नेणें ॥ १ ॥
कथा तों कोणाची आयिकिली नाहीं । निंदा बहु देहीं करूं वाटे ॥ २ ॥
कामक्रोधें लोभें भरलेंसे पोट । विकार उद्धट असे चित्तीं ॥ ३ ॥
संध्या स्नान निष्ठा काडीचीही नसे । अहंता ते असे दृढतर ॥ ४ ॥
छळावेंसें वाटे पढतां द्विजांसी । त्यांचिया चित्तांसी क्षोभवावें ॥ ५ ॥
ऐसा अवगुण परिपूर्ण देहीं । पापपुण्य कांहीं न ये चित्ता ॥ ६ ॥
प्रपंचाच्या योगें गेलों जीर्णपुरा । होतों निदसुरा कृष्णघरीं ॥ ७ ॥
कोण्ही येक कांहीं उपदेश केला । पूजनासि चला देवतेच्या ॥ ८ ॥
श्रमास्तव त्याणी आधीं हाकारिलें । मग उपेक्षिलें नका येऊं ॥ ९ ॥
समागमी गेले आदरें पूजेसी । माझिया मनासी दुःख जालें ॥१०॥
तेव्हां वाटे चित्ता शाक्त मी असतों । तरि हो बैसतों शाक्तांमाजी ॥११॥
रात्रि गेल्यावरी घेईन मी मंत्र । यंत्रमंत्रशास्त्र विचारीन ॥१२॥
ऐसा चित्तामाजी केला दृढ नेम । रात्र गेली याम सार्धत्रय ॥१३॥
तावत्काळ निद्रा आली नाहीं मातें । केव्हां आगमातें धुंडाळीन ॥१४॥
ऐसें विचारितां कांहीं निद्रा आली । देहबुद्धि गेली विचाराची ॥१५॥
सहस्रभोजनी कृष्णभट आले । स्वप्नीं त्यां देखिले तये वेळीं ॥१६॥
अद्भुत तें रूप साजिरें सुंदर । मंद हास्य कीर देखियलें ॥१७॥
हात जोडूनियां मातें विनविलें । म्हणे नव्हे भलें मंत्रशास्त्र ॥१८॥
हांसोनियां म्हणे यांत न पडावें । सांगतों तें भावें धरा मनीं ॥१९॥
कर्णापाशीं माझ्या श्रीमुख आणिलें । बीज सांगितलें एकांतीचें ॥२०॥
नका करूं याचा म्हणती अव्हेर । निज प्रणवाक्षर हेंचि जपे ॥२१॥
ऐसा उपदेश पडतांचि कानीं । होतें जें जें मनीं तें तें गेलें ॥२२॥
चित्ता दृढ आलें गीता ही पढावी । आनंदें पाहावी नित्य टीका ॥२३॥
एक दीसीं घरीं पुस्तक वाचितां । कांहीं आलें चित्ता वडिलांच्या ॥२४॥
तीर्थस्वरूपांनीं घातलें ताडन । गीतार्थनमन करूं नको ॥२५॥

चोरूनियां गीता भावें पाठ केली । अविद्या चालली हळूहळू ॥२६॥
विज्यापुरा गेलों वडिलांच्या भेणें । पृछा नारायणें मांडियली ॥२७॥
पूर्वस्थिति आतां नाहीं कां तुमची । स्थिति आर्जवाची काय जाली ॥२८॥
नारायणें मातें स्वप्नीं आज्ञा केली । गीता म्हणवीली यजमानें ॥२९॥
दों कां ठायीं त्याणी काढिलें अबद्ध । केली गीता शुद्ध अष्टादश ॥३०॥
नारायणें कर मस्तकीं ठेविला । भला म्हणे भला स्वप्नामाजी ॥३१॥
तेथूनि प्रकट गीता म्हणों लागे । सोडिले उद्वेग कांहीं कांहीं ॥३२॥
चमत्कार कांहीं माझा मज आला । जीवासी लागला गीताछंद ॥३३॥
जरि प्रभातेसी न म्हणतां गीता । पाषाण तत्वता ताडूं पाहे ॥३४॥
कोण्ही एक नर दिव्य दिगांबर । हाणाया प्रस्तर पाहे वेगीं ॥३५॥
करितसे पूजा भावार्थे लिंगाची । अध्या एक वाची नित्यनेम ॥३६॥
सहस्रनामाचा करीं नित्य जप । मनीं वाटे व्याप न करावा ॥३७॥
मध्यें कांहीं जाला आघात विषाचा । तेणें देह साचा जाला क्षीण ॥३८॥
विष पाडावया नाना यत्न केले । सिद्धी नाहीं गेले, जाला श्रम ॥३९॥
विषाच्या संयोगें लागलीसे धाप । रात्रिंदिवस झोप स्वप्नीं नसे ॥४०॥
करूं काय आतां ऐसें मज वाटे । देह जरी सुटे तरी बरें ॥४१॥
मारीच्या प्रसंगें सिरोलीस गेलों । सुख जें लाधलों सांगों काय ॥४२॥
हरिभक्तीं तेथें आरंभिली कथा । भावार्थें सर्वथा ऐकियली ॥४३॥
मला स्वस्त वाटे करावें कीर्तन । संतांसी नमन करूं वाटे ॥४४॥
म्हणउनि गेलों खेटकग्रामासी । नारायणापासीं सर्वभावें ॥४५॥
तया विनविलें द्यावीं पांच पदें । लेहूनि आल्हादें तुकोबाचीं ॥४६॥
पृछा आयकुनी दिधलें उत्तर । अंबाजीचें घर तेथें जावें ॥४७॥
सर्वेही संग्रह तुकोबाच्या वह्या । जावें लवलाह्या तुम्ही तेथें ॥४८॥
आज्ञा घेऊनियां भावार्थें निघालों । देऊळासी आलों विठोबाच्या ॥४९॥
देखोनियां देव आनंदलें मन । ऐकिलें कीर्तन संतामुखें ॥५०॥
कथा जाल्यावरी देखिलें कौतुक । मोटें अलोलिक सांगवेना ॥५१॥
प्रत्यक्ष तुकोबा करितसे कथा । आनंदें सर्वथा डोलतसे ॥५२॥
कर्दळी हेलावे जैसी चंडवातें । तैसें तुकोबातें देखियलें ॥५३॥
भास गेला ऐसा माझिया मनासी । पडेल भूमीसी काय करूं ॥५४॥

म्हणुनीया खांदा घेऊनि आंवरी । बळेंही सांवरी आवरेना ॥५५॥
ऐसा धीर केला एक म्यां प्रहर । जालेंसे शरीर क्षीण माझें ॥५६॥
जाणितला भाव अंतरीं व्यापकें । कथा कवतुकें पूर्ण केली ॥५७॥
ठेवियला माझ्या माथ्यावरी हात । स्वयें जाला गुप्त स्वप्नामाजी ॥५८॥
तेथुनियां स्फूर्ति तुकोबानें दिल्ही । येरे दिसीं केली कथा दीनें ॥५९॥
स्वरताळज्ञान नव्हतें ठाऊकें । कथा कवतिकें करविली ॥६०॥
व्यथा जे जे होती ते ते सर्व गेली । प्रचित घडली माझी मज ॥६१॥
मग म्यां सोडिली लौकिकाची लाज । इतरांसी काज काय माझें ॥६२॥
ब्राह्मण म्हणती यासि काय जालें । कांहीं संचरलें महद्भूत ॥६३॥
बापापासीं द्वेषें सांगती गाऱ्हाणें । तुमच्या पुत्रानें बुडविलें ॥६४॥
लाज येते आम्हां वैदिक आमचा । पुत्र हा तुमचा म्हणुनीयां ॥६५॥
नाचतो बाजारीं यासि सिक्षा करा । येऊं नका घरां देऊं तुम्ही ॥६६॥
भलत्यासि कैसें करितो नमन । देतो आलिंगन लघूवर्णा ॥६७॥
ऐसें आयिकिलें ब्राह्मणाच्या मुखें । अत्यंत त्या दुःखें कष्टी जालें ॥६८॥
बोलति कष्टोनी क्रोधें तीर्थरूप । कैसा पापरूप पोटां आला ॥६९॥
यासि पढविलें सर्व सिकविलें । वृथा वायां गेलें काय करूं ॥७०॥
कष्टाचें सार्थक माझ्या जालें नाहीं । म्हणउनि देहीं कष्टी जाले ॥७१॥
सांडी करुनियां वेगळें घातलें । अन्न वस्त्र दिल्हें थोडें बहु ॥७२॥
संतांसि करिती गाळीप्रदानाचें । अर्भक आमुचें वेडें केलें ॥७३॥
वाळीत घालावें, कोण्ही बोलियलें । मजपासीं आले, कैसें आतां ॥७४॥
अवश्य म्हणुनी आज्ञा म्यां दिधली । उक्ति तों खुंटली ब्राह्मणांची ॥७५॥
सांभाळाया आले हरिभक्त कोण्ही । देखिलें दुरुनी दीनवाणें ॥७६॥
चिंता नको करूं, आसीर्वाद देती । धन धान्य येती आपें आप ॥७७॥
आसीर्वाद त्यांचा मानिला विश्वासें । जीव श्वासोश्वासें दाटलासे ॥७८॥
ईश्वराची माया कोण्हाही कळेना । प्रेषिलें सदना पत्र पंतीं ॥७९॥
नारायणें दील्हा चऱ्होली मोकासा । जालासे भर्वसा आहे देव ॥८०॥
इछा जाली चित्तीं निःस्पृह असावें । स्थळ दिल्हें देवें तळ्यापासीं ॥८१॥
काष्टें तोडावीं ना संकल्प म्यां केला । देवें सिद्धी नेला पण माझा ॥८२॥
विहीर खाणावी ऐसी जाली वांछा । देवें तीही इच्छा पुरविली ॥८३॥

पुजाविसी वाटे महाविष्णुमूर्ति । देवें अवचितीं तेही दिल्ही ॥८४॥
विस्तीर्ण असावें स्थळ कथेसाठीं । देवानें सेवटीं पूर्ण दिल्हें ॥८५॥
अग्निहोत्र घ्यावें स्मार्ताग्निसहित । देवानें साहित्य घडविलें ॥८६॥
करावीसी वाटे स्वयें देवस्तुती । देवें दिल्ही स्फूर्ति कवित्वाची ॥८७॥
जो जो हेत माझ्या मनामाजी येतों । तो तो पुरवितो स्वामी माझा ॥८८॥
कोठेंही अंतर पडों नेदी कांहीं । संसाराची नाहीं मज चिंता ॥८९॥
माझा अंगीकार पूर्ण देवें केला । अनुभव आला अंतरासी ॥९०॥
मागें पुढें देव मज सांभाळितो । बाळातें पाळितो मायबाप ॥९१॥
आतां वणवण करूं काशासाठीं । हृदयसंपुटीं आला देव ॥९२॥
माझा योगक्षेम चालवितो देव । त्यासी अहंभाव पूर्ण माझा ॥९३॥
त्याणें उणें कांहीं केलें नाहीं मज । इछिलें सहज पावतों मी ॥९४॥
स्नानसंध्या माझी नित्य चालवितो । कथा करवितो अहोरात्रीं ॥९५॥
जाऊं नेदीं कोठें आपल्यावेगळें । न धरी निराळें बाळकासी ॥९६॥
संकटाचा कांहीं येऊं नेदी वारा । वारितो परभारा स्वामी माझा ॥९७॥
होणारासारिखी करितो सूचना । सादवितो दीना होई जागा ॥९८॥
किती उपकार आठऊं स्वामीचे । सर्व खेळ याचे अगणित ॥९९॥
अनंत ब्रह्मांडें व्यापूनि भरला । पुरोनि उरला निराळाचि ॥१००॥
इछेविना काडी पानही न हाले । जग चाले बोले सत्ता त्याची ॥१०१॥
हानि मृत्यु लाभ उत्पत्ति प्रळय । स्थिति समुदाय कर्ता तोचि ॥१०२॥
याचा पार वर्णी ऐसा आहे कोण । शेषाही संपूर्ण वर्णवेना ॥१०३॥
वेद नेति नेति स्तवितां सिणले । तटस्त राहिले अधोमुखें ॥१०४॥
ब्रह्मादिक अंत पाहतां भागले । साधक सिणले ठाईं ठाईं ॥१०५॥
तोचि कृपा करी जरी दीनावरी । भुक्ति मुक्ति च्यान्ही दासी होती ॥१०६॥
वर्म आहे थोडें स्वामीचें आइका । भक्तिभावें एका वश्य होतो ॥१०७॥
कलयुगामाजी वर्णाश्रम धर्म । करूनि सत्कर्म आचरावें ॥१०८॥
ऐसें प्रेरूनियां कथा करवितो । नित्य चालवितो महाविष्णु ॥१०९॥
पुढील प्रसंग जाणे नारायण । अवस्थेचा प्रश्न ऐसा आहे ॥११०॥
पृछेचें उत्तर वदवितो देव । बोले अनुभव कचेश्वर ॥१११॥

॥ इति आदिकथानुसंधान अवस्थाप्रश्न शुभमस्तु ॥

★ ★ ★

निरंजन रघुनाथ

४४००२
१०४८

# स्वात्मप्रचीति

## अध्याय पहिला

ॐ नमोजी मंगळमूर्ति । सर्वां आदी तूं गणपती ।
ग्रंथ वदावया स्फूर्ति । देईं मातें सत्वरीं ॥ १ ॥

आतां नमो सरस्वती । जे कां आदिमाया भगवती ।
आदि अनादि चिच्छक्ति । देईं मती बाळकां ॥ २ ॥

आतां वंदूं संतसाधु । जे करिती जडमूढासि बोधु ।
स्वयंप्रकाश ब्रह्मानंदु । कलियुगामाजी अवतरले ॥ ३ ॥

साष्टांग नमूं त्या दिगंबर । जो तिही देवांचा अवतार ।
भवसिंधूचा पैलपार । उतरवी जो सर्वांतें ॥ ४ ॥

दत्तात्रया पूर्ण अवतारा । ब्रह्मानंदा निराकारा ।
सत्यस्वरूप दातारा । तूं वदविता ग्रंथातें ॥ ५ ॥

तूं प्रत्यक्ष गा अवधूत । सर्वां असूनि सर्वातीत ।
देहीं असूनि देहातीत । विदेहत्वें वर्तसी ॥ ६ ॥

सहज करितां तुझें स्मरण । गुरुरूपें येसी धावून ।
कीं तेथेंचि होसी अवतीर्ण । क्षणमात्र न लागतां ॥ ७ ॥

तूंचि या ग्रंथीं अवतरलासी । तूंचि माझे मुखें वदसी ।
तूंचि एथें येउनि लिहिसी । दुजे कोणी नसे कां ॥ ८ ॥

ॐ नमो सद्गुरु रघुनाथ श्रेष्ठ । जो ब्रह्मज्ञानी अति सुभट ।
जो आनंदकंदाचा मूळपीठ । कलिमाजी प्रगटला ॥ ९ ॥

ऐके वो श्रोतिया समर्था । माझे शरिरीं घडिली व्यवस्था ।
पूर्वीपासुनि झाली कथा । ते मी तुज सांगतों ॥ १० ॥

दक्षिणदेशीं पुण्यनगरीं । नष्टकनाम हुंडेकरी ।
वेतन घेउनि त्याचे पदरीं । कारभारी होतों मी ॥ ११ ॥

तों कोणी एके अवसरीं । पेटेमाजी त्याचि नगरी ।
ठाकूरदास विष्णुद्वारीं । कीर्तन करी सप्रेम ॥ १२ ॥

प्रेमानंदीं बहु डुलत । वेदशास्त्रीं जो पारंगत ।
ब्रह्मज्ञान मूर्तिमंत । ज्याचे ठायीं राहिलें ॥ १३ ॥

निःस्पृहत्वें कीर्तन करी । हें ऐकिलें लोकाचारीं ।
आलस्य निद्रा करूनि दूरी । कीर्तनासि पै गेलों ॥ १४ ॥

श्रवणीं ऐकुनि हरिगुण । वेधुनि गेलें तन्मन ।
सर्वेंचि तेणें कथिलें ज्ञान । जें कां शरीरीं प्रत्यक्ष ॥ १५ ॥

अनेक प्रकारचें मतांतर । सांगूनि भेदीतसे अंतर ।
म्हणे ' तुम्हीच रे ! ईश्वर । नरदेहीं अवतरला ॥ १६ ॥

तुम्ही तिन्ही अवस्था जाणतां । जागृती स्वप्न सुषुप्ति व्यथा ।
या तिहींचा जो पहाता । तेंचि तुमचें स्वरूप ॥ १७ ॥

सर्वाभूतीं ईश्वर असे । असोनिया प्रकट नसे ।
जैं काष्ठामाजी अग्नी वसे । परि न दिसे कवणासी ॥ १८ ॥

विप्रें घेतल्या श्रौताग्नी । त्याचीच करिती मंथारणी ।
काष्ठ-काष्ठाचे संघट्टणीं । निघे अग्नी भडभडा ॥ १९ ॥

होतांचि तेथ अग्नीउदय । क्षणक्षणीं काष्ठता सरूनि जाय ।
कठिणता कांहीं न राहे । अग्नीच होय सर्वांगीं ॥ २० ॥

तैसाच तुमचे हृदयीं ईश्वर । प्रत्यक्ष नांदतो सर्वेश्वर ।
परि तुम्हां न दिसे साचार । सद्गुरूं परिकर दाखविला ॥ २१ ॥

किती रे सांगावें तुम्हांला । मानव असूनि पशु कां झालां ? ।
जागृती असुनि निजालां । भुलूनि गेला विषयांतें ॥ २२ ॥

दोष आचरूनि करितां बंड । यम करील खंडविखंड ।
हिशोब द्याल कवणें तोंडें । नाहीं केलें ह्मणवूनि ॥ २३ ॥

अहा रे ! सर्वस्व चुकलां । आपआपणाशींच वैरी झालां ।
येतां काळजीचा घाला । श्वास टाकूं न देचि ॥ २४ ॥

आतां व्हा रे ! सावधान । वाया कां दवडितां निधान ।
मेळविली बहु श्रमानें । व्यर्थ दवडूं नका रे ! ' ॥ २५ ॥

ऐसें ऐकुनी कीर्तन । माझें दचकलें अंतःकरण ।
नेत्रीं पातलें जीवन । कंठ दाटून तो आला ॥ २६ ॥

पाठीं उभे राहिले कांटे । शरीर कांपे थरथराटें ।
बोलूं जातां कंठ दाटे । शब्द होटीं न निघती ॥ २७ ॥

वाटे आतांचि येईल मरण । म्यां कांहीं न केलें साधन ।
व्यर्थ गमाविलें जिणें । विषयमदेंकरूनी ॥ २८ ॥

अहा रे दुर्दैव ! कटकटा । वस्तु लाभली रे चोखटा ।
झुगारिसी बारा वाटा । विषयांध होऊनी ॥ २९ ॥

ऐसा होतांचि पश्चात्ताप । हृदयीं उदेला संताप ।
वाटे बहुत केलें पाप । कांहींएक नुमजोनी ॥ ३० ॥

सर्वेचि विसर्जिलें कीर्तन । लोक गेले सर्व उठून ।
मी तेथेंचि राहिलों बैसून । सात घटिकांपर्यंत ॥ ३१ ॥

वाटे पोटांत झाली आगी । झाली सर्वांगीं तगमगी ।
बाळक मरतां मातेलागी । दुःख जेंवी होतसे ॥ ३२ ॥

तैसा मी भयभीत झालों । ठाकुरदासाजवळीं गेलों ।
हात जोडोनी विनम्र झालों । स्तुती वदलों विशेष ॥ ३३ ॥

धन्य धन्य तुमचें कीर्तन । ऐकोनी झालें समाधान ।
आतां उद्विग्न झालें मन । सर्व त्यागुनी जातसें ॥ ३४ ॥

साधू वदला प्रसन्नवदन । ' तूं होशील रे ! नारायण ' ।
मला तोच शकुन मानून । तेथूनिया निघालों ॥ ३५ ॥

एका वाणियाचे घरीं । जागर केला सर्व रात्रीं ।
दिन उगवलियावरी । तेथूनिया निघालों ॥ ३६ ॥

मग तुळशीबागेंत जाऊन । घेतलें साधूचें दर्शन ।
तोही बोले कृपावचन । 'गुरुकृपा लाहसी' ॥ ३७ ॥

ते बांधुनि शकुनगांठी । तेथुनि निघालों उठाउठी ।
ग्रामाबाहेर एकवेळीं । तपस्वी थोर देखिला ॥ ३८ ॥

करित होता पात्रमज्जन । कपाळीं विभूतीचें भूषण ।
जटामंडित शोभायमान । दैदीप्यमान देखिला ॥ ३९ ॥

तयाप्रती केलें नमन । तांब्या तयाप्रती देऊन ।
मागुती त्यातें वंदून । मार्गाप्रती चालिलों ॥ ४० ॥

उत्तरेसि चिंचवाड नगरी । गणपती वसे देवाघरीं ।
जाऊनि त्या ग्रामाभीतरीं । एक बैरागी देखिला ॥ ४१ ॥

जवळला दुपटा काढुन । तो बैरागियातें देउन ।
करूनि तयासि नमन । पुढील मार्गीं लागलों ॥ ४२ ॥

तंव दिठीं देहुग्राम देखिला । जेथें तुकया संत जहाला ।
वैकुंठासि निघोनि गेला । शरिरासहित आपुले ॥ ४३ ॥

धन्य धन्य ते देहू नगरी । साधूअवतार जीभीतरी ।
तुच्छ वाटे अमरपुरी । देव जेथें राहती ॥ ४४ ॥

मग घेतलें पांडुरंगदर्शन । तुका जातां वैकुंठालागून ।
जियें वाकुडी केली मान । ते म्यां दृष्टीं देखिले ॥ ४५ ॥

ते साक्ष अद्यापिवरी । पहावें तेथें जाऊनि चतुरीं ।
दुसरी वैकुंठ पंढरी । विष्णू तेथें नांदतसे ॥ ४६ ॥

अस्तु तया स्थळीं जाऊन । उदासीन झालें मन ।
वाटे मी नरतनूस येऊन । कांहीं सार्थक न केलें ॥ ४७ ॥

ऐसा होऊनि उदासीन । वस्त्रें वांटिलीं साधूलागून ।
एक धोत्र पांघरूण । रात्रौ जागर केला ॥ ४८ ॥

क्षणक्षणा अश्रु येती नयनीं । बहु संताप उठे मनीं ।
वाटे स्यां जन्मासि येऊनी । कांहींच केलें नाहीं कीं ॥ ४९ ॥

ऐसा अहोरात्र खेद करितां । भानुउदय जाला अवचिता ।
मग स्नानासी घाटावरुता । इंद्रायणीच्या पातलों ॥ ५० ॥

पूर्व दिशा अवलोकून । केलें तुकारामाचें स्तवन ।
समर्था ! तूं धन्य धन्य । मजवर कृपा करी कां ॥ ५१ ॥

ऐसें करितां स्तवन । तों दृष्टीं पडली कौपीन ।
दुसरें कटिसूत्रालागून । देखता झालों ते समर्थी ॥ ५२ ॥

तेंचि प्रसादवस्त्र घेऊन । तेथें कौपीन केली धारण ।
सर्वांगीं भस्म लावून । केलें ध्यान दत्तात्रें ॥ ५३ ॥

मग करसंपुटीं जळ घेऊन । सांडिलें संकल्पालागून ।
जीवभाव मनःप्राण । गुरु अर्पण केलासे ॥ ५४ ॥

हृदयीं ठेविला नेम करून । आजपासून द्वादश महिने ।
उपरी सात दिन जाण । देहधारण करणें हा ॥ ५५ ॥

मजला दत्तात्रयदर्शन । झालिया ठेवीन हा प्राण ।
नाहीं तरी देह अर्पण । केला असे गुरुपायीं ॥ ५६ ॥

ऐसा करुनि निश्चय अंतरीं । साक्ष तुकोबा बाहेरी ।
वाचे करूनि दीर्घस्वरें । तेथें वदता जाहलों ॥ ५७ ॥

काढिली लज्जेची गवसणी । निर्लज्जशस्त्र हातीं घेउनी ।
त्याचि ग्रामांत जाउनी । भिक्षाटण पैं केलें ॥ ५८ ॥

भक्षुनि इंद्रायणीचे तीरीं । प्रयाण केलें अति सत्वरीं ।
अंतरीं प्रेमाश्रूंचिया लहरी । जळ तुंबळ दाटलें ॥ ५९ ॥

मार्गीं चालतां नाहीं भान । ध्यानीं वेधुनी गेलें मन ।
उत्तर दिशा अवलोकून । मार्ग क्रमण बहु केला ॥ ६० ॥

अखंड वाचेसी नामस्मरण । दत्त अवधूत हेंचि भजन ।
त्रैलोक्यीं जयांचें गमन । जग उद्धारा अवतरले ॥ ६१ ॥

हालय ठाणे

करूनि त्याचें नामस्मरण । पाउल ठेवी भूमीलागुन ।
ऐसें अखंड लागलें ध्यान । वेधलें मन निजरूपीं ॥ ६२ ॥

ऐशी स्थिती अवलोकून । मार्गीं पाहतां हासती जन ।
" वेडा आला रे ! " ह्मणवून । दाविती दुरून एकमेकां ॥ ६३ ॥

त्यांतील एक जवळ येऊन । पुसता होय मजलागून ।
त्यासी सांगू कवणें गुणें । हेंही भान नसेचि ॥ ६४ ॥

असो कांहीं न जातां ग्रामाभीतरीं । तैसेंच जावें वरचेवरी ।
मार्गीं अरण्याभीतरीं । बहु उल्हासें पळावें ॥ ६५ ॥

पोटीं पश्चात्तापाचा व्याळ । तेणें पळाली क्षुधा सकळ ।
तृषा उदेली अळुमाळ । उदकप्राशन बहु केलें ॥ ६६ ॥

मार्गीं ब्राह्मण आढळती । ते भोजनासी चला ह्मणती ।
क्षुधा न आणोनि चित्तीं । कोठें भोजन न केलें ॥ ६७ ॥

ऐसे झाले तीन दिन । मार्गीं चालतां देश कठिण ।
नद्या पर्वत उल्लंघून । देह क्षीण पैं झालें ॥ ६८ ॥

चतुर्थ दिन उगवलियावरी । दिन आला दीडप्रहरीं ।
दिठीं देखिली घोडनगरी । जे कां पुरी सिद्धाची ॥ ६९ ॥

अनेक प्रकारचीं गुह्यस्थानें । ऋषींनीं केलें अनुष्ठान ।
हरिश्चंद्र राजा सत्त्वनिधान । त्याची तेथें समाधी ॥ ७० ॥

जातां तया ग्रामाभीतरीं । जन पाहती बहुतापरी ।
आश्चर्य करिती अंतरीं । ह्मणती " वेडा आला हो ! " ॥ ७१ ॥

त्यांचिये बोलाचें भूषण । अंतरीं प्रेम चढे द्विगुण ।
वाटे माझें शहाणपण । केव्हां जळूनि जाईल हें ॥ ७२ ॥

असो समय पाहुनी माध्यान्ह । नदीतीराप्रती जाऊन ।
फाटक्या चिंध्या वेचून । बहु कंटकें जोडिल्या ॥ ७३ ॥

जाउनी तया ग्रामाभीतरीं । हिंडता झालों घरोघरीं ।
मागोनिया माधुकरी । हरिश्चंद्रतीर्थीं भक्षिली ॥ ७४ ॥

तेथें भिकोबाबावा संत । असे वस्तीसि नांदत ।
उदासीन पाहुनि मातें । घरासि नेलें आपुल्या ॥ ७५ ॥

तेथें राहिलों तीन रात्र । त्यानें दिधलीं वस्त्रेंपात्रें ।
सहस्त्रथिगळी कंथा विचित्र । एक नरोटी दीधली ॥ ७६ ॥

तेथें एकादशीव्रत आलें । आहारार्थ अन्यत्र झाडपाले ।
शिजवून त्यांचे पिळे केले । तेचि भक्षिले दोघांनीं ॥ ७७ ॥

द्वादशीस केलें गमन । ब्राह्मणवाड्यास येऊन ।
कानफाट्याचे मठीं जाऊन । एकरात्रीं राहिलों ॥ ७८ ॥

करितां दिगंबरस्मरण । कानफाटिया बोले वचन ।
तुझा दिसतो निश्चय पूर्ण । तरि त्वां जावें गिरनारा ॥ ७९ ॥

तेथें दत्तात्रयाचें स्थान । योगी करिती अनुष्ठान ।
तुजलागीं प्रत्यक्ष दर्शन । तेथें जातांचि होईल पैं ॥ ८० ॥

तेंचि ऐकोनि आर्तभूत । पश्चिमे जावया झालों उदित ।
दृष्टीं पाहूं गिरनारपर्वत । ऐसा निश्चय दृढ केला ॥ ८१ ॥

तेथोनि केलें प्रयाण । जुन्नर ग्रामासि आलों जाण ।
ठाकूरमंदिर शुद्ध पाहून । तेथें जाउनी राहिलों ॥ ८२ ॥

तेथें बैरागियांचे वृंद । मातें पाहोनि करिती विनोद ।
वल्कलवसनी मतिमंद । अससी कोण सांग पां ॥ ८३ ॥

त्यांसि म्यां केला नमस्कार । जोडोनिया दोन्ही कर ।
मी तुमचा दासकिंकर । कृपा मजवर असों द्या ॥ ८४ ॥

मातें पुसतां कवण वर्ण । तरि मी जातीचा ब्राह्मण ।
ठाऊकें नाहीं ब्रह्मज्ञान । व्यर्थ जन्मोनि कष्टलों ॥ ८५ ॥

तुह्मी उत्तम दिसतां संत । मजवरी व्हावें कृपावंत ।
दत्तात्रय मूर्तिमंत । भेटे ऐसें सांगावें ॥ ८६ ॥

ऐसें ऐकुनि माझें वचन । सर्वही ह्मणती ' बुद्धिहीन ।
ब्राह्मण असतां मलिन । भ्रांतिरूप दीसतो ' ॥ ८७ ॥

एक ह्मणती झाला वेडा । एक ह्मणती निःसंग उघडा ।
एक ह्मणती बुद्धि प्रौढा । वेडा कैसा ह्मणावा ? ॥ ८८ ॥

एक ह्मणती मंत्र चळला । एक ह्मणती भांग प्याला ।
एक ह्मणती कासया आला । जाई ग्रामाभीतरीं ॥ ८९ ॥

एक ह्मणती असों द्या परता । एक ह्मणती सत्य ह्मणतां ।
परि कांहींच होईल कांहीं करतां । वस्त्रपात्र संरक्षा ! ॥ ९० ॥

ऐसे वदले बहु प्रकार । ऐकुनि आश्चर्य वाटलें फार ।
निःस्पृही असुनि लोभाकार । यांची वृत्ति दीसते ॥ ९१ ॥

अस्तु बहु प्रकारचे जन । तयांसी करावें साष्टांग नमन ।
आपुले आंगीं अनुभव घेऊन । शुद्धवृत्ती करावी ॥ ९२ ॥

त्याचि ग्रामीं कुशाबा संत । कौपीनधारी पिशाचवत ।
वेडियासारिखा असे फिरत । शुद्ध नाहीं देहाची ॥ ९३ ॥

मुद्रा लावूनि खेचरी । अलक्ष पाहे दिगंतरीं ।
श्वासोश्वास वाहती अंतरीं । सुषुम्नामार्गीं चालतु ॥ ९४ ॥

ऐसी तयाची धारणा । दृष्टीं पाहिला योगिराणा ।
तयासी केलें साष्टांगनमना । हात जोडोनि विनविलें ॥ ९५ ॥

लोक म्हणती वेड्यासी वेडा । भेटी कां जैशी दगडदगडा ।
यांच्या शब्दाचा उघाडा । काय लोकीं समजावा ॥ ९६ ॥

ऐसें बोलुनिया जन । गेले आपुलाले घरा उठून ।
मग तया संतासी विनीत होऊन । गुजगोष्टी बोलिलों ॥ ९७ ॥

मग तो झाला प्रसन्नवदन । देहस्थिती आला जाण ।
बोलता झाला मातें वचन । ‘ कंथा जतन करी कां ! ’ ॥ ९८ ॥

तेव्हां वृत्तीस आनंद होऊन । म्यां तयासी केलें नमन ।
आज्ञा मागून त्यालागून । पुढील ग्रामा चालिलों ॥ ९९ ॥

मार्गीं बहुतचि आनंद झाला । वाटे मज अवधूत भेटला ।
कंथा जतन कर म्हणाला । हाचि शकुन पै मातें ॥ १०० ॥

कृतनिश्चयता दृढ अंतरीं । गुरुदर्शनाचा प्रेमा भारी ।
आनंदसिंधूच्या भीतरीं । भावार्थनद्या मिसळल्या ॥ १०१ ॥

पुढील कथेचें अनुसंधान । विचित्र आहे रसाळ गहन ।
करूनि सर्वांगाचे कान । श्रोतेजनीं परिसावें ॥ १०२ ॥

इतिश्री स्वात्मप्रचीति ग्रंथ । संमत दत्तात्रय अवधूत ।
निरंजनीं आत्मप्रचीत । गुरुकृपें जहाली ॥ १०३ ॥

॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

* * *

## अध्याय दुसरा

उदारधीरा गुणगंभीरा । प्रसन्नवरदा कृपासागरा ।
श्रीदत्तात्रया पूर्णावतारा । मज निजमंदिरा नेई कां ॥ १ ॥

तुझें गृह तें चिदाकाश । मी तेथेंचि राहीन सावकाश ।
निशिदिनीं हेंचि मानस । इच्छितसे गुरुराया ॥ २ ॥

प्रथम अध्यायीं निरूपण । पुण्यग्रामीं पश्चात्ताप होऊन ।
जुन्नराप्रती झालें येणें । तें निरूपण कथियेलें ॥ ३ ॥

पुढें चालिलें अनुसंधान । कोतुळ ग्रामासि झालें येणें ।
समय पाहूनी माध्यान्ह । भिक्षाटन पै केलें ॥ ४ ॥

जन मुखाकडे पाहती । येउनि पायासी लागती ।
कित्येक स्तुतीतें करिती । तुम्हीच देव म्हणवूनी ॥ ५ ॥

हे पाहुनी जनाची करणी । आश्चर्य वाटलें माझे मनीं ।
देवाधिदेवा ! काय करणी । विचित्र तुवां केलीसी ? ॥ ६ ॥

मजला दिधलें नाहीं दर्शन । जगासि कैसें दाविसी चिन्ह ।
सद्गुरु नाटकी तूं पूर्ण । मजलागून दिससी ॥ ७ ॥

ऐसें करितां अंतरीं स्तवन । धडाडिलें अंतकरण ।
देवा ! भेटसी मजलागून । किंवा नाहीं कळेना ॥ ८ ॥

मग आरंभिलें स्तवना । प्रेमाश्रु पातले नयनां ।
दीर्घस्वरेंकरूनि रुदना । टाहो मोठा फोडिला ॥ ९ ॥

लोक म्हणती 'काय झालें । कोण निष्ठुरत्वें बोलिलें ।
किंवा कोणीं ताडण केलें । सांगा वहिलें आम्हुतें !' ॥ १० ॥

एक म्हणती 'पिसा दिसतो !' एक म्हणती 'असा कां करितो ?'
एक म्हणती 'उगाचि रडतो । व्यर्थ वेड्यासारिखा !' ॥ ११ ॥

एक म्हणती 'धन्य ! धन्य ! । दृष्टीं दिसतो परिपूर्ण ।
ईश्वरप्राप्ति आनंदघन । पुरुष दृष्टीं दीसतो' ॥ १२ ॥

कित्येक करिती साष्टांगनमना । कित्येक करिती प्रदक्षिणा ।
कित्येक करिती स्तवना । कोणी भोजना चला म्हणती ॥ १३ ॥

असतु भक्तिमान तेथींचे जन । नेत्रीं प्रेमाश्रु पाहोन ।
कित्येक करिते झाले रुदन । देहाभिमान सांडूनि ॥ १४ ॥

दुसरे दिवशीं तेथून । न पुसतांच केलें गमन ।
दृष्टीसी पाहिलें जाऊन । अंकुल ग्राम योग्य जें ॥ १५ ॥

तेथें चंडीदासबोवा समर्थ । गीर्वाण वदे जो स्पष्टार्थ ।
सर्वकाळ करी परमार्थ । दुजा अर्थ नेणेचि ॥ १६ ॥

तयाचे घराप्रती गेलों । नमन करूनि उभा ठाकलों ।
हात जोडोनी विनीत झालों । मग वदलों स्तुतीतें ॥ १७ ॥

चंडीदासबोवा सज्ञान । बोलता झाला गीर्वाण ।
स्वामी ! कोठुनि केलें येणें । योगीश्वर दीसतां ॥ १८ ॥

कवण सांप्रदाय कवण ठिकाण । येथें किमर्थ झालें येणें ।
माध्यान्हिक भोजन । झालें किंवा नाहीं हो ?' ॥ १९ ॥

ऐसें पुसतां स्वागत । मी वदता झालों त्यातें ।
दत्तसांप्रदाय, घाटीं वसत । भेटीलागी पातलों ॥ २० ॥

ते पुसती 'वस्त्रें काय झालीं । जेथें असतील ठेविलीं ।
तीं कोणी नेईल वहिलीं । जाउनि त्यांतें पहावें ' ॥ २१ ॥

तयांसी म्यां केलें उत्तर । 'मी तों इतुकाचि दिगंबर ।
सहस्रथिगळी कथा परिकर । शिवालयीं ठेविली ॥ २२ ॥

तयाचें ऐका हो वर्णन । विंचा सर्पांचें जें स्थान ।
लोक पळती तयासी भिऊन । ऐसी कंथा योग्य जे ॥ २३ ॥

ती ठेविली शिवाचे शेजारीं । तीतें पाहुनी अभिलाष करी ।
ऐसा कवण हो दरिद्री । तुमचे गांवीं जन्मला ? ' ॥ २४ ॥

ऐसें कंथेचें करितां स्तवन । तयांनीं केलें हास्यवदन ।
ह्मणती याचें हो घेऊन । दर्शन घेऊं तयेचें ॥ २५ ॥

'तुह्मी एथेंचि येऊनि रहावें । पुराणश्रवणातें करावें ।
दत्तात्रयानें गुरु अनुभवें । यदूप्रती कथियेले ॥ २६ ॥

तेंचि आजि अनुसंधान । तुह्मी गुरुभक्त दिसतां जाण ।
अत्यादरें करावें श्रवण । येऊनिया सत्वरीं ॥ २७ ॥

ऐसें करितां भाषण । तों सवेंचि पुराणिक येऊन ।
आदौ संहिता करुनि पठण । अर्थांतर सांगतसे ॥ २८ ॥

ह्मणे ऐका हो ! सावधपण । दत्तात्रयें चोवीस गुरु करून ।
एक एकाचा घेतला गुण । थोर सान न ह्मणतां ॥ २९ ॥

एकादश स्कंध पुराण । नित्य करावें तेथें श्रवण ।
गांवांत करुनि भिक्षाटण । स्वस्थ तेथें राहिलों ॥ ३० ॥

बाप होणार बलवत्तर । दत्तात्रययदूचें उत्तर ।
हृदयकमळीं धरितां परिकर । मन मधुकर वेधला ॥ ३१ ॥

श्रवण करितां तीन दिन । सवेंचि उद्विग्न झालें मन ।
वाटे दत्तात्रयरूप सगुण । केव्हां दृष्टीं पाहीन मी ॥ ३२ ॥

ऐसें करितां तीव्र ध्यान । सर्व रात्र केलें स्तवन ।
आलस्य निद्रा गेली पळून । सद्गुरुगुण आठवितां ॥ ३३ ॥

मग प्रातःकाळीं उठोन । प्रवरे जाउनी केलें स्नान ।
सवेंचि बिराडा आलों परतोन । तो दिन कोण परियेसा ॥ ३४ ॥

शके सत्राशें तेहत्तीस । प्रजापति संवत्सरास ।
शुद्धपक्ष कार्तिकमास । नवमी दिवस पैं होता ॥ ३५ ॥

दिनमणी आला एक प्रहर । जाउनि एकांतीं माडीवर ।
ध्यानस्थ बैसलों क्षणभर । मूर्ति चिंतन पैं केली ॥ ३६ ॥

नाभिकमळ अधोवदन । तें ऊर्ध्व केलें मनेंकरून ।
त्यावरी षोडशदळ सूर्य नेमून । द्वादशपत्र चंद्र तो ॥ ३७ ॥

तया चंद्राचिया वरी । अग्नी योजिला दशचक्रीं ।
मग तया अग्नीवरी । दिव्य पादुका योजिल्या ॥ ३८ ॥

मनोरम्य रत्नखचित । दैदीप्यमान शोभायुक्त ।
वरती पाउलें मंडित । तळवे आरक्त योजिले ॥ ३९ ॥

घोटिया सुरेख मवाळ । पायीं वाळे रत्नप्रवाळ ।
त्यावरी पैंजणांचा खळाळ । मनोरम्य योजिला ॥ ४० ॥

गुडघे मांडिया जानुस्थळ । कौपीनधारी बहु सुशीळ ।
माजेस कटिसूत्र देतसे ढाळ । तेज अळुमाळ फांकलें ॥ ४१ ॥

कटि बारीक सिंहवत । हृदय विस्तीर्ण सुशोभित ।
नाभीपासूनि कंठपर्यंत । रोमलतिका साजिरी ॥ ४२ ॥

षड्भुजमूर्ति सुलक्षण । उच्चग्रीव सुहास्यवदन ।
सरळ नासिक लंबायमान । कर्णयुग्म साजिरें ॥ ४३ ॥

नेत्रकमळद्वयाकर्ण । भुकुटि बारिक बहु संगीन ।
ललाटस्थान अति विस्तीर्ण । जटामुकुट साजिरे ॥ ४४ ॥

मूर्ति प्रादेशमात्र सगुण । कंबुकंठ गौरवर्ण ।
सुप्रसन्न विभूतिभूषण । सर्वांगा जी साजिरी ॥ ४५ ॥

मस्तकीं मुकुट शोभायमान । अत्यद्भुत प्रभा गहन ।
चंद्रसूर्य जयाचे किरण । शोभायमान साजिरा ।। ४६ ।।

मैलागिरी चंदन सुगंध बहुत । केशरादि अष्टगंधयुक्त ।
त्रिपुंड्र आडवे अक्षतासंयुक्त । कस्तुरिच्या साजिऱ्या ।। ४७ ।।

श्रीकृष्ण चतुर्भुजमूर्तिध्यान । दत्तात्रयाचें घेउनि दर्शन ।
भाळीं लावुनि चंदन । वैकुंठासी पैं गेला ।। ४८ ।।

दत्तात्रयमूर्तीचें ध्यान । पहातां वेधलें माझें मन ।
जैसा आमिषालागीं मीन । न सोडीच सर्वथा ।। ४९ ।।

कर्णद्वय कुंडलयुक्त । शोभायमान झळाळित ।
क्षणक्षणा विद्युल्लता तळपत । तैसे कर्ण चमकती ।। ५० ।।

कटीं मेखळा शुभ्रवर्ण । जानुपर्यंत लंबायमान ।
जैसें ग्रीष्मऋतूचें चांदण । तैसी शोभा दाटली ।। ५१ ।।

कंठीं अनेक रत्नमाळा । बोरमाळा जवमाळा ।
बहुत पुतळियांच्या माळा । जांबूनद सुवर्णीं ।। ५२ ।।

त्यावरी मौक्तिकांच्या माळा । रुद्राक्षमिश्रित सुढाळा ।
नाभीपर्यंत लांब सरळ । मनोरम्य योजिल्या ।। ५३ ।।

अनेक रत्नमाळा सुरंग । शुभ्रवर्णादि सहा रंग ।
बहुतेजस्वी हेमलग । माळा कंठीं घातल्या ।। ५४ ।।

त्यावरी पुंगीचें भूषण । खड्गपात्रीं शुभ्रवर्ण ।
चतुरांगुली सुलक्षण । गळ्यामाजी साजिरी ।। ५५ ।।

सर्व हस्तकीं रत्नकंकण । पृथक् पृथक् शोभायमान ।।
मुद्रिका सर्वांगुळ्यांलागून । बहु सुंदर योजिल्या ।। ५६ ।।

षड्हस्तकीं षड्भूषण । ऊर्ध्वहस्तकीं शोभायमान ।
शंखचक्र चिमणें ध्यान । देदीप्यमान साजिरें ।। ५७ ।।

मध्यपाणी त्रिशूळ डमरु । रत्नखचित अतिसुंदर ।
मौक्तिक झालरी परिकर । चिमणी चिमणी योजिली ।। ५८ ।।

अधोपाणी कमलाकृती । सव्यपाणी माला फिरती ।
कमंडलूधारण वामहस्तीं । रत्नखचित साजिरा ॥ ५९ ॥

ऐसें हृदयांतरीं ध्यान । मूर्ती चिंतली सुलक्षण ।
मग रत्नखचित आलय निर्मून । कर्पूरदीप लाविले ॥ ६० ॥

सभोंवतीं केळी तोरण । बकुळ मैलागिरी चंदन ।
घमघमित सुगंध पूर्ण । हृदयांतरीं दाटला ॥ ६१ ॥

पुष्पवाटिका अनेक जाती । जाई मोगरा आणि मालती ।
गुलाब चापा आणि सेवंती । मनोमय निर्मिल्या ॥ ६२ ॥

देवालयाचे सन्मुख । सभामंडप अतिसुरेख ।
माजी हंस मयोरें उचलूनि पांख । बहु आनंदें नाचती ॥ ६३ ॥

कोकिळा सुस्वरें गर्जती । शुक उंच स्वरें गाती ।
बदक पाणियामाजी फिरती । हौदकारंजे निर्मिले ॥ ६४ ॥

तेथें सूर्यप्रभा निर्मून । कमळिणी विकसित झाल्या तेणें ।
हेमरौप्य चूर्ण करून । उपरीवरूनि झोकती ॥ ६५ ॥

नारदतुंबर घेऊनि वीणा । सुस्वर गाती गंधर्वगायना ।
आलाप आळविती राग नाना । यशकीर्ति वर्णिती ॥ ६६ ॥

तेथें मनाची मूर्ति निर्मून । पायीं घागऱ्या बांधून ।
नामघोष आनंदें करून । देवापुढें नाचतो ॥ ६७ ॥

कीर्तन करी प्रेमयुक्त । क्षणाक्षणा देवातें न्याहाळित ।
नखापासुनि शिखापर्यंत । ध्यान दृष्टीं विलोकीं ॥ ६८ ॥

या प्रकारें करितां ध्यान । चित्त स्वरूपा गेलें वेधून ।
आसनीं बैसलों असतां जाण । नाहीं भान देहाचें ॥ ६९ ॥

हृदयांतरीं करितों ध्यान । हें देही गेलों विसरून ।
तेथींचा आनंद पाहून । वृत्ति शून्य पैं झाली ॥ ७० ॥

ऐसें एक घटिकापर्यंत । वाटे पाहतों स्वप्नांत ।
जे कां रचना मूर्तिमंत । मनोमय योजिली ॥ ७१ ॥

ऐसें पाहतां तेचि वेळीं । कर्मरेषा विचित्र बळी ।
दत्तात्रयामूर्ति हृत्कमळीं । मातें जाली बोलती ॥ ७२ ॥

तेथें मनाची मूर्ति सान । ते श्रीगुरूनीं हृदयीं आलिंगून ।
मुखासि लावूनि माझा कान । मंत्र झाले बोलते ॥ ७३ ॥

अष्टाक्षरमंत्र संपूर्ण । अर्थ जयाचा गूढज्ञान ।
तये वेळीं मातें सांगून । हास्यवदन जह्राले ॥ ७४ ॥

तये वेळीं आनंद समरस । एकचि जाला उल्लास ।
ब्रह्मपुरीं विष्णुस्थानास । सुख नसेल ऐसें पैं ॥ ७५ ॥

सर्वेचि देहावरी येऊन । पहाता झालों नेत्र उघडून ।
तों आंतबाहेरी तें ध्यान । तेजयुक्त देखिलें ॥ ७६ ॥

मग ध्यानासि विसर्जिलें । आपुले मनांत ह्मटिलें ।
देवा ! त्वां इतुकें केलें । परि मी न समजेचि ॥ ७७ ॥

तुजला मज कायसी चोरी । जाणोनी आलासी हृदयांतरीं ।
मंत्र सांगणें वरचेवरी । स्वप्न पडल्यासारिखा ॥ ७८ ॥

असो त्वां आपुली केली थोरी । परि म्यां नेमिली जे अंतरीं ।
तया निश्चयातें कोण वारी । कृतसंकल्पा माझिया ॥ ७९ ॥

आतां गिरनारासी जाईन । एक संवत्सर सात दिन ।
भरतां करूनि निर्वाण । प्राण त्यागीन आपुला ॥ ८० ॥

ऐसा निश्चय करून । खालें उतरलों माडीवरून ।
हृदयीं करूनि तैंचि ध्यान । नामस्मरण करीतसें ॥ ८१ ॥

एकादश दिनपर्यंत । तेथें राहिलों आनंदयुक्त ।
श्रवण करूनि भागवत । सुखसंतुष्ट राहिलों ॥ ८२ ॥

तेथें एक ब्राह्मणाची कुमरी । वय तारुण्य अति सुंदरी ।
तयेचा भ्रतार देशांतरी । टाकुनी बहुदिन पैं गेला ॥ ८३ ॥

ती ब्राह्मणी आपुले माहेरीं । राहिली बहुत काळवरी ।
चिंता करितसे अंतरीं । भ्रताराच्या वियोगें ॥ ८४ ॥

तयेनें मजलागीं पाहोन । मातेसी जाऊनि सांगे खूण ।
ह्मणे दृष्टीं पाहिला ब्राह्मण । आपुले भ्रतारासारिखा ॥ ८५ ॥

ह्मातारी तैशीच उठूनी । आली पुराण-श्रवणालागूनी ।
दृष्टीं मातें अवलोकुनी । गेली सदनीं आपुल्या ॥ ८६ ॥

आप्तवर्गासी मेळवून । तयासी बोलती झाली वचन ।
माझा जामात गेला उठून । तो म्यां दृष्टीं देखिला ॥ ८७ ॥

ते सर्व मजला पाहूं येती । आश्चर्य करिती आपुले चित्तीं ।
जवळ येऊनि पुसती । कवण ग्राम तुमचें ॥ ८८ ॥

कवण कुळ कवण गोत्र । गृहस्थाश्रमी किंवा स्वतंत्र ।
त्यागुनीया वस्त्रपात्र । ब्रह्मचारी दीसतां ॥ ८९ ॥

तुह्मी तों आच्छादिलें स्वरूप । परि आह्मी ओळखिलें तुमचें रूप ।
सोडोनिया सर्व संताप । सत्य आह्मांसी वदावें ॥ ९० ॥

मग त्यासी बोलतां झालों उत्तर । बालाघाटीं कळंबनगर ।
तेथील मी वतनदार । कुलकर्णवृत्ति आमुची ॥ ९१ ॥

आश्वलायन गोत्र कौशिक । स्त्रिया बंधु आप्त मित्र ।
गृह सानकूळ आणि स्वातंत्र्य । नाहीं कोणीं गांजिलें ॥ ९२ ॥

हृदयीं उठला अति संताप । वाटे बहुत झालें पाप ।
आतां पहावें आत्मस्वरूप । गुरुकृपेंकरुनी ॥ ९३ ॥

नको नको हा संसार । याचें करितां हित फार ।
वय वेंचुनि गेलें फार । नाहीं आधार कोठेंही ॥ ९४ ॥

प्रपंचीं धरूनि अभिमान । करावें नीचाचें सेवन ।
बहु करावें दोषाचरण । द्रव्यालागीं ॥ ९५ ॥

प्रपंचालागीं सर्व त्यजावें । सांडोनि परदेशी व्हावें ।
एकलेंचि निघोनिया जावें । मरण आल्यासारिखें ॥ ९६ ॥

घरचे ह्मणती सत्वर जावें । मुहूर्त आहे आजचि बरवें ।
बाहीर प्रस्थान ठेवावें । मग यावें घरासी ॥ ९७ ॥

तंव प्रस्थानासि ठेविलें । निघावयाचें खचित झालें ।
सर्व घरचे आनंदले । ह्मणती केलें उत्तम ॥ ९८ ॥

घरचे पापड देठवे काढून । केलीं गोड गोड मिष्टान्नें ।
मुरडकानवले करून । मातोश्रीनें घातले ॥ ९९ ॥

ह्मणे हे कानवले खादल्यानें । फिरूनि लवकर होतसे येणें ।
आणिक दहीभात कालवून । तोहि सर्वेचि घातला ॥ १०० ॥

जैसा चोरटा धरावा । सुळीं घालावयासी न्यावा ।
दहींभात त्यासि भक्षवावा । तैसें केलें मजलागीं ॥ १०१ ॥

ऐसें करूनि बाहेर घातलें । वस्त्रपात्रही नाहीं दिलें ।
ह्मणती जातां वाटचाले । ओझें होईल तुह्मांतें ॥ १०२ ॥

बंधु मातोश्री आप्त सोयरीं । घालवीत आले बाहेरीं ।
गळां पडती मैंदापरी । आक्रंदोनि रडताती ॥ १०३ ॥

मित्र ह्मणे हा बरा होता । आमचे कामास पडत होता ।
सोइरे ह्मणती तुह्मी जातां । घरचें कैसेंकरोनि ? ॥ १०४ ॥

बहीण ह्मणे ' वो बंधुराया ! । मज लुगडें नेसावया ।
छीट चांगलें रे सखया ! । मजलागीं पाठवीं ' ॥ १०५ ॥

बंधु हात जोडोनिया पुढा । ह्मणे ' मज चांगला धोतरजोडा ।
पैका वेंचोनिया रोकडा । घेऊनिया पाठवा ' ॥ १०६ ॥

माता सांगे बहू परवडी । मज धाबळी आणि घोंगडी ।
बारीक चांगली खडखडी । आसनालागीं पाठवी ॥ १०७ ॥

स्त्रिया बोले मृदुवचनीं । ' वस्ता पाठवा मजलागुन ।
बाळ्या बुगड्या आणि नथनी । घडोनिया पाठवा ' ॥ १०८ ॥

ऐसें सांगुनी सर्वांनीं । माझ्यावरुतें सोडिलें पाणी ।
ह्मणती आला जरी वांचुनी । तरी आपुला ह्मणावा ॥ १०९ ॥

ऐसें ह्मणती वरचेवरी । परि कोणी न ह्मणे ' राहें घरीं ।
कासया जातोसि दुरीं । श्रम होतील तुजलागीं ' ॥ ११० ॥

असो कोणी न ह्मणतां भलें । सर्वांनीं मज बाहेर घातलें ।
मार्गीं चालतां रुदन आलें । सर्व राहिले ह्मणवूनी ॥ १११ ॥

द्रव्याकरितां आप्त सोईरे । द्रव्याकरितां मुलें लेंकुरें ।
द्रव्य नसतां घालिती बाहेर । कोणी माया न करिती ॥ ११२ ॥

कोठेंही नाहीं विश्रांती । संसारसागरीं आदिअंतीं ।
सद्गुरुपाय धरितां चित्तीं । सर्व सुख आतुडे ॥ ११३ ॥

इतिश्री आत्मप्रचीति ग्रंथ । संमत दत्तात्रय अवधूत ।
निरंजनीं आत्मप्रचीत । गुरुकृपें जाहली ॥ ११४ ॥

॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

* * *

## अध्याय तिसरा

श्रीगुरुराया दत्तात्रया । कृपासिंधु करुणालया ।
मजवरी कृपा करी सखया । योगिराया ! स्वामी तूं ॥ १ ॥

तूं जो निरंजन निर्विकार । मजसाठीं जालासी साकार ।
मस्तकीं ठेवुनी अभयकर । अनुभव साचार वदवीसी ॥ २ ॥

मागील कथेचें अनुसंधान । बाहेर घातलें आप्तवर्गानें ।
मग दूर देशाप्रती जाऊन । केली सेवा यवनाची ॥ ३ ॥

तेथें राहोनि दोन संवत्सर । श्रम केले अतिनिष्ठुर ।
द्रव्य मिळविलें फार । पापाचरण करूनी ॥ ४ ॥

सर्वेंचि घरची ऐकिली मात । स्त्री जाली ऋतुस्नात ।
हुंडी करूनी द्रव्यातें । घराप्रती पातलों ॥ ५ ॥

आणिल्या द्रव्यातें खर्चून । स्त्रियेचें केलें ओटभरण ।
उरलें तें देणें वारून । स्वस्थ घरीं बैसलों ॥ ६ ॥

बहु आनंदें विषय भोगिला । जैसा रेडा चिखलीं पडला ।
कीं डुकर नरकीं भरला । प्रेमानंदें डुल्लत ॥ ७ ॥

ऐसे झाले षण्मास । आणखी ओढवला प्रवास ।
घरचीं ह्मणती रोजगारास । जाई आतां सत्वरीं ॥ ८ ॥

मग दूरदेशीं जाऊन ! बहुतांचें आर्जव करून ।
पैशाची नामक लिपी लिहून । रोजगार पैं केला ॥ ९ ॥

तेथें बहुत दिवस राहूनी । फार केलें श्रमालागूनी ।
देहीं लागलें तेथिंचें पाणी । ह्मणुनि गेलों घरासी ॥ १० ॥

द्रव्य मातेचें स्वाधीन केलें । तेव्हां ह्मणती भलें भलें ।
मागुती कुसमुसूं लागले । घरीं कासया राहिला ॥ ११ ॥

आणखी निघालों प्रवासाकारणें । घरचीं सांगति निरोपालागून ।
कोणी ह्मणती आणा पांघरुणें । कोणी सोनें मागती ॥ १२ ॥

स्त्री ह्मणे ' वो प्राणपती । मजला घेऊनि यावें मोतीं ।
ऐसें आपुले हितासी रडती । परि न जाणती श्रमातें ॥ १३ ॥

प्रवासामाजी जाऊन । श्रम होती हें कोणीच नेणें ।
सर्व इच्छिती धनाकारणें । बहु लोभिष्ट होउनी ॥ १४ ॥

नको नको रे ! संग त्यांचा । आप्त मित्र सोइरियांचा ।
श्रम नेणती गरीबाचा । काय करितो ह्मणूनी ॥ १५ ॥

अनेक प्रकारच्या पापराशी । करून मेळवावें द्रव्यासी ।
घरां जातां देहासी । सुख नाहीं क्षणभरी ॥ १६ ॥

एका विषयसुखाकारण । धरावा सर्वांचा अभिमान ।
पापद्रव्य मेळवूनी । सर्वांसी पोसावें ॥ १७ ॥

तया विषयाचें काय सुख । केवळ नरकाचेंचि सुख ।
देवासी होउनि विन्मुख । भवचक्रांत पडावें ॥ १८ ॥

स्त्रीरूप केवळ अविद्या । शरीरीं विटाळाच्या नद्या ।
रक्त वाहे सांदोसांदा । योनिद्वारेंकडूनी ॥ १९ ॥

अंतरीं अस्थींचा पंजर । मांसेंकरूनि लिंपिलें वर ।
शिरांचें बांधण देउनि बरवें । चर्मयुक्त मढियेली ॥ २० ॥

मस्तकीं केसांचें वेटाळें । हृदयीं मांसाचिये गोळे ।
मुख नासिकाचिये बिळें । बहु दुर्गंधी वाहती ॥ २१ ॥

अंतरीं भरला मळमूत्र । पोटीं नरकाडी अपवित्र ।
दुर्गंधी जैशी मेलें कुत्रें । तैसें अपवित्र सर्वेही ॥ २२ ॥

स्त्रीरूप केवळ मोहिनी । भवदोषाची निबिड खाणी ॥
पाठवीतसे नरकालागूनी । संग करी तयातें ॥ २३ ॥
नको नको स्त्रियांची संगती । इणें बहुतांची केली माती ।
जन्ममृत्यू खापर हातीं । देऊनि बहुद्वार फिरविली ॥ २४ ॥

असो स्त्रियांचा सोडावा संग । प्रपंचीं व्हावें निःसंग ।
तरीच होईल भवभंग । जन्ममृत्यू चुकेल ॥ २५ ॥

नाहीं तरी भवसागरीं । बुडणें लागेल वरचेवरी ॥
शेवटीं यमाचिये घरीं । बहु जाचणी पैं होती ॥ २६ ॥

ऐसें समजूनी म्यां अंतरीं । वीट मानिली या संसारीं ।
तुह्मी सर्व मिळोनि घोरीं । घालूं पहातां मजलागीं ॥ २७ ॥
एथींची नीत ऐशी काई । सर्व करिती एकचि आवई ।
लटकेंच ह्मणूनी जांवाई । गळां पडतां माझिया ॥ २८ ॥

एका स्त्रियेचे भयेंकरून । सर्व सोडून घेतलें येणें ।
पुढें विघ्न सद्गुरूनें । कैसें मज पाठविलें ॥ २९ ॥
सर्वेचि त्या मुलीचे गांवींचा । एक आला ओळखीचा ।
तोही ह्मणे हाचि साचा । जांवाई तुमचा होय कीं ॥ ३० ॥
ऐसें ऐकुनी तयाचें वचन । चंडीदासबावा सत्त्वनिधान ।
ह्मणे 'तूं आहेसी कवण । खरें सांग अवधूता!' ॥ ३१ ॥
ऐसें ऐकूनि तयाच्या बोला । अंतरीं खेद बहुत वाटला ।
वाटे सत्पुरुषही क्षोभला । मजलागीं कैसा हो! ॥ ३२ ॥

मग मोठियानें गळा काढून । करिता झालों बहु रुदन ।
सर्वेंचि उद्विग्न जालें मन । वाटलें प्रयाण करावें ॥ ३३ ॥

चंडीदासबावाशीं पुसतां । ह्मणे 'रे नको जाऊं अवधूता ! ।
हे नसली जरी तुझी कांता । तरी भय काइसें ? ' ॥ ३४ ॥

चंडीदासानें कृपा केली । मजलागीं वस्त्रपात्रें दिल्हीं ।
कौपीन दोन धोत्रें चांगलीं । नरोटी दिली पांचवी ॥ ३५ ॥

असो तयाप्रती पुसून । सर्वांसी करिता झालों नमन ।
मग तेथुनिया केलें गमन । सिन्नरासी पैं आलों ॥ ३६ ॥

नागेश्वराचें शिवालय प्रचंड । तेथेंचि असे नागकुंड ।
तयावरी ब्राह्मणांची झुंड । स्नानालागीं पै आली ॥ ३७ ॥

मीहि तेथें स्नानासी । सहज गेलों अनायासीं ।
त्यांनीं वेडा मानुनी मजसी । संकल्पासी बोलिले ॥ ३८ ॥

एकसमयावच्छेदेंकरून । बोलते झाले चौघे जण ।
ह्मणती ' तुमचें पापदहन । समूळ आजी जहालें ' ॥ ३९ ॥

ऐसें ऐकतां त्यांचें वचन । हर्षयुक्त झालें मन ।
मग वस्त्रें सर्व गोळा करून । चौघांप्रती दिधलीं ॥ ४० ॥

एकाकी कौपीनधारी । तेथूनी निघालों झडकरी ।
ग्रामांत करूनि माधुकरी । देपुराप्रती पै गेलों ॥ ४१ ॥

तेथें बाबाजी भागवत । गृहस्थाश्रमी बहु समर्थ ।
अतिथियाचे मनोरथ । पूर्ण करीत सर्वदा ॥ ४२ ॥

घेतलें तयाचें दर्शन । पाहूनि धालें मन ।
भागवत ह्मणे ' आलां कोठून । पश्चात्तापी दिसतां ' ॥ ४३ ॥

सत्वरीं गृहाप्रती चलावें । माझे मनोरथ पुरवावे ।
दोनचार दिवस रहावें । कोठें न जावें सत्वरीं ॥ ४४ ॥

बहुत आदर तारतम्य घेऊन । घेतलें आठ दिवस ठेवून
पांघरावया कामळ घेऊन । मजलागीं दीधलें ॥ ४५ ॥

दुसरें अंगवस्त्र घेऊन । ह्मणे याजलागीं पांघरण ।
म्यां तयाचें मोडिलें वचन । अंगवस्त्र नाहीं घेतलें ॥ ४६ ॥

तंव तेच रात्रीं स्वप्न झालें । ब्राह्मणाचे रूपें दत्तात्रय आले ।
येउनि उभे जवळ ठेले । बोलते जाले सक्रोधें ॥ ४७ ॥

'कां रे ! अंगवस्त्र न घेसी । इतका त्याग कासया करिसी ।
कोणा दुखावूं नये मानसीं । सुखें देतां घ्यावें पैं' ॥ ४८ ॥

ऐसें बोलोनियां वहिला । दत्तात्रय अदृश्य झाला ।
भानू प्रकाशला । रविरश्मी दाटल्या ॥ ४९ ॥

मग जाउनी भागवतासी शरण । अंगवस्त्र घेतलें मागून ।
सांगितलें वर्तमान । जें कां रात्रीं जहालें ॥ ५० ॥

बावाचें घेतलें आशीर्वचन । तेथें आठ दिन राहून ।
सर्वेचि निरोपातें मागून । सिंद्रासी पैं आलों ॥ ५१ ॥

तेथें बाळकरामबावा आनंदघन । त्याचें घेतलें दर्शन ।
जयासी मारुती प्रसन्न । साक्षात्कार जाहलासे ॥ ५२ ॥

तेथें राहुनी पांच दिवस । आज्ञा मागुनी तयास ।
सर्वेचि केलें प्रयाणास । सिंद्याप्रती पातलों ॥ ५३ ॥

तेथोनि प्रातःकाळीं उठोन । सत्वरचि केलें गमन ।
द्वादश घटका दिनमान । तंव क्षेत्राप्रती पातलों ॥ ५४ ॥

जें कां सर्व देशाचें नासिक । योगवृंदाचें येतसे पिक ।
तें हें सुक्षेत्र नाशिक । दृष्टीलागीं पाहिलें ॥ ५५ ॥

लोक ह्मणती या नाशिक । परि म्यां देखिलें बहुशिक ।
दुरला येऊनि नाशिक । शिकूनिया जातसे ॥ ५६ ॥

क्षेत्रासि नाम नाशिक । परि योगी रहाती बहुसम्यक ।
न देखों नाशिक । मनुष्यमात्र करूनिया ॥ ५७ ॥

सर्वेचि दिठीं देखिली गंगा । जे त्रितापशमनी भवभंगा ।
वसे सांबाचे अर्धांगा । जे श्रीरंगा आवडती ॥ ५८ ॥

जियेचें सामर्थ्य अतिगहन । दोषी असतां शतयोजन ।
तयाचें करीत उद्धरण । क्षणमात्र न लागतां ॥ ५९ ॥

जियें विष्णूचे अंगुष्ठावरून । ब्रह्मगिरीस केलें येणें ।
शिवजटा मिळणीं मिळून । मृत्यलोका पातली ॥ ६० ॥

तयेचें लावण्य पाहून । मदनारी झाला तल्लीन ।
मस्तकावरी केलें धारण । जटाजूटीं राहिली ॥ ६१ ॥

शिवें केलें विषप्राशन । सर्वांग झालें तपन ।
करितां गंगा जटीं धारण । शीतल सर्वांगीं झाला पैं ॥ ६२ ॥

ते हे गंगा पापहारिणी । कलियुगीं जडमूढउद्धरणी ।
भागीरथीची ज्येष्ठ भगिनी । नाशिकालागी पातली ॥ ६३ ॥

प्राणी बहुश्रमें जाती काशी । कावडी नेती रामेश्वरासी ।
दृष्टीं पाहतां गंगेसी । भागीरथी उसळतसे ॥ ६४ ॥

तो चमत्कार अद्यापिवरी । दृष्टीसी पहावा चतुरीं ।
मग सत्य वाटेल अंतरीं । एरवीं खरेंचि आहे वो ॥ ६५ ॥

ऐसें गंगेचें करूनि स्तवन । दृष्टीं पाहिलें सुहास्यवदन ।
जें ब्रह्मानंदाचें सुखसदन । सांडणीं मदन करावा ॥ ६६ ॥

जीचे स्वरूपाची पाहुनी सीमा । लज्जित झाल्या उमारमा ।
ते म्यां पाहिली सुखधामा । भीष्ममाता साजिरी ॥ ६७ ॥
जीचे पुत्राचें सामर्थ्य गहन । विष्णूसि केलें रणकंदन ।
शस्त्रप्रतिज्ञा केली खंडण । चक्र हस्तकीं धरविलें ॥ ६८ ॥
जियेचें दुग्धप्राशनबळ । भीष्म कृष्णालागीं सबळ ।
होउनि युद्ध केलें तुंबळ । एकादश दिनवरी ॥ ६९ ॥
ते हे गंगा सुप्रसन्नवदना । आवडती जे भालनयना ।
प्रगटली जे विष्णुचरणा । ते म्यां दिठीं देखिली ॥ ७० ॥
अरुणा तयेचें कंठस्थान । वरुणा हनुवटी गहन ।
रामकुंड तें मुख जाण । लक्ष्मणकुंड नासिका पैं ॥ ७१ ॥

सूर्यकुंड ब्रह्मतीर्थ विचित्र । हेचि गंगेचे दोन्ही नेत्र ।
पंचवटी नाशिक दोन्ही क्षेत्र । कर्ण-युगुल जियेचें ॥ ७२ ॥

द्वैपायन गंगापुत्र । तपश्चर्या केली स्वतंत्र ॥
तें बदरीतीर्थ अतिपवित्र । भांग सुरेख साजिरा ॥ ७३ ॥

त्र्यंबकापर्यंत स्वप्रवाहिनी । तेचि तयेची सुंदर वेणी ।
आतां वर्णिजेल सर्वभूषणीं । दैवतांचा समुदावो ॥ ७४ ॥

रेणुका लक्ष्मी भद्रकाळी । हेचि गळयांतील गरसोळी ।
मंगळसूत्र तयातळीं । मारुति तपोवनींचा ॥ ७५ ॥

नीळकंठ तारकेश्वर रामेश्वर । मुरडेश्वर पंचरत्नेश्वर ।
बाणेश्वरादि चिंचपेट्या समग्र । गळयामाजी घातल्या ॥ ७६ ॥

चित्रघंटा पदकमाळा । रोकडामारुति तेजआगळा ।
खालीं लोलक सुढाळा । लाविलासे सुंदर ७७ ॥

जगप्रसिद्ध तिळभांडेश्वर । तोचि कंठीं चंद्रहार ।
श्रीव्यंकटेश पदक सुंदर । तयालागी शोभतसे ॥ ७८ ॥

सिद्धिविनायक गणपती सुंदर । उभय कर्णीं कुंडलाकार ।
बाळिया दत्तपादुका परिकर । पंचवटी माजींतल्या ॥ ७९ ॥

कपालेश्वर उमामहेश्वर । हीं कर्णफुलें अतिविचित्र ।
तेणं सुशोभित दिसती श्रोत्र । तया गंगामातेचे ॥ ८० ॥

गोरे रामलक्ष्मण । तेचि नासिकीं मोतीं सुपाण ।
द्विमुखी मारुती अधोवदन । मदननायक जोडला ॥ ८१ ॥

पंचमुखी मारुती आणि विठ्ठल । तोचि विजवरा देतसे ढाळ।
पाताळेश्वर हिरा तेजाळ । देतसे ढाळ तयासी ॥ ८२ ॥

श्रीदत्तात्रय दिगंबर । तोचि मस्तकीं मुगुट सुंदर ।
कोटि उगवले प्रभाकर । तेज अमूप जयाचें ॥ ८३ ॥

ब्रह्माविष्णुमहेश्वर । या तिहींचा जो अवतार ।
तो साक्षात् दिगंबर । मस्तकावरी शोभतो ॥ ८४ ॥

जो निष्कळंक निरंजन । निष्काम सदैव परिपूर्ण ।
सच्चित्स्वरूप आनंदघन । मुगुट शिरीं साजिरा ॥ ८५ ॥

जो परात्पर अवधूत । सर्वीं असुनी सर्वातीत ।
सर्व विषयांसी अलिप्त । मुगुटाकृती शोभतो ॥ ८६ ॥

अश्वत्थवन मौक्तिकें बरीं । हरिहरेश्वरादि पोंवळीं अंतरीं ।
तेचि तयालागीं झालरी । मुगुटाखालें शोभती ॥ ८७ ॥

तया सान्निध्या सुंदरनारायण । तो मस्तकीं सिसफूल जाण ।
ब्रह्मतीर्थ तया संलग्न । कुंकुम भाळीं शोभतसे ॥ ८८ ॥

सर्वांमाजी गुणसमुद्र । पंचवटी श्रीरामचंद्र ।
तोचि भाळीं शोभला चंद्र । प्रभा अपार जयाची ॥ ८९ ॥

रावणें सीता केली हरण । मग लक्ष्मणें ताटिकेचें घ्राण ।
स्वहस्तें केलें छेदन । त्रिशिरखरदूषण मारिले ॥ ९० ॥

श्रीरामें पाषाणसेतु बांधून । मारिले रावणकुंभकर्ण ।
सीतालक्ष्मणसह आपण । फिरूनि आले पंचवटीं ॥ ९१ ॥

पाहून सुंदर तपोवन । चिरकाळ राहिले आपण ।
तें स्वरूप इंदुवदन । गंगाभाळीं शोभतसे ॥ ९२ ॥

सव्यभागीं तपस्वी थोर । रघुनाथ गुरूजी योगीश्वर ।
जो साक्षात् भृगु अवतार । कलियुगामाजी अवतरला ॥ ९३ ॥

ह्मणाल भृगु असें संबोधन । तरि ते मिथ्या न वदे जाण ।
मजलागीं श्रीदत्तात्रयानें । स्वप्नीं येऊनि कथियेलें ॥ ९४ ॥

जो तपस्वियांमाजी वीरभद्र । अनुष्ठानियांमाजी दुजा रुद्र ।
कां योगियामाजी योगींद्र । शीतळ चंद्र दूसरा ॥ ९५ ॥

सत्वधीर अति उदार । ज्ञानियांमाजी रत्नाकर ।
तपोतेजप्रभाकर । गंगाभाळीं शोभतो ॥ ९६ ॥

ऐसी गंगामाता सुंदर । रत्नभूषणेंयुक्त परिकर ।
हास्यवदन उदार । दृष्टीसी म्यां देखिली ॥ ९७ ॥

मग तयेप्रती करूनि नमन । केलें तीर्थातें वंदन ।
पंचवटीमाजी जाऊन । श्रीरामदर्शन घेतलें ॥ ९८ ॥

दिनमणी पाहुनि माध्यान्ह । क्षेत्रांत केलें भिक्षाटन ।
गौतमीतटाकीं जाऊन । भोजनातें सारिलें ॥ ९९ ॥

मग यतीसी केलें विचारण । साधकामांजी अग्रगण्य ।
रघुनाथ गुरुजींचें स्थान । कोठें मज दाखवा ॥ १०० ॥

स्वामी बोलते झाले उत्तर । दिनमणी राहतां घटकाभर ।
दर्शन होईल साचार । एरवीं जातां न घडेचि ॥ १०१ ॥

तयाप्रती मी वदलों वचन । माझें शुद्ध अंतःकरण ।
असेल तरिच हो दर्शन । तिसरे प्रहरीं होईल ॥ १०२ ॥

मग मी निघालों तेथोनी । उतरलों स्वर्धुनीचें पाणी ।
निरंजनस्थानाखालुनी । घाटावरुतें चढिन्नलों ॥ १०३ ॥

तों दृष्टीं पाहिला विप्रसमुदावो । त्यांमाजी योगियांचा रावो ।
पाहुनी नमनाचा भावो । मम अंतरीं उदेला ॥ १०४ ॥

तयासी ऐलिकडे टाकून । घाटावरी सुंदरनारायण ।
तयाचें घेतलें दर्शन । सवेंचि मागें परतलों ॥ १०५ ॥

तंव गुरुराज तेथोनि गेला । जैं दरिद्रिया परीस सांपडला ।
धोंडा ह्मणवूनि झुगारिला । अक्षोभ उदकामाझारी ॥ १०६ ॥

कीं मार्ग चालतां श्रांतला । निकट कल्पतरु देखता झाला ।
त्यागुनी हिवराखालें गेला । अभागिया जैसा ॥ १०७ ॥

कां गुराखिया हिरा सांपडला । गार ह्मणुनि विस्तो पाडूं गेला ।
न पडतां झुगारोनि दिला । उपेगी नाहीं ह्मणवूनी ॥ १०८ ॥

कां अकस्मात् दैव उदलें । रोगिया अमृत आंतुडलें ।
कांजी ह्मणुनी त्यागिलें । अभागिया पुरुषांनीं ॥ १०९ ॥

कां धनगर हिंडतां वनीं। आढळती जाहली पद्मिनी।
चेष्टा समजूनी मनीं। अरण्यामाजी पळतसे ॥ ११० ॥

असो पुढें होईल गुरुदर्शन। सर्व मनोरथ होतील पूर्ण।
माझें तुटेल भवबंधन। श्रोते जनीं परिसावें ॥ १११ ॥

इतिश्री आत्मप्रचीतिग्रंथ। संमत दत्तात्रय अवधूत।
निरंजनीं आत्मप्रचीत। गुरुकृपें जहाली ॥ ११२ ॥

॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

* * *

## अध्याय चवथा

ॐ नमो जी श्रीदिगंबरा। विवेकबुद्धीचिया दातारा।
करुणालया दयासागरा। पूर्ण अवतारा धन्य तूं ॥ १ ॥

पूर्वाध्यायीं कथानुसंधान। करूनि प्रपंचविटंबन।
जालें नासिकाप्रती येणें। गंगादर्शन घेतलें ॥ २ ॥

गुरुरायाचे भेटीलागून। आलों घाटावरी फिरून।
जेथें उभे ठेले ब्राह्मण। तया ठाया पातलों ॥ ३ ॥

तयांमाजी अच्युतरावजी। तेजःपुंज सर्वांमाजी।
जयालागीं उपमा दुजी। दृष्टीलागीं दिसेना ॥ ४ ॥

जो कवीश्वरांमाजी श्रेष्ठ। बृहस्पतीसम वक्ता स्पष्ट।
वसिष्ठासम कर्मनिष्ठ। इष्ट अनिष्ट जाणता ॥ ५ ॥

जयाची प्रज्ञा विशाळ गहन। कर्मकांडीं अतिविचक्षण।
प्रतिसृष्टि करितां निर्माण। विश्वामित्र दूसरा ॥ ६ ॥

ऐसा विप्रमंडळीमाजी। दृष्टीसी देखिला रावजी।
तयासी विचारिलें सहजीं। सद्गुरु कोठें रहाती वो ॥ ७ ॥

तयांनीं मजवरी कृपा करून । दाखविले गुरुचरण ।
मग समर्थांसी अवलोकून । साष्टांगनमन पैं केलें ॥ ८ ॥

सद्‌गुरु बोलती कृपावचन । कोठून जालें तुमचें येणें ।
माध्यान्हकाळ भोजन । जालें किंवा न जालें ॥ ९ ॥

तंव म्यां द्वयकर जोडून । बोलता जालों नम्रवचन ।
ग्रामांत माधोकरी मागून । भोजनातें सारिलें ॥ १० ॥

आपुले दर्शनाची इच्छा मानसीं । बहुत होती आसोसी ।
ते येतांचि पायापाशीं । बहुं तृप्ती जहाली ॥ ११ ॥

बालेघाट माझें स्थान । पुणियाहून जाहलें येणें ।
गिरनाराप्रती आहे जाणें । दत्तदर्शन घ्यावया ॥ १२ ॥

ऐसें बोलतां वचन । सद्‌गुरु जाहले हास्यवदन ।
ह्मणती दत्तात्रयाचें स्थान । एथेंच दृष्टीं पहावें ॥ १३ ॥

मग मजलागीं देवालयीं नेऊन । दाखविलें रूप सगुण ।
दत्तात्रय अवतार पूर्ण । सावळी मूर्ति साजिरी ॥ १४ ॥

षड्‌भुजमूर्ति प्रसन्नवदन । शंखचक्रमालाकमंडलूधारण ।
मध्यपाणी त्रिशूळ डमरु जाण । नयन आकर्ण साजिरे ॥ १५ ॥

भाळ रुंद अति विशाळ । मध्यकटी बारीक चिवळ ।
कर्णनाशिक अति सोज्वळ । समपद उभी ठाकली ॥ १६ ॥

पाहून रूप अति सुंदर । वेधून गेलें मनभ्रमर ।
पदपंकजीं गंध परिकर । सेवून तृप्त जहालों ॥ १७ ॥

मग गुरूप्रती वदलों वचन । हर्षयुक्त जाहलें माझें मन ।
दत्तात्रयरूप आनंदघन । आपुलें दर्शन घेऊन ॥ १८ ॥

सद्‌गुरु ह्मणती अहंविशेष । एथें वसावें चार दिवस ।
दत्तजयंती अनायास । आली तेही करावी ॥ १९ ॥

तयाप्रती वदलों उत्तर । आजींचा दिन आहे स्थिर ।
रात्रीं देवासि पुसोन विचार । आपणालागीं सांगेन पैं ॥ २० ॥

ऐसें होऊन भाषण । गुरूंनीं अरण्यांत केलें गमन ।
मी पंचवटीचें बिऱ्हाड घेऊन । दिगंबरापाशीं पैं आलों ॥ २१ ॥

कार्तिक वद्य चतुर्दशी । शके सत्राशें तेहतीसीं ।
प्रजापती नाम संवत्सरासी । ते दिनीं एथें पातलों ॥ २२ ॥

रात्रौ पंचपदी करून । देवालयीं केलें शयन ।
मध्यरात्रीं ब्राह्मण होऊन । दत्तात्रय स्वप्नीं पैं आले ॥ २३ ॥

म्हणती ऐक रे ! सावधपण । एथें रहावें पंधरा दिन ।
जें जें होईल तें तें पाहणें । स्थिर मन करोनिया ॥ २४ ॥

सवेंच जालें दुजें स्वप्न । अकस्मात् गंगोदकीं पडलों जाण ।
तंव जान्हवीजळ वरी येऊन । मजलागून तारिलें ॥ २५ ॥

त्वरितचि प्रातःसमय जाला । तमारी प्रकाशातें प्रसवला ।
मग मी गेलों स्नानाला । स्वर्धुनीचे तटाकीं ॥ २६ ॥

करोनि यथोक्त संध्यास्नान । देवालयाप्रती येऊन ।
श्रीदत्तात्रयाचें पूजन । यथाविधी पैं केलें ॥ २७ ॥

माध्यान्हीं पंचवटीस जाऊन । होऊनी आनंदयुक्त मन ।
माधोकरीतें मागून । गंगातीरीं भक्षिली ॥ २८ ॥

सायंकाळीं संध्या करुनी । सहज गेलों गुरुदर्शनीं ।
मग द्वय करपुटें जोडुनी । नमन गुरूतें पैं केलें ॥ २९ ॥

तंव सद्गुरु कृपाळुपण । मज वामभागीं दिधलें स्थान ।
उठुनी गेले सर्व जण । निशी बहुत जाहली ॥ ३० ॥

समर्थ पुसती मजप्रती । सांप्रदाय कवण गुरुमूर्ती ।
कृपा संपादिली कवणें रीतीं । ते मजप्रती सांगावी ॥ ३१ ॥

कवण मुद्रा कवण ध्यान । ध्यातां निराकार कीं सगुण ।
कवण धारणा धरुनी मनीं । उदासीन पै केलें ? ॥ ३२ ॥

ऐसें पुसतीं मजप्रती । मग मी निष्कपट होउनी चित्तीं ।
बोलता जालों वचनोक्ती । सत्य शरीरीं होत्या ज्या ॥ ३३ ॥

ऐको वो सद्‌गुरु समर्था । माझी पश्चात्तापी कथा ।
अग्निज्वाला नखादि शिखा । व्यापुनिया राहिल्या ॥ ३४ ॥

म्हणूनि अभिष्टाकृती होऊन । फिरत आलों देशाटन ।
परि स्थिर नव्हे अंतःकरण । उदासीन सर्वदा ॥ ३५ ॥

गुरुकृपा नाहीं संपादिली । धारणा अद्यापि नाहीं धरिली ।
संतमुखें कीर्तनीं ऐकिली । ते सगुण मूर्ती ध्यातसे ॥ ३६ ॥

मुद्रा चाचरी ना भूचरी । खेचरी ना अगोचरी ।
कवण नामीं वनउरी । हें मज नाहीं ठाउकें ॥ ३७ ॥

दत्तात्रयमूर्ती सगुण । द्वितीय अध्यायीं केलें कथन ।
तया प्रकारें करून केलें ध्यान । हृदयामाजी पहातसे ॥ ३८ ॥

सद्‌गुरु म्हणती बहुत बरवें । याचि प्रकारें ध्यान करावें ।
परी सर्वांतरीं पहात जावें । सच्चिदानंद स्वरूपातें ॥ ३९ ॥

मग मी बहु नम्र होऊन । पुसता लागलों गुरूलागून ।
सच्चिदानंद हें ध्यान । सर्वीं कैं पहावें ॥ ४० ॥

ऐसें देतां प्रत्युत्तर । सद्‌गुरु चातुर्यरत्नाकर ।
मग होऊन बहु उदार । आनंदलहरी प्रसवले ॥ ४१ ॥

म्हणे ऐक वो चातुर्यभरिता । सोडुनी पश्चात्तापव्यथा ।
मनइंद्रियांचा करोनि लोथा । वचन माझें परियेसी ॥ ४२ ॥

टाकोनिया शब्दविभाग । सांडूनि पोकळी दिशावलंब ।
त्यागोनि आधार प्रकाश । चिदाकाश तें घेईं ॥ ४३ ॥

आकाश सर्वव्यापक आहे । बाह्य दृष्टीसी न दिसताहे ।
जेंवि हृदयांतरीं पाहे । ज्ञानदृष्टीकरुनिया ॥ ४४ ॥

मग मी तैसाच पाहूं गेलों । पाहतां तदाकारचि जालों ।
देहस्फूर्तीतें विसरलों । कोठें आहे नेणवे ॥ ४५ ॥

कवण ध्याता कवण ध्यान । कवण श्रोता वक्ता कवण ।
पाहतां हारपुनी गेलें मन । तीव्र ध्यान लागलें ॥ ४६ ॥

शरिरामाजी आकाश भरलें । वाटे मस्तक भेदुनी गेलें ।
ब्रह्मकटाहामाजी मीनलें । स्वरूप माझें सर्वेही ॥ ४७ ॥

ऐसें चार घटिका करितां ध्यान । वाचेसी पडून गेलें मौन ।
तंव सद्‌गुरु म्हणती सावधान । ध्यान विसर्जन करी कां ॥ ४८ ॥

तंव अंतरीं काढूं गेलों ध्यान । वाटे कोठें ठेवूं काढून ।
याजला ठेवितां ठिकाण । यावीण नाहीं दुसरा ॥ ४९ ॥

अंतरीं एकचि जाला गोळ । वाटे हृदयींच आहे भूगोळ ।
खालीं वरी मध्यें निर्मळ । मीच अवघा व्यापिलों ॥ ५० ॥

स्वरूपीं नाहीं देहभान । गुरूसी न बोलवे वचन ।
ऐसे वृत्तीतें पाहून । सद्‌गुरु जाले बोलते ॥ ५१ ॥

हेंचि ब्रह्म निराकार । निरंजन निराधार ।
निःप्रपंच निर्व्यापार । हेंचि तुझें स्वरूप पैं ॥ ५२ ॥

निर्मळ निष्कळंक निर्गुण । अनादि स्वरूप चैतन्यघन ।
स्वप्रकाश आत्मा आनंदघन । तें हें स्वरूप तुझें पैं ॥ ५३ ॥

तुझें स्वरूप निराकार । तुझेंचि रूप अजरामर ।
तुज जन्ममृत्यूचा घोर । एथून आतां नसेचि ॥ ५४ ॥

आतां निर्भय होय अंतरीं । सांडी द्वैताची कर्तरी ।
नांदे एकपणाचे घरीं । स्वानंदेंसी सर्वदा ॥ ५५ ॥

ऐसें ऐकुनि गुरुवचन । हर्षयुक्त जालें मन ।
मोठ्यानें हास्य करून । प्रेमटाळी पीटिली ॥ ५६ ॥

या प्रकारें भाषणें करितां । दोन प्रहर रात्रि झाली अवचिता ।
गुरु ह्मणती खालीं जाई आतां । जाउनी नीजीं निजावें ॥ ५७ ॥

मग सद्‌गुरूतें वंदून । देवालयीं येऊन केलें शयन ।
परि देहीं नाहीं भान । कोठें निद्रा केली हें ॥ ५८ ॥

नेत्रांसी बहु ताठा चढला । अंतरींचा अग्नी शीतळ जाला ।
स्वप्न-सुषुप्तिव्यापार निमाला । स्वात्मसुखेंकरूनी ॥ ५९ ॥

वाटे जागा ना निजलों । ठायीं नसे ना कोठें गेलों ।
देहीं आहे का नाहीं जालों । दोन्ही भावना उडाल्या ॥ ६० ॥

मागील एक प्रहर रात्रीं । वाटे स्वप्न पडलें अंतरीं ।
सद्गुरु येऊन हृदयांतरीं । मजलागी सांगती ॥ ६१ ॥

सखया ऐक सावधपण । माझें राहतें स्थान ।
मनोरम कोण कोण । तें मी तुज सांगतों ॥ ६२ ॥

माडी हेंचि निरंजनस्थान । मठ तो भृगुस्थान ।
गंगातीरीं आनंदवन । वृक्षवेली साजिरे ॥ ६३ ॥

ऐसें मजलागीं बोलून । अदृश्य जाले गुरु आपण ।
मग म्यां उठोनिया भजन । श्रीगुरूचें आरंभिलें ॥ ६४ ॥

सर्वेंचि गंगेसी करुनि स्नान । आरंभिलें देवतार्चन ।
दत्त पाहिला दृष्टी भरून । तंव पाषाणमूर्ती हालली ॥ ६५ ॥

तो पाहुनी चमत्कार । अंतरीं आनंद जाला फार ।
तया सुखासी अंतपार । कोठें पाहतां न दिसेचि ॥ ६६ ॥

ते दिवशींचिये रात्रीस । लक्ष्मी आली स्वप्नास ।
सांगती जाली आत्मप्रचीतीस । गुरु-उपदेश आपला ॥ ६७ ॥

ह्मणे ' शुकभृगूपासून । म्यां संपादिलें आत्मज्ञान ।
आकाशवत् चिंतन करून । हृदयांतरीं पहावें ' ॥ ६८ ॥

ऐसें बोलुनियां वचन । अदृश्य जाली सुवासीन ।
मग प्रातःकाळीं उठून । गुरूपाशीं कथियेलें ॥ ६९ ॥

गुरु ह्मणती ' उत्तम जालें । रात्रीं दत्तात्रय स्वप्नीं आले ।
मजप्रतीही सांगून गेले । बीजमंत्रास सांगावें ' ॥ ७० ॥

ऐसें ह्मणता गुरुमूर्ती । मज आठव जाला चित्तीं ।
अकोलियांत एकांतीं । मज उपदेश जो जाहला ॥ ७१ ॥

हृदयीं कथिला अत्रिपुत्र । मुखीं लावून माझा श्रोत्र ।
सांगितला अष्टाक्षरी मंत्र । तो गुरूप्रती कथियेला ॥ ७२ ॥

मग सद्‌गुरु जाले कृपावंत । सांगितलें मूळ बीजातें ।
ह्मणती ' जोडुनिया यातें । नव अक्षर ह्मणत जा ' ॥ ७३ ॥

अष्टाक्षरी तोचि बाण । नवम अक्षर अग्र लावून ।
मनोवेगाचें धनु ओढून । भवकुरंग विंधिला ॥ ७४ ॥

श्रीदत्तात्रय रघुनाथ एकचि जाला । नवाक्षरांची नवरत्नमाला
गुरूनें माझे घातली गळां । आत्मसोहळा देऊन ॥ ७५ ॥

मग आनंदयुक्त होऊन । सद्‌गुरूसी केलें नमन ।
जयजयकार स्तुती करून । स्वस्थळाप्रती पैं गेलों ॥ ७६ ॥

पंचमीस एक येऊन ब्राह्मण । अभंगांची वही देऊन ।
पंचवीस पान विडा करून । सुपारीसह दिधला ॥ ७७ ॥

पाहिलें जागृत होऊन । अदृश्य जाला ब्राह्मण ।
तेचि काळीं कवित्वाचें स्फुरण । मजलागी जहालें ॥ ७८ ॥

सवेंच स्वप्नीं विहिरींत पडलों । भोंवतें पाहोन भयभीत जालों ।
पारंबियांतें वळंघलों । वरती आलों चढूनिया ॥ ७९ ॥

बाहेर येऊन जंव पाहे । तों ब्राह्मण एक बैसला आहे ।
जटायुक्त शोभताहे । भस्म सर्वांगीं लावितो ॥ ८० ॥

करीत बैसला देवतार्चन । एकाग्र चित्त करूनि ध्यान ।
.................. । भोवतें सैन्य बहुतसे ॥ ८१ ॥

विहिरी तेचि भवकूप होय । ब्राह्मण तोचि दत्तात्रय ।
मज काढुनिया लवलाहें । कृपादृष्टीं तारिलें ॥ ८२ ॥

सवेंचि दिनमणी जाहला अस्त । चंपाषष्ठी दिवस युक्त ।
पंचवटीमाजी वेदांत । श्रवणालागीं पै गेलों ॥ ८३ ॥

तेथें गुरुशिष्यांचें भाषण । निघालें ब्रह्मनिरूपण ।
एकाग्र चित्तीं करितां श्रवण । उन्मादृदशा पैं जाली ॥ ८४ ॥

नेत्र भ्रूकुटी एकचि जाली । मस्तकाप्रती कळ लागली ।
आकाशमय वृत्ति जहाली । भान नाहीं देहाचें ॥ ८५ ॥

वाटे आकाशींच उडावें। कीं समुद्रापलीकडे जावें।
कीं ब्रह्मांडचि गिळावें। तोंड पसरून आवघें ॥ ८६ ॥

जैं वीर निघे युद्धाप्रती। भाट सवाया बोलती।
स्फुरण चढे वीराप्रती। बाहु उडती तटतटा ॥ ८७ ॥

तैसें झालें मजलागून। वाटे मीच ब्रह्म निर्गुण।
शास्त्र वेद आणि पुराण। माझे गुण वर्णिती ॥ ८८ ॥

ऐकुनि ब्रह्मींचा सोहळा। हास्य येतसे वेळोवेळां।
कंठ दाटून आला सगळा। नेत्रांलागीं दिसेना ॥ ८९ ॥

पुराण न होतां समाप्त। तेथुनि निघालों त्वरित।
जैसा मद्यपी दिसे भ्रांत। तैसी गती जहाली ॥ ९० ॥

बाहेर येतां जये वेळां। मार्ग कांहीं न दिसे डोळां।
वाटे ब्रह्मांडाचा गोळा। एकचि अवघा जाहला ॥ ९१ ॥

आपुलें न दिसेचि शरीर। अवघें दिसे निर्विकार।
सृष्टी जाहली धूम्राकार। नाहीं आकार कोठेंही ॥ ९२ ॥

क्षणक्षणीं नेत्र उघडुनि पाहे। तंव तें तैसेंचि दिसताहे।
भूमीवरी पाय न राहे। वाटे उडूनि चालिलों ॥ ९३ ॥

ऐसा जाहला विचार। अंतरीं भय उदेलें फार।
मग काढुनिया दीर्घस्वर। रुदनातें आरंभिलें ॥ ९४ ॥

मार्गी चालतां नाहीं भान। न दिसे रहाता ठिकाण।
क्षणक्षणा व्याकुळ होतसे प्राण। मुख घ्राण सूकलें ॥ ९५ ॥

ऐसा मार्गीं पडत झडत। येता जाहलों मठाआंत।
तेथें येऊन रुदनातें। मोठियानें पैं केलें ॥ ९६ ॥

सद्गुरु बैसले भोजनीं। कैसें जावें मोकळेन चरणीं।
हे आशंका न धरितां मनीं। कपाट उघडून पैं गेलों ॥ ९७ ॥

स्फुंद स्फुंद असे रडत। पोटांत तिडक उठती बहुत।
वायू ऊर्ध्वपंथें चालत। शेंबूड येतसे बहुतसा ॥ ९८ ॥

एक घटिकापर्यंत । अंतरीं होउनी भयाभीत ।
उठूनि भूमीसी पडत । उभा राहत क्षणक्षणीं ॥ ९९ ॥

तंव गुरु पहाती कृपादृष्टीं । ह्मणती ' जाहली संतुष्टी ।
आतां उघडुनिया पाहे दृष्टी । देहावरी येई कां ' ॥ १०० ॥

ऐकुनि ऐसें कृपावचन । सर्वेचि केलें हास्यवदन ।
सर्व शरीर शीतळपण । होऊनिया राहिलें ॥ १०१ ॥

तंव नेत्रीं बहुत निद्रा आली । मग तेथेंचि क्षणैक शय्या केली ।
गाढ समाधि लागली । तुर्या ह्मणती जियेसी ॥ १०२ ॥

ऐसा गुरुप्रसाद जाला । राज्यीं अभागी स्थापिला ।
कीं रोगिया जीवन्मुक्त केला । तैसें मजला जहालें ॥ १०३ ॥

पुढें कथेचें अनुसंधान । कथा रसाळ आहे गहन ।
कृपा करून श्रोते जन । अवधानातें देईजे ॥ १०४ ॥

इतिश्री आत्मप्रचीतिग्रंथ । संमत दत्तात्रय अवधूत ।
निरंजनीं आत्मप्रचीत । गुरुकृपें जहाली ॥१०५ ॥

॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

* * *

## अध्याय पांचवा

श्रीकृपामूर्ति अवधूता । त्रैलोक्यामाजी तुझी सत्ता ।
माझिया बुद्धीचा तूं दाता । होई आतां गुरुराया ॥ १ ॥
मागिल्या अध्यायीं कथाभाग । निरंजनीं गुरुकृपा सांग ।
होऊनी झाला भवभंग । आत्मसंग पावला ॥ २ ॥
आतां ऐकावें श्रोतेजनीं । मुमुक्षुपंथाची सुगणी ।
मज दीनाची साबडी वाणी । गोड केली पाहिजे ॥ ३ ॥

वदविता दत्तात्रय मायबाप । तुह्मीही आह्मां त्याचें स्वरूप ।
श्रवणीं मनालागीं विक्षेप । सहसा येऊं न द्यावा ॥ ४ ॥

आतां ऐकावा कथारंग । द्वैतभावना झाली भंग ।
करूनिया आत्मसंग । सुखासनीं पहुडलों ॥ ५ ॥

मग सर्वेचि देहावरी येऊन । सद्‌गुरूसवें केलें गमन ।
गंगातीरीं आनंदवन । तया स्थाना पैं गेलों ॥ ६ ॥

मार्गीं चालतां आनंदभरित । कांहीं हसत कांहीं रडत ।
मोठियानें धुमा ठोकित । सैरावैरा अरण्यीं ॥ ७ ॥

ऐसा सायंकाळपर्यंत । बहुत मी झालों उन्मत्त ।
मग सद्‌गुरु ह्मणती सावचित्त । होई आतां लेंकुरा ॥ ८ ॥

मग म्यां प्रेमानंद-लहरी । गिळूनि दिधली ढेकरी ।
सायंकाळ होतां माघारी । मठालागी पातलों ॥ ९ ॥

ते दिनीं रात्रीं झालें स्वप्न । गंगेंत बंगला केला बाइन ।
तयावरी मी गेलों चढून । वरी जाऊनी बैसलों ॥ १० ॥

तों इतकियांत एक ब्राह्मण । दुसरे रघुनाथगुरु आपण ।
उभयता बोलते झाले वचन । त्याचें अपान बंद करा ॥ ११ ॥

मी सर्वेचि जागा होऊन । गुरूतें केलें विचारण ।
ते ह्मणती दत्तात्रय येऊन । योगधारणा कथियेली ॥ १२ ॥

तों दुसरे दिवशीं प्रातःकाळीं । अपानवायु अंतराळीं ।
चढूनि लागली असे टाळी । खेचरी मुद्रा अलक्ष ॥ १३ ॥

शुद्ध सप्तमी असे ते दिनीं । जयंती नवदिवस तेथोनी ।
उपवासमौनातें अवलंबुनी । देवापाशीं बैसलों ॥ १४ ॥

रात्रंदिवस नंदादीप । पूजाविधान जपजाप्य ।
वाद्यें वाजती अमूप । वाजंत्री आदिकरूनी ॥ १५ ॥

प्रातःकाळीं देवाचें पूजन । पंचामृत उष्णोदकेंकरून ।
वस्त्रअलंकारभूषण । पुष्पमाळा बहुपरी ॥ १६ ॥

नैवेद्यासी शर्करादुग्ध । दक्षणा तांबूल त्रयोदश अंग ।
मंत्र पुष्पांजळी सांग । विधियुक्त मंत्रें करूनी ॥ १७ ॥

ऐसें होतां तीन दिन । चमत्कार झाला मजलागून ।
देवापाशीं होतों बैसून । रात्र मध्यान्ह पैं झाली ॥ १८ ॥

करित बैसलों होतों ध्यान । तों एक वेश्या जवळ येऊन ।
तिनें आपुल्या स्तनेंकरून । माझे हृदयीं ताडिलें ॥ १९ ॥

आणखी एक्याचि हारीनें । आठ वेश्या गृह बांधून ।
आपुलाल्या द्वारीं बैसून । मज बोलवूं लागल्या ॥ २० ॥

त्यां तयांतें धिक्कारून । मग पुढारां केलें गमन ।
तंव दृष्टीं देखिला ब्राह्मण । बहु स्त्रिया समवेत ॥ २१ ॥

स्त्रिया लेवोनि वस्त्र भूषण । सुस्वरें करिती गायन ।
वर्णिती श्रीगुरूचे गुण । धन्य धन्य ह्मणवोनी ॥ २२ ॥

तयांलागीं दृष्टीं पाहून । निघता झालों एकीकडून ।
गंगातटीं निरंजनस्थान । त्यातळीं येऊन बैसलों ॥ २३ ॥

सहस्र चंद्रांचे किरण । तैसें माझें स्वरूप होऊन ।
एकटाचि राहिलों बैसून । तेज अळुमाळ फाकलें ॥ २४ ॥

तंव रघुनाथ गुरु आपण । खालीं उतरले माडीवरून ।
माझें तेज गेलें झाकून । पूर्ववत् जहालों ॥ २५ ॥

सद्‍गुरूंनीं कृपा करूनी । एक अष्टदलातें निर्मूनी ।
दाखविलें मजलागुनी । अति लाघव तयाचें ॥ २६ ॥

तें अष्टदळ घेऊनी हातीं । पाहता झालों तयाप्रती ।
एकें द्वारें पाहतां व्यक्ति । अष्टद्वाराची दिसतसे ॥ २७ ॥

सर्वेचि तेथुनि गेलों उठून । स्त्रीरूप नोवरी झालों आपण ।
हिरवी पातळ चोळी नेसून । हरिद्रा सर्वांगीं लाविली ॥ २८ ॥

दुसरी स्त्री जवळी येऊन । मजशी बोलती झाली वचन ।
रघुनाथबावासी त्यागून । किमर्थ येथें आलासी ॥ २९ ॥

बोवा हे भृगूंचा अवतार । त्यांजपाशीं जाई सत्वर ।
जाऊनी दीप नीट कर । उजेड होईल अंतरीं ॥ ३० ॥

ऐसें मजलागीं सांगून । स्त्री अदृश्य झाली आपण ।
सवेंचि ध्यान विसर्जन । करिता झालों अंतरींचें ॥ ३१ ॥

नेत्र उघडोनि जों पाहिलें । तंव कोणी नाहींसें झालें ।
दत्तमूर्तीतें अवलोकिलें । नमन केलें साष्टांगीं ॥ ३२ ॥

तंव अकस्मात् कर्णांतुनी । उठती झाली एकचि ध्वनी ।
वाटे वाद्यें वाजती गगनीं । शब्द अनेक प्रकारचे ॥ ३३ ॥

उठल्या वाजंत्र्यांच्या ध्वनी । नगारे वाजती दणाणी ।
क्षणाक्षणा वाजती किणकिणी । घड्याळादि सारिखे ॥ ३४ ॥

सवेंचि कर्णांमाजी सरारी । उठे एकचि भरारी ।
गोमासी गेली कर्णाभीतरीं । ऐसें वाटूं लागलें ॥ ३५ ॥

ऐसी होतां वाद्यध्वनी । क्षणक्षणा बाहेर यावें उठूनी ।
पाहतां बहुत यामिनी । ध्वनी कोठें नसेचि ॥ ३६ ॥

एकांतीं बैसतां जाऊन । वाद्यें वाजतीं पहिल्याप्रमाण ।
मग अंतरीं श्रम उपजून । मठीं फिरूं लागलों ॥ ३७ ॥

सवेंचि उगवला दिनमणी । जाऊन कथिलें गुरुलागुनी ।
ते म्हणती तुज उमजोनी । अर्थांतर सांगतों ॥ ३८ ॥

अष्ट वेश्या त्या सिद्धी जाण । तुझे हृदयीं जें केलें ताडण ।
तरि सर्व मनोरथ होतील पूर्ण । ब्रह्म तोचि दत्तात्रय ॥ ३९ ॥
भोंवता स्त्रियांचा समुदाव । तें ऋद्धिसिद्धींचें वैभव ।
त्यांसी त्यागिलें त्वां स्वभावें । हें उत्तम त्वां बहु केलें ॥ ४० ॥
तेजस्वी झालें तुझें रूप । तें पाहिलेंसि आत्मस्वरूप ।
स्वप्रकाश ब्रह्मरूप । होऊनिया ठेलासी ॥ ४१ ॥
अष्टदळ तें ब्रह्म निर्गुण । वेदशास्त्रें द्वारें करून ।
त्याजला पहावें जिकडून । तिकडून दिसे सर्वही ॥ ४२ ॥

वाद्यें वाजलीं कर्णांतरीं । ते दशनाद झाले अंतरीं ।
वेगळाले बहुतापरी । किंकिणी आदिकरूनियां ॥ ४३ ॥

नवरी झालासी हळदी लागून । तें गुरूसी लाविलें लग्न ।
दुसरी स्त्री जवळी येऊन । वदली खूण भृगूची ॥ ४४ ॥

स्त्रीरूप घेऊनि दत्तात्रय । तुजला सांगितली सोय ।
सत्वरीं भृगूपाशीं जाय । उजेड करी म्हणाली ॥ ४५ ॥

असो माझा अवतार कोण । याविण तुज काय कारण ।
शुद्ध करूनि अंतःकरण । ज्ञानदीप लावी कां ॥ ४६ ॥

आतां तूं आनंदघन झालासी । राज्यपदवी पावलासी ।
सच्चिदानंदविलासी । होउनि सुखें भोगी कां ॥ ४७ ॥

तुझे सुखासी नाहीं पार । पावलासी जीवन्मुक्तीचें घर ।
नको पुसूं वारंवार । सुखी राहे अंतरीं ॥ ४८ ॥

मग मी स्तब्धचि राहिलों । स्वस्वरूपातें पहाता झालों ।
देह-स्फूर्तीसी विसरलों । दोन घटिकांपर्यंत ॥ ४९ ॥

मग देहावरी येऊन । गुरूसी केलें साष्टांगनमन ।
सद्गुरु कृपावंत होऊन । आज्ञा करिते जहाले ॥ ५० ॥

तुज सांगितलें ब्रह्मज्ञान । त्वांही सेविलें भाव करून ।
पूर्वपुण्याचे बळेंकरून । प्राप्त तूंतें जहालें ॥ ५१ ॥

योगधारण याच्यापुढें । सर्वस्वीं दिसताहे बापुडें ।
जैसें पितळ सोन्यापुढें । तैसी वायुधारणा ॥ ५२ ॥

जरी म्हणसी नाहीं पाहिलें । तरी मी सांगतों ऐक वहिलें ।
जें वेदोक्त वर्म बोलिलें । तें तुज हातीं करवितों ॥ ५३ ॥

मग दशमीचे दिवशीं जाण । दोन प्रहर रात्री पाहून ।
निरंजनस्थानीं बैसून । सांगते झाले मजप्रती ॥ ५४ ॥

प्रथमारंभीं योगासन । पंचदश केलें गोरक्षानें ।
तें मज हातीं करवून । पाहिलें गुरूनें सर्वेही ॥ ५५ ॥

यमनियमादि अष्टांग । तेंहि निवेदन केलें सांग ।
षट्कर्म योगाचीं आंगें । तींहि मज दाखविलीं ॥ ५६ ॥

अष्टकुंभक दशमुद्रा जाण । चारी अवस्था सुलक्षण ।
तें मज केलें निवेदन । आत्मचिंतन शेवटीं ॥ ५७ ॥

सर्व एके रात्रीं सांगून । चित्त केलें परिपूर्ण ।
म्हणती सर्व आहेत साधन । आत्मप्राप्तीलागी पैं ॥ ५८ ॥

आतां कोठें न घाली मन । सर्वदा करी आत्मचिंतन ।
तेणेंचि होशील परिपूर्ण । अखंडत्व सर्वदा ॥ ५९ ॥

मग म्यां तथास्तु म्हणून । वंदिता झालों गुरुचरण ।
मग सर्वेचि खालीं उतरून । देवापाशीं पैं गेलों ॥ ६० ॥

दुसरे दिवशीं रात्रीसी । मार्गशीर्ष शुद्ध एकादशी ।
मंडळी आली जागरणासी । तंव गुरूपाशीं मी गेलों ॥ ६१ ॥

जाउनी साष्टांग केलें नमन । सद्‌गुरु वदोनि आशीर्वचन ।
वर्षते झाले कृपावन । जो अप्राप्त देवेंद्रा ॥ ६२ ॥

मजवरी कृपादृष्टी करून । करविलें दुग्धातें प्राशन ।
नांव ठेविलें निरंजन । तेचि काळीं पै माझें ॥ ६३ ॥

ह्मणती ऐक आज्ञोत्तर । स्वमुखें प्राकृत कविता कर ।
ठेवी मस्तकीं अभयकर । येच क्षणीं वदे कां ॥ ६४ ॥

दत्तात्रय तांबूल देऊन । आज्ञा केली तुजलागून ।
तैशीच म्यांही तुजकारण । कवित्वबुद्धि दीधली ॥ ६५ ॥

ऐसें ऐकुनि गुरूचें वचन । प्रफुल्लित झालें माझें मन ।
तेव्हां दौत लेखणी घेऊन । अभंग लिहिता जहालों ॥ ६६ ॥

पंच अभंगांतें लिहून । दाखविलें गुरूलागून ।
तयांनीं होऊनि हास्यवदन । प्रेमटाळी पीटिली ॥ ६७ ॥

ह्मणती रे तूं धन्य धन्य । होशील सर्वांमाजी मान्य ।
तुझी कविता वाचितां अन्य । तेहि धन्य होतील पैं ॥ ६८ ॥

ऐसें ऐकुनि गुरूचें उत्तर । लोळता झालों चरणांवर ।
जोडोनिया दोन्ही कर । विनत झालों तयांसी ॥ ६९ ॥

सद्‌गुरुराया समर्था । तुम्हीं पुरविलें माझ्या आर्ता ।
मानवी असतां झालों कर्ता । ब्रह्मसृष्टी दूसरी ॥ ७० ॥

ऐसें वाटे माझिया मना । मी देऊं गुरुदक्षणा ।
द्रव्यसंपत्ति उपभोग नाना । मिथ्या मजप्रती दीसती ॥ ७१ ॥

पाहतां राहिलें एक शरीर । तेंहि नाशिवंत असार ।
मी अकिंचन झालों फार । काय देऊं दक्षणा ॥ ७२ ॥

आतां विनंती आदि अंतीं । आज्ञा करावी मजप्रती ।
गुरुदक्षणा पायांप्रती । प्रविष्ट होय सर्वस्वीं ॥ ७३ ॥

सद्‌गुरु ह्मणती ऐक गोष्टी । त्वां मज दिली सर्व सृष्टी ।
स्वरूपीं ठेवी अखंड दृष्टी । कवित्व मुखीं वदत जा ॥ ७४ ॥

हें चालवी माझें व्रत । दक्षणा पावली सर्व मातें ।
तुजप्रती पाहुनि माझें चित्त । आनंदयुक्त सर्वदा ॥ ७५ ॥

ऐसें ऐकुनि गुरुउत्तर । हात जोडोनि वारंवार ।
वदता झालों स्तुति-उत्तर । प्रेमयुक्त होऊनी ॥ ७६ ॥

जयजया जी गुरुराया ! । जयजया जी करुणालया ।
जयजया जी योगिराया । करी दया मजवरी ॥ ७७ ॥

जयजया स्वामी समर्था । जयजया गूढज्ञान अर्था ।
जयजया भवभंग परमार्था । हरली व्यथा बहु माझी ॥ ७८ ॥

मज रंकातें राज्यपदवी । देऊनी संपत्ति आघवी ।
चिद्‌विलासाचिये गांवीं । नांदविलें सुखरूप ॥ ७९ ॥

ऐसें करुनिया स्तुतीतें । आज्ञा मागुनी सद्‌गुरूतें ।
जावोनि मठिकाआंत । जागरणासी बैसलों ॥ ८० ॥

द्वादशी त्रयोदशी होऊन। दत्तजन्म चतुर्दशीलागून।
करूनिया प्रातःस्नान। सर्व आली मंडळी ॥ ८१ ॥

देवासि घालेनिया स्नान। षोडशोपचारीं पूजा करून।
जन्मकाळीं गुरुकीर्तन। करुनि बुका उधळिला ॥ ८२ ॥

जयंतीचे पारणालागून। कांहींच नव्हता ठिकाण।
दत्तात्रयें चमत्कार करून। सामुग्रीतें निर्मिलें ॥ ८३ ॥

क्षेत्रांतील गृहस्थ मिळाले। रात्रौ सद्गुरुपाशीं आले।
कोण कोण त्यांचीं नामें वहिलें। सांगतों तें परियेसा ॥ ८४ ॥

भगवंतपंत बारामतकर। रामहारी विप्र मल्हार।
महिपतभट बापु भोगुरकर। सज्जन ह्मणती जयातें ॥ ८५ ॥

भगवद्भक्त तिघे जण। राघव कृष्णशर्मा ब्राह्मण।
तिसरा राजारामबावा जाण। भटपति ह्मणती जयातें ॥ ८६ ॥

ह्मणती आह्मी सर्वत्र मिळून। करूं दत्तजयंतीलागून।
पौर्णिमेसी करूं पारणें। संतर्पण चांगलें ॥ ८७ ॥

अपरात्रीं साहित्य करून। प्रातःकाळीं स्वयंपाक सारून।
केलें ब्राह्मणसंतर्पण। शतसंख्यापरियंत ॥ ८८ ॥

ब्राह्मण बैसले भोजनासी। चमत्कार झाला ते घटिकेसी।
गुरूंनीं सांडुनि मंडळीसी। दूर जाऊनी बैसले ॥ ८९ ॥

ते पंक्तीलागून। कोण कोण होते ब्राह्मण।
त्यांचें परिसा नामाभिधान। यथानिगुती सांगतों ॥ ९० ॥

स्वयंप्रकाश यतीश्वर। जो योगियांमाजी तपेश्वर।
सर्वत्यागी निरंतर। आत्मस्वरूपीं निमग्न ॥ ९१ ॥

शीतोष्ण-पर्जन्यधारी। व्यथा सोशी शरीरीं।
दुःख न पवतां अंतरीं। नग्न फिरे सर्वदा ॥ ९२ ॥

द्वितीय आनंदभट दातार । जे वेदांतवक्ते अतिचतुर ।
शास्त्रविद्येचे रत्नाकर । भांडारगृह विद्येचें ॥ ९३ ॥

केशवभट कर्मनिष्ठ । जो योगियांमाजी वरिष्ठ ।
अग्निसेवा एकनिष्ठ । अहोरात्र करितसे ॥ ९४ ॥

परम चतुर अच्युतरावजी । विज्ञानकळा जयामाजी ।
वाचे बोलतां सहजीं । जगासी बोध होतसे ॥ ९५ ॥

पांचवे वासुदेवअण्णा भिडे । ब्रह्मनिष्ठ शांत उदार फुडे ।
सर्व कुशळ चातुर्य गोडे । परोपकारी सर्वदा ॥ ९६ ॥

ऐसी मंडळी पंक्तीस घेऊन । सद्गुरु बैसले आपण ।
राघवाचे मठीं जाऊन । भोजनासी बैसले ॥ ९७ ॥

मग सर्वत्र मंडळीनें । इकडे देवाचा नैवेद्य करून ।
भोजनासी पात्रें टाकून । भृगुस्थानीं बैसले ॥ ९८ ॥

तंव ते आप आपणासी वदती । भटजी येथें न दिसती ।
आह्मांसी आगांतुक भाऊन चित्तीं । तिकडे जाऊनि बैसले ॥ ९९ ॥

ऐसें वदोनि ब्राह्मण । चालिले घराप्रती उठून ।
हें ऐकिलें वर्तमान । सद्गुरुरायें ते काळीं ॥ १०० ॥

तेथें अघटित केली करणी । न समजतां कोणालागुनी ।
बैसले असतां एके स्थानीं । दोन्ही ठिकाणीं दीसती ॥ १०१ ॥

एक ह्मणती आहेत भटजी । एक ह्मणती मिथ्या वदतां जी ।
एक ह्मणती भास झाला जी । भटजी तिकडेच बैसले ॥ १०२ ॥

एक ह्मणती आमचे शेजारीं । बैसले आहेत घटका चारी ।
पहात असतां नेत्रांतरीं । धूर कां हो आलासे ? ॥ १०३ ॥

ऐसें एकमेकांसी वदून । बैसले भोजनालागून ।
सद्गुरु नाटकी पूर्ण । उभय ठायीं जहाले ॥ १०४ ॥

सर्वांनीं करूनि भोजन । तांबूल दक्षिणा घेऊन ।
करुनि देवासी नमन । आपुले घरीं पैं गेले ॥ १०५ ॥

ऐसी दत्तजयंती करुनी । आनंद केला सर्वत्रांनीं ।
क्षेत्रांत कीर्ति गेली होउनी । निरंजनें जयंती केली हो ॥ १०६ ॥

म्यां नाहीं काडी हालविली । नाहीं देवाची सेवा केली ।
कांहीं न करितां कीर्ति झाली । सर्व जगामाझारी ॥ १०७ ॥

उभय सद्‌गुरूंचें देणें । दोहोंसी होऊनी एकपण ।
मज माकडासी लेणें । लेवविलें संभ्रमें ॥ १०८ ॥

धन्य धन्य सद्‌गुरु समर्थ । मज हातीं करविला ग्रंथ ।
आत्मप्रचीति यथार्थ । ते मज हातीं वदविली ॥ १०९ ॥

जैशी काष्ठपुतळी करूनी । हस्तकीं तबक देउनी ।
पाठविली सभेलागुनी । तैसें मज हातीं करविलें ॥ ११० ।

श्रीकृष्णें राजसूययज्ञीं । अर्जुनासी पुढें करूनी ।
करविली अचाट करणी । तैसें मज हातीं वदविलें ॥ १११ ॥

साळुंकी पक्षी असतां मूढ । बोले मानवी भाषा गोड ।
परि शिकविता राहे एकीकडे । तैसें मज हातीं करविलें ॥ ११२ ॥

त्रिमळियाचा नंदी सजवला । मान हालवी बोलिल्या बोला ।
परि त्रिमली शिकविता भला । तैसें केलें मज हातीं ॥ ११३ ॥

मी तों होतों मंद । लिहिलें नव्हतें बाळबोध ।
परि दत्तरघुनाथ आनंदकंद । प्रज्ञा दिधली विशेष ॥ ११४ ।

आतां विनवणी मंगळमूर्ति । जयांनीं विशाल दिधली स्फूर्ति ।
साह्य झाली सरस्वती । आदिमाता भवानी ॥ ११५ ॥

तेचि मूळपीठ-निवासिनी । निरंजनाची कुळस्वामिनी ।
मज अकिंचनासी राजधानी । कवित्वस्फूर्ति दीधली ॥ ११६ ॥

नमन तया साधुवृंदा । कृपाघन वर्षती सदा ।
कवि ह्मणविलें मतिमंदा । सुखसंपदा देऊनी ॥ ११७ ॥

आतां नमो मातापितर । ज्यांनीं दाखविला संसार ।
मज आत्मप्राप्तीचें घर । ठाऊक ज्यांचेनि जह्यालें ॥ ११८ ॥

वृत्तिवंत कळंबकर । बालाघाट वंजरातीर ।
माता लक्ष्मी पिता श्रीधर । श्रोत्री उपनांव आमुचें ॥ ११९ ॥

आता विनंती श्रोतियांलागुनी । जे आर्तभूत ब्रह्मज्ञानी ।
मुमुक्षुपंथाची सुराणी । पाहूं इच्छिती सर्वदा ॥ १२० ॥

त्यागुनि द्यावा भवसंसार । पहावें गुरुमायेचें घर ।
तुह्मांसी विनंति करूनि साचार । तरिच भवपार व्हाल कीं ॥ १२१ ॥

पहिली पहावी शास्त्रप्रचीति । दुसरी घ्यावी गुरुप्रचीति ।
तिसरी ते आत्मप्रचीति । उपरी ग्रंथीं लिहलीसे ॥ १२२ ॥

जरि ऐसा पश्चात्ताप घडेल । तरिच डोळा उघडेल ।
नाह्मीं तरी सप्रेम बोल । येणार नाहीं अंतरीं ॥ १२३ ॥

म्हणाल लटकें हें वचन । तरि पुसा गुरूसि जाऊन ।
तेव्हां मिळेल माझी खूण । ज्याप्रमाणें वदलों तें ॥ १२४ ॥

निरंजनाचे बोबडे बोल । हें अरण्यांतील वांकडें फूल ।
गुरु आत्मलिंगा बहुसाल । पूजा करितसे अंतरीं ॥ १२५ ॥

तें लिंग म्हणाल जरी सान । तरि ठेवावया नाहीं टिकाण ।
ब्रह्मांडाएवढें कल्पून । उगेंच अनुमान सांगतों ॥ १२६ ॥

तया देवाकडे पाहून । ग्रंथ लिहिला संपूर्ण ।
समाप्तीचा कवण ठिकाण । तोहि आतां परिसावा ॥ १२७ ॥

गंगातीर जनस्थान । दत्तात्रयाजवळी बैसून ।
ग्रंथ संपविला जाण । तो दिन तुम्हां सांगतों ॥ १२८ ॥

संवत् अठराशें अडुसष्टाशीं । प्रजापति नाम संवत्सरासी ।
शुद्ध दशमी पौषमासी । दो प्रहरांसी संपला ॥ १२९ ॥

सद्‌गुरूनें कृपा करून । ग्रंथावरी हात ठेवून ।
स्वात्मप्रचीति नामाभिधान । या ग्रंथासी ठेविलें ॥ १३० ॥

इतिश्री स्वात्मप्रचीति ग्रंथ । संमत दत्तात्रय अवधूत ।
निरंजनीं आत्मप्रचीत । गुरुकृपें जहाली ॥ १३१ ॥

॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

* * *

# शब्दार्थ आणि टीपा

## बहिणाबाई

[ टीपा अभंगांच्या अनुक्रमानें दिल्या आहेत. ]

१. **देवगांव**—ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ‘ रंगाऱ्याचें देवगांव ’ म्हणून प्रसिद्ध. **शिवनदी**—शिवना नदी. ही कन्नड तालुक्यांत कन्नडच्या उत्तरेस उगम पावते. **लक्षतीर्थ**—देवगांवचें एक स्थानिक तीर्थ.

२. **होईल संतान कन्या दोन पुत्र**—एक कन्या व दोन पुत्र होतील, असा आऊजी कुलकर्ण्यांना दृष्टान्त झाला होता; परंतु बहिणाबाईनें एक कन्या ( स्वतः ) व एकच पुत्र ( अभंग क्र. ४ ) अशा दोनच अपत्यांचा उल्लेख केला आहे.

३. **देवलसी**—ज्योतिषी, भविष्यवेत्ता, मांत्रिक.

४. **प्राक्तन**—नशीब, पूर्वसंचित. **शिऊर**—ता. वैजापूर, जि. औरंगाबाद. हें देवगांवच्या दक्षिणेस अगदीं थोड्या अंतरावर आहे. **वाक्प्रदान**—मुलगी देऊं केल्याची वाचिक मान्यता.

५. **द्वितीयसंबंधी**--बिजवर. **आंदण**—वधूला माहेरकडून विवाहप्रसंगीं मिळणाऱ्या प्रापंचिक गरजेच्या वस्तु.

६. **संपादोनी**--चांगल्या रीतीनें पार पाडून. **गोत्रज**--एकाच कुलगोत्रांत जन्मलेले, भाऊबंद. **वृत्ति**--निर्वाहसाधन, व्यवसाय ( इथें कुलकर्णपणाचें वतन ). **जामात**--जांवई. **निशिचिया भरीं**--रात्रींचा भर असतांना. **गंगातीर**--दक्षिणगंगा गोदावरीचें तीर. **प्रवरासंगम**--कायगांव-टोकें या गांवाजवळचें गोदा-प्रवरा-संगमाचें पवित्र स्थान ( अहमदनगरच्या ईशान्येस ४० मैल ). **पाय वोसंतुनी**--पाय उचलून, वेगानें. **महादेव**—शिखर-शिंगणापूरचा शंभू महादेव ( पंढरपूरच्या पश्चिमेस ४० मैल ).

७. **सिद्धेश्वर**—प्रवरासंगमावरील शिवस्थान. **करंटें**—कमनशिबी, दरिद्री, हीन. **अदृष्ट**— पूर्वसंचित, नशिब.

८. **नरसिंहदर्शन**— नीरानरसिंगपूर (पंढरपूरच्या वायव्येस ८४ मैल) येथील नरसिंहाचें दर्शन.

९. **कोरान्न**—कोरडी भिक्षा.

१०. **थार**—ठिकाण, आश्रयस्थान. **रहिमतपूर**—साताऱ्याच्या आग्नेयीस २० मैल.

११. **उदित**— उद्युक्त, इच्छुक. **विभागी**— भागीदार, प्रतिनिधि ( Substitute ).

१२. **दोहीं शास्त्रीं गती**-- आध्यात्मिक आणि लौकिक अशा उभयविध विद्यांमध्यें पारंगतता. **अग्निहोत्र**--घरांत पवित्र अग्नि सतत प्रज्वलित ठेवून त्याची नित्य उपासना करीत राहण्याचें एक वैदिक व्रत. **जयराम गोसावी**-- समर्थपंचायतनांतील प्रख्यात साधु जयरामस्वामी वडगांवकर. (श. १५२१-१५९९ ) शांतलिंगस्वामी (शिखरशिंगणापूर)--कृष्णाप्पास्वामी (उरणबहें)— जयरामस्वामी ऊर्फ कृष्णदास जयराम (वडगांव, जि. सातारा) अशी यांची परंपरा आहे. यांनीं ' अपरोक्षानुभव ', ' रुक्मिणीस्वयंवर ', ' सीतास्वयंवर ', ' ज्ञानीभक्तसंवाद ' व पदपदांतरें अशी बरीच ग्रंथरचना केली आहे.

१३. **अठराव्या वरुषांत**--मूळ पाठ ' अकराव्या वरुषांत ' असा आहे. परंतु याच अभंगांतील 'म्हणे असो तुज नाहीं मूलबाळ ' ( कडवें २९) हा उल्लेख आणि याच प्रसंगांतील ( अभंग क्र. ३३ ) ' आहे स्त्री गरोदर मास तीन ' हा उल्लेख ध्यानीं घेतां, या वेळीं बहिणाबाईचें वय अकरा नसून अठराच असलें पाहिजे. **निवेदिली**—अर्पण केली. **क्षीर**--दूध. **दोह**--धार काढण्याची क्रिया. **साच**--सत्य. **शुश्रूषण**--सेवा. **तृणालागीं**--चारा आणण्यासाठीं. **रिघे दोहा**--अंगावर प्यायला निघे. **दोहावा**--अंगावर पिण्याची क्रिया. **काच**--काळजी, खंत. **न वचे**--राहत नसे. **फुंजे**—हुंकार देई. **योगभ्रष्ट**-- मागील जन्मीं परमार्थसाधना थोडी अपुरी राहिल्यामुळें तिच्या पूर्तीसाठीं पुनः जन्मास आलेलें. **नष्ट सवे**--वाईट संवय. **क्षितीं**--भूमीवर. **मोरोपंतें**--

मोरोपंत नामक कोणा स्थानिक गृहस्थांनीं. **श्रुत जालें**—कानांवर गेलें, ऐकायला मिळालें, माहीत झालें. **वत्स-अंतर्याम**—वासराचें अंतःकरण. **वामसव्य**—डावी-उजवीकडे. **चिन्ह**—लक्षण, रहस्य.

१४. **विदेही अवस्था**— देहांत राहूनहि देहाचें भान विसरून जाण्याची, मृत्यूपूर्वीच मुक्त होण्याची अवस्था. **गेह**—घर. **अठरावें वरुष**—मूल पाठ 'अकरावें वरुष' ( अभंग क्र. १३ वरील टीप पहा ). **त्रास**—संताप. '**येरू**'—तो. (संवादाचें वृत्त देतांना एकाच्या बोलण्याचा उल्लेख संपल्यावर दुसऱ्याच्या उल्लेखासाठीं 'येरू' हा शब्द वापरला जात असे. ) **देह संकल्पिलें**— देहाची आशा सोडली.

१५. **मोट बांधणें**— हातपाय बांधणें.

१६. **निर्वाणीं**— शेवटीं, आणीबाणीच्या प्रसंगीं. **सांगात**—संगत, सोबत. **मनोरम चिन्हें**—( परमार्थ बाणल्याचीं ) शुभ चिन्हें.

१७. **संभ्रम**— समुदाय. **अनुष्ठानी**— परमार्थनिष्ठ, व्रती, साधक

१८. '**मूकं करोति**'—'मूकं करोति वाचालम् । पङ्गुं लङ्घयते गिरिम् । यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥' (ज्याची कृपा मुक्याला बोलायला आणि पांगळ्याला डोंगर चढायला समर्थ बनविते, त्या परमान्दस्वरूप माधवाला मी वंदन करतों. )

१९. **विकळ**—क्षीण.

२०. **अद्वैतपदें**—अद्वैताच्या अनुभवानें रंगलेले अभंग. **अनुवाद**—पुनः स्मरण.

२१. **तृषित**—तहानेलेला.

२२. **संचितासी दग्ध करी**—पूर्वकर्मांचें फळ जाळून टाकील. **निमे**—शमेल, नाहींसा होईल. **त्रिविधताप**—अधिभौतिक, अधिदैविक आणि आध्यात्मिक ताप ( पहा-'दासबोध', ३.६-८ ).

२३. **महाराष्ट्री शब्दांत वेदान्ताचा अर्थ**—मराठी भाषेंत तुकोबांनीं वेदान्ताचा म्हणजे उपनिषदांचा आशय व्यक्त केला. (पहा तुकारामांचीं वचनें— 'आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी । बोलिले जें ऋषी । साच भावें

वर्तीया ॥ '; ' वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा । इतरांनीं वहावा भार व्यर्थ ॥ '; ' वेद आम्हांवरी रुसोनिया गेला । आम्हीं त्याच्या बाला धरिलें कंठीं ॥ ' ) **त्रिशुद्धी**–खरेंच, निश्चितच.

२४. **दिधलें पुस्तक मंत्र गीता**—तुकारामांनीं मंत्र (' रामकृष्ण हरी ') आणि गीतेचें पुस्तक दिलें. ( श्री. वा. सी. बेंद्रे यांनीं या कडव्याचा अर्थ भिन्न करून, तुका पांडुरंगदासांनीं रचलेली अभंगात्मक गीताटीका देहूकर तुकारामांची ठरविली आहे आणि प्रस्तुत चरणाच्या आधारें तिचें नामकरण ' मंत्रगीता ' असें केलें आहे. अधिक चर्चेसाठीं पहा–' मंत्रगीता ' : संपा. वा. सी. बेंद्रे आणि भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक, ४३. १–४, पृ. ८९-९८ मधील माझा लेख. ) **कार्तिकांत वद्य पंचमी रविवार**–कार्तिक वद्य ५, रविवार, शके १६६९. **अनारिसी**–आगळी, अपूर्व.

२५. **बौद्धरूप**--मौनरूप, शांतरूप. **अद्वयत्वें**--एकरूपकतेनें, अभिन्नपणें.

२६. **न सोसी तें तया**--त्या वासराला तें सहन झालें नाहीं. **निमालीसे**–मृत्यु पावली.

२८. **कोंदाटला**--दाटला.

३०. **घुमारें**--भूतबाधा, देवतेचा संचार.

३१. **आश्रमाचा भंग**--( खरें म्हणजे ) वर्णोचित कर्मठपणाचा भंग. ( बहिणाबाईच्या पतीच्या मतें, ब्राह्मणांनीं वेदपठणाऐवजीं भक्तीच्या नादीं लागणें अनिष्ट, शूद्र गुरु करणें त्याहून अनिष्ट आणि हें सर्व स्त्रीनें करणें तर अनिष्टतम होय ! ) **विचारलें**--विचार केला.

३२. **गोसावीण**--संत स्त्री.

३३. **देवलसी**--मांत्रिक. **भंडिमा**--फजितवाडा, अपमान.

३४. **स्वामी**—पति. **भिडा**--भिडेला.

३६. **वाघुरेंत**—जाळ्यांत.

३७. **गृह-शैल**--घर आणि डोंगर. **द्वाराशीं भुजंग प्रहजळे आगी**--घराला आग लागून आंत जळण्याची वेळ आली आहे, म्हणून बाहेर पडावें,

तों दाराशीं विषारी सर्प डंख करायला सज्ज आहे-- अशा प्रसंगीं कसें तरावें? (पतित्याग हाहि अपराध आणि परमार्थत्याग हाहि अपराध--यांतून वाट कशी काढावी?)

३९. **अधिकार नाहीं...गुप्त केली**—स्त्रियांना वेदाध्ययनाचा आणि गायत्रीमंत्राचा अधिकार नाहीं, याचा हा उल्लेख. **प्रणव**--ॐकार. **बीज**--मंत्रारंभींचें गूढार्थक अक्षर.

**जमदग्नि**--रागीट, संतापी. (परशुरामाचे वडील जमदग्नि ऋषि हे अत्यंत क्रोधी होते.)

४०. **श्रुतिशास्त्रकथा**--वेदान्ताच्या गोष्टी.

४१. **अनुताप**--पश्चत्ताप. **धरणें**--विशिष्ट हेतूच्या सिद्धीसाठीं अन्नपाणी वर्ज्य करून निग्रहानें एके जागीं बसणें. **पारणें**--उपवासाची समाप्ति.

४२. **गांजवणें**--त्रस्त करणें, छळणें. **सांकडें**--संकट.

४३. **सहोदर**--सख्खा भाऊ.

४४. **प्रपंचाचे सखे**--लौकिक लाभापुरते संबंधी. **थार**--जागा, अवकाश

४६. **संचित**—नशिब, पूर्वकर्मांचें फळ.

४८. **अंगासी वारें येणें**--अंगांत देवतेचा संचार होणें. **घुमारीन**--झपाटलेली. **सांग हा परमार्थ**—परमार्थ परिपूर्ण होतो, सफल होतो.

४९. **रात्री वीणप्रभा चंद्राचिये**—चंद्राच्या प्रकाशावांचून रात्र (जशी निस्तेज, कळाहीन असते, तशी). **केसेनी**—कशानें, कशा प्रकारें.

५१. **उदंड**—विपुल. **उभय कुळें**--सासर व माहेर.

५२. **ज्वाळ**—दाह, आग. **सद्या**--(सद्यः) तत्काळ, लगेच.

५४ **दृढावो**—दृढता, निर्धार.

५६. **कोंडाजी**--तुकारामांविषयीं भक्तिभाव बाळगणारा देहूंतीळ एक सद्-गृहस्थ.

५७. **मंबाजी गोसावी**--तुकारामांचा विरोधक असलेला देहूंतील एक बुवा. **सोमवारीं आहे अमावास्या पुढें**--आषाढ व. ३०, सोमवार, शके १५७०.

५८. **हेलावणें**--उचंबळणें. **डोलावे**--डोळे.

५९. **बाळिभद्र**--दळभद्री, दरिद्री.

६०. **गोळक**--ब्राह्मणांतील एक कनिष्ठ मानली गेलेली पोटजात. **दिवाणांत घालणें**—खटला भरणें, न्यायालयांत नेणें.

६१. **महादाजी कुलकर्णी**--तुकारामांविषयीं भक्तिभाव बाळगणारे देहूचे वतनदार जोशी–कुलकर्णी. मूळ उपनाम ब्रह्मे. यांचें घर तुकारामांच्या देऊळ-वाड्याजवळच होतें.

६२. **आपाजी गोसावी**—पुणें-शिरवळ प्रांताचे त्या वेळचे सरदेशपांडे. **रामेश्वरभट**--तुकारामांहून वयानें बरेच ज्येष्ठ असलेले आणि तुकारामां-विषयीं प्रेमभाव बाळगणारे वाघोलीचे योगमार्गी गृहस्थ. **कुलकर्णीहीं फार मान्य केले**—महादाजी कुलकर्ण्यांनीं त्यांना ( बहिणाबाई व तिचे यजमान यांना ) अत्यंत आस्थेनें जवळ केलें आहे. **डोंबाळें**—ढोंग, थोतांड.

६७. **हेलावे**--कढ.

७२. **षडक्षरी मंत्र**—' राम कृष्ण हरी ' हा सहा अक्षरांचा मंत्र.

* * *

## कचेश्वर

[ टीपा कडव्यांच्या अनुक्रमानें दिलेल्या आहेत. ]

१. **परिसणें**—ऐकणें. **वर्तमान**—वृत्त, घटना. **आन**—अन्य. २. **कथा**—कीर्तन. **निंदा बहु देहीं करूं वाटे**—मनांत निंदेची प्रवृत्ति फार असे. **पोट**—( इथें संदर्भानें ) मन. ४. **काडीचीही**--यत्किंचितहि, मुळींच. ५. **द्विज**--ब्राह्मण. **क्षोभविणें**--भडकविणें, संतप्त करणें. ६. **देहीं**--( इथें संदर्भानें ) मनांत. ७. **योग**--निमित्त. **जीर्णपुर**--जुन्नर. ( कचेश्वराचें गांव चाकण हें होय. चाकणपासून जुन्नर जवळच आहे. ) **निदसुरा**--सुस्त, आळसावलेला, अर्धवट झोपेंत असलेला. पहा-- ' जो परमात्माचि परि दुसरा। जे अहंकार निद्रा निदसुरा ' – ज्ञान. ८. ३५, अथवा ' जन्मा येऊनि करी निदसुरा। जाय भेटी वरा रखुमाईच्या ॥ '--तुगा. २४७१. **कृष्णघरीं**--जुन्नर येथील एक

सत्पुरुष कृष्णंभट सहस्त्रभोजने यांच्या घरीं. ८. **देवतेच्या**--देवीच्या, शक्तीच्या ९. **भ्रमास्तव**--भ्रमामुळें, अनवधानानें. **हाकारणें**--बोलावणें, निमंत्रण करणें. **उपेक्षिणें**--नाकारणें, निराकरण करणें, दुर्लक्ष करणें. १०. **समागमी**--सोबती, सांगाती, सहकारी, बरोबरचे लोक.

११. **शाक्त**--शक्तीचा उपासक, शक्त्युपासक (शाक्त) संप्रदायाचा अनुयायी. १२. **मंत्र घेणें**--गुरूकडून एखाद्या देवतेच्या उपासनेचा मंत्र एकांतांत विधिपूर्वक स्वीकारणें, दीक्षा घेणें. **यंत्रमंत्रशास्त्र**--शाक्त संप्रदायांत गूढ अक्षरांनीं युक्त अशा मंत्रांच्या जपाचें आणि गूढ आकृतींच्या (यंत्रांच्या) पूजेचें अत्यंत महत्त्व असतें. **विचारणें**--विचार करणें, चिंतन करणें. १३. **नेम**--निश्चय. **याम**--प्रहर, दिवसाचा आठवा भाग. **सार्धत्रय**--साडे-तीन. १४. **तावत्काळ**--त्या वेळेपर्यंत. **मातें**--मला. **आगम**--तंत्रशास्त्र. आपल्या शास्त्रांचे आगम आणि निगम असे दोन भाग आहेत. निगम म्हणजे वेद. उपासनेचें जें विधिविधान लौकिक परंपरांतून शास्त्ररूप पावलें, त्याला आगम असें नांव मिळालें. **धुंडाळणें**--शोधणें, बारकाईनें अभ्यासणें. १५. **ऐसें विचारितां**--असा विचार करतां. १६. **देहबुद्धि**--देह म्हणजेच मी, अशी समजूत, भौतिक प्रवृत्ति. **सहस्त्रभोजनी कृष्णभट**--जुन्नरचे कृष्णंभट सहस्त्र-भोजने नामक सत्पुरुष. जुन्नर येथें सहस्त्रभोजने आडनांवाचें घराणें आजहि आहे. १७. **साजिरें**--सुरेख, शोभिवंत. **कीर**--खरोखर. १८. **मातें**--मला. **भलें**--चांगलें, इष्ट. १९. **यांत न पडावें**--यांत (मंत्रविद्येंत वा शाक्तांच्या उपासनेंत) भाग घेऊं नये. **भावें**--श्रद्धेनें. २०. **कर्ण**--कान. **श्रीमुख**--मुख. ('श्री' हें पावित्र्यसूचक वा आदरसूचक पद आहे.) **बीज**--मंत्राच्या आरंभीं असणारें गूढार्थक अक्षर; अशा अक्षरानें युक्त मंत्र.

२१. **अव्हेर**--नकार, उपेक्षा, त्याग. **निज**--स्वतःचें, प्रत्यक्ष परब्रह्माचें प्रतीक. **प्रणवाक्षर**--ॐ हें अक्षर (ॐ हें शब्दरूप ब्रह्म मानलें जातें). २३. **टीका**--कचेश्वरानें अभ्यासासाठीं स्वीकारलेली ही गीताटीका कोणती असावी, तें सांगतां येत नाहीं. कदाचित् ज्ञानेश्वरीहि असेल. २५. **ताडन घालणें**--मार देणें. **गीतार्थनमन करूं नको**--गीतेच्या आशयाला (गीतेंतील विचारांना) पवित्र मानूं नको. २६. **भावें**--श्रद्धेनें, निष्ठेनें.

**अविद्या**--परमेश्वराविषयींचें अज्ञान. २७. **भेणें**--भयानें. **पृछा** ( पृच्छा )--विचारणा, चौकशी. **नारायण**—तुकाराममहाराजांचे पुत्र नारायणबावा. यांचा मुक्काम खेड येथें होता. २८. **आर्जव**—ऋजुता, सरळपणा, विनय. २९. **यजमान**—( इथें संदर्भानें ) आश्रयदाता, ज्याच्या घरीं कांहीं निवास केला आहे, तो ( नारायणबावा ). ३०. **दों का ठायीं**--दोन-एक ठिकाणीं. **अबद्ध**—( लेखनांतील वा पठणांतील ) अशुद्धता. **अष्टादश गीता**--( अष्टादश = अठरा ) अठरा अध्यायांची गीता, संपूर्ण गीता.

३५. **प्रस्तर**–दगड. **लिंग**--शिवलिंग. **अध्या**--अध्याय. ३७. **सहस्रनाम**--देवाचीं ( इथें बहुतेक विष्णूचीं ) हजार नांवें गुंफलेलें स्तोत्र, ‘ विष्णुसहस्रनामस्तोत्र ’ या नांवाचें संस्कृत स्तोत्रें. ( अशीं स्तोत्रें शिव, गणेश, ललिता, इ. अनेक देवतांचीं आहेत. ) ३८. **साचा**--खरोखर. ४०. **संयोगें**–मिनून जाण्यामुळें. **धाप लागणें**--श्वास लागणें.

४१. **देह सुटणें**—मरण येणें. ४२. **मारीचा प्रसंग**--पटकीच्या साथीचें संकट. **सिरोली**--( शिरोली ) हें गांव चाकणच्या उत्तरेस सुमारें साडेपांच मैलांवर आहे. **लाधणें**--प्राप्त होणें. ४३. **हरिभक्तीं**--हरिभक्तांनीं, वैष्णवांनीं. ४४. **स्वस्त**--स्वस्थ. ४५. **खेटकग्राम**--खेड ( खेड तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें गांव चाकणच्या उत्तरेस सात मैलांवर असून, शिरोलीपासून उत्तरेस अवघ्या दीड मैलावर आहे ). **नारायणापाशीं**--तुकारामपुत्र नारायणबाबाकडे. ४७. **पृछा**—( पृच्छा ) विचारणा, चौकशी, मागणी. **अंबाजी**--तुकारामाचे एक भक्त अंबाजीपंत लोहगांवकर ? ( श्री. वा. सी. बेंद्रे यांच्या मतें हे अंबाजी म्हणजे देहूचे तुकारामभक्त महादाजी कुलकर्णी वा त्यांचे बंधु साबाजी असावेत. साबाजीचें चुकून अंबाजी वा आबाजी असें नामांतर झालेलें दिसतें.– ‘ तुकाराममहाराज यांचे संतसांगाती ’, पृ. १८९ ) ४८. **लवलाह्या**--सत्वर, लगेच. ४९. **विठोबाचें देऊळ**--देहू येथील तुकाराममहाराजांचें विठ्ठलमंदिर.

५१. **अलौलिक**--नवलाईचें, अद्भुत. ५३. **कर्दळी**--केळी. **चंडवात**--सुसाट वारा. ५७. **व्यापकें**--तुकाराममहाराजांनीं. ५८. **स्वयें** –स्वतः. ५९. **येरे दिसीं**--दुसऱ्या दिवशीं. ६०. **स्वरताळज्ञान**--संगीताचें ज्ञान.

६१ **प्रचीत**—( प्रतीति )–अनुभव. ( ' माझी मज प्रचीत घडली,' म्हणजे आपण आणि देव एकच आहोंत, अशी अद्वैतानुभूति प्राप्त झाली. ) ६२. **काज**–काम. ६३. **महद्भूत**–मोठें भूत. ६७. **लघुवर्ण**–कनिष्ठ वर्णाचे वा हलक्या जातीचे लोक.

७२. **सांडी**––त्याग. **वेगळें घालणें**––एकत्र कुटुंबांतून विभक्त करणें. ७३. **गाळीप्रदान**––शिव्या देणें. **अर्भक**––अज्ञानी मूल. ७४. **वाळींत घालणें**––बहिष्कार टाकणें. ७५. **उक्ति खुंटणें**—निरुत्तर होणें. ७६. **सांभाळाया आले**—सांत्वन करायला व सहाय्याचें आश्वासन द्यायला आले, हा भाव. ७९. **माया**––लीला, अद्भुत सामर्थ्य. **प्रेषिलें**––पाठविलें. **पंतीं**––पंतांनीं, रामचंद्रपंत अमात्यांनीं. ८०. **चऱ्होली मोकासा**––आळंदी-जवळचें चऱ्होली हें गांव मोकासा ( इनाम अथवा वसुलांतील हिस्साचा हक्क ) म्हणून दिलें.

८१. **निःस्पृह**––निरिच्छ, निरपेक्ष. **स्थळ**—जागा. **काष्टें**––( काष्ठें )––लाकडें. ८३. **वांछा**—इच्छा. ८६. **अग्निहोत्र**––घरांत सतत अग्नि प्रज्वलित ठेवून त्यांत नित्य सकाळ-संध्याकाळ विधिपूर्वक आहुति टाकण्याचें वैदिक व्रत. **स्मार्ताग्नि**––विवाहसंस्काराच्या वेळीं प्रज्वलित केलेला पवित्र अग्नि. ८८. **हेत**—हेतु.

९२. **वणवण**—भटकंती, सततचे श्रम. **हृदयसंपुट**—( संपुट हें शाळिग्रामासारख्या स्वयंभू देवमूर्ति ठेवण्याचें खोलगट – वाटीसारखें – पात्र असतें. ) हृदय हेंच संपुट. ९३. **योगक्षेम**––जें हवें तें मिळवून देणें आणि आहे तें राखणें. **योगक्षेम चालविणें**––सर्व प्रकारें सांभाळ करणें. **अहंभाव**––अभिमान, कैवार. ९७. **संकटाचा वारा येऊं नेदी**––संकटाचा स्पर्शहि ( अथवा चाहूलहि ) लागूं देत नाहीं. **वारितो परभारें**––( जवळ येऊं न देतां ) तिकडच्या तिकडेच निवारण करतो. ९८. **होणारासारिखी**––जें पुढें घडणार असेल, त्याची. **सादवणें**–साद घालणें, खुणावणें. ९९. **खेळ**—लीला.

१०३. **पार**—अंत. **शेष**––पाताळांतील नागांचा राजा. ( याला हजार जिभा आहेत, अशी समजूत आहे. ) १०४. **नेति नेति**––परमेश्वराचें वर्णन करताना वेदांनीं ' नेति नेति ' ( असा नाहीं, असा नाहीं ) असे उद्गार काढले आहेत.

( म्हणजे तो कसा आहे, हें वेदांनाहि सांगतां आलें नाहीं. ) **तटस्त**—तटस्थ, स्तब्ध. **अधोमुखें**--( लज्जेनें ) खालीं तोंड करून. १०५. **ब्रह्मादिक**--ब्रह्मदेवादि देव. **भागणें**--शिणणें. १०६. **भुक्ति**--ऐहिक सुख. **मुक्ति**--पारमार्थिक सुख, भौतिक बंधनांतून मुक्त होण्याची अवस्था. ( मुक्ति चार आहेत–१. सलोकता--देवलोकांत स्थान मिळणें; २. समीपता--देवासन्निध स्थान मिळणें; ३. सरूपता-देवासारखें बनणें; आणि ४. सायुज्यता--देवाशीं सर्वस्वीं एकरूप होऊन जाणें. ) १०७. **वर्म आहे थोडें स्वामीचें**--परमेश्वराच्या प्राप्तीचें रहस्य सोपें आहे. 'भक्तिभावें एका वश्य होतो', ( तो भक्तिभावाला वश होतो, ) हेंच त्याच्या प्राप्तीचें रहस्य आहे. १०८. **कलयुग**—कलियुग, चालू युग. **वर्णाश्रमधर्म**--ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण आणि ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम यांची व्यवस्था असलेला हिंदुधर्म.

* * *

## निरंजन रघुनाथ : 'स्वात्मप्रचीति'

[ टीपा ओव्यांच्या अनुक्रमानें दिल्या आहेत. ]

### अध्याय पहिला

६. **अवधूत**—ज्यानें सर्व प्रकृतिविकार धुऊन टाकले आहेत, अशा सिद्ध पुरुषाला 'अवधूत' असें म्हणतात. ( 'सर्वान् प्रकृतिविकारानवधुनोतीत्यवधूतः । –सिद्धसिद्धान्तपद्धति, ६.१. ) दत्तात्रेयाचें एक नांव.

११. **पुण्यनगर**—पुणें. **नष्टक**--नष्टे ( आडनांव ). १२. **ठाकुरदास**—पुण्यांत येऊन राहिलेला एक उत्तरभारतीय कनोजी ब्राह्मण जातीचा साधु. याला पंढरपूर येथें एकनाथांचा स्वप्नोपदेश लाभला होता. यानें 'सहजबोध' हा ग्रंथ व अनेक हिंदी-मराठी पदें रचलीं आहेत. **विष्णुद्वारीं**--वेळबागेंतील विष्णूसमोर. १९. **श्रौताग्नि**--घरीं सतत पवित्र अग्नि प्रज्वलित ठेवून त्याची नित्य उपासना करण्याचें वैदिक व्रत. **मंथारणी**--घर्षणानें अग्नि निर्माण करण्यासाठीं वापरावयाचें लाकूड. २०. **काष्ठता**--लाकूडपण.

२१. **परिकर**--चांगल्या रीतीनें. २४. **काळुजींचा घाला**--काळाचा आघात. **श्वास टाकूं न देचि**--उसंत खाऊं देणार नाहीं. २५. **निधान**--गुप्त धन, सुरक्षित ठेवा. ओवी क्र. २६–२७ मध्यें अष्ट सात्त्विक भावांपैकीं कंप, रोमांच, स्फुरण, प्रेमाश्रु हे कांहीं भाव प्रकट झाल्याचें वर्णन आहे.

३८. **उठाउठी**—सत्वर, लगेच. **एकवेळीं**--एकाएकीं, अचानक **पात्रमज्जन**--भांडें स्वच्छ करणें.

४१. **गणपती वसे देवाघरीं**--चिंचवड येथील गोसाव्यांच्या घराण्याला देव असें आडनांव लाभलें आहे. चिंचवडचा गणपति देवांच्याच वाड्यांत आहे. ४५. **जियें वाकुडी केली मान**—तुकाराम सदेह वैकुंठाला गेले तेव्हां देवानें त्यांच्याकडे सकौतुक पाहतांना मान वाकडी केली, ती तशीच राहिली, अशी कथा आहे. देहू येथें तुकारामांच्या वैकुंठगमनस्थानीं जी विठ्ठलमूर्ति आहे, तिची मान वाकडी आहे. ती मूर्ति या कथेशीं संबद्ध आहे. ४७. **नरतनूस येऊन**—मानवजन्म प्राप्त करून.

५२. **कौपीन**--लंगोटी. **कटिसूत्र**--करगोटा. ५४. **करसंपुट**--ओंजळ. ओंजळींत पाणी घेऊन आणि मनांतील संकल्प मुखानें उच्चारून पाणी विधिपूर्वक खालीं सोडण्याची क्रिया या ओवींत वर्णिली आहे. अशा क्रियेनें संकल्पपूर्तीचें मानसिक बंधन दृढावतें, अशा प्रकारचा जुन्या पढडींतील माणसांच्या मनावर संस्कारच झालेला असे. ५८. **काढिली लज्जेची गवसणी**--लज्जेचा बुरखा काढला, लाज सोडली. **निर्लज्जशस्त्र**--निर्लज्जतेचें हत्यार. प्रतिष्ठितपणाचें दडपण सोडून व केवळ लंगोटी धारण करून भिक्षा मागायची, म्हणजे लाज सोडायलाच हवी.

६६. **पोटीं पश्चात्तापाचा...सकळ**--पोटांत पश्चात्तापाचा सर्प (व्याळ) असल्यामुळें सर्व भूक (क्षुधा) पळून गेली. **तृष्णा**--तहान. **अळुमाळ**--थोडी, किंचित्. ६९ **घोडनगरी**--घोडें (जि. पुणें).

७६. **कंथा**--गोधडी. ७८. **ब्राम्हणवाडा**--ता. अकोला, जि. अहमदनगर. ओतूरमार्गें ब्राह्मणवाड्यास जातां येतें. **कानफाटा**--नाथपंथाच्या एका शाखेचा

अनुयायी. कान फाडून त्यांत मोठालीं कुंडलें घातलेलीं असतात, म्हणून लोक यांना कानफाटे म्हणतात. ७९. **गिरनार**--दत्तात्रेयाचें प्रख्यात ठाणें असलेला सौराष्ट्रांतील एक डोंगर. जुनागड याच्या पायथ्याशीं आहे.

८२. **जुन्नर ग्रामासि आलों जाण**--वास्तविक ब्राह्मणवाडा जुन्नरपुढें आहे; परंतु निरंजन तेथून परत मागें आलेले दिसतात. **ठाकुरमंदिर**—देवमंदिर. ८३. **वृंद**--समूह.

९१. **लोभाकार**—लोभमय, अत्यंत लोभी. ९४. **खेचरी मुद्रा**—एक यौगिक क्रिया. या क्रियेंत योगी जीभ उलटी करून कपालकुहरांत प्रविष्ट करतो आणि त्याची दृष्टि भुवयांच्या मध्यें निबद्ध होते. ( 'कपालकुहरे जिह्वा प्रविष्टा विपरीतगा । भ्रुवोरन्तर्गता दृष्टिर्मुद्रा भवति खेचरी ॥ '– हठयोगप्रदीपिका, ३.३२. ) ही क्रिया अत्यंत कठीण आहे; पण जर ती साधली, तर योगी विष आणि व्याधि यांच्या परिणामांतून पूर्णतः मुक्त होतो. **सुषुम्नामार्ग**--मेरुदंडांतून प्राणवायूचें वहन करणाऱ्या ज्या डाव्या-उजव्या बाजूंच्या नाड्या आहेत, त्यांना इडा-पिंगला म्हणतात; त्यांच्या मध्यें सुषुम्ना नाडी आहे. हिच्यांतूनच जागृत कुंडलिनी शक्ति ऊर्ध्वगामी होऊन जाते. तो हा सुषुम्नामार्ग. कबीरानें इडा, पिंगला आणि सुषुम्ना यांना अनुक्रमें गंगा, यमुना व सरस्वती असें म्हटलें असून, या तिहींचा ब्रह्मरंध्रांत जो संगम होतो, त्याला प्रयागतीर्थ मानलें आहे. या प्रयागतीर्थांत स्नान करणारा योगी धन्य होय. ९६. **उघाडा**—उलगडा, उकल, आशय.

## अध्याय दुसरा

४. **कोतूळ**--ता. अकोलें, जि. अहमदनगर. हें ब्राह्मणवाडा- अकोलें मार्गावर मध्येंच मुळेच्या कांठीं आहे. ८. **धडाडिलें**—भडकलें, कासावीस झालें.

१५. **अंकुल**—अकोलें ( जि. अहमदनगर ). १६. **चंडीदासबोवा**—चंडीराममहाराज. हे मूळचे अकोल्याचे. यांची समाधि खेड येथें आहे. चंडी-( सप्तशृंगी ) च्या कृपेनें यांचा जन्म झाला, म्हणून चंडीदास वा चंडीराम असें नांव ठेवलें गेलें. ( पहा- 'नूतनसंतचरित्र ', भाग दुसरा : वि. सी. शालिग्राम, अध्याय ४३–४४, पृ. ३७१–३८७ ). **गीर्वाण वदे जो स्पष्टार्थ**—चंडीरामबोवा संस्कृत ( गीर्वाण ) भाषेचे अधिकारी होते. त्यांचा ' भक्तिकल्पलता ' नामक

संस्कृत ग्रंथ प्रकाशित झालेला आहे. **२०. घाटीं**—बालेघाटावर. (निरंजनांचें मूळ गांव कळंब हें बालेघाट प्रदेशांत– बीड जिल्ह्यांत आहे.) **२२. दिगंबर**—(जवळ जवळ) नग्न. (एका लंगोटीशिवाय अन्य वस्त्र निरंजनांच्या अंगावर नव्हतें.) **परिकर**—सुंदर (उपहासानें वापरलेला शब्द). **२६. दत्तात्रयानें गुरु... कथियेले**—चंडीरामबोवांच्या घरीं भागवतावर पुराण चाललें होतें, असें दिसतें. निरंजन त्यांच्याकडे गेले त्या दिवशीं त्यांच्या दत्तभक्त मनाला आवडेल असा यदु-अवधूत-संवादाचा (अवधूतानें यदूला सांगितलेल्या चोवीस गुरूंविषयींचा) कथाभाग (भागवत, ११.७–९) पुराणांत येणार होता.

**३४. प्रवरे जाउनी केलें स्नान**--प्रवरा नदी अकोलें तालुक्यांतच उगम पावते आणि अकोल्याजवळून वाहत जाते. ओवी क्र. २७ ते ७४ मध्यें निरंजनांनीं ध्यानांत स्थिर केलेल्या सगुण सालंकृत दत्तात्रेयाचें व त्याच्या सगुण साकार रूपाच्या साक्षात्काराचें वेधक वर्णन आहे.

**४१. जानुस्थळ**--गुडघे. **माजेस**--कंबरेला (माज = मध्य-देहमध्य). **४३. उच्चग्रीव**—उंच मानेचा. **कर्णयुग्म**—कानांची जोडी. **४४. नेत्रकमळद्वयाकर्ण**—(आकर्ण नेत्रकमळद्वय) विशाल डोळे. **४५. प्रादेशमात्र**—टिचभर (अंगठा व त्याच्या जवळचें बोट परस्परांपासून जास्तींत जास्त दूर ताणून जेवढें अंतर होईल, तेवढ्या उंचीची). **कंबुकंठ**—शंखासारख्या मानेचा. **४७. केशरादि अष्टगंध**—केशर, कस्तुरी, कृष्णागरु, गोरोचन, चंदन, रक्तचंदन व मळयागरु हे अष्टगंध होत. **मैलागिरी**--(मलयगिरि) एक चंदनप्रकार. दक्षिणेंतील मलयगिरि हें स्थान चंदनासाठीं प्रसिद्ध आहे.) **४९. आमिष**—गळाला मासा लागावा म्हणून गळाच्या टोकाला लावलेला पिठाचा लहान गोळा.

**५२. जांबूनद**--सोनें. **५५. हेमलग**--सोन्याचें. **५८. मध्यपाणी**—मधले हात (सहा हातांपैकीं डावे-उजवे मधले दोन हात). **५९. अधोपाणी**--खालचे दोन हात. **सव्यपाणी**--उजवा हात. **वामहस्त**--डावा हात.

**७०. वृत्ति शुन्य पै झाली**--मनांतील सर्व विकार निमाले.

**७४. अष्टाक्षरमंत्र**—'ॐ नमो दत्तात्रेयाय।' (?)

**८७. जामात**— जांवई.

**९७. प्रस्थान ठेवणें**-- प्रवासास निघावयाचें असेल, त्या सुमारास शुभ मुहूर्त पाहून शेजारच्या घरीं जाऊन राहणें अथवा तांदूळ, पैसा, हळकुंड, इ. पदार्थांची पुरचुंडी दुसऱ्याकडे ठेवणें आणि मग सोयीच्या वेळीं प्रवासास निघणें याला 'प्रस्थान ठेवणें' असें म्हणतात. 'प्रवासास निघणें. **९९. देठवे**-गव्हले. **मुरडकानवले**--कातणीनें न कातता, हातानें मुरड घालून केलेली गुळाची करंजी म्हणजे मुरडकानवला. प्रवासाला निघालेल्या व्यक्तीला हा खायला घातला म्हणजे ती व्यक्ति सत्वर सुखरूप परत येते, असा संकेत रूढ आहे.

१०३. **मैंद**--ठक, वाटमाऱ्या. १०७. **परवडी**-घांदलीनें. १०९. **माझ्या-वरुतें सोडीलें पाणी**--माझा त्याग केला.

११२. **द्रव्याकरितां**--द्रव्यामुळें, द्रव्याच्या योगें. ११३. **आतुडे**--प्राप्त होई.

## अध्याय तिसरा

६. **ओटभरण**--( ओटीभरण ) गर्भाधान संस्कार. ९. **पैशाची लिपी**--उर्दूलिपी. उर्दूचें लेखन उजवीकडून डावीडे असतें. भूतपिशाचांचे पाय, डोळे इ. अवयव व वागणेंहि माणसाच्या उलटें असतें. त्यावरून उर्दू लिपीला पैशाची लिपी म्हटलें आहे. १०. **पाणी लागणें**--संस्कार जडणें, वळण लागणें, सवयी जडणें.

११. **कुसमुसणें**--कुरकुरणें.

२८. **आवई**--खोटी वार्ता, बालंट.

**सिन्नर**--जि. नाशिक. संगमनेर-नाशिक मार्गावरील एक व्यापारी गांव. येथें गोंदेश्वर, नागेश्वर, इ. यादवकालीन हेमाडपंती मंदिरें आहेत.

४१. **देपूर**--जि. नाशिक.

५१. **सिंदर**--सिन्नर, जि. नाशिक. ५३. **सिंदें**--जि. नाशिक. सिन्नर-नाशिक मार्गावर देवळालीच्या अलीकडे. ५६. **लोक म्हणती या नाशिक**--या वाक्यांत 'नाशिक' याचा अर्थ श्लेषानें 'न शिकलेलें' असा घेतला आहे.

**दुरला**--दूरवा, परस्थ. **५८. त्रितापशमनी**--आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा त्रिविध तापांचें शमन करणारी. **गंगा**-दक्षिणगंगा गोदावरी. **सांबाचे अर्धांगा**--गंगा ही शिवाची पत्नीच मानली जाते. ( गंगा व गौरी या सवतींच्या भांडणाचीं काव्यें प्रचलित आहेत. ) **६०. विष्णूचे अंगुष्ठावरून**--गंगेचा उदय विष्णूच्या चरणतीर्थांतून ( पायाच्या आंगठ्यावरून ओघळणाऱ्या पाण्यांतून ) झाला.

**सांडणी करणें**--ओवाळून टाकणें. **६७. भीष्ममाता**--गंगा. ( भीष्म हा गंगापुत्र असल्यामुळें त्याला गांगेय म्हणतात. ) **७०. भालनयन**--शंकर. **७१-७२. अरुणा वरुणा**--गोदेला मिळणाऱ्या नद्या. **रामकुंड, लक्ष्मणकुंड, सूर्यकुंड**--नाशिकच्या गोदापात्रांतील तीर्थकुंडें. ओवी क्र. ७५ ते ९७ मध्यें नाशिकांतील देवदेवतांची योजना गंगेच्या अलंकारांच्या ठायीं करून त्यांचा महिमा गायिला आहे.

**९३. रघुनाथ गुरुजी**--नाशिकचे प्रख्यात साधु रघुनाथभटजी महाराज. यांनींच निरंजनांना गुरुबोध केला आणि त्यांचें पूर्वाश्रमींचें 'अवधूत' हें नांव बदलून निरंजन असें नांव ठेवलें. निरंजनांनीं एका स्वतंत्र ग्रंथांत आपल्या गुरुदेवांचें चरित्र गायिलें आहे. **९९. दिनमणी**--सूर्य.

**१०७. हिवराखालें गेला अभागिया जैसा पैं**--हिवराचें झाड अशुभ समजलें जातें. त्याच्या खालीं भुतांची वस्ती असते, अशी समजूत आहे. **१०९. आंतुडणें**--प्राप्त होणें. **११०. पद्मिनी**--सुंदर स्त्री.

## अध्याय चौथा

**१. विवेकबुद्धीचा दातार**--सारासारविवेक हा साधकांच्या वाटचालींतील मोठा आधार होय. परमेश्वराची कृपा झाली म्हणजे तो साधकांचा विवेक जागा करतो आणि मग त्यांची वाटचाल सुकर होते.

**१७. पदपंकजीं गंध परिकर**--चरणकमळांतील मधुर गंध. **१९. अहंविशेष**--फारच छान !

२३. **पंचपदी**--पांच पदांचा समुदाय. नित्याच्या उपासनेंत देवाच्या स्तुतीचीं अशीं पांच पदें आपापल्या संप्रदायानुरूप म्हणण्याचा प्रघात असतो.

२६. **तमारी**—सूर्य. २७. **स्वर्धुनी**--गंगा ( गोदावरी ).

३७. **चाचरी, भूचरी, खेचरी, अगोचरी**--योगमुद्रांचीं नांवें.

४१. **चातुर्यरत्नाकर**—चातुर्याचा समुद्र. ४२. **लोथा**—मुडदा. ( मन व इंद्रियें यांचा निग्रह करून माझें म्हणणें ऐक–हा भाव. )

५५. **कर्तरी**--कातरी. ( द्वैतभावाच्या कातरींतच जीवाचें कल्याण सापडलेलें असतें. ).

७०. **बीजमंत्र**--गूढ सामर्थ्यानें युक्त अशा सांकेतिक अक्षरानें युक्त असा गुरुदत्त मंत्र.

७३. **नव अक्षर**--रघुनाथभटजींनीं निरंजनांना दिलेला मंत्र बीजाक्षर + आठ अक्षरें असा नवाक्षरी होता, असें दिसतें. ७४. **भवकुरंग**--प्रपंचरूपी हरिण. अष्टाक्षरी मंत्राच्या बाणाला नवव्या बीजाक्षराचें धारदार टोक बसवून आणि तो बाण मनोवेगाच्या धनूवर चढवून प्रपंचाचा हरिण मारण्याची ही कल्पना अभिनव आहे !

९७. **कपाट**—दार ( कवाड ).

१०२. **तुर्या**--जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तीन अवस्थांच्या पलीकडची परम अवस्था.

## अध्याय पांचवा

३. **सुराणी**--आवड. **साबडी**—साधीभोळी. ४. **विक्षेप**--अडथळा. ८. **सावचित्त होणें**--भानावर येणें.

११. **अपान**--वायूचा अधोमार्ग. १३. **खेचरी मुद्रा**—अध्याय १, ओ. ९४ वरील टीप पहा. २०. **हारीनें**—ओळीनें.

२६. **अष्टदल**--आठ पाकळ्यांचें कमळ.

४३. **दशनाद**--चिनचिनी नाद, शिंगीनाद, तंतीनाद, ताळनाद, सुस्वर नाद, गर्जनानाद, शंखनाद, घोषनाद, भेरीनाद व मेघनाद असे दहा प्रकारचे नाद साधकांस विशिष्ट साधनेनंतर ऐकूं येतात.

५५. **पंचदश**--पंधरा. 'अपरोक्षानुभूती'मध्यें यम, नियम, त्याग, मौन, देश, काल, आसन, मूलबंध, देहाची समता, दृष्टीची स्थिरता, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, आत्मध्यान व समाधि अशीं पंधरा योगांगें सांगितलीं आहेत. **अष्टांग**--यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा व समाधि (पातंजलयोगसूत्रें). ५६. **षट्कर्मे**--धौति, बस्ति, नेति, नौलि, कपालभाति व त्राटक (हठयोगप्रदीपिका). ५७. **दशमुद्रा**--महामुद्रा, महाबंध, महावेध, खेचरी, उड्डियान, मूलबंध जालंधरबंध, विपरीत करणी, वज्रोली व शक्तिचालन या जरामरणनाशक दशमुद्रा होत. **चारी अवस्था**--जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुरीया.

११३. **त्रिमळियाचा नंदी**-- नंदीबैलवाल्याचा नंदी. नंदीबैलवाल्याला 'तिरमल' असें म्हणतात. तो तिरुपति-तिरुमलैचा भक्त असतो. ११४. **दत्त-रघुनाथ**--उपास्य दत्त आणि सद्गुरु रघुनाथ हे दोघेहि एकरूपच- हा भाव. ११९. **वंजरातीर**--निरंजनांचें मूळ गांव कळंब हें वांजरा नदीच्या कांठीं आहे.

१२८. **जनस्थान**--नाशिक. १२९. **संवत् अठराशें अडुसष्ट**--शके सतराशें तेहेतीस.

* * *

# परिशिष्टें

## १ : बहिणाबाईच्या आत्मचरित्राची संहिता

बहिणाबाईचें आत्मचरित्र तिच्या अभंगगाथ्यांत प्रारंभींच समाविष्ट आहे. बहिणाबाईचा गाथा प्रथम 'संत बहिणाबाईकृत कवितासंग्रह, भाग पहिला' या नांवानें श्री. धोंडू विश्वनाथ उमरखाने (खामगांव-विदर्भ) यांनीं बहिणाबाईच्या वंशजांकडील हस्तलिखितांवरून संपादित केला असून, तो १९१३ मध्यें चित्रशाळा, पुणें, या संस्थेनें प्रकाशित केला आहे. याचा दुसरा भाग पुढें कधीं निघालाच नाहीं. प्रकाशित पहिल्या भागांत 'आत्मचरित्र' या शीर्षकाखालीं १ ते ५३ अभंग (पृ. २–२४) छापले आहेत.

यानंतर १९२६ मध्यें चित्रशाळेनेंच श्री. विश्वनाथ नारायण कोल्हारकर (कुंभारी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर) यांनीं संपादित केलेला 'संत बहिणाबाईचा गाथा' प्रकाशित केला. या गाथ्यांत 'आत्मनिवेदन' या शीर्षका-खालीं क्र. २ ते ७९ असे ७८ अभंग छापले आहेत. यांपैकीं २ ते ५४ असे ५३ अभंग उमरखाने प्रतीप्रमाणेंच आहेत; परंतु त्यापुढें क्र. ५५ ते ७९ असे २५ अभंग जास्त आहेत.

चित्रशाळेनें कोल्हारकर प्रतीचें पुनर्मुद्रण १९५६ मध्यें प्रकाशित केलें; त्यावर संपादकाचें नांव नाहीं. यांतील अभंगांचा क्रम १९२६ च्या आवृत्तीप्रमाणेंच ठेवलेला आहे.

मीं प्रस्तुत संपादनांत कोल्हारकरांची द्वितीयावृत्ति वापरली आहे. परंतु या प्रतींतील जादा २५ अभंगांचा क्रम कथानुरोधाचें बदलून घेतला आहे. या जादा २५ अभंगापैकीं ५५ ते ५८ या ४ अभंगांत प्रारंभींचा कथाभागच पुनरुक्त झालेला असल्यामुळें ते मीं गाळले आहेत.

यापुढील क्र. ५९ ते ७२ या १४ अभंगांत, बहिणाबाईचा पति तिला टाकून जाऊं लागला असतां त्या संघर्षमय परिस्थितींत तिच्या मनांत प्रपंच आणि परमार्थ यांच्या संबंधाविषयीं जो कोलाहल निर्माण झाला, त्याची

अभिव्यक्ति झालेली आहे. म्हणून ते अभंग मीं येथें क्र. ३३ नंतर घेतले आहेत आणि क्र. ७३ ते ७९ हे ७ अभंग देहूला आल्यानंतरच्या घटनांशीं संबद्ध असल्यामुळें शेवटीं टाकले आहेत. चित्रशाळा प्रतींतला क्रम आणि मीं स्वीकारलेला क्रम यांचा संबंध असा—

| चित्रशाळा ( द्वितीयावृत्ति ) | प्रस्तुत संपादन |
|---|---|
| अभंग क्र. २ ते ३४ | १ ते ३३ |
| अभंग क्र. ५९ ते ७२ | ३४ ते ४७ |
| अभंग क्र. ३५ ते ५४ | ४८ ते ६७ |
| अभंग क्र. ७३ ते ७९ | ६८ ते ७४ |

मीं स्वीकारलेला पाठ कोल्हारकर ( द्वितीयावृत्ति ) प्रतींतील आहे, हें प्रारंभीं सांगितलेंच आहे. परंतु यांतील अनेक अपपाठ उमरखाने प्रतीवरून दुरुस्त केले आहेत. एक उघड उघड अपपाठ नजरचुकीनें दुरुस्त करायचा राहून गेला : अभंग क्र. ३/१ मध्यें ‘ करुनी ब्राह्मण घरां गेलें । ’ या चरणा-ऐवजीं ‘ करुनी भोजन घरां गेले । ’ असा चरणा वाचावा. उमरखाने आणि कोल्हारकर प्रतींत कांहीं महत्त्वाचे आणि अनेक किरकोळ पाठभेद आहेत. उदाहरणार्थ, पुढील कांहीं पाठभिन्नतेचीं स्थानें पहा—

| उमरखाने पाठ | | कोल्हारकर पाठ | |
|---|---|---|---|
| क्र. १/६ | दिनोदयीं | क्र. २/६ | सूर्योदयीं |
| क्र. २/२ | माता ते जानकी | क्र. ३/२ | जननी जानकी |
| क्र. ३/५ | वीरेश्वर द्विज | क्र. ४/५ | विश्वेश्वर ब्राह्मण |
| क्र. १२/१ | बहिरंभट | क्र. १३/१ | हिरंभट |
| क्र. १६ | कडवीं १४ | क्र. १७ | कडवीं १५ ( १३ वें कडवें जास्त ) |
| क्र. १६/१४ | शिष्यांचा संभ्रम फार होता । | क्र. १७/१५ | पाहे मनोरम सर्व चिन्हें । |
| क्र. १६ | ( यांत कडवें नाहीं. ) | क्र. १८/१ | स्वस्थाना आपण चालिले जयराम । शिष्यांचा संभ्रम फार होता ॥ १ ॥ |

उमरखाने प्रतींत सर्वत्र बहिणाबाईची नाममुद्रा ' बहेणि ' अशी आहे.

आतां प्रश्न येतो तो गाथ्यांतील निर्याणपर अभंगांचा. उमरखाने प्रतींत ' निर्याणाचे अभंग ' एकूण ३४ (क्र. १ ते ३४, पृ. १६६–१८२) असून कोल्हारकर प्रतींत ते ३६ (क्र. ८० ते ११५, पृ. २७–४२) आहेत. या अभंगांत, बहिणाबाई आपल्या निर्याणप्रसंगीं आपला पुत्र विठोबा याला आपल्या तेरा पूर्व-जन्मांची कहाणी सांगत आहे, अशी भूमिका आहे. म्हणजे हे अभंग जर बहिणा-बाईचेच असतील, तर ते तिच्या आत्मचरित्राचाच अखेरचा भाग ठरतील.

परंतु, श्री. बा. सी. बेंद्रे यांनीं या अभंगांची सूक्ष्म छाननी करून आणि त्यांची बहिणाबाईच्या पूर्वचरित्राविषयींच्या अभंगांशीं व विठोबा-कृत ' बहिणा-बाईच्या आरतीं 'तील माहितीशीं तुलना करून असा निष्कर्ष काढला आहे कीं, हें प्रकरण विठोबाचें असावें. ते लिहितात : "...हें आख्यान केवळ कथेकरितां बहिणाबाईनंतर रचलें असावें व तेंहि बहिणाची थोडीबहुत माहिती असावी, अशाच लेखकांनीं लिहिलें असलें पाहिजे. आंतील माहितीच्या तपशिलाचें परीक्षण केलें, तर तें विठोबानेंच सजवणें शक्य दिसतें. मात्र त्यांत आपल्याकडेच बरेंच महत्त्व घेतलें असल्यानें तें आपण निर्मिलें असें दाखविणें व विशेषतः आपल्याच कथेंत गाणें अयोग्य, म्हणून लेखकानें आपलें नांव येऊं दिलें नाहीं, इतकेंच...विठोबाच्या आरतींतील मजकुराचाच, हें आख्यान हा विस्तार आहे, हेंहि स्पष्ट होतें." (' तुकाराममहाराज यांचे संतसांगाती ', पृ. १००–१०१.)

श्री. बेंद्रे यांचें हें विवेचन साधार असल्यामुळें मीं येथें निर्याणपर अभंगांचा समावेश बहिणाबाईच्या आत्मचरित्रांत केला नाहीं.

* * *

## २ : बहिणाबाईचें ' वज्रसूचिकोपनिषद्भाष्य '

मराठी भक्तिपरंपरेंत संत बहिणाबाईचें नांव पहिल्या श्रेणींत गणलें जातें. तुकोबांच्या प्रभावळींत राहूनहि ती स्वयंतेजानें चमकली आणि भागवतधर्म-मंदिरावर ध्वजा होऊन फडकली. या परमार्थप्रवण मुलीनें अवघ्या अठराव्या वर्षी तुकोबांकडून स्वप्नबोध प्राप्त केला आणि परमार्थजीवनाला कडवा विरोध

करणाऱ्या कर्मठ पतीचें हृदयपरिवर्तन घडवून प्रपंच व परमार्थ यांची सांगड घातली. ‘ प्रपंच परमार्थ चालवी समान । तिनेंच गगन झेलियेलें ॥ ’ हा तिचा आदर्श स्त्रीविषयींचा उद्गार तिला यथार्थपणें लागू पडतो.

बहिणाबाईचा मुक्काम कोल्हापूर येथें असतांना कार्तिक वद्य पंचमी, शके १५६९ ( रविवार ) या दिवशीं कोल्हापूर येथें तिला तुकोबांचा स्वप्नबोध प्राप्त झाला. या घटनेनें बहिणाबाई धन्य झाली; परंतु तिच्या कर्मठ पतीला हें रुचलें नाहीं. ‘ कैंचा शूद्र तुका, स्वप्नींचे दर्शनीं । बिघडली पत्नी काय करूं ? ॥ ’ असा त्याचा संताप झाला. ब्राह्मणानें शूद्राला गुरु करणें त्याच्या मनाला पटणें शक्य नव्हतें. त्यानें आपल्या पत्नीचा अनन्वित छळ केला. हा छळ सोशीत असतांना विवेकनिष्ठ बहिणाबाईच्या मनांत असें विचारमंथन सुरू झालें कीं, ‘ खरा ब्राह्मण कोण ? तुकोबांसारख्या परमानुभूतीनें रंगलेल्या महामानवाला शूद्र म्हणायचें आणि आपण केवळ जन्मानें ब्राह्मण आहोंत म्हणून त्याच्यापुढें नमायचें नाहीं, हें योग्य आहे काय ? ’ तिच्या मनांतील या संघर्षांत जयरामस्वामींनीं सहानुभूतीनें मार्गदर्शन केलेलें दिसतें. याच संघर्षमय मनःस्थितींत ( कदाचित् जयरामस्वामींकडूनच ) तिला वज्रसूचिकोपनिषदानें दिलासा लाभला असावा, असें तिच्या गाथ्यांतील यासंबंधींच्या अभंगांवरून दिसतें.

‘ वज्रसूचिकोपनिषद् ’ हें जन्मजात ब्राह्मण्यावर कठोर आघात करणारें उपनिषद् आहे. तें नव्य उपनिषदांत मोडत असलें, तरी त्याची प्राचीनता इ. स. च्या नवव्या शतकाच्या मागें जाते. याचा रचनाकार कोण, तें समजण्यास साधन नाहीं. इ. स. १८२९ मध्यें याची एक प्रत हडसनला नेपाळांत उपलब्ध झाली. हडसनला तिथें अशी पारंपरिक माहिती ऐकायला मिळाली कीं, याचा कर्ता अश्वघोष ( इ. स. चें दुसरें शतक ) आहे. इ. स. १७१० मध्यें नकललेली एक प्रत नाशिक येथें उपलब्ध झाली. हें उपनिषद् आद्य शंकराचार्यांनीं रचलें आहे, अशी समजूत महाराष्ट्रांत आढळते. इ. स. ९७३–९८१ या काळांत याचा चिनी भाषेंत अनुवाद झाला होता. तिथें त्याचा कर्ता धर्मकीर्ति असल्याचें सांगतात. निर्णयसागर, खेमराज श्रीकृष्णदास आणि सर्वहितैषी कंपनी (काशी ) या संस्थांनीं प्रकाशित केलेल्या उपनिषत्संग्रहांत या उपनिषदाचा समावेश आहे. हें उपनिषद् गद्यांत असून, आकारानें अगदीं छोटें ( क्राउन १ पान ) आहे. ‘ ब्राह्मण

कोण ?' हा या उपनिषदाचा प्रतिपाद्य विषय आहे. जीव, देह, जाति, ज्ञान, कर्म वा धर्म यांनीं ब्राह्मणत्व सिद्ध होत नसून, केवळ अद्वितीय आत्म्याच्या साक्षात्कारानेंच ब्राह्मणत्व सिद्ध होतें, असा याचा मथितार्थ आहे. याची भाषा वज्राच्या टोकासारखी अत्यंत तीव्र असली, तरी त्यांतील तर्कशुद्धता ढळलेली नाहीं. सुधारकांचे अग्रणी राजा राममोहन राय यांच्या विचारविश्वावर या उपनिषदाचा विशेष प्रभाव पडला होता.

बहिणाबाईच्या गाथ्यांत 'ब्रह्मकर्मपर अभंग' या शीर्षकाखालीं ४९ (क्र. ४०४–४५२) अभंग छापलेले आहेत. या विभागांत मला १८ अभंग असे आढळले कीं, त्यांत वज्रसूचिकोपनिषदाचा अनुवाद आहे. या अभंगांचें हें महत्त्व जाणवतांच मीं वज्रसूचिकोपनिषदांतील अंशांच्या अनुरोधानें त्यांची व्यवस्थित मांडणी केली आणि त्या मांडणींतून बहिणाबाईची एक विवेकनिष्ठ कृति मला आपल्यापुढें सादर करतां आली. बहिणाबाईच्या पारमार्थिक जीवनांत आणि महाराष्ट्राच्या उदारमतवादी विचारधारेंत या कृतीचें स्थान विशेष आहे, हें वाचकांना सहजीं जाणवेल.

## श्रीबहिणाबाई-विरचित
## 'वज्रसूचिकोपनिषद्भाष्य'

### ॥ ॐ आप्यायन्त्विति शान्तिः ॥

(सर्व लोक प्रसन्न होवोत.)

**वज्रसूचीं प्रवक्ष्यामि शास्त्रमज्ञानभेदनम् ।**
**दूषणं ज्ञानहीनानां भूषणं ज्ञानचक्षुषाम् ॥ १ ॥**

[ ज्ञानहीनांचें दूषण आणि ज्ञानलोचनांचें भूषण असलेलें वज्रसूची नामक अज्ञानभेदक असें शास्त्र मी सांगतों. ]

**ब्रह्मक्षत्रियवैश्यशूद्र इति चत्वारो वर्णास्तेषां वर्णानां ब्राह्मण एव प्रधान इति वेदवचनानुरूपं स्मृतिभिरप्युक्तम् ॥ २ ॥**

[ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण आहेत. त्या सर्वांत ब्राह्मण हा प्रधान वर्ण आहे, असें श्रुतींनीं व स्मृतींनींहि म्हटलें आहे. ]

१

चहूं वर्णांमाजी वरिष्ठ ब्राह्मण । समीपता जाण मुक्ति त्यांसी ॥ १ ॥
ब्रह्मचि ब्राह्मण बोलताती श्रुति । वचन वंदिती लोकत्रय ॥ २ ॥
ब्राह्मण जालिया नाहीं अधोगती । देव सर्व ध्याती ब्राह्मणासी ॥ ३ ॥
बहिणी म्हणे जें हें गायत्रीचें स्थळ । पाहाया केवळ देह ज्यांचें ॥ ४ ॥

□ □ □

तत्र चोद्यमस्ति को वा ब्राह्मणो नाम कीं जीवः किं देहः किं जातिः किं ज्ञानं किं कर्म किं धार्मिक इति ॥ ३ ॥

[ आतां असा प्रश्न उपस्थित होतो कीं, ब्राह्मण कोण? जीव, देह, जाति, ज्ञान, कर्म, धार्मिकता यांपैकीं कशानें ब्राह्मणत्व सिद्ध होतें? ]

२

ब्राह्मण कोणासी म्हणावें निश्चित । पहावा हा अर्थ विवेकेंचि ॥ १ ॥
मग ते वंदावे भजावे सप्रेमें । मोक्षदानी नेमें वेदवाक्य ॥ २ ॥
जीव देह जाति वर्ण कर्म धर्म । पहावें तें वर्म शोधोनियां ॥ ३ ॥
बहिणी म्हणे ज्ञान पांडित्य ब्राह्मणीं । विवेकेंकरोनी पाहा चित्तीं ॥ ४ ॥

□ □ □

तत्र प्रथमो जीवो ब्राह्मण इति चेत्तन्न । अतीतानागतानेकदेहानां जीवस्यैकरूपत्वाच्च । तस्मान्न जीवो ब्राह्मण इति ॥ ४ ॥

[ आपण प्रथम असा विचार करूं कीं, जीव ब्राह्मण आहे काय? तर तसें नाहीं. अतीत-अनागत अशा सर्व देहांतील जीव एकरूपच आहे. म्हणून जीव ब्राह्मण ठरूं शकत नाहीं. ]

३

जीव हा ब्राह्मण म्हणावा इत्यर्थ । तरी येथें अर्थ सापडेना ॥ १ ॥
सर्वां ठायीं जीव सारिखाचि एक । पशु पक्षी देख चांडाळादि ॥ २ ॥

पुढें जीव होती, मागें बहु झाले । ब्राह्मणत्व आलें नाहीं तयां ॥ ३ ॥
बहिणी म्हणे जीव प्राणिमात्रीं एक । ब्राह्मणत्व देख म्हणों नये ॥ ४ ॥

□ □ □

तर्हि देहो ब्राह्मण इति चेत्तन्न । आचाण्डालादिपर्यन्तानां मनुष्याणां पाञ्चभौतिकत्वेन देहस्यैकरूपत्वाज्जरामरणधर्माधर्मादिसाम्यदर्शनाद्ब्राह्मणः श्वेतवर्णः क्षत्रियो रक्तवर्णो वैश्यः पीतवर्णः शूद्रः कृष्णवर्ण इति नियमाभावात् । पित्रादिशरीरदहने पुत्रादिनां ब्रह्महत्यादिदोषसम्भवाच्च । तस्मान्न देहो ब्राह्मण इति ॥ ५ ॥

[ तर मग देह ब्राह्मण आहे काय? तर तसेंहि नाहीं. चांडाळादि सर्व मनुष्यांचा देह एकसारखा पंचमहाभूतांपासून बनलेला आहे. जरामरणादि धर्म सर्व देहांना सारखेच आहेत. ब्राह्मणाचा वर्ण पांढरा, क्षत्रियाचा तांबडा, वैश्याचा पिवळा व शूद्राचा काळा असाहि कांहीं नियम आढळत नाहीं. जर देह ब्राह्मण असता, तर पित्याच्या मृत देहाला अग्नि दिल्यानें पुत्राला ब्रह्महत्येचेंच पातक लागलें असतें. म्हणून देह ब्राह्मण नाहीं. ]

४

देहचि ब्राह्मण म्हणों जरी आतां । न घडे तत्त्वतां विवेकदृष्टीं ॥ १ ॥
विचारोनी आधीं ब्राह्मण तो कोण । मग तूं भजोन सुखें राहें ॥ २ ॥
देह हे सर्वांचे एकचि जाणिजे । पंचभूतें सहजें तीं सर्वांठायीं ॥ ३ ॥
तारुण्य वार्धक्य बालत्व देहासी । जाणावें जीवासी स्थान तेंचि ॥ ४ ॥
देह तेथें जीव, जीव तेथें देह । ब्राह्मण तो काय म्हणों तया ॥ ५ ॥
बहिणी म्हणे सर्व योनींसी शरीरें । सारिखींचि बा रे विवंचिती ॥ ६ ॥

५

जरा मृत्यु भय सर्वांसी समान । तरी ते ब्राह्मण म्हणों कैसे ॥ १ ॥
यालागीं विवेक धरोनी मानसीं । ब्राह्मणपदासी ओळखावें ॥ २ ॥
मातापितयाच्या जाळिलें शरीरा । ब्रह्महत्या नरा केवीं नोहे ॥ ३ ॥
बहिणी म्हणे देह ब्राह्मण तो नव्हे । विवेकवैभवें विचारितां ॥ ४ ॥

६

आतां वर्ण हाचि ब्राह्मण म्हणावा । तरी तो अनुभवा न ये कांहीं ॥ १ ॥
ब्राह्मण वेगळा वर्णांही अतीत । पाहतां निश्चित भासतसे ॥ २ ॥
श्वेत तो ब्राह्मण, क्षत्रिय आरक्त । वैश्यवर्ण पीत नाहीं ऐसें ॥ ३ ॥
कृष्णवर्ण शूद्र नाहीं ऐसा भेद । आयुष्याचा बांध सारिखाचि ॥ ४ ॥
बहिणी म्हणे वर्ण ब्राह्मण तो नव्हे । विवंचूनि पाहें मनामाजीं ॥ ५ ॥

□ □ □

तर्हि जातिर्ब्राह्मण इति चेत्तन्न । तत्र जात्यन्तरजन्तुष्वनेकजातिसम्भवा महर्षयो बहवः सन्ति । ऋष्यशृंगो मृग्याः, कौशिकः कुशात्, जम्बूको जम्बूकात्, वाल्मीकि वल्मीकात्, व्यासः कैवर्तककन्यकायां, शशपृष्ठात् गौतमः, वसिष्ठ उर्वश्यां, अगस्त्यः कलशे जात इति श्रुतत्वात् । एतेषां जात्या विनाप्यग्रे ज्ञानप्रतिपादिता ऋषयो बहवः सन्ति । तस्मान्न जातिर्ब्राह्मण इति ॥ ६ ॥

[ तर मग जाति ब्राह्मण आहे काय ? नाहीं. कारण मानवेतर योनींत जन्म घेऊनहि महर्षिपद पावलेले पुष्कळ जण आहेत. ऋष्यशृंग हरिणीपासून, कौशिक दर्भापासून, जंबूक कोल्ह्यापासून, वाल्मीकि वारुळांतून, व्यास कोळ्याच्या मुली-पासून, गौतम सशाच्या पाठींतून, वसिष्ठ उर्वशीपासून, अगस्त्य कलशांतून जन्मलेला आहे, असें सांगतात. हे सर्व जण जातिबाह्य असूनहि ज्ञानाचे अधिकारी बनूं शकले. म्हणून जाति ब्राह्मण नाहीं. ]

७

आतां यातीलागी म्हणावें ब्राह्मण । तरी तें निर्वाण न ये चित्ता ॥ १ ॥
निरसोनी सर्व विचारा वेदांतें । उरे तें आयतें ओळखावें ॥ २ ॥
ऋषि शृंगी झाला मृगीचिये पोटीं । गौतम शेवटीं कुशास्तरणीं ॥ ३ ॥
जंबूक तो ऋषि जन्मला जांबुळीं । वाल्मीकाची कुळी वारुळीं ते ॥ ४ ॥
कैवर्तकीपोटीं व्यास तो जन्मला । विश्वामित्र जाला क्षत्रणीचा ॥ ५ ॥
वसिष्ठाचा जन्म उर्वशीउदरीं । अगस्ति निर्धारीं कलशोद्भव ॥ ६ ॥

नारद प्रसिद्ध ठाउका सर्वांसीं । दासी हे तयासी प्रसवली ॥ ७ ॥
बहिणी म्हणे याति नव्हेचि ब्राह्मण । ब्राह्मणाची खूण वेगळीच ॥ ८ ॥

□ □ □

तर्हि ज्ञानं ब्राह्मण इति चेत्तन्न । क्षत्रियादयोऽपि परमार्थदर्शिनोऽभिज्ञा बहवः सन्ति । तस्मान्न ज्ञानं ब्राह्मण इति ॥ ७ ॥

[ तर मग ज्ञान ब्राह्मण आहे काय ? नाहीं. अनेक क्षत्रियादि ब्राह्मणेतरहि परमार्थदर्शी ज्ञानी आहेत. म्हणून ज्ञान ब्राह्मण नाहीं. ]

८

म्हणों जरी आतां ब्राह्मण पंडितां । न माने तत्त्वतां मना तेंही ॥ १ ॥
जाणता विवेक निवडी तो बरा । ब्राह्मण तो खरा ज्ञानवंत ॥ २ ॥
क्षत्रिय वैश्य शूद्र ब्राह्मणादि सर्व । पांडित्य अपूर्व करिती सर्व ॥ ३ ॥
पदपदार्थाचें करिती विवरण । सर्व वर्ण जाण काव्य-अर्थ ॥ ४ ॥
अविंधादिकही करिती पांडित्य । ब्राह्मण त्या तथ्य कोण मानी ॥ ५ ॥
बहिणी म्हणे ऐसें वोळखावें जनीं । ब्राह्मण निर्वाणीं कोण कैसें ॥ ६ ॥

□ □ □

तर्हि कर्म ब्राह्मण इति चेत्तन्न । सर्वेषां प्राणिनां प्रारब्धसञ्चितागामिकर्मसाधर्म्यदर्शनात्कर्मभिप्रेरितः सन्तो जनाः क्रियाः कुर्वन्तीति । तस्मान्न कर्म ब्राह्मण इति ॥ ८ ॥

[ तर मग कर्म ब्राह्मण आहे काय ? नाहीं. सर्व प्राण्यांच्या प्रारब्ध, संचित व आगामी कर्मांत समानता दिसते. कर्मानें अभिप्रेरित होऊनच सर्व लोक कर्म करतात. म्हणून कर्म ब्राह्मण नाहीं. ]

९

आतां म्हणों जरी कर्म तें ब्राह्मण । चहूं वर्णीं जाण कर्म आहे ॥ १ ॥
म्हणोनि न म्हणावे कार्मिक ब्राह्मण । आहे तेचि खूण वेगळीच ॥ २ ॥

आपुल्याचि कर्मीं वर्तताती वर्ण । तयांसी ब्राह्मण म्हणों नये ॥ ३ ॥
बहिणी म्हणे कर्म विचारतां पाहे । ब्राह्मणत्व नोहे कर्मासी तें ॥ ४ ॥

१०

शास्त्रासी प्रमाण आपुलालें कर्म । वर्णाचा स्वधर्म आचरती ॥ १ ॥
तयांसी ब्राह्मण कैसेनि बोलिजे । विचार हा कीजे मनामाजीं ॥ २ ॥
कोणे वर्णीं कर्म शास्त्र न बोलेचि । आज्ञा समर्थांची सर्वांवरी ॥ ३ ॥
बहिणी म्हणे वेदाप्रमाणें चालती । सर्व त्या बोलती ब्राह्मण केवीं ॥ ४ ॥

□ □ □

तर्हि धार्मिको ब्राह्मण इति चेत्तन्न । क्षत्रियादयो हिरण्यदातारो बहवः सन्ति । तस्मान्न धार्मिको ब्राह्मण इति ॥ ९ ॥

[ तर मग काय धार्मिक ब्राह्मण आहे ? नाहीं. हिरण्यदान करणारे क्षत्रियादि ब्राह्मणेतर अनेक आहेत. म्हणून धार्मिक ब्राह्मण नाहीं. ]

११

आतां धर्म यासी म्हणावें ब्राह्मण । तरी हें अप्रमाण दिसतसे ॥ १ ॥
ब्राह्मण ते भिन्न जाणते जाणती । ज्ञानी ओळखती आत्मदृष्टीं ॥ २ ॥
ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य-शूद्र जाण । धर्म हा प्रमाण सांगितला ॥ ३ ॥
अन्नदान, द्रव्यगोदानादि सर्व । चहूं वर्णीं भाव सारिखाचि ॥ ४ ॥
बहिणी म्हणे धर्म नव्हे तो ब्राह्मण । ब्रह्मपरीक्षण वेगळेंचि ॥ ५ ॥

१२

स्वर्गलोकप्राप्ति होय जया धर्में । ब्राह्मण उत्तम तेही नव्हती ॥ १ ॥
ब्रह्म जाणे तोचि ब्राह्मण बोलिजे । येर तें सहजें ब्रह्मबीज ॥ २ ॥
नाना यज्ञ दान अनुष्ठान तप । ब्राह्मणाचें रूप तेंही नोहे ॥ ३ ॥
बहिणी म्हणे किती सांगावें मनासी । ओळखी हे कैसी ब्राह्मणाची ॥ ४ ॥

□ □ □

तर्हि को वा ब्राह्मणो नाम । यः कश्चिदात्मानमद्वितीयं जातिगुणक्रियाहीनं षडूर्मिषड्भावेत्यादिसर्वदोषरहितं सत्यज्ञानानन्दस्वरूपं स्वयं निर्विकल्पमशेषकल्पाधारमशेषभूतान्तर्यामित्वेन वर्तमानमन्तर्बहिश्चाकाशवदनुस्यूतमखण्डानन्दस्वभावमप्रमेयमनुभवैकवेद्यमपरोक्षतया भासमानं करतलामलकवत्साक्षादपरोक्षीकृत्य कृतार्थतया कामरागादिदोषरहितः शमदमादिसम्पन्नो भावमात्सर्यतृष्णाशामोहादिरहितो दम्भाहङ्कारादिभिरसंस्पृष्टचेता वर्तत एवमुक्तलक्षणो यः स एव ब्राह्मण इति श्रुतिस्मृतिपुराणेतिहासानामभिप्रायः । अन्यथा हि ब्राह्मणत्वसिद्धिर्नास्त्येव । सच्चिदानन्दमात्मानमद्वितीयं ब्रह्म भावयेदात्मानं सच्चिदानन्दं ब्रह्म भावयेदित्युपनिषत् ॥ १० ॥

[ तर मग ब्राह्मण कोण ? अद्वितीय, जातिगुणक्रियाहीन, षडूर्मि–षड्भावादि–दोषरहित, सत्यज्ञानानंदस्वरूप, निर्विकल्प, अशेषकल्पाधार, सर्व भूतांच्या अंतर्यामीं राहणारा, आंत-बाहेर सर्वत्र आकाशाप्रमाणें व्यापून असलेला, अखंडानंदस्वभाव, अप्रमेय, केवळ अनुभवाचा विषय असलेला व अपरोक्षतेनें भासमान होणारा असा जो आत्मा, त्याचा अपरोक्षानुभव जो कोणी घेतो आणि षड्विकारांचा त्याग करून व शमदमादि गुणांनीं संपन्न बनून कृतार्थतेनें राहतो, तोच केवळ ब्राह्मण होय, असा श्रुति, स्मृति, पुराणें व इतिहास यांचा अभिप्राय आहे. अन्य कोणत्याहि प्रकारें ब्राह्मणत्व सिद्ध होऊं शकत नाहीं. म्हणून मानवानें सच्चिदानंदस्वरूप अद्वितीय आत्मतत्त्वाचीच उपासना करावी. ]

## १३

ब्राह्मण तो एक सांगेन इत्यर्थ । जेणें हा वेदार्थ सांठविला ॥ १ ॥
वेदांहीं प्रमाण तोचि असे केला । वरिष्ठ तो भला गुरु सर्वां ॥ २ ॥
थोर नाहीं दुजें ब्राह्मणावांचोनी । कैवल्य ज्याचेनि प्राप्त होय ॥ ३ ॥
मोक्षा अधिकारी जयाचेनि शब्दें । जळतीं प्रारब्धें दृष्टिमात्रें ॥ ४ ॥
ब्रह्म ब्राह्मणासी नसे अणुभेद । साधा हें निर्द्वंद्व तयापाशीं ॥ ५ ॥
बहिणी म्हणे चिन्ह कोण त्याचे जाणे । विवेकें शहाणे वोळखिती ॥ ६ ॥

## १४

गुणांत असोनी गुणांसी नातळे । क्रियेसी नाकळे अणुमात्र ॥ १ ॥
तोचि गा ब्राह्मण वोळखावा जनीं । द्वैत जया स्वप्नीं आडळेना ॥ २ ॥

षडूर्मीरहित षड्भाव नातळे । दोषांचेनि मेळें सापडेना ॥ ३ ॥
बहिणी म्हणे सत्य न संडी सर्वथा । ब्राह्मण तत्त्वतां तोचि एक ॥ ४ ॥

१५

निर्विकल्प जया समाधि जोडली । चित्तासी अमोलीं परब्रह्मीं ॥ १ ॥
तोचि एक खरा ब्राह्मण वेदार्थें । आणिक तीं मतें पाखंडाचीं ॥ २ ॥
सर्वां भूतीं एक आत्मा देखियेला । शांतीचा वोतिला मूर्तिमंत ॥ ३ ॥
बहिणी म्हणे जैसें आकाश सर्वत्र । तैसा तो एकत्र जगामाजी ॥ ४ ॥

१६

अंतर्बाह्य एक अखंड अद्वय । प्रत्यक्ष प्रमेय अनुभवें ॥ १ ॥
तयासीच जाण म्हणावें ब्राह्मण । जयाचें निर्वाण परब्रह्मीं ॥ २ ॥
अनपेक्षा जयाचें आंदण हें जाण । करतल विज्ञान हातीं वसे ॥ ३ ॥
बहिणी म्हणे काम क्रोध सर्व गेले । तेथेंचि राहिलें ब्राह्मणत्व ॥ ४ ॥

१७

शमदम सर्व साधिले नवगुण । संतोषें संपन्न सर्वदा जो ॥ १ ॥
ब्राह्मण वरिष्ठ श्रेष्ठांचाही श्रेष्ठ । जयाचेनि भ्रष्ट मोक्ष पावे ॥ २ ॥
तृष्णा मोह दंभ गेला अहंकार । वृत्ति निर्विकार सर्व कर्मीं ॥ ३ ॥
बहिणी म्हणे ज्याची निमाली वासना । ब्राह्मण तो जाणा ब्रह्मनिष्ठ ॥ ४ ॥

१८

ब्रह्मभाव देहीं सदा सर्वकाळ । ब्राह्मण केवळ तोचि एक ॥ १ ॥
श्रुति स्मृति साक्ष करोनि बोलिले । नाहीं म्यां ठेविलें गुज कांहीं ॥ २ ॥
ब्रह्मींच सर्वदा वर्तती इंद्रियें । ब्राह्मण तो होय याचि अर्थें ॥ ३ ॥
बहिणी म्हणे ब्रह्मीं नांदे तो ब्राह्मण । यातीशीं प्रमाण नसे तेथें ॥ ४ ॥

॥ ॐ आप्यायन्त्विति शान्तिः ॥

[ सर्व लोक प्रसन्न होवोत. ]

॥ इति वज्रसूच्युपनिषत्समाप्ता ॥

* * *

# प्रस्तावनेची सूची


' अनुभवामृतपदबोधिनी ' ५८
आजगांवकर ज. र. २४
आत्मकथन-पत्रांतील ३८-४०
आत्मकथन-बहेरूचें ३१-३३
आत्मकथनविमुखता ९-१०
आत्मकथन-स्फुट ( संतांचें ) १४-२०
आत्मकथनात्मक वाङ्मय-वर्गीकरण १३-१४
आत्मचरित्र-आनंदमूर्ति २७-२८
आत्मचरित्र-कचेश्वर ५२-५६
आत्मचरित्र-गंगाधरशास्त्री ४१,४३-४४
आत्मचरित्र-चक्रधर १८-१९
आत्मचरित्र-नाना फडणीस ४१-४३
आत्मचरित्र-नामदेव २०-२४
आत्मचरित्र-निरंजन माधव २४-२७
आत्मचरित्र-निरंजन रघुनाथ ५६-६१
आत्मचरित्र-बहिणाबाई ४६-५१
आत्मचरित्र-बापू कान्हो ४१,४४-४५
आत्मचरित्र-विठाबाई २८-३१
आत्मचरित्रें-गद्य ४०-४५
' आदि '-कचेश्वर ५२-५६
' आदि '-नामदेव ३४
आत्मगौरव-अप्रत्यक्ष ११-१२
आत्माभिव्यक्ति १२-१३
' आनंदचरितामृत ' २७
आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर २७-२८
आपटे द. वि. ३९
आवळसकर शां. वि. ३९
आवळीकर पंडित २२
' इतिहाससंग्रह ' ४४-४५
एकनाथ १४,१५
' ऐतिहासिक साधनें ' ३९
ओतुरकर रा. वि. ३९
कचेश्वर १३, १८, २८, ५२-५६
' काव्येतिहाससंग्रह ' ४१
' केनोपनिषत्-टीका ' ५८
कोल्हते वि. मि. १८-१९
कोल्हटकर य. व्यं. ५६
गंगाधरशास्त्री ( पटवर्धन ) ४३-४४
गंगावती २५-२६
' गंगास्तव ' ३६-३७
' गजेंद्रमोक्ष ' ५२
गिरिधरस्वामी ३५-३६
' गुरुगीता ' २५
चंडीराममहाराज ५९
चक्रधरस्वामी १८-२०
' चक्रधरचरित्र ' १८-१९
' चक्रपाणिचरित्र ' १८
चिदंबर दीक्षित २८-३१

' जुनें वाङ्मय–नवें संशोधन ' २८
जोशी चिं. नी. २४
ठाकुरदास ५६, ५९
' तीर्थावळी ' ३३–३४
तुकाराममहाराज १२–१३, १४
तुळपुळे शं. गो. २२–२४, ३८, ४०
त्र्यंबक १६
' त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या ' ३७
' दासबोध ' ११, ३२
दीनता–संतांची १०–११
देव शं. श्री. ३२, ४०
नागदेवाचार्य १८–१९
नाना फडणीस ४१–४३
नामदेव २०–२४, ३३–३४
' नामदेवगाथा ' २०–२४
नारायणमहाराज ( जालवणकर ) ५८
' नित्यानंदैक्यदीपिका ' १६
निफाडकर नाथ २४
निरंजनदास २५–२७
निरंजन माधव २४–२७
निरंजन रघुनाथ १३, १८, ५६–६१
' निरंजन रघुनाथांचे ग्रंथ ' ५६
पंगू द. सी. २४
पटवर्धन पां. न. ४३
पांगारकर ल. रा. १६, २४, ३६–३७
' पांच संतकवि ' २२–२४
पारसनीस द. ब. ४४
पोतदार द. वा. २४, ४३
' प्राचीन मराठी गद्य ' ३८, ४०
प्रियोळकर अ. का. ३६, ६२
बहिणाबाई १३, १८, ४६–५१
' बहिणाबाईचा गाथा ' ४६
बहेरू ३१–३३
बळभीमबुवा ( साडेकर ) ५८
' बालबोध ' १६
भावे वि. ल. २४
महाडिक ए. कृष्णस्वामी ३८
' महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास ' ३९
मुकुंद ( दीन दत्तपदांकित ) ३४–३५
मृत्युंजयस्वामी १६
मोरोपंत ३६–३७
' मोरोपंतचरित्र ' ३७
म्हाइंभट १८–१९
यात्रावर्णनें ३३–३८
' रघुनाथचरित्र ' ५८
रमावल्लभदास १५
राजाराम २९–३१
' रावबहादुर दादोबा पांडुरंग ' ६२
लागू रा. कृ. ६२
' लीळाचरित्र ' १८–१९
विनय ( संतांचा ) १०–११
' विविधा ' ३४
विष्णुबुवा ब्रह्मचारी ५८
शरफोजी ३७–३८
शांताश्रम ५८
शिवकल्याण १६
शिवदिन केसरी १६
शिवाजीमहाराज ३८–४०

'श्रीसंप्रदायाचीं कागदपत्रें' ४०
संतांच्या आत्मकथा व चरित्रकथा (तुलना) ६३–६४
संतांच्या आत्मकथा–मूल्यमापन ६२
संप्रदायपरिमळ' २४–२७
सबनीस पां. जि. २४
समर्थपंचायतन २७
'समाधि' (नामदेव) ३४
'सरस्वतीमंदिर' ५२
साने का. ना. ४१
'साक्षात्कार' ५७
'सुदामचरित्र' ५२
सेंट ऑगस्टिन १३
सेंट पॉल १३
'स्वरूपसमाधान' १६
'स्वात्मप्रचीति' ५६–६१
'ज्ञानप्रदीप' १६
ज्ञानेश्वर ११, १२, १४, ३३
ज्ञानेश्वरी ९–१०, ११, १२

* * *

REFBK-0016308
REFBK-0016308

# संदर्भ-साहित्य


१. संत बहिणाबाईकृत कवितासंग्रह, भाग पहिला : संपा. धोंडू विश्वनाथ उमरखाने. पुणें, १९१३.

२. संत बहिणाबाईचा गाथा : संग्रा. विश्वनाथ नारायण कोल्हारकर. पुणें, १९२६.

३. श्रीसंत बहिणाबाई यांची अभंगांची गाथा : चित्रशाळा प्रकाशन, पुणें, १९५६.

४. लीळाचरित्र–एकांक : संपा. डॉ. शं. गो. तुळपुळे. पुणें, १९६४.

५. ज्ञानेश्वरी : संपा. वि. का. राजवाडे. धुळें.

६. नामदेवगाथा : प्रका. त्र्यंबक हरी आवटे. पुणें, १९०८.

७. श्रीरमावल्लभदासांची गाथा : संपा. सुब्राव गोपाळ उभयकर. नारायणपूर–हुबळी, १९२८.

८. दासबोध : संपा. शंकर श्रीकृष्ण देव. धुळें.

९. तुकारामगाथा : संपा. पु. मं. लाड. महाराष्ट्र शासन प्रकाशन, मुंबई.

१०. श्रीगिरिधरकृत काशीखंड व काशीयात्राकथन : संपा. गणेश शंकर देव. धुळें, १९४७.

११. श्रीआनंदचरित्रामृत : संपा. शंकर पांडुरंग ओक. सांगली, १९३५.

१२. निरंजन रघुनाथांचे ग्रंथ : संपा. य. व्यं. कोल्हटकर. सांगली, १९३५.

१३. निरंजन माधवांचा कवितासंग्रह, भाग पहिला : संपा. ल. रा. पांगारकर पुणें, १९११.

१४. निरंजन माधव–विरचित सुभद्रास्वयंवर : संपा. रामचंद्र चिंतामण ढेरे. पुणें, १९६७.

१५. त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या : संपा. ए. कृष्णस्वामी महाडिक. तंजावर, १९५१.

१६. मोरोपंतांचे समग्र ग्रंथ, खंड दहावा (स्फुट काव्यें, भाग पहिला) : संपा. प्रा. अ. का. प्रियोळकर. मुंबई, १९६१.

१७. ऐतिहासिक साधनें : संपा. शां. वि. आवळसकर. मुंबई, १९६३.

१८. श्रीसंप्रदायाचीं कागदपत्रें, खंड पहिला : संपा. शंकर श्रीकृष्ण देव. धुळें, १९१५.
१९. ऐतिहासिक पत्रें, यादी वगैरे : संपा. काशीनाथ नारायण साने. पुणें, १८८९.
२०. इतिहाससंग्रहांतील ऐतिहासिक स्फुट लेख (भाग तिसरा) : द. ब. पासनीस.
२१. सनदापत्रांतील माहिती : संपा. पुरुषोत्तम विश्राम मावजी आणि द. ब. पारसनीस. पुणें, १९१३.
२२. महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास : संपा. कै. द. वि. आपटे आणि प्रा. रा. वि. ओतुरकर. पुणें, १९६३.
२३. प्राचीन मराठी गद्य : संपा. डॉ. शं. गो. तुळपुळे. पुणें, १९६१.
२४. महाराष्ट्र-सारस्वत : वि. ल. भावे, डॉ. शं. गो. तुळपुळे. पुणें, १९६३.
२५. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा : ल. रा. पांगारकर. मुंबई, १९३५.
२६. रामदासी संशोधन, खंड पहिला : शंकर श्रीकृष्ण देव. धुळें, १९६३.
२७. जुनें वाङ्मय – नवें संशोधन : डॉ. पंडित आवळीकर. धारवाड, १९६४.
२८. तुकाराममहाराज यांचे संतसांगाती : वा. सी. बेंद्रे. मुंबई, १९५८.
२९. मोरोपंत-चरित्र आणि काव्यविवेचन : ल. रा. पांगारकर. मुंबई, १९४३.
३०. विविधा : रामचंद्र चिंतामण ढेरे. पुणें, १९६७.
३१. रावबहादुर दादोबा पांडुरंग : प्रा. अ. का. प्रियोळकर. मुंबई; १९४७.
३२. भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, ३.१
३३. भारत इतिहास संशोधक मंडळ वार्षिक इतिवृत्त, शके १८३४।२
३४. भारत इतिहास संशोधक मंडळ वार्षिक इतिवृत्त, शके १८३५
३५. संशोधक त्रैमासिक, १३.२
३६. श्रीसरस्वतीमंदिर मासिक पुस्तक, ८.११–१२
३७. इतिहाससंग्रह, १.५
३८. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड सातवा : भा. इ. सं. मंडळ, पुणें.

★ ★ ★